REFBK-0002711

प्रथमावृत्ति ]  सन १९२९.  [ किंमत १॥ रु.

मुद्रक व प्रकाशक—रामचंद्र नारायण मंडलीक, बी. ए.
लोकमान्य छापखाना, रास्तीबाई बिल्डिंग,
गिरगांव, मुंबई नं. ४.

# अनुक्रमणिका.


| विषय | | पृष्ठें |
|---|---|---|
| | प्रस्तावना ... ... ... ... | १—८ |
| १ | अरविंद बाबूंच्या खटल्यांतील भाषण ... | ९—१५ |
| २ | दे. नारायणराव वैद्य यांच्या खटल्यांतील भाषण ... | १६—२३ |
| ३ | सुरेंद्रनाथांचें स्थित्यंतर ... ... ... | २४—३७ |
| ४ | एक भयंकर अन्याय ... ... ... | ३८—४८ |
| ५ | असहकारिता ... ... ... ... | ४९—५१ |
| ६ | गया काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून ... ... | ५२—९८ |
| ७ | अध्यक्षपदाचा राजीनामा ... ... ... | ९८–१०० |
| ८ | मुंबईकडील मोहीम ... ... ... | १००–१०२ |
| ९ | पुणें म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास उत्तर ... | १०३–१०४ |
| १० | प्रतियोगी सहकारितेचें रहस्य ... ... | १०५–१०६ |
| ११ | शिवाजीमंदिरांतील टोलेजंग सभा ... ... | १०६–११० |
| १२ | मद्रासेंतील पहिलें व्याख्यान... ... ... | १११–१२७ |
| १३ | मद्रासेंतील दुसरें व्याख्यान ... ... ... | १२७–१२९ |
| १४ | तेल गेलें तूप गेलें, धुपाटणें हातीं आलें ! ... | १२९–१३३ |
| १५ | श्री. राजगोपाळाचार्यांस उत्तर ... ... | १३३–१४१ |
| १६ | स्वराज्य पार्टीच्या टीकाकारांस ... ... | १४२–१४६ |
| १७ | नागपूरची ऑल इंडिया काँग्रेस कमिटी ... | १४६–१४९ |
| १८ | स्वराज्य पक्षाचा नूतन कार्यक्रम ... ... | १४९–१५९ |
| १९ | ‘दरिद्र नारायणा’ची सेवा ... ... ... | १६०–१६२ |

# कै. देशबंधु दास

यांचीं

# निवडक भाषणें.

REFBK-0002711

| विषय | | पृष्ठें |
|---|---|---|
| २० जादा कॉंग्रेस व स्वराज्य पक्षाचा विजय | ... | १६३–१६६ |
| २१ मीहि गुन्हेगार आहें ! मला कां पकडीत नाहीं ? | ... | १६७–१७३ |
| २२ घरांच्या झडत्या व धरपकड | ... ... | १७३–१७६ |
| २३ क्रांतिकारकांबरोबर सरकारचाहि धिक्कार करा ! | ... | १७६–१८१ |
| २४ परकीयांचे खिसे भरूं नका ! | ... | १८१–१८२ |
| २५ बेळगांव कॉंग्रेसमधील भाषण | ... ... | १८३–१८५ |
| २६ बंगाल कौन्सिलांतील भाषण | ... ... | १८५–१९३ |
| २७ देशबंधूंची अखेरची घोषणा... | ... ... | १९३–२१० |
| देशबंधूंचें अल्प चरित्र | ... ... ... | २११–२२६ |



आठ वर्षांचें दासबाबू.

# प्रस्तावना.

देशबंधु चित्तरंजन दास यांच्या अकालिक मृत्यूमुळें सर्व देश आज हळहळत आहे. " त्यांचें निधन ही एक भीषण राष्ट्रीय आपत्ति आहे " हीच भावना आज सर्वांच्या अंतःकरणांत वसत आहे. देशबंधूंच्या निधनामुळें ज्याप्रमाणें राष्ट्रीय सभेतील व स्वराज्यपक्षांतील त्यांच्या सहकारी मित्रांसमोर व अनुयायी वर्गासमोर " आतां यापुढील कार्याची दिशा कोणती " असा प्रश्न उपस्थित झाला आहे, त्याचप्रमाणें त्यांच्या अकल्पित मृत्यूमुळें देशांतील तरुण पिढीच्या दृष्टीसमोर गेलीं पांच वर्षें अव्याहत उभें असलेलें एक दिव्य दृश्य एकाएकी अदृश्य झालेलें आहे. देशबंधु दास यांच्याशीं ज्यांचा सदासर्वदा मतविरोध होता, त्यांना देखील देशबंधूंच्या ठिकाणीं उत्कटतेनें वास करीत असलेल्या अनेक सद्गुणांमुळें त्यांच्याविषयीं आदर व पूज्यबुद्धि वाटत होती. जाज्वल्य देशप्रीति, अतुल स्वार्थत्याग, अलोट धैर्य, कुशाग्र बुद्धि हे त्यांचे गुण इतक्या उज्ज्वलतेनें गेल्या पांच वर्षांत प्रकट झाले होते कीं त्या बाबतींत देशबंधूंची तुलनाच करावयाची म्हटल्यास गेल्या शंभरीदोंशें वर्षांत जे लहानमोठे अनेक पुढारी व कार्यकर्ते या देशांत होऊन गेले त्यांतून फक्त कै० लोकमान्य टिळक यांचाच निर्देश करतां येणें शक्य आहे. या त्यांच्या नैसर्गिक उज्ज्वल गुणांस असामान्य कर्तृत्व व संघटनाकौशल्य या दोन दुर्लभ शक्तींची जोड मिळाल्यामुळें सर्व भरतखंडास व भरतखंडाचे बाहेरील जगास देशबंधु दास हेच प्रचलित भारतीय राजकीय चळवळीचें केंद्रस्थान आहेत ही गोष्ट मान्य करावी लागली. देशबंधूनें आपल्या कर्तृत्वाचे जोरावर देशांतील राष्ट्रीयपक्षाचें धुरीणत्व संपादन केलें. गेल्या दोन वर्षांत हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीची नौका त्यांनीं मोठ्या कुशलतेनें, धैर्यानें आणि धडाडीनें चालवून आणि अनेक गुप्त व प्रकट सरकारी व बिनसरकारी संकटांस युक्तिप्रयुक्तीनें तोंड देऊन " राजकीय पुढारी " या दृष्टीनें जी योग्यता लोकांच्या प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिली, तिचें विस्मरण हिंदी जनतेच्या पुढील कित्येक पिढ्यांस कदापि होणें शक्य नाहीं. जेव्हां हिंदुस्थानला स्वराज्याचे खरे हक्क प्राप्त होऊन राजकीय स्वातंत्र्याकरितां हिंदी जनतेनें चालविलेल्या प्रयत्नांचा इतिहास लिहिण्याचा मंगल प्रसंग भरतखं-

होतील भावी इतिहासकारांस प्राप्त होईल, तेव्हां देशबंधूंच्या चरित्राचें आणि कर्तृत्वाचें वर्णन त्याला सुवर्णाक्षरांनीं लिहावें लागेल. इतक्या उज्ज्वल भावनेनें आणि उदात्त कल्पनांनीं तें खचून भरलेलें आहे.

देशबंधु दास यांच्या बुद्धिमत्तेची व कर्तृत्वाची योग्य कल्पना येण्यास त्यांच्याकडे कोणत्या परिस्थितींत राजकीय चळवळीचें अध्वर्युत्व आलें याचा थोडासा विचार करणें आवश्यक आहे. ज्या प्रांतांत व ज्या शहरांत देशबंधु दास हे राहत असत तो प्रांत हिंदुस्थानांतील सर्व राजकीय चळवळींत गेल्या ४०-५० वर्षांत अग्रेसरत्व मिळवून बसलेला आहे. त्यामुळें देशास सर्वतोपरी पूज्य व वंद्य अशा पुढाऱ्यांची आणि देशभक्तांची अविच्छिन्न परंपरा गेल्या शतकार्धांत त्या प्रांतांत उत्पन्न झालेली आहे. बंगाल्यांत उत्पन्न झालेल्या लहानमोठ्या चळवळींचा परिणाम सर्व देशावर, झालेला आहे आणि पर्यायानें देशांत उत्पन्न झालेल्या 'नवजीवना'चें आणि 'कार्यप्रवण चैतन्यसंचारा'चें बरेंच मोठें श्रेय बंगभूमीसच देणें उचित आहे. सर सुरेंद्रनाथ बानर्जी आणि अरविंद घोष या दोन बंगाली व्यक्तींनां सर्व भरतखंडाचें लक्ष कित्येक वर्षेपर्यंत आपणाकडे वेधून घेतलेलें होतें. बंगालच्या फाळणीपासून राष्ट्रीय चळवळीची जबाबदारी एकट्या बंगालनें वाहूनच आतां निभाव लागणार नाहीं असा विचार कै० लोकमान्य टिळक यांनीं, त्या चळवळीचे प्रसंगीं राष्ट्रीय सभेंतून जीं भाषणें केलीं व वादविवाद केले त्यांतून प्रकट केला व सर्व हिंदुस्थानच्या आकांक्षांस कांहीं तरी दिव्य पण व्यवहार्य ध्येयाची जोड देऊन त्याबरोबरच बंगालच्या फाळणीमुळें उत्पन्न झालेल्या प्रचंड लोकक्षोभाचा ओघ वरील सर्व भारतीय उच्च ध्येयाचे सिध्यर्थ युक्तिप्रयुक्तीनें वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. या त्यांच्या प्रयत्नामुळेंच देशांतील राजकीय पुढाऱ्यांत दोन तट पडले. बंगालचे फाळणीकरितां प्रचंड चळवळ करणार सर सुरेंद्रनाथ सर्व भारतीय आकांक्षा पूर्ण करणाऱ्या स्वराज्यप्राप्तीकरितां कराव्या लागणाऱ्या अखिल भारतीय आंदोलनाचें नेतृत्व पत्करण्यास तयार नसल्यामुळें खास बंगालच्या नवजवान तरुणांचे डोळे कै० लोकमान्य टिळक यांजकडे लागले. या आणीबाणीचे प्रसंगीं बंगालच्या पुराणपुढाऱ्यांची भीड न ठेवतां, संयुक्त बंगाल्यांत उत्पन्न झालेल्या नवीन

शास्त्रांचें शस्त्र लोकमान्यांच्या हातांत देऊन त्यांचे पाठीमागें पाउलावर पाऊल देऊन चालण्याचें आश्वासन ज्यांनीं दिलें त्यांपैकीं कै० देशबंधु दास हे प्रमुख होते. तेव्हांपासून लोकमान्यांच्या शोचनीय निधनदिवसापर्यंत देश-बंधु दास हे लोकमान्य टिळकांचे अत्यंत विश्वासू सहकारी या नात्यानेंच कार्य करीत होते. लोकमान्यांच्या ठिकाणीं असलेल्या स्वार्थत्याग, देशभक्ति, अविरत उद्योग आणि उच्च ध्येयास पोषक असा तेजस्वी पण व्यवहार्य कार्य-क्रम जनसमूहापुढें मांडण्यांत दिसून येणारें बुद्धिकौशल्य, इत्यादि अनेक गुणांचा त्यांचे मनावर विलक्षण परिणाम झाल्यामुळें, राजकीय चळवळीकडे दुरून 'प्रशमाततपर तटस्थ' या दृष्टीनें न पाहतां त्यांत प्रत्यक्ष भाग घेऊन लोकमत प्रतिकारसंपन्न करण्याचें कार्य करण्याकडे त्यांच्या मनाचा कल दिवसेंदिवस वाढूं लागला. देशांत उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांच्या विवेचनेंत त्यांचा काळ पूर्वीपेक्षां अधिकाधिक जाऊं लागला आणि त्यामुळें स्वतःच्या व्यवसायाकडे स्वाभाविकपणेंच त्यांचें दुर्लक्ष होऊं लागलें. कै० लोकमान्य टिळक हे विलायतेंत असतांना दिल्ली येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत त्यांना राष्ट्रीयपक्षाचें अध्वर्युत्व करावें लागलें आणि अनं-तर येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे प्रसंगीं महात्मा गांधी आणि लोक-मान्य टिळक या दोन प्रचंड व्यक्तींमधील मतभेद तात्पुरता मिटून संमट-रूपाचा ठराव राष्ट्रास एकमतानें पास करतां आला त्याचें श्रेयहि देशबंधु दास यांच्या मध्यस्थीकडेच आहे. अशा तऱ्हेनें मोठमोठ्या वावटळींतून राष्ट्रीय चळवळीची नौका सुखरूप बाहेर काढून तिला योग्य मार्गावर आण-ण्याचें काम त्यांच्या हातून बऱ्याच मोठ्या प्रमाणांत होऊं लागल्यामुळें महात्मा गांधी यांचा हिंदी राजकारणांत प्रवेश झाला नसता तर लोकमान्यांच्या पश्चात् राष्ट्रीय पक्षाचें धुरीणत्व आपोआपच त्यांच्याकडे गेलें असतें. या अवधींत बंगालचे फाळणीचे वेळीं प्रसिद्धीस आलेले बाबू अरविंद घोष हे हद्दपार झाल्यामुळें व त्याचप्रमाणें विपिनचंद्र पाल या दुसऱ्या पुढाऱ्याच्या मतांत स्थैर्याचा योग्य प्रमाणांत दृष्टीस पडत नसल्यामुळें बंगाल्यांतील राष्ट्रीय-पक्षास पुन्हां आपल्या वाक्प्रवाहाचे जोरावर खेंचून नेमस्ततटाकांतील सांचलेल्या पाण्यांत आणून सोडूं अशी उमेद सर सुरेंद्रनाथप्रभृति पुढा-

त्यांस वाटूं लागली. परंतु ' नवीन सुधारणेच्या ' बाबतींत सर सुरेंद्रनाथ व त्यांचा अनुयायी वर्ग यांजकडून जे धरसोडीचें वर्तन होऊं लागलें त्यावर टीकेचा कडक भडिमार करून आणि बंगाल्यांत टिळक होमरूल लीगची शाखा स्थापन करून बंगाल्यांतील राष्ट्रीयपक्षाचें अस्तित्व देशबंधु दास यांनीं कायम ठेवलें आणि त्या पक्षाचें कार्यक्षेत्र विस्तृत करून तो पूर्वीपेक्षां अधिक प्रबल केला. बंगाल्यांत या अवधींत राष्ट्रीयपक्षावर ज्या भयंकर आपत्ति अधिकारीवर्गाकडून आणण्यांत येत होत्या त्यामुळें देशांतील सुप्रसिद्ध व शिस्तप्रिय म्हणविणारे पुढारी हे या कर्तबगार लोकांपासून आपणांस अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. अशा अडचणीचे प्रसंगीं त्या सर्वतोपरी निंदित तरुणांस अंतःकरणपूर्वक उदार आणि सक्रिय सहानुभूतीच्याच जोरावर अत्याचारांपासून परावृत्त करून प्रकृत व प्रचलित राजकीय चळवळीशीं त्यांचें तादात्म्य करण्याचें कार्य किती बिकट होतें याची तसल्या परिस्थितीचा ज्यांना गंध देखील नाहीं त्यांना नुसती कल्पना करणें देखील कठीण आहे. तरुणांचा ज्यांच्यावर अढळ विश्वास असे पुढारी याच वेळीं त्यांना दुर्लभ झालेले, अधिकाऱ्यांच्या हट्टी धोरणामुळें तरुणांचीं डोकीं अधिकाधिक फिरूं लागलेलीं, देशाकरितां चुकीच्या कल्पनामुळें कां होईना जे हाल अपेष्टा भोगीत आहेत त्यांच्या मागें त्यांच्या कुटुंबांची दैना वाढत असलेली, या परिस्थितीची जबाबदारी आपणांस अप्रिय असलेल्या राजकीय पक्षावर टाकण्यास नेमस्तपक्षाचे अध्वर्यू टपलेले व तत्परतेनें पुढें आलेले आणि सर्वत्र संशय आणि भीति यांनीं सामान्य जनता सचिंत व निष्क्रिय बनलेली अशी ही परिस्थिति होती. परंतु या परिस्थितींत देखील तरुणांची देशभक्ति, उत्साह व स्वार्थत्यागबुद्धि हीं अधिक उपयुक्त मार्गांत खेंचून आणून त्यांचा एक प्रखर व तेजस्वी युवकसंघ बनवून देशांतील चळवळींत नवीन जोम भरणें हा उद्योग देशबंधु दास यांनीं केला व त्यांत अपूर्व यश संपादन केलें. देशबंधु दास हे बंगाली तरुणांच्या अंतःकरणांतील आराध्य दैवत होऊन बसले. तरुणांचा उत्साह व प्रौढांचा पोक्त विचार यांचें मनोरम मिश्रण कै० वा० देशबंधु दास यांच्या राजकीय कार्याचे पद्धतींत व प्रतिपादनशैलींत प्रत्येकास आढळून येईल.

दे० दास हे गेल्या तीन वर्षांत केवळ बंगालचे पुढारी राहिले नसून अखिल भरतखंडाचें नेतृत्व त्यांचेकडे आलें. यामुळेंच सन १९१८ पर्यंतच्या त्यांच्या भाषणांत बंगालला उद्देशूनच ते बोलत असल्याचें दृष्टीस पडतें तो प्रकार त्यानंतर स्वराज्यपक्षाचे स्थापनेकरितां व संवर्धनाकरितां त्यांनीं जीं व्याख्यानें दिलीं आहेत त्यांतून दृष्टीस पडत नाहीं. सर्व हिंदुस्थानचा नकाशा त्यांचे डोळ्यांसमोर उभा असून या प्राचीन भारताचा उद्धार कसा होईल या एकाच विचाराची छाप त्यांच्या गयेनंतरच्या भाषणावर पडलेली आहे. हिंदुस्थानच्या राजकारणांत असहकारितेची लाट उठल्या-बरोबर तिचा फायदा घेऊन प्रचलित राजकीय चळवळ अधिक तीव्र, सर्व-व्यापी आणि प्रतिकारप्रवण करतां येईल तर पहावी म्हणून त्यांनीं महात्मा गांधी यांशीं प्रथमतः वाद घालूनसुद्धां नंतर नागपूर येथें सहकार्य केलें व त्यानंतर ती यशस्वी करण्याकरतां दिव्य स्वार्थत्याग केला. असहकारितेच्या कार्याकडे जनतेंतील प्रतिकारसामर्थ्याची वृद्धि करण्याचें तें एक प्रबल साधन होईल अशा दृष्टीनेंच ते पाहत होते व जेव्हां जेव्हां असा प्रतिकार मोठ्या प्रमाणांत करतां येण्याची संधि त्यांना उपलब्ध झाली, तेव्हां तेव्हां असहकारितेच्या अध्वर्यूंनीं घालून दिलेल्या नियमांचें परिपालन करण्याचा सोंवळेपणा दाखविण्याची त्यांनीं यत्किंचितसुद्धां फिकीर केली नाहीं. राज-कारणाचें स्वरूप प्रतिकारमार्गापासून परावृत्त होऊन तें धार्मिक संप्र-दायाचे धर्तीवर गेल्यास हिंदुस्थानच्या दुर्भाग्याचे दिवस कधींहि संपणार नाहींत असा त्यांचा दृढ विश्वास असल्यामुळेंच त्यांनीं स्वतःचे जबाब-दारीवर बंगाल्यांत क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट लागू करतांच त्या-विरुद्ध कायदेभंगाची मोहीम सुरू केली. या मोहिमेंत बंगाल्यांतील तरु-णांच्या अंतःकरणावर देशबंधु दास यांनीं केवढें स्वामित्व संपादन केलें आहे व त्यांचीं अंतःकरणें कशीं अगदीं आपल्या मुठींत आणून ठेवलेलीं आहेत ही गोष्ट सर्व हिंदुस्थानच्या प्रत्यक्ष निदर्शनास आली. अधिकारी-वर्गालासुद्धां देशबंधूंचे ठिकाणीं दिसून येणारी विलक्षण धडाडी व लोक-प्रियता यामुळें एक प्रकारचा विस्मय वाटून ही आग थांबविण्याचा कांहीं प्रयत्न करणें अवश्य आहे असें वाटूं लागलें. त्यामुळें हल्लींचे व्हाइस-

राय लॉर्ड रीडिंग यांनीं राउन्ड टेबल कान्फरन्स भरविण्याचा आपला विचार हिंदी राष्ट्रीय सभेचे पुढारी महात्मा गांधी यांजपुढें एका विशिष्ट पद्धतीनें मांडला. परंतु महात्माजींना तत्कालीन परिस्थितींत दृश्यमान होणाऱ्या बाह्य देखाव्यामुळें खऱ्या वस्तुस्थितीचा योग्य बोध झाला नाहीं आणि त्यामुळें अधिकारीवर्गाकडून सुचविण्यांत आलेल्या परिषदेचा स्वीकार करण्याऐवजीं भलत्याच अटी पुढें करून धिक्कार करावासा वाटला. महात्मा गांधींच्या राजकारणावर देशबंधु दास यांच्या मनांत पूर्वी जी उत्साहपूर्वक निष्ठा होती, ती बार्डोली येथील माघार, विधायक कार्यक्रमाचा अनिवार पुरस्कार आणि वरील परिषदेबद्दलचे सूचनेचा अविचारपूर्वक त्यांच्याकडून झालेला तिरस्कार, यामुळें बरीच डळमळावयास लागली. आणि तुरुंगांतून बाहेर पडतांच बहिष्कारत्रयीवरील त्यांनीं आपलें मत प्रथमतः उमरावती येथील व्याख्यानांत जाहीर केलें. त्याच प्रसंगीं त्यांनीं कौन्सिलबहिष्काराची चळवळ निष्फल झाल्यामुळें देशांतील कर्तबगार लोकांचे समोर राजकीय कार्य व तज्जन्य विरोध याचा नवा मार्ग काढणें अवश्यक आहे असें स्पष्टपणें प्रतिपादन केलें आणि भावी स्वराज्यपक्षाच्या कार्याची रूपरेषा त्यांनीं लोकांसमोर मांडली. यापुढें स्वराज्यपक्षाची स्थापना कशी करण्यांत आली, त्या पक्षाला आपलें बल वृद्धिंगत करण्यास अवसर मिळावा म्हणून कट्टरपक्षाशीं त्यांना कसे मुत्सद्देगिरीचे डाव खेळावे लागले, शेवटीं महात्मा गांधींशीं समेट करून स्वराज्यपक्षाचे कार्यक्रमास त्यांनीं राष्ट्रीय सभेची मान्यता कशी मिळविली. स्वराज्यपक्षाविरुद्ध चाललेल्या असत्य आक्षेपांस उत्तर देण्याची जोखीम व जबाबदारी महात्मा गांधी ह्यांनी आपण होऊन आपणांवर कशी घेतली इत्यादि गोष्टींची हकीगत या प्रस्तावनेंत दिल्यास तिचा विस्तार मोठा होईल व दे० दास यांच्या व्याख्यानांचे ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याऐवजीं स्वराज्यपक्षाचा इतिहासात्मक उपोद्घात लिहिण्याचेंच काम केल्यासारखें होईल म्हणून त्यांचें वर्णन या लेखांत मी करूं इच्छित नाहीं. परंतु या सर्व प्रयत्नांतून त्यांच्या बुद्धिमत्तेची करामत कोणालाहि दृष्टीस पडल्याशिवाय राहाणार नाहीं.

त्यांच्या अंगच्या गुणांचा विचार करीत असतांना एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवणें अवश्य असतें. स्वपक्षाचे प्राबल्यावर आपल्या मताचा पुरस्कार

ते उत्साहानें करीत. परंतु स्वभिन्नपक्षाशीं तडजोड करून झगडा मिटवि-ण्यास ते केव्हांहि तयार असत. दिल्ली येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत त्याचप्रमाणें मुंबई येथें भरलेल्या सर्व पुढाऱ्यांच्या ऐक्य-परिषदेंत त्यांच्या ठिकाणीं असलेली समेटवृत्ति फार स्पष्टपणें निदर्शनास आली. त्यांना तत्त्वतः पसंत नसणाऱ्या गोष्टीसुद्धां राष्ट्रीय ऐक्य साधण्या-करितां व चळवळ एकमुखी व एकसूत्री होण्याकरितां ते मान्य करावयास तयार होत. 'सुतास मत' या तत्त्वास त्यांनीं या बुद्धीनेंच मान्यता दिली ही गोष्ट सर्वविश्रुत आहे.

स्वराज्यपक्षानें ठरलेल्या धोरणानुसार दीड वर्षपर्यंत त्यांच्या नेतृत्वाखालीं कार्य केलें. यापुढील कार्य स्वराज्यपक्षाला इतर पक्षांचा पाठिंबा मिळाल्या-शिवाय अधिक धडाडीनें करतां येणार नाहीं असा विचार आज बरेच महिन्यांपासून त्यांचे ठिकाणीं घोळत होता. द्विदलपद्धतीचीं शकलें उडवून दिल्यानंतर सर्व हिंदी राष्ट्रास अपेक्षित अशी स्वराज्याची योजना एकमुखानें मांडण्यांत यावी आणि त्याकरतां सर्व पक्षांनीं आपले क्षुल्लक पक्षभेद विस-रून प्रयत्न करावा ही त्यांची इच्छा त्यांनीं आपले फरीदपूर येथील अखे-रच्या भाषणांत प्रकट केलेली आहे. हें ऐक्य घडवून आणण्याचें आणि राज-कीय चळवळीचा ओघ अस्ताव्यस्त व सैरावैरा वाहूं न देतां त्यांत प्रचंड वेग उत्पन्न व्हावा म्हणून प्रथमतः लहानमोठ्या प्रतिकाररूप खडकांमधून नेऊन एक प्रचंड विरोधशक्ति उत्पन्न करणारें आणि व्यवस्थित उपयोग करून घेणारें यंत्र निर्माण करण्याचें महत्कार्य त्यांच्यामागें जो त्यांचा अनु-यायीवर्ग उरलेला आहे त्यांच्यावरच सोंपवून ते आतां परलोकीं निघून गेले आहेत. अशा प्रसंगीं त्यांनीं जे विचार आपल्या लेखांतून व व्याख्यानांतून प्रकट केले आहेत त्यांचें योग्य मनन केल्यास त्यांनीं प्रति पादिलेल्या मूलभूत व आद्य तत्त्वांस धरून इतर पक्षांशीं सहज समेट होण्यासारखा कार्यक्रम आखतां येणें शक्य होईल. राजकारण हें नेहमीं प्रतिकारप्रधान मार्गानें जाणारें असलें तरी समेटावसायी असतें. समेटाचे प्रसंग कधीं अधिकाऱ्यांशीं येतील तर कधीं आपल्यांतील भिन्न पक्षांशीं येतील. परंतु समेट म्हणजे तत्त्वत्याग असें म्हणून त्यापासून दूर गेल्यास

राजकारणाचा प्रागतिक मार्ग सर्वथैव कुंठित होतो. स्वराज्यपक्षाला जर पुढें कांहीं कार्य करीत राहणें अवश्य असेल तर त्याला आपले कार्यक्रमांत देश-स्थित्यनुरूप फरक करणें प्राप्त आहे. दे. दास यांनीं गेल्या दोन वर्षांत योग्य प्रसंगीं आपल्या पक्षाचे धोरणांत अवश्यक फेरफार केलेले आहेत. तेव्हां कोणत्याहि एखाद्या शब्दाची किंवा कल्पनेची उराशीं गांठ बांधून बसल्यास कार्यहानि होण्याचा संभव आहे. राजकीय चळवळीचे मार्ग हे बुद्धिबळाचे खेळांतील डावासारखे आहेत. प्रतिपक्षाचे मोहऱ्यांच्या चालीकडे लक्ष ठेवूनच ते डाव खेळावे लागतात, हें उघड आहे. सर्व पक्षांचें एकीकरण व स्वराज्यप्राप्त्यर्थं हिंदुस्थानांतील यच्चयावत प्रतिकारशक्तींचें राजकीय क्षेत्रांत केंद्रीकरण हीं दोन महत्त्वाचीं कार्यें आज देशांतील विचारी व कर्तबगार लोकांसमोर आहेत. देशबंधूंच्या व्याख्यानांचें यथायोग्य परिशीलन व मनन झाल्यास वरील कार्याकरितां योग्य मार्गाचा शोध करण्यास सुलभ जाईल असा आमचा विश्वास आहे.

देशबंधूंच्या अमोघ वाणीचा मराठी वाचकांस परिचय करून देण्यास प्रस्तुत ग्रंथाचा फार मोठा उपयोग होईल. देशबंधु दास यांच्या निधनामुळें दुःखी झालेल्या महाराष्ट्रीय अंतःकरणाला प्रस्तुत ग्रंथ हा एक प्रकारें देशबंधूचें वाङ्मयस्मारक असें वाटून त्याचा ते सप्रेम व सद्गदित अंतःकरणानें सादर स्वीकार करतील असा मला भरंवसा वाटतो.

देशबंधूंच्या गुणांचें जेव्हां चित्र डोळ्यांसमोर उभें राहातें तेव्हां ' अहह महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः ' हे उद्गार आपोआप मुखांतून बाहेर पडतात व त्यांच्यासंबंधीच्या प्रेमानें व आदरानें हृदय भरून येतें. वर्णनविस्तार करून लेखणीस शीण देण्यापेक्षां त्यांच्या उदात्त चरित्राचें क्षणभर मनन करण्याकरितां स्वस्थ बसणें हेंच अधिक प्रशस्त असा विचार उत्पन्न होतो. म्हणून मी वाचकांची येथेंच रजा घेतों. आणि देशबंधूंच्या महाराष्ट्रीय वेषानें समोर उभ्या असलेल्या वाङ्मयमूर्तीची त्यांनीं श्रद्धापूर्वक आराधना करून तिजपासून स्वराज्यप्राप्तीचें वरप्रदान मागून घ्यावें अशी वाचकांची नम्रभावानें प्रार्थना करतों.

यवतमाळ,<br>ता. ३-७-२५

आपला,<br>**माधव श्रीहरि अणे.**



अरविंदबाबूंच्या खटल्याचे वेळीं दासबाबू.

# दासबाबूंचीं निवडक भाषणें

## १—अरविंदबाबूंच्या खटल्यांतील भाषण.

( १९०८—०९ )

मराठी ग्रंथ संग्रहालय
२७११

' अलिपूर बाँब केस ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या खटल्यांत बॅ. चित्तरंजन दास यांनीं बाबू अरविंद घोष यांचे वतीनें जें भाषण केलें, त्यांतील महत्त्वाचा भाग थोडक्यांत पुढें दिला आहे. हा खटला अलिपूरचे अॅडि. सेशन्स जज मि. बीचक्रॉफ्ट यांचे कोर्टांत जवळ जवळ सहा महिने चालून त्यांत बाबू अरविंद यांची सुटका झाली, ही गोष्ट सर्वांस विदित असेलच. याच खटल्यांत सेशन्स जज मि. बीचक्रॉफ्ट यांनीं " कोणताहि खरा इंग्रज हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या ध्येयास हरकत घेणार नाहीं ! " अशा प्रकारचे उद्गार आपल्या निकालांत काढिले. या खटल्यांत बॅ. दास यांनीं जें विलक्षण कायदेपांडित्य दाखविलें, त्यामुळें त्यांची चहूंकडे वाहवा झाली. खुद्द कलकत्ता हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश सर लॉरेन्स जेन्किन्स यांनींहि सदर प्रकरणांतील अपिलाचा निकाल देतांना दासबाबूंबद्दल धन्योद्गार काढिले होते.

### " होय ! शक्य असल्यास सशस्त्र युद्धसुद्धां करावें !"

स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गासंबंधीं अरविंदांनीं आपल्या लेखांत जो ऊहापोह केला होता त्यासंबंधीं बोलतांना दासबाबू म्हणाले—उद्यां एकाद्या माणसानें एकादा बाँब अरविंदांसमोर आणिला आणि " रस्त्यांत जो कोण पहिला इंग्रज गृहस्थ भेटेल, त्याजवर मी हा फेकूं का ? " असा त्यांस प्रश्न केला; तर अरविंद तात्काळच " असें केल्यानें आपलें स्वातंत्र्याचें उच्च ध्येय साध्य होणार आहे कां ?" असा उलट सवाल त्यास विचारतील ! अर्थात या सवालाचें उत्तर नकारार्थीच येणार ! कारण एकादा बाँबगोळा फेंकल्यानें इष्टसिद्धि होणार नाहीं.

कोर्ट—आणि झाली तर ?

दास—सरकारी जुलूम इतक्या कळसाला पोंचला व सरकारशीं मुकाबला करण्याइतकी एकजूट व युद्धसामग्री आपणांजवळ आहे असें लोकांस वाटत असलें तर त्यांनीं सरकारविरुद्ध सशस्त्र युद्ध पुकारण्यास मुद्धां हर-कत नाहीं ! पण सध्यां मात्र तें उचित होणार नाहीं !

कोर्ट—येथें अरविंदांचा उपयुक्ततेचा मार्ग [युटिलिटेरियन मेथड्] पुनः आला. लढण्याची ताकद असेल, तर इष्टसिद्धीसाठीं लढण्यासहि हरकत नाहीं.

दास—होय ! अरविंदांच्या लेखांचा रोख हा असाच आहे. परंतु एकं-दरीत अत्याचाराचा मार्ग वाईट व शांतीचा चांगला असेंच त्यांचें मत होतें.

## दासबाबूंचें उपसंहारात्मक भाषण

कोर्टापुढें आलेल्या साक्षीपुराव्याचा समाचार घेतल्यानंतर उपसंहारा-त्मक भाषण करितांना बॅ. दास म्हणाले— अरविंदबाबूंची दांडगी बुद्धिमत्ता, त्यांचें असामान्य कर्तृत्व व संघटनाकौशल्य हीं लक्षांत घेतां, तेच या कटाचीं सूत्रें पडद्यामागून हलवीत असले पाहिजेत असें फिर्यादी पक्षाच्या वकिलाचें म्हणणें आहे. साक्षीपुराव्याचा डोंगर पोखरून फिर्यादी पक्षानें जो कटाचा उंदीर बाहेर काढला आहे. त्याचें स्वरूप पहातां असला कट यशस्वी होईल असें बाबू अरविंद यांस कधीं तरी वाटलें असेल. असें मला वाटत नाहीं. अरविंदबाबूंची बुद्धिमत्ता दांडगी आहे, अशी फिर्यादी पक्षानें दिलेली कबुली आतां त्यास मान्य नसेल तर मात्र गोष्ट निराळी. परंतु ते विलक्षण बुद्धिमान् असून मुद्धां या कटाचे म्होरके व सूत्रचालक आहेत असें तुमचें म्हणणें असेल, तर मात्र हा कट यशस्वी होईल असें अरविंदबाबूंस केव्हांहि वाटणें शक्य नाहीं. असें सांगून ठेवणें मला भाग आहे. फिर्यादी वकिलानें या कटाच्या अनेक उपांगांचा उल्लेख करून कलकत्त्यापासून तुतिकोरिनपर्यंत या कटाचें जाळें पसरलें होतें असें म्हटलें व तें सिद्ध करण्यासाठीं ज्यांच्या-विरुद्ध काडीचाहि साक्षीपुरावा नाहीं, अशा माणसांचा संबंध या खटल्याशीं जोडला. आपण ही कटाची कल्पना अजिबात सोडून द्या, असें माझें आप-

29

णास मांगणें आहे. खरा कट असा कुठेंच दिसून येत नाहीं. तो फक्त फिर्यादी वकिलाच्या कल्पनेची भरारी आहे. या तरुण्या प्रकरणाच्या बुडाशीं कट असलाच पाहिजे,. अशी त्यांची समजूत झाली आहे. यांत बिलकूल शंका नाहीं. पण ही समजूत आपोआप नाश झालेली नाहीं. अनेक दिवसपर्यंत पोलीसचा गराडा त्यांचेभोंवती पडला होता आणि म्हणून पोलिसांनींच त्यांचें मन बिघडविलें असलें पाहिजे !

## हा लटुपटीचा कट होता !

परंतु प्रत्यक्ष पुरावा फार निराळा आहे. या कोर्टापुढें जे कबुलीजबाब देण्यांत आले—आणि त्यांवरच फिर्यादी पक्षाची विशेष भिस्त आहे—ते पहातां हा एक अत्यंत पोरकट स्वरूपाचा कट होता, ती एक लटुपटीची क्रांति होती असें दिसून येईल. एकाददुसऱ्या इंग्रजावर बॉंबगोळे फेंकल्यानें सध्यांचें ब्रिटिश सरकार उलथून पाडतां येईल असें अरविंद बाबूंस वाटणें कदापि शक्य नाहीं. अरविंदांची बुद्धिमत्ता दांडगी असें तुम्ही म्हणतां तर मग त्याच तोंडानें असल्या पोरकट स्वरूपाच्या कटाचे—एका लटुपटीच्या क्रांतीचे ते नेते होते असें तुम्ही कसें म्हणूं शकतां ? अरविंदांची बुद्धिमत्ता दांडगी, म्हणून ते या कटाचे नेते असले पाहिजेत अशी कोर्टाची खात्री पटविण्याचा तुम्ही प्रयत्न केला आहे. एक ही बुद्धिमत्तेची कबुली तरी परत घ्या. नाहींतर ते या लटुपटीच्या क्रांतीचे नेते नव्हते असें तरी म्हणा ! कोर्टापुढें मिळालेले कबुलीजबाब हाच अरविंदबाबूंच्या विरुद्ध पुरावा होय. असें सांगण्यांत येतें ! पण या कबुलीजबाबामुळेंच अरविंद निर्दोष ठरतात. असें माझें म्हणणें आहे. गुप्त पोलीस व इतर साक्षीदार यांच्या साक्षीमुळें अरविंदांचा कटवाल्यांशीं संबंध होता असें सिद्ध झालें आहे असें आपलें म्हणणें असेल, तर या साक्षीवर आपणांला काडीइतकाहि विश्वास ठेवतां येणार नाहीं, असें मला म्हटलें पाहिजे. या सर्व साक्षी सपशेल अविश्वसनीय आहेत. सरकारचें सिंहासन डळमळून टाकणारा असा एकादा कट देशांत शिजत आहे, अशी सरकारची नुसती समजूत झाली पुरे कीं लगेच सरकारी हेर खोट्या साक्षी देण्यास पुढें येतात. असा अनुभव आहे. " असा

परिस्थितींत सरकारी हेर भलताच पत्रव्यवहार लोकांच्या घरांत फेंकून देतात व बनावट कागदपत्र तयार करितात" अशा प्रकारचे उद्गार एका प्रख्यात जज्जानेंच काढिले आहेत. आपण या खटल्यांतील साक्षीपुरावा काळजीपूर्वक तपासून पहाल, तर तात्काळ तो अविश्वसनीय असल्याबद्दल आपली खात्री पटेल. या खटल्यांत जीं निरनिराळीं पत्रें सादर करण्यांत आलीं, त्या पत्रांवरून अरविंदांचा या कटाशीं संबंध शाबीत होतो, असें तर फिर्यादीपक्षाचें म्हणणें नाहीं ना? असेल तर तें सपशेल खोटें आहे. कोर्टापुढें आलेल्या पत्रांवरून अरविंदांचा या कटाशीं संबंध आहे, असें बिलकुल सिद्ध होत नाहीं. फिर्यादी पक्षाचे वकिलांनीं त्यांच्या अर्थाची जी भलतीच ओढाताण केली आहे ती मात्र अरविंदांस बाधक होण्यासारखी आहे. फिर्यादी-वकिलांनीं अरविंदांचा कांहीं मुलांशीं स्नेहसंबंध होता हें सिद्ध करण्यासाठीं जी पत्रांच्या अर्थाची ओढाताण केली आहे, ती तर निव्वळ हास्यास्पद वाटते. ते एखादें पत्र वाचून दाखवितात व त्यांत ज्या गोष्टींचा मागमूससुद्धां नाहीं, अशा गोष्टी आहेत असें बिनदिक्कत सांगत सुटतात! या गोष्टी मूळ पत्रांत तर नसतातच; पण त्या वकिलसाहेबांच्या मनाच्या आंतल्या पडद्यांत कुठेंतरी तयार झालेल्या असतात. आपण हीं सारीं पत्रें वाचून पहाल व तीं कोणत्या परिस्थितींत लिहिलीं गेलीं हें लक्षांत घ्याल तर अरविंदांवर लादलेले सारे आरोप खोटे आहेत असें आपणांस आढळून येईल! फिर्यादी पक्षाच्या वकिलसाहेबांची देखील याबद्दल थोडीबहुत खात्री झालेली दिसते. आणि म्हणूनच बहुधा निराशेच्या भरांत "पत्रें बाजूला राहूं द्या, साक्षीपुरावाहि बाजूला राहूं द्या' फक्त त्या माणसाचे विचार लक्षांत घ्या व त्यानें काय केलें असतें याचा विचार करा!" अशा प्रकारचे उद्गार त्यांनीं काढिले आहेत. हेंच धोरण समोर ठेवून त्यांनीं निरनिराळीं वर्तमानपत्रें वाचून दाखविलीं व देशांतील अनेक विद्वान व पुढारलेल्या लोकांचा या कटाशीं संबंध जोडला. "वंदेमातरम् पत्र वाचा; त्यांचीं भाषणें वाचा, इतर वर्तमानपत्रें वाचा, म्हणजे अरविंदबाबूंचे विचार काय होते तें दिसून येईल; व अरविंदांस स्वातंत्र्य पाहिजे होतें अशी तुमची खात्री पटली कीं मग हें स्वातंत्र्य ते

बॉंबगोळ्यांच्या व गुप्त मंडळ्यांच्या मार्गानेंच हस्तगत करणार होते असें समजण्यास हरकत पडणार नाहीं "—असा फिर्यादी वकिलाच्या भाषणाचा आशय होता. त्यास माझें असें उत्तर आहे कीं, हीं वर्तमानपत्रें साक्षीपुरावा म्हणून आपणांस कदापि विचारांत घेतां येणार नाहींत; व घेतलींच तर त्यांतील लेखामुळें अरविंदांवर लादलेला एकहि आरोप शाबीत होऊं शकत नाहीं !

### " होय ! स्वातंत्र्य हें माझें ध्येय आहे !"

मी अरविंदांचें १३ ऑगस्ट १९०५ चें पत्र आपणांस वाचून दाखविलें आहे. अरविंदांनीं त्यांतील प्रत्येक गोष्ट कबूल केली आहे. ते म्हणतात—" मी बडोद्याहून कलकत्त्यास आल्यापासून त्या पत्रांत नमूद केलेल्या तत्त्वांपासून रेंसभरहि ढळलों नाहीं. मी राजकारणांत कधींहि भाग घेतला नव्हता. माझ्या चळवळींचें स्वरूप राजकीय असो, सामाजिक असो, धार्मिक असो अगर कोणत्याहि प्रकारचें असो—मी त्या पत्रांत ग्रथित केलेल्या तत्त्वांपासून रेंसभरहि ढळलेला नाहीं. मी माझ्या देशासाठीं स्वातंत्र्याचें ध्येय प्रतिपादिलें व हें ध्येय बेकायदेशीर होतें असा माझ्यावर आरोप असेल, तर हा आरोप मला मान्य आहे ! मी स्वातंत्र्य प्रतिपादण्याचा गुन्हा केला आहे. परंतु जे गुन्हे मी अजिबात केले नाहींत, ज्या कृत्यांस माझा निसर्गतःच विरोध व जीं माझी विचारप्रणालि लक्षांत घेतां माझ्या हातून कधींच घडणें शक्य नाहीं —असलीं कृत्यें व गुन्हे मात्र मेहरबानी करून माझ्यावर लादूं नका ! स्वातंत्र्याच्या ध्येयाचा प्रचार करणें हा गुन्हा असेल, तर तो मात्र मी केला आहे व तो मला मान्य आहे ! या ध्येयासाठींच मी माझ्या जीविताच्या सर्व सुखाशेस तिलांजलि दिली आहे ! या ध्येयासाठींच मी माझ्या आयुष्याची माती करण्याचें ठरविलें आहे ! या ध्येयासाठींच जगावें व या ध्येयासाठींच आपल्या प्रयत्नाची शिकस्त करावी म्हणून मी कलकत्त्यास आलों. स्वातंत्र्य हा एकच विचार जागेपणीं माझ्या डोळ्यांसमोर उभा असतो व झोंपी गेलों तरीहि स्वातंत्र्याचींच सुखस्वप्नें मला पडत असतात ! हा माझा गुन्हा असेल, तर त्यासाठीं पिंजऱ्यांत साक्षीदार उभे करण्याची बिलकुल

जरूरी नाहीं ! मला तो गुन्हा मान्य आहे ! त्यासाठीं एवढी खटल्याची उठाठेव कशाला पाहिजे ? "वंदेमातरम्" पत्रावरील राजद्रोहाच्या खटल्यांत झालेल्या नाटकाची पुनरावृत्ति येथें होऊं नये, एवढीच माझी इच्छा व विनंति आहे. स्वातंत्र्य-प्रतिपादन हाच एक माझा गुन्हा असेल तर तसें स्पष्ट सांगा, मी त्याबद्दलची शिक्षा भोगण्यास तयार आहें ! अविश्वसनीय पुराव्यावर विश्वास ठेवून, त्याचप्रमाणें ज्या माझ्या लेखास स्वातंत्र्याच्या उच्च ध्येयाशिवाय दुसऱ्या कशाचाहि संपर्क झालेला नाहीं त्या लेखांचा विपरीतार्थ करून, ज्या गुन्ह्यांचा विचारहि माझ्या मनांत कदापि येणार नाहीं व जीं कृत्यें माझ्या अंगावर तात्काळ शिसारी आणतात—ते गुन्हे व तीं कृत्यें केल्याचा आरोप माझ्यावर लादलेला पाहून मला अत्यंत वाईट वाटलें. मी फक्त स्वातंत्र्याचा गुन्हा केला आहे व तो मी कधींच नाकबूल करणें शक्य नाहीं ! मी पाश्चिमात्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानांतील कांहीं तत्त्वें उचलून, त्यांचा वेदांताच्या अमर शिकवणुकीशीं मेळ घालण्याचा प्रयत्न केला. जगामध्यें हिंदुस्थानला एक महत्कार्य करावयाचें आहे, अशा प्रकारची जाणीव माझ्या देशबांधवांचे मनांत उत्पन्न करणें, हेंच माझें कार्य व कर्तव्य आहे अशी माझी भावना झाली होती. हा गुन्हा असेल. तर खुशाल माझ्या हातापायांत कडीतोडे अडकवा, मला तुरुंगांत घाला ! पण हा गुन्हा मात्र मी कधींहि नाकबूल करणार नाहीं ! स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुरस्कार केल्यानें माझ्या हातून कोणत्याहि कायद्याचा भंग झालेला नाहीं व जीं कृत्यें केल्याचा माझ्यावर आरोप लादण्यांत आला आहे, तीं शाबीत होण्यासारखा पुरावा कोर्टासमोर आलेला नाहीं व जो काय पुरावा पुढें आलेला आहे तो माझ्या शिकवणुकीस, लेखांस व साक्षीपुराव्यावरून दिसून आलेल्या माझ्या मनोवृत्तीस अजिबात विसंगत आहे, एवढेंच मला सांगावयाचें होतें !"

## देशाभिमानाचा शाहीर व राष्ट्रधर्माचा प्रणेता !

असलें उज्ज्वल चारित्र असलेले अरविंद आज या कोर्टापुढेंच नव्हत, तर इतिहासाच्या सर्वोच्च हायकोर्टासमोर गुन्हेगार म्हणून उभे आहेत ! आज

ज्यां आपला वाद विस्मृतीच्या डोहांत अदृश्य होईल, चळवळीची खळखळ बंद होईल, अरविंदाचा नश्वर देह नष्ट होईल,—परंतु त्यानंतर पुढील पिढ्या त्यांचेकडे देशाभिमानाचा शाहीर, राष्ट्रधर्माचा प्रणेता व अखिल जगताचा प्रेमळ बंधु याच दृष्टीनें पाहतील, ही गोष्ट लक्षांत ठेवा ! अरविंदांचा नश्वर देह नष्ट झाला, त्यांचा आत्मा त्यांस सोडून गेला तरी कांहीं दिवसांनीं त्यांच्या संदेशाचा प्रतिध्वनि एकट्या हिंदुस्थानांतच नव्हे, तर सातासमुद्रांपलीकडेहि दुमदुमल्याशिवाय राहाणार नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवा ! आणि म्हणूनच अरविंदासारख्या उज्वल चारित्र्याचा मनुष्य आज या कोर्टापुढेंच नव्हे तर इतिहासाच्या सर्वोच्च हायकोर्टासमोर न्यायासाठीं उभा आहे असें मी म्हणतों. कोर्टानें व असेसरांनीं आपला निकाल देण्याची वेळ आतां जवळ येऊन ठेपली आहे. आपल्याला मी जास्त काय सांगू? इंग्लिश न्यायासनाच्या परंपरेचा उज्वल इतिहास, इंग्लिश न्यायासनानें उत्पन्न केलेलीं कायद्याचीं हजारों तत्वें, आपल्या निकालांनीं कायद्याच्या अंमलबजावणीची इच्छाच नव्हे तर कायद्याबद्दल आदर उत्पन्न करणारे सुविख्यात इंग्लिश न्यायाधीश—या सर्वांच्या नांवानें मी आपणांस अशी कळकळीची विनंति करितों कीं वरील गोष्टी लक्षांत ठेवा व या खटल्यांत योग्य तो न्याय द्या ! एका इंग्रज जज्जानें खरा न्याय दिला नाहीं, असें म्हणण्यास कोणालाहि वाव ठेवूं नका ! [ असेसरांस उद्देशून ] सद्गृहस्थहो ! अरविंदबाबूंनीं जें ध्येय प्रतिपादिलें त्याच ध्येयाच्या नांवानें मी आपणांस अशी विनंती करितों कीं, अरविंदांच्याच हाडामासाचे दोन देशबांधव विकारवश होऊन भोंवतालच्या परिस्थितीस बळी पडले असें म्हणण्याची संधी लोकांस देऊं नका !

## २. दे. नारायणराव वैद्य यांच्या खटल्यांतील भाषण.

दमो येथील डिस्ट्रिक्ट म्याजिस्ट्रेटनें नागपूरचे दे० नारायणराव वैद्य यांस १२४-अ व भारतसंरक्षण कायद्याचें कलम २३-यांखालीं दोषी ठरवून १८ महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली होती. त्यासंबंधींचें अपील नागपूरचे जुडिशिअल कमिशनर मि. ड्रेक ब्रॉकमन यांचेपुढें ता. ८ आक्टोबर १९१८ रोजी सुनावणीसाठीं निघालें होतें. या वेळीं दे० वैद्य यांचे तर्फे बॅ. दास यांनीं जें भाषण केलें त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे. या अपिलांत दे० नारायणराव वैद्य हे निर्दोष सुटले. त्यांचेवरील खटला हा वैयक्तिक स्वरूपाचा नसून त्या वेळीं जारी असलेल्या टिळक-स्वराज्यसंघाच्या अखिल चळवळीवरचाच तो खटला होता. त्यांच्या सुटकेमुळें स्वराज्यसंघाची चळवळ पूर्णपणें सनदशीर ठरली. या खटल्यांत दासबाबूंनीं एक पैहि न घेतां दे. वैद्य यांचे तर्फे काम चालविलें.

### जज्जाशीं उडालेले खटके

या खटल्यांत दासबाबूंचे जज्जाशीं जे अनेक खटके उडाले त्यांवरून त्यांचा निर्भीडपणा सर्वांचे ध्यानीं येईल. म्हणून मासल्यासाठीं कांहीं खटके उत्तरप्रत्युत्तराचे रूपानें थोडक्यांत पुढें दिले आहेत.

दास—रा. वैद्य यांचें भाषण राजनिष्ठेच्या पायावर उभें होतें. त्यांच्यासारख्या सुशिक्षित माणसाला राजद्रोहासारखा गुन्हा करणें खरोखरच कमीपणाचें वाटेल—

कोर्ट—वाटलेंच पाहिजे!

दास—आपण आपलें मत आधीं बनविलें नसेल, अशी मला आशा आहे पण बनविलेंच असेल, तर मात्र आपण तसें करतां कामा नये. माझें म्हणणें आपणांस पटत नसेल. तर त्यांस ( वैद्यांस ) हवी ती शिक्षा करा. प्रहार करावयाचाच असेल तर करा, पण आधीं माझें म्हणणें ऐकून घ्या!

× × × ×

कोर्ट—हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्यानें ब्रिटिश लोकांना विशेष फायदा तो काय होणार ?

दास—आपण हिंदुस्थानच्या राजकारणांत लक्ष घालीत नाहीं असें दिसतें. ( हंशा )

कोर्ट—माझें तें काम नव्हे !

दास—कबूल; पण राजकारणांत लक्ष असलें कीं लोकांचें अंतरंग समजूं शकतें !

× × × × ×

दास—" डेप्युटी कमिशनरची जागा रिकामी पडली कीं लगेच २५ वर्षांचा पोर विलायतेहून येऊन ती भरून काढतो " असें वैद्यांनीं आपल्या भाषणांत म्हटलें आहे.

कोर्ट—हें विधान सपशेल खोटें आहे. २५ वर्षांचा पोर केव्हां तरी डेप्युटीकमिशनर म्हणून येत असतो काय ? २५ व्या वर्षी मनुष्य केव्हांहि डेप्युटी कमिशनर होत नाहीं.

दास—४।२ वर्षें पाठीमागून होत असेल.

कोर्ट—परंतु वैद्य म्हणतात कीं तो तडक इंग्लंडांतून येतो. हें विधान धादांत खोटेपणाचें ( a malignant lie ) आहे !

दास—धादांत खोटेपणाचें काय ? या विधानांत आपणांस धादांत खोटेपणा दिसत असेल, तर माझ्या पक्षकाराची धडगत नाहीं, असेंच मला म्हणावें लागेल.

कोर्ट—मी आपलें मत सांगितलें.

दास—आपण आधींच आपलीं मतें बनविलीं असतील, तर हा खटला आपण अजिबात चालवूंच नये !–वगैरे.

× × × × ×

वरील खटका उडाल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं दासबाबूंनीं नोकरीवर रुजू झाल्यापासून चार वर्षांत डेप्युटी कमिशनर झालेल्या दहा सिव्हिल सर्व्हंटांची यादी कोर्टापुढें सादर केली. आणि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं

या यादींत पहिलें नांव प्रत्यक्ष जज्जसाहेबांचें–ड्रेक ब्रॉकमन यांचेंच होतें ! दासबाबूंचें भाषण चालू असतां एका प्रसंगीं जज्जसाहेब अगदींच चवताळल्यासारखे दिसले; तेव्हां दासबाबूंना " आपली तशी इच्छा असेल, तर मी आपलें भाषण येथेंच बंद करितों" असें स्पष्टपणें कोर्टास सांगावें लागलें.

× × × ×

## भारतसंरक्षणाचा कायदाच मुळांत बेकायदेशीर आहे.

सरकारी वकिलाच्या भाषणास उत्तर देतांना, श्री. दास म्हणाले—आधीं मी भारत-संरक्षण कायद्याखालील आरोप विचारांत घेतों. हा कायदाच मुळांत बेकायदेशीर आहे. तो कायदेशीर आहे, असें गृहीत धरून चाललें तरीसुद्धां त्यासंबंधींचे जे पोटकायदे अंमलबजावणी खात्यानें केले आहेत, ते बेकायदेशीर ठरतात. ज्या अटींवर प्रजेची राजनिष्ठा अवलंबून असते, त्या अटींचे बाबतींत कोणत्याहि प्रकारचा कायदा करण्याचा अधिकार कायदेकौन्सिलला नाहीं. कायदेकौन्सिलचा दर्जा पार्लमेंटपेक्षां कमी आहे. हिंदी कायदेकौन्सिलला वाटेल ते कायदे पास करण्याचा अधिकार आहे, असा सरकारी वकिलाचा गैरसमज झालेला दिसतो. कौन्सिलला कायदे करण्याचा अधिकार पार्लमेंटाकडून मिळालेला असतो व या अधिकाराचें अतिक्रमण त्यास करितां येत नाहीं. प्रजेचे जे सर्वमान्य असे सनदशीर हक्क आहेत, त्यांच्या पाळणुकीवरच तिची राजनिष्ठा अवलंबून असते. पार्लमेंटाशिवाय दुसरी कोणतीहि संस्था या हक्कांवर गदा आणूं शकणार नाहीं. पार्लमेंट सर्वशक्तिमान् असल्याकारणानें तें वाटेल तो कायदा पास करूं शकेल. पार्लमेंटचें अधिकारक्षेत्र इतकें विस्तृत आहे कीं, एका विद्वान कायदेपंडितानें म्हटल्याप्रमाणें पुरुषाची स्त्री व स्त्रीचा पुरुष करण्याचा अधिकारच फक्त त्याला नाहीं ! बाकी सारे अधिकार त्याला आहेत. आतां ज्या हक्कांवर प्रजेची राजनिष्ठा अवलंबून असणार ते हक्क गुलाम प्रजेस मिळूं शकणार नाहींत, असें सरकारी वकील सिद्ध करून दाखवितील, तर मात्र मला गप्पच बसावें लागेल. परंतु त्यासंबंधीं त्यांनीं चकार शब्दसुद्धां काढिलेला नाहीं. असें असलें तरी कॉविल, ब्लॅकस्टोन, ब्रॅक्टन इ० सर्वमान्य ग्रंथकारांनीं काढिलेल्या उद्गारांकडे मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. त्या सर्वांनीं राजनिष्ठेचे बाबतींत जे हक्क इंग्लिश अगर वसाहतवाल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
४००
२०-११



ठक्कीं ग्रंथ संग्रहालय

प्रजेचे हक्क हिंदुस्थानसारख्या पराधीन राष्ट्रांतील प्रजेचेहि असतात, अशा अर्थाचे उद्गार काढिले आहेत. या हक्कांवर फक्त पार्लमेंटच गदा आणूं शकेल. कायदेकौन्सिलासारख्या कनी दर्जाच्या संस्थेनें हे हक्क हिराकून घेतले, तर त्यासारखी आश्चर्यकारक गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं. सध्यांचें कायदेमंडळ खऱ्या प्रातिनिधिक स्वरूपाचें नसतांना, पार्लमेंटसारख्या अधिक मोठ्या प्रातिनिधिक संस्थेनें लोकांचे मूलभूत हक्क हिरावून घेण्याचा अधिकार त्यास दिला असेल, तर त्यासारखी विलक्षण गोष्ट दुसरी कोणतीहि असूं शकणार नाहीं.

## फिर्यादीपक्षाचा पुरावा अपुरा आहे.

आतां मी राजद्रोहाच्या आरोपाकडे वळतों. इंग्लंडांतील राजद्रोहाचा कायदा हा बेअब्रूच्या कायद्याचाच विस्तार आहे; सबब बेअब्रू काय किंवा राजद्रोह काय दोन्ही एकच, अशी फिर्यादी वकिलाची समजूत झालेली दिसते. वस्तुस्थिति मात्र तशी नाही. राजद्रोहाचा कायदा हा बेअब्रूच्या कायद्याचा विस्तार असला, तरी साधी बेअब्रू व राजद्रोहात्मक बेअब्रू यांत भरपूर अंतर आहे. साधें बेअब्रूकारक विधान सत्य ठरवितां आलें तर तें न्याय्यहि ठरूं शकतें; पण राजद्रोहाची गोष्ट तशी नाहीं. सरकारविषयीं अत्यंत सत्य अशा गोष्टी पुढें करून अप्रीति उत्पन्न करविण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्या सत्य आहेत एवढ्या सबबीवर त्याची सुटका होऊं शकणार नाहीं. राजद्रोहाच्या आरोपाचे बाबतींत सत्याचा अगर असत्याचा प्रत्यक्ष असा कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं. राजद्रोहाच्या बाबतींत आरोपी माणसाचा हेतु काय होता हें पाहतांना त्यानें असत्य विधानें केलीं असल्यास त्याचा उपयोग होऊं शकेल; परंतु एरव्हीं सत्य अगर असत्य याचा कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं. समजा, रा. वैद्य यांनीं कांहीं असत्य विधानें केलीं असलीं तर तीं असत्य आहेत हें ठरविण्याची जबाबदारी कोणावर येऊन पडते? अर्थात फिर्यादीपक्षावर! फिर्यादीपक्षानें वैद्यांचीं विधानें असत्य होतीं असें दाखविण्यासाठीं यत्किंचित पुरावा तरी पुढें आणला आहे काय? उलट वैद्यांचीं पुष्कळशीं विधानें खरीं असल्याचेंच उलटतपासणींत उघडकीस आलें आहे. फिर्यादी वकिलाचें आणखी असें म्हणणें आहे कीं, आरो-

पीनें कोणत्याहि प्रकारचा साक्षीपुरावा पुढें मांडला नाहीं. हें म्हणणें साफ चुकीचें आहे. आरोपीनें आपल्या लेखी जबानींत आपल्या भाषणाचा सारांश दिला आहे व शिवाय " पोलिसनें अजिबात बनावट अशीं विधानें माझ्या तोंडांत घातलीं असून अर्थाचा अनर्थ होईल अशा प्रकारें त्यांची तुटक रचना केली आहे " असेंहि म्हटलें आहे. आतां फिर्यादीपक्षाचा पुरावा तरी एवढा काय आहे ? तर पोलिस हपिसरांना जें जें हरकत घेण्यासारखें वाटलें, तेवढें त्यांनीं टिपून घेतलें व जें वाटलें नाहीं तें मधून मधून सोडून दिलें ! वैद्यांचें भाषण १ तासपर्यंत चाललें, पण त्याचा रिपोर्ट वाचून पाहतां तो वाचण्यास अवघीं १० किंवा १५ मिनिटें लागूं शकतील, असा या कोर्टाचाच अंदाज आहे. शिवाय या पोलिस हपिसरांच्या बुद्धीला ज्या गोष्टी हरकत घेण्यासारख्या वाटल्या तेवढ्याच त्यांनीं टिपून घेतल्या हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अशा परिस्थितींत फिर्यादीपक्षाचा असा कोणता पुरावा आहे कीं ज्यास मी उत्तर द्यावें ?

## या भाषणांत राजद्रोह कुठें आहे ?

या सबंध भाषणांत राजद्रोह कुठें आहे ? मॅजिस्ट्रेट आपल्या निकालांत म्हणतात कीं, माझ्या पक्षकारानें सध्यांची राज्यपद्धति बदलण्यासाठीं लोकांना स्वराज्यसंघाचे सभासद होण्याबद्दल विनंति करून अप्रीति पसरविली व अशा प्रकारची अप्रीति पसरविणें हा राजद्रोह आहे. माझ्या मतें हा राजद्रोह होत नाहीं. या एकाच मुद्यावर मी अपील जिंकायला किंवा हरायला तयार आहे. लोकांना स्वराज्यसंघाचे सभासद होण्यास विनंति करणें हा राजद्रोह असेल, तर तो गुन्हा मला मान्य आहे ! मी तो गुन्हा केला आहे. परंतु तो राजद्रोह नसेल, तर मात्र फिर्यादीपक्षाची बाजू सपशेल ढांसळणार आहे. हें भाषण स्वराज्यसंघासंबंधीं होतें. आरोपीनें सध्यांची राज्यपद्धति अजिबात बदलावी हा उपदेश केला हें वाईट झालें असें फिर्यादी वकिलाचें म्हणणें आहे. हा उपदेशमुद्धां राजद्रोही ठरूं शकत नाहीं असें माझें म्हणणें आहे. खुद्द मांटेग्यूसाहेबांनीं हिंदुस्थानसरकारची राज्यपद्धति " too iron, too wooden, too inelastic " आहे, अशा प्रकारचे उद्गार नुकतेच काढले आहेत. ( कोर्ट–कोणत्या भाषणांत ? ) मेसापोटेमियाच्या

भाषणांत त्यांनीं हे उद्गार काढले आहेत. हीं सारीं भाषणें इंग्लंडां-तून इकडे आलीं आहेत ( हंशा )! मॉटेग्यूसाहेबांनीं सध्यांच्या राज्य-पद्धतीस ' रानटी ' असेंसुद्धां विशेषण लाविलें. हें सारें ' घादांत असत्य ' ( a malignant lie ) आहे, असें आपण समजणार नाहीं अशी आशा आहे ( हंशा ) ! चळवळ करून राज्यपद्धतींत फेरफार घडवून आणावयाचा, ही व्याख्यात्याची मूळ कल्पना एकदां मान्य झाली कीं हा फेरफार अत्याचारानें घडवून आणण्याची कल्पना तात्काळ रद्द ठरते ! आतां व्याख्यात्यानें कोणत्या प्रकारची अप्रीति पसरवण्याचा प्रयत्न केला, एवढाच प्रश्न फक्त शिल्लक उरतो. अप्रीति हा शब्द अनेकार्थप्रसव आहे. त्याचा ठरींव अर्थ असा कांहींच नाहीं. ' सुलिव्हन 'च्या खटल्यांत म्हटल्याप्रमाणें ' एकाद्या विशिष्ट राज्य-पद्धतींत फेरफार घडवून आणावयाचा असेल, तर त्या पद्धतीशीं संबंध असलेल्या व्यक्तीविरुद्ध तुम्हांला कोणत्याना कोणत्या प्रकारची तरी भावना जागृत केलीच पाहिजे. ' सर फिट्झ जेम्स स्टीफन यांनींहि कौन्सिलांत भाषण करतांना, ' सरकार चुकलें अशी टीका करणें किंवा राज्यपद्धति सदोष असून तींत फेरफार करणें जरूर आहे असें म्हणणें, यांत कोणत्याही प्रकारचा द्रोह होत नाहीं !' असे उद्गार काढिले आहेत. व्याख्यात्याला इंग्लंडच्या सार्वभौमत्वाखालचें स्वराज्य पाहिजे होतें, ही गोष्ट एकदां मान्य झाली कीं मग सरकार अमुक ठिकाणीं चुकलें अशा प्रकारची कितीहि, अन्याय्य टीका केली, तरी राजद्रोहाच्या दृष्टीनें ती अप्रीति ठरूं शकत नाहीं. नीतिदृष्ट्या ती पापमय असेल, पण तिनें राजद्रोह खास होत नाहीं. व्याख्या-त्याला जबाबदारीची राज्यपद्धति पाहिजे होती व ही जरुरी त्यानें उदाहरणें देऊन सिद्ध केली. यांत राजद्रोह बिलकूल नाहीं. इंग्लंडांतल्या मंत्र्यांनीच अधि-काऱ्यांनींसुद्धां या ध्येयास मान्यता दिली आहे. हिंदुस्थानला पायरीपायरीनें जबाबदार राज्यपद्धति द्यावी, असें त्यांचें म्हणणें आहे. अशा परिस्थितींत त्यांस उत्तर म्हणून " आम्हीं या घटकेला स्वराज्यास लायख आहों, आ-म्हाला तात्काळ स्वराज्य मिळालें पाहिजे " असें म्हटलें तर तो राजद्रोह होईल काय ?

## हत्यारें बाळगण्याचा हक्क पाहिजे !

जमीनधारा लोकांच्या संमतीनें ठरवावा अगर वाढविला जावा, असें वक्त्यानें आपल्या भाषणांत सांगितलें. ही मागणी मूर्खपणाची आहे असें आपल्याला वाटलें ! (कोर्ट–नाहीं; कायदेकौन्सिलला जमीनधाऱ्याचे बाबतींत ढवळाढवळ करण्याचा अधिकार असावा हें मला मूर्खपणाचें वाटलें. ) मला आपलें मत मान्य नाहीं. कर बसविण्याचा अधिकार कायदेकौन्सिलचा आहे, तेव्हां त्यानेंच कर बसविले पाहिजेत. कदाचित् ही मागणी मूर्खपणाची व भरमसाट वाटेल पण ती करण्यांत राजद्रोह होऊं शकत नाहीं.

आतां लष्करासंबंधीं. लष्कराचे बाबतींत वक्त्याचें म्हणणें काय होतें हें फिर्यादी वकिलालाहि समजलें नाहीं व आपल्यालाहि समजलें नाहीं. " आम्ही लष्करांत भरती व्हावयास तयार आहोंत, पण ब्रिटिश अंमलाच्या सुरुवातीपासून हत्याराचा कायदा अस्तित्वांत असल्याकारणानें आमचे लोक भ्याड व नामर्द बनले आहेत, त्यांची लष्करी वृत्ति नष्ट झाली आहे " असें वक्त्याचें म्हणणें आहे. सर सत्येंद्रप्रसन्न सिंहासारख्या मोटमोठ्या गृहस्थांनींहि अशाच प्रकारचे उद्गार काढिले आहेत.

कोर्ट—इंग्लंडांत सुद्धां परवान्याशिवाय हत्यारें बाळगण्याची कोणाला परवानगी नाहीं.

दास—हा नुसता शोभेसाठीं हत्यारें बाळगण्याचा प्रश्न नाहीं. हत्यारें बाळगण्याच्या हक्काचा हा प्रश्न आहे. परवाना काय, अर्धा आणा टाकला कीं मिळूं शकतो. इंग्लंडांत कोणालाहि हत्यारें बाळगण्याचा परवाना मिळूं शकतो. हिंदुस्थानांत तसें नाहीं.

कोर्ट—हत्यारें बाळगण्याची परवानगी मिळाल्यानें जास्त लोक लष्करांत दाखल होतील, हें म्हणणें मूर्खपणाचें आहे. लष्कर एकदम उत्पन्न होत नसतें. त्यासाठीं शिक्षण घ्यावें लागतें.

दास—शिक्षण घ्यावें लागतें, ही गोष्ट खरी. पण आमचीं हत्यारें हिसकून घेतलीं नसतीं तर आमची लढण्याची प्रवृत्ति कायम राहिली असती, असें वक्त्याचें म्हणणें आहे. " लढाई तर बाजूलाच राहूं द्या ; या सभेच्या साध्या

जाहीर पत्रकावरहि सही करण्यास लोक भितात" इतकें आमचें तेज लुप्त झालें, असें वक्त्याचें म्हणणें आहे. हत्यारें बाळगण्याची परवानगी नसल्या-कारणानें आमची अवघी क्षात्रवृत्ति नष्ट झाली आहे. आम्हांला हत्यारें बाळगण्याचा हक्क नसावा, ही आमची मानखंडना आहे.

कोर्ट---यांत मानखंडना कसली ?

## आमच्या भावना तुम्हांला कशा कळणार ?

दास---आपल्याला आरोपीच्या भावना समजणें शक्य नाहीं. आमच्या भावना आपण अनुभवूं शकत नाहीं. लढाई सुरू झाल्यापासून 'आम्हांला सैन्यांत घ्या' असा आक्रोश आम्ही करीत आहोंत. आम्ही ६ हजार माणसें उभीं केलीं ! मी माझा एकुलता एक मुलगा लढाईसाठीं अर्पण केला आणि सरकारनें आम्हांला सिमल्याहून तार पाठविली कीं, या माणसांना फार तर डोली वाहक म्हणून नेमूं ! " हत्यारांच्या कायद्यामुळें अशा प्रका-रची अवहेलना झाली आहे. लष्करांत दाखल होण्यासाठीं, आधीं लोकां-मध्यें क्षात्रवृत्ति उत्पन्न झाली पाहिजे. लोकांचीं हत्यारें हिसकून घेतलीं नसतीं तर आज कोट्यवधि लोक लष्करांत सामील होण्यास तयार झाले असते" असा रा. वैद्य यांच्या भाषणाचा रोख होता.

फिर्यादीवकिलाचें असें म्हणणें आहे कीं, हें भाषण फारच परिणाम-कारक झालें व त्यामुळें लोकांच्या मनांत अप्रीति उत्पन्न झाली. हें खरें होतें तर माझ्या मनांत अप्रीति उत्पन्न झाली असें म्हणणारा एकहि साक्षीदार फिर्यादीपक्षानें कां पुढें आणिला नाहीं ? ब्रिटिश सार्वभौमत्वाखालीं राहून सध्यांच्या राज्यपद्धतींत फेरफार घडवून आणण्यासाठीं स्वराज्य-संघाचे सभासद झालें पाहिजे-अशा प्रकारची भावनाच जर लोकांच्या मनांत उत्पन्न झाली असेल, तर तो राजद्रोह होऊं शकत नाहीं, एवढेंच मला सांगावयाचें आहे. आपण क्षणभर आरोपींची भूमिका पत्करून त्याच्या संबंध भाषणाकडे नजर टाका, अशी माझी विनंति आहे. कारण तसें केल्याशिवाय आपणांस या खटल्यांत खरा न्याय देतां येणार नाहीं. इंग्लिश जज्ज या नात्यानें, ब्रिटिश न्यायदेवतेचें चित्र डोळ्यांसमोर ठेवून उदार दृष्टीनें या खटल्याचा निकाल आपण द्याल, अशी आशा आहे."

## ३—सुरेंद्रनाथांचें स्थित्यंतर.

ता. १२ जून १९१८ रोजीं चितागांग येथें, स्थानिक स्वराज्यसंघामार्फत बाबू जत्रमोहन सेन यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंत श्री. चित्तरंजन दास यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें:—

सद्गृहस्थहो, आज स्वराज्याइतका दुसरा कोणताहि प्रश्न महत्वाचा नाहीं. हा मुख्य प्रश्न सुटला, तरच त्यास आनुषंगिक असे इतर प्रश्न सुटतील व आपलें राष्ट्रीयत्व पूर्णत्वास जाऊन पोहोंचेल. आमच्या देशाचा राज्यकारभार आमच्या हातीं येईपर्यंत राष्ट्रसंवर्धनाचें कार्य आमच्या हातून होऊं शकणार नाहीं [ ऐका, ऐका ]! आणि ह्मणूनच गेल्या वर्षभर आह्मी स्वराज्याची चळवळ शक्य तितक्या नेटानें चालविली आहे. आमचें मायबाप सरकार आमच्यासाठीं सर्व कांहीं करील, अशा भरंवशानें आह्मी आजपर्यंत स्वस्थ बसलों. परंतु आज १५० वर्षांच्या ब्रिटिश कारकीर्दीनंतर आमची स्थिति अत्यंत निराशाजनक झाली आहे.

### आह्मी दरिद्री, कमताकत व नेभळे बनलों !

आज आमचें असें आमच्याजवळ काय आहे ? उद्यां शत्रु देशावर चाल करून आला, तर त्याच्याशीं मुकाबला करण्याची ताकद आमचे अंगीं आहे काय ? आमच्याजवळ युद्धासाठीं लागणारीं शस्त्रास्त्रें आहेत काय ? आमच्या घरादारांच्या संरक्षणासाठीं लागणारी साधी लाठी तरी आमचे हातीं आहे काय ? नाहीं. [टाळ्या] आमच्याजवळ पैसा तरी आहे काय ? नाहीं. [टाळ्या] बंगालमधील बहुजनसमाजाला पुरेसें शिक्षण मिळालें आहे काय ? नाहीं ! ब्रिटिशांनीं आज १५० वर्षें हिंदुस्थानांत राज्य केलें, पण तेवढ्या अमदानींत आमच्या लोकांस खरें शिक्षण मिळूं शकलें नाहीं. पैसा नाहीं, शस्त्रास्त्र नाहीं, शिक्षण नाहीं-आमच्याजवळ कांहींहि नाहीं. स्वराज्याशिवाय ही परिस्थिति पालटणें शक्य नाहीं. ज्या कारणासाठीं स्वराज्य नको ह्मणतां त्याच कारणासाठीं आह्माला स्वराज्य पाहिजे आहे [ टाळ्या ]. लोक सुशिक्षित नाहींत ह्मणून आह्मी स्वराज्याला नालायक आहोंत, असें सांगण्यांत येतें. पण माझा

असा सवाल आहे कीं, आह्मी इतके दिवस अशिक्षित कां राहिलों ? आह्माला इतके दिवस अशिक्षित कोणी ठेवलें ? इतर देशांनीं अवघ्या २०–२५ वर्षांच्या अवधींत आपला बहुजनसमाज सुशिक्षित करून टाकिला. कांहीं कांहींनीं तर यापेक्षांहि कमी अवकाशांत आपलें शिक्षणासंबंधींचें कर्तव्य पार पाडिलें. मग येथील नोकरशाहीला मात्र गेल्या १५० वर्षांच्या कारकीर्दींत सबंध देश सुशिक्षित कां करितां येऊं नये ? नोकरशाहीला लोकांच्या शिक्षणाची जरुरी नाहीं. लोकांना मात्र आहे. कारण त्यामुळें त्यांच्या सर्व जातिबांधवांची उन्नति व्हावयाची आहे. आपलें राष्ट्रीयत्व जिवंत रहावयाचें असेल तर सबंध देश सुशिक्षित केल्यावांचून गत्यंतर नाहीं. या उप्परहि आमचे सत्ताधारी ‘ तुह्मी अशिक्षित आहांत सबब स्वराज्यास नालायक आहांत’ असें ह्मणतील, तर त्यांस ‘ आह्मी अशिक्षित आहोंत ह्मणूनच आह्माला स्वराज्य द्या, ह्मणजे अवघ्या २० वर्षांच्या अवधींत आह्मी आपला बहुजनसमाज सुशिक्षित करून दाखवूं !’ असें उत्तर आमचेकडून मिळेल [टाळ्या].

## आह्मांला दुसरी नोकरशाही नको !

आमचे राज्यकर्ते ह्मणतात कीं, ‘ तुह्मां सुशिक्षितांपैकीं थोडेसे लोक आपल्या मताधिकाराचा उपयोग करतील; पण मग तुह्मांला देशाचे प्रतिनिधि कसें ह्मणतां येईल ? सध्यांच्या नोकरशाहीच्या हातीं असलेलं सरकार, तुह्मां मूठभर लोकांच्या दुसऱ्या नोकरशाहीच्या हातीं जाईल, इतकेंच कायतें.’ मूठभर सुशिक्षितांचे हातीं देशाचीं सत्तासूत्रें जावीं अशी आमची इच्छा नाहीं ! विस्तृत मताधिकार मिळून गरीब रयतेनें व शेतकऱ्यांनीं त्या अधिकाराचा उपयोग करावा, अशी आमची इच्छा आहे. यांत आमच्या सुशिक्षितांचा स्वार्थ साधणार नाहीं. पण तसा तो साधूं नये, अशीच आमची इच्छा आहे. आमच्या स्वराज्याला नोकरशाहीचा तसाच कलकत्याच्या युरोपियन व आंग्लोइंडियन लोकांचा आणि व्यापाऱ्यांचा विरोध आहे. हिंदुस्थानला स्वराज्य दिल्यानें नोकरशाहीचा अंत होतो, ह्मणून नोकरशाहीचा आमच्या स्वराज्याला विरोध; व सदासर्वदा नोकरशाहीच्या कृपाछत्राखालीं राहिल्यानें आपली भरभराट होते असें युरोपियन लोकांस व आंग्लोइंडियन व्यापाऱ्यांस वाटतें

म्हणून त्यांचाहि त्यास विरोध. मताधिकार अधिक विस्तृत न करून घेण्यांत आम्हां सुशिक्षितांचाहि स्वार्थच साधणार आहे. मूठभर सुशिक्षित लोक, कांहीं मुसलमान, कांहीं हिंदू, ब्राह्मण, वैश्य व कायस्थ-एवढ्या लोकांसच फक्त मताधिकार मिळेल अशी खटपट केली, तर त्यांत आमचा स्वार्थ साधण्यासारखा आहे. देशांतील सर्व लोकांस मताधिकार मिळाला, तर आम्हां सुशिक्षितांची काय स्थिति होणार, असा प्रश्न निघण्यासारखा आहे. मागें एका वृद्ध गृहस्थानें मला असाच प्रश्न विचारला होता. तो म्हणाला—" तुम्हांला स्वराज्य मिळालें कीं देशांतील सर्वसाधारण लोकांना मत व सत्ता मिळणार; मग आम्हां ब्राह्मण-वैद्य-कायस्थांची काय स्थिति होईल ? " तुम्हांला हल्लींपेक्षां अत्यंत गैरसोईच्या ठिकाणीं जाऊन बसावें लागेल, अशा प्रकारचें उत्तर मी दिलें. या उत्तराचें रहस्य आपण लक्षांत आणा.

## मग आम्ही कशासाठीं लढत आहों ?

सद्‌गृहस्थहो, आम्ही आमचा क्षुद्र स्वार्थ साधण्यासाठीं ही स्वराज्याची लढाई लढत नाहीं. आज हयात असलेल्या लोकांचे, माझें, तुमचें, चालू पिढीचें किंवा फक्त सुशिक्षित समाजाचें हित साधण्यासाठीं आम्ही ही स्वराज्याची लढाई चालविलेली नाही ! आमच्यापैकीं कोणीहि स्वार्थ साधण्यासाठीं धडपडत असतील, तर त्यांच्याशीं माझा कांहींहि संबंध नाहीं, असें खुशाल समजा. व्यक्तिशः माझें कांहींहि होवो, चालू पिढीचें कांहींहि होवो, आजच्या सुशिक्षित समाजाचेंहि कांहींहि होवो, मला त्याची पर्वा नाहीं ! मला फक्त माझ्या राष्ट्राच्या उन्नतीची पर्वा वाटते ! मला मायदेशाशिवाय दुसऱ्या कशाचीहि पर्वा नाहीं ! (टाळ्या) सबंध बंगाली राष्ट्र जागृत व वैभवसंपन्न केव्हां होईल, इकडे माझे डोळे लागून राहिले आहेत ! मी त्यावेळीं जिवंत असेन कीं मेरन, याची मला पर्वा नाहीं— ( टाळ्यांचा कडकडाट ) माझी मुलेंबाळें त्या वेळीं जिवंत असतील कीं मरतील, त्याचीही मला पर्वा नाहीं ! ईश्वराच्या दयेनें केव्हांना केव्हां तरी सबंध बंगाली राष्ट्र खडबडून जागें होऊन आपलें अस्तित्व सिद्ध करील व आपली सारी शक्ति एकवटून सबंध जगाला तोंड देण्यास सज्ज होईल, याबद्दल खात्री बाळगा ! हरघडीं हेंच

ध्येय माझ्या डोळ्यांसमोर उभें असतें. हेंच ध्येय मला पटतें! या ध्येयासाठींच माझा जन्म आहे, अशी माझी सदसद्विवेकबुद्धि मला सांगते! मला प्रिय अशा सर्व गोष्टींची या एका कार्यासाठीं होळी करण्यास मी तयार आहें! आणि या प्रयत्नांत मी मृत्युमुखीं पडलों तर? तर काय? मी पुनः पुनः या देशांत जन्म घेईन, पुनः पुनः माझ्या मायदेशासाठीं जगेन! पुनः पुनः त्याच्यासाठीं आशेचे पवाडे गाईन व माझ्या ध्येयाची परिपूर्तता होईपर्यंत माझ्या मायदेशाच्या कार्यासाठीं शक्तिसर्वस्व खर्च करीन ( टाळ्यांचा कडकडाट )!

## आमचे कालचे पुढारी.

सद्गृहस्थहो, हें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आह्मी सध्यांची स्वराज्याची चळवळ सुरू केली व तीं सुरू झाल्यापासूनच आमच्यावर दुतर्फी मारा होत आहे. एकीकडे नोकरशाही आमच्याविरुद्ध दांतओंठ चावत आहे, तर दुसरीकडे कलकत्त्यांतील कांहीं बंगाली लोक आमच्या मार्गांत विघ्नें उपस्थित करीत आहेत. स्टेट्समन किंवा इंग्लिशमन इत्यादि पत्रांत आमच्याविरुद्ध कांहीं टीका आली, तर त्याबद्दल मला आनंद वाटतो. कारण त्यामुळें त्यांची बाजू किती असमर्थनीय व लंगडी आहे. हें जगाच्या निदर्शनास येतें. परंतु, अशाच प्रकारची टीका ज्या वेळीं 'बंगाली' पत्रांत आलेली दिसते, त्या वेळीं मात्र मला असह्य वेदना होतात. मला त्या टीकेचा अर्थच समजत नाहीं. स्वराज्यासारखे महत्त्वाचे प्रश्न एकाद्या व्यक्तीच्या आवडीनिवडीवर अवलंबून आहेत काय? आह्मांला असें सांगण्यांत येतें कीं, 'कालचे पुढारीच फक्त लोकांना योग्य मार्ग दाखवूं शकतील.' त्यांनीं खुशाल देशाचें धुरीणत्व पत्करावें. त्यास माझी बिलकुल हरकत नाहीं. परंतु हे कालचे पुढारी होते या एकाच सबबीवर मात्र त्यांची ताबेदारी सहन करण्यास मी कदापि तयार होणार नाहीं! पुढारी कालचा असला तरी हरकत नाहीं. पण त्यानें आज देशाला खरा मार्ग दाखविला पाहिजे. या घटकेला जे जे पुढारी देशाचें खरें राजकारण करीत असतील, ते ते सर्व मला पूज्य आहेत. मी त्यांच्यापुढें आपली मान वांकवून त्यांची चरणधूलि शिरसावंद्य मानण्यास तयार आहें.

परंतु जर का एकादा मनुष्य मला सांगूं लागला कीं—"तुह्मांला अमुक अमुक केलेंच पाहिजे; तें बंगालच्या लोकांना आवडो अगर न आवडो; मी बंगालचा पुढारी आहें ! हें मी केलें आहे. त्यास पाठिंबा मिळालाच पाहिजे!" तर मात्र त्यास उत्तरादाखल "ढोंगी आहांत, लबाड आहांत !" असे उद्गार माझ्या तोंडांतून बाहेर पडल्याशिवाय राहाणार नाहींत. लोकमताकडे दुर्लक्ष करून लोकांचे पुढारी होण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं ! आपण देशकार्य नेकीनें पुढें चालवितों कीं त्यापासून परावृत्त होतों यावरच आपलें अस्तित्व किंवा पतन अवलंबून आहे ! व्यक्तिशः माझी काय किंमत आहे ? कोणताहि पुढारी घ्या, तो एकटा कांहींच करूं शकणार नाहीं. अखिल राष्ट्र हीच त्याची शक्ति आहे ! त्याच्या पाठीशीं असलेली सारी शक्ति राष्ट्राची असते ! या राष्ट्राचा मी एक प्रतिनिधि आहें. आपणांपैकीं प्रत्येकजण या राष्ट्राचा प्रतिनिधि होऊं शकेल. ही माझी एकट्याची शक्ति नाहीं. ती साऱ्या जनतेची आहे. हें ओळखा व त्याप्रमाणें कार्यास लागा. ह्मणजे तुह्मी पुढारी व तुह्मी देशभक्त असें ह्मणून आह्मी तुमचे पाय धरूं. परंतु जर का याच्या विरुद्ध वागाल तर मात्र तुह्मांला कुत्रा देखील विचारणार नाहीं ! मी थोडीशी कडक भाषा वापरली आहे खरी; पण काय करूं ? लोकमत पायाखालीं तुडवून या लोकांनीं माझ्या अंतःकरणाला भयंकर जखम केली आहे.

## मांटेग्यूला आगाऊ वचन दिलें होतें काय ?

सद्गृहस्थहो, लौकरच ब्रिटिश पार्लमेंटकडून आपणाकडे एक स्वराज्याची योजना येणार आहे. या योजनेंत काय आहे, तें मला ठाऊक नाहीं. कोणालाच तें ठाऊक असण्याचा संभव नाहीं. पण अशा प्रकारची योजना येणार आहे, एवढें मात्र खरें. सुरेंद्रनाथ बानर्जी, पं. मदनमोहन मालवीय, श्रीनिवास शास्त्री व आणखी कांहीं गृहस्थ यांस या योजनेची रूपरेषा मांटेग्यूसाहेबांनीं सांगितली, अशा प्रकारची बातमी मागेंच कानावर आली होती. ती खरी आहे कीं खोटी, तें मला ठाऊक नाहीं. पण खरी असावी असें मात्र वाटतें. वरील लोकांपैकीं कांहीं जणांनीं 'आह्मी ही योजना लोकांचे घशाखालीं उतरवूं; आह्मी तिला मान्यता देण्यास लोकांना भाग पाडूं !' अशा प्रकारचें

अभिवचन स्टेटसेक्रेटरीला दिल्याची बातमीहि आमचे कानावर आली आहे. अर्थात ही गोष्ट सदर गृहस्थांनीं अद्यापि कबूल केलेली नाहीं; पण ती आमच्या कानावर आली आहे, एवढें मात्र खरें.

## गुप्त पत्राच्या बुडाशीं काय होतें ?

यानंतर मांटेग्यूसाहेब निघून गेले व थोडक्याच दिवसांत बाबू सत्यानंद बोस यांच्या सहीचें एक गुप्त सर्क्युलर सगळीकडे पाठविण्यांत आलें. बंगाल प्रांतिक परिषदेनें अखिल बंगालसाठीं ह्मणून जें काय निश्चित ठरविलें होतें, तें सारें सोडून देऊन मांटेग्यू जें काय देतील तेवढ्यासाठींच हात पुढें करावे व खूप रहावें असा तें सर्क्युलर काढण्यांत उद्देश होता, हें तें वाचल्यानंतर कोणासहि कळून येईल. हें सर्क्युलर मुळांत कां काढण्यांत आलें? त्याच्याशीं फक्त सत्यानंदबाबूंचाच संबंध होता, कीं एकादा सबंध पक्ष त्याचे पाठीशीं उभा होता? सत्यानंद बोस हे सुरेंद्रनाथांचे अनुयायी आहेत, ही गोष्ट आह्माला ठाऊक आहे. मग हा फक्त सत्यानंदबाबूंचाच प्रयत्न होता कीं मांटेग्यूसाहेबांच्या लहरीस जें काय येईल तेवढ्यांत समाधान माना असें लोकांस सुचविण्याचा तो आणखी कोणाचा तरी अंधारांतला प्रयत्न होता? मांटेग्यूसाहेबांच्या योजनेस मान्यता मिळविण्यासाठीं ही तयारी चालली होती काय?

## कांग्रेस कमिटीचें सर्क्युलर.

पुढें मुंबई येथें कांग्रेसची जादा बैठक भरणार, अशी बातमी प्रसिद्ध झाली. तेव्हां प्रां. कां. कमिटीच्या चिटणिसांनीं पुढील आशयाचें पत्र लिहिलें—"लौकरच सुधारणांच्या बाबतींत स्टेटसेक्रेटरी कांहीं तरी जाहीर घोषणा करतील, अशीं लक्षणें दिसत आहेत. या घोषणेनंतर कांग्रेस व प्रांतिक परिषद यांचीं जादा अधिवेशनें भरविण्याचा विचार चालू आहे. निदान एका तरी पिढीचें भवितव्य या सुधारणांच्या बरेवाईटपणावर अवलंबून आहे. तरी लौकरच ठिकठिकाणीं जाहीरसभा भरवाव्या लागतील, कांग्रेस व प्रांतिक परिषद यांच्या बैठकी जेथें जेथें भरतील तेथें तेथें प्रतिनिधींच्या झुंडीच्या झुंडी जाव्या लागतील व या सुधारणा अपुऱ्या व असमाधानकारक असल्या तर त्यांचेविरुद्ध निर्भीडपणाची टीका करावी लागेल, ही गोष्ट लक्षांत ठेवा

व त्याप्रमाणें तयारींत असा !" या पत्रांत हरकत घेण्यासारखें कांहीं तरी आहे काय ?

## ' बंगाली ' पत्राचा आक्रोश !

पण ' बंगाली ' पत्राला वरील पत्र झोंबलें. वर्तमानपत्र ह्मटलें कीं, त्याच्यावरोबर त्याचा संपादक आलाच. अर्थात ' बंगाली ' पत्रावरोबरच आह्मांला सुरेंद्रबाबूंची हजेरी घ्यावी लागते ही दुर्दैवाची गोष्ट होय. सदर पत्राशीं सुरेंद्रबाबूंचा संबंध नसता, तर त्याला मी काडीचेंहि महत्त्व दिलें नसतें. तें मी केराच्या टोपलींत फेंकून दिलें असतें. ' बंगाली ' पत्र ह्मणतें—'कांग्रेस कमिटीचें पत्र वाचून आह्मांला अत्यंत दुःख झालें. आश्चर्य मात्र वाटलें नाहीं. कारण सध्यांच्या प्रांतिक कांग्रेस कमिटीचें धोरण आह्मी मागेंच विशद करून दाखविलें आहे. जुने पुढारी हे कालचे पुढारी ! तेव्हां ' नवभारता ' संबंधीं विचार करितांना त्यांस कोण विचारतो ? कारण आमच्या वाडवडिलांपेक्षां आह्मांला अक्कल जास्त! शिवाय वडिलांचें ऋण मान्य केलें, तर त्यांत आमची बडेजावी कमी होतेना? मग जुन्या लोकांस कोण विचारतो ? "—इ. कांग्रेस कमिटीच्या एका साध्या पत्रावद्दल ' बंगालीला' एवढा कांगावा व व्यक्तिविषयक हल्ला कशाला करावयास हवा होता? आह्मी लोकांना स्टेटसेक्रेटरीच्या घोषणेकडे लक्ष लावून बसण्यास सांगितलें, हा आमचा अपराध झाला काय ? स्टेटसेक्रेटरीची घोषणा नीट तावून सुलाखून पहा, ती अपुरी असली तर तिचेवर निर्भीडपणें टीका करा व ठिकठिकाणीं जाहीर सभा भरून तेथें प्रचंड गर्दी जमूं द्या, असा उपदेश आह्मी लोकांना केला आहे. " प्रचंड गर्दी " हे शब्द बंगालीच्या काळजाला शल्यासारखे झोंबले आहेत. जणू काय, 'प्रचंड गर्दी' जमेल अशा जाहीर सभा भरविणें हा एक नवीन गुन्हाच झाला आहे ! पूर्वीं हा गुन्हा समजला जात नसे; पण आतां मात्र तो गुन्हा झाला आहे.

## पुढें खरोखर मोठा धोका आहे !

पुढें आमचे संपादकमहाशय कांग्रेस--कमिटीच्या सक्युंलरवर टीका करितांना ह्मणतात—" सक्युंलरची भाषा निराशामय तर आहेच; पण एकादें भयंकर मोठें संकट उद्भवण्याचा संभव दिसतांच एकाद्यानें जशी भीतिदर्शक

किंकाळी फोडावी, तशा प्रकारची किंकाळी त्यांत फोडलेली आहे. जणूं काय, आमच्यावर एकादें महान् संकटच कोसळणार आहे !" होय, सद्गृहस्थहो आपणांवर लौकरच एक मोठें थोरलें संकट कोसळणार, अशी भीति मला वाटत आहे. लट्टुपटीच्या स्वराज्याचा स्वीकार करणें हेंच तें महान् संकट होय. राष्ट्राबद्दल कळकळ वाळगणाऱ्या प्रत्येक माणसानें या प्रसंगीं भीतीची किंकाळी फोडली पाहिजे. स्टेटसेक्रेटरींच्या घोषणेकडे संशयी वृत्तीनें पाहण्यास व ती अपुरी असल्यास 'आह्मांला नको, परत घ्या !' असें ह्मणून ती झिड-कारण्यास कोणत्याहि प्रकारची हरकत नाहीं. सुरेंद्रबाबू ह्मणतात-"सुधारणा अपुऱ्या वाटल्यास त्यावर सडकून टीका करण्यास हे लोक सांगत आहेत. बारिसल कान्फरन्स पोलिसांनीं मोडली त्या वेळीं पळतां पळतां भुई थोडी झालेल्या लोकांचे तोंडीं हे शब्द चांगले शोभतात !" बंगाली राष्ट्राचे पुढा-ऱ्याचे तोंडून असलीं मुक्ताफळें बाहेर पडावीं ना? सपशेल खोटे आरोप पसर-वण्यापर्यंत त्यांची मजल जावी ना? या खोट्या आरोपांचा १९०६ व १९०७ सालीं प्रथम जन्म झाला. ते सपशेल खोटे आहेत, असें त्यावेळींच सिद्ध कर-ण्यांत आलें होतें. आणि तरी मुद्धां आज १९१८ सालीं लोकपक्षाची पाठ सडकण्यासाठीं 'बंगाली' पत्राचे हे नवीन हरिश्चंद्रावतार त्याच खोट्या आरोपांचा पुनः उच्चार करीत आहेत. हे राजेश्री पुढे ह्मणतात--" सुधारणा अपुऱ्या असतील तर त्यांवर टीका करावयाची. पण त्या अपुऱ्या नसतील तर—" नसतील तर काय? आह्मी त्याचा स्वीकार करूं ! [हंशा] पुढें सुरेंद्र-बाबूंनीं असा उपदेश केला आहे—" सुधारणा अपुऱ्या आहेत, असें ह्मण-ण्याइतका सबळ पुरावा पुढें नसतांना, निर्भीड टीकेची व एकजुटीनें तोंड देण्याची भाषा कशाला पाहिजे ?" सुरेंद्रनाथांच्या तोंडून असले उद्गार बाहेर पडावे ना? खरोखरच सध्या काळ उलटला आहे !

## आमच्या माजी पुढाऱ्यांचा लोकांस उपदेश

आमचे संपादकमहाशय पुढें म्हणतात—" सुधारणा समाधानकारक असल्या तर त्यांचें स्वागत करावें; त्या अंशतः समाधानकारक असल्या तर अंशतः त्यांचें स्वागत करावें. " (श्रोते-कधींहि करणार नाहीं !)

कां ? तर ब्रिटिशांचे मनांत त्या अजिबात रद्द करण्याचा विचार येईल म्हणून ! सद्गृहस्थहो, आपण आतां हा सबंध लेख ऐकला आहे. कॉंग्रेस–कमिटीच्या पत्राची लंगडी सबब पुढें करून आमच्या या माजी पुढाऱ्यानें " सुधारणा समाधानकारक असतील तर घ्याच; पण अंशतः समाधानकारक असतील तरीहि घ्याच " अशा प्रकारचा उपदेश बंगाली लोकांना केला आहे. कां ? तर " आधींच युरोपियन लोकांचा त्यांस विरोध; इंग्लंडमधील इंडो–युरोपियन असोसिएशनहि त्याविरुद्ध शस्त्र घेऊन उठलेली. अशा परिस्थितीत तुम्ही बंगाली लोकहि आम्हांला असल्या सुधारणा नकोत असें म्हणाल, तर ब्रिटिश लोक त्या अजिबातच रद्द करा असें म्हणतील." सुधारणा समाधानकारक नसल्याकारणानें रद्द झाल्या, तर बेलाशक रद्द होऊं द्या, असें माझें सुरेंद्रबाबूंस उत्तर आहे. आजपर्यंत आंग्लोइंडियन लोकांनी हिंदुस्थानचे बाबतींत वचनभंग काय थोडे वेळां केला ? त्यांतच आणखी एका वचनभंगाची भर पडेल. " आम्हीं एवढें देतों, यापेक्षां जास्त आम्हाला देतां येत नाहीं " असें त्यांचें म्हणणें असेल तर त्यांस जें काय द्यावयाचें असेल, तेवढें त्यांनीं द्यावें. परंतु तें पुरेसें आहे असें आम्हीं म्हणावें, असा आमच्यावर जुलूम कां ? हा जुलूम मान्य करण्यास आपण कदापि तयार होणार नाहीं, अशी मला खात्री वाटते. आम्हांला स्वराज्य पाहिजे आहे ! युरोपियन राजकारणांत वाढलेले लोक जशा प्रकारचें स्वराज्य मागतात, तशा प्रकारचें स्वराज्य आम्हांला नको ! नोकरशाहीशीं लढण्यास उपयुक्त अशा प्रकारचें एकादें हत्यारच फक्त आम्हांला नको आहे ! आम्हांला असल्या हत्यारांचा आतां पुरतेपणीं वीट आला आहे. आम्हांला बंगाल प्रांतांत खरोखरीची शांतता हवी आहे. ( टाळ्या ) वाटेंत कोणत्याहि प्रकारचा अडथळा न येतां आम्हांला आमची शेती व उद्योगधंदे सुधारतां येतील, शिक्षणप्रसार करितां येईल, आरोग्य सुधारतां येईल, अशा प्रकारचें खरोखरीचें स्वराज्य आम्हांला पाहिजे आहे ! आणि म्हणूनच सध्यांच्या राज्यपद्धतींत फेरबदल झाला पाहिजे, अशी आमची मागणी आहे ! ( टाळ्या ).

## दिल्लीस जाण्यापूर्वी बानर्जींचें मत काय होतें ?

उद्यां मँटेग्यू असें म्हणाले कीं,—" आम्हांला तुम्हीं मागतां तेवढें सगळें कांही देतां येत नाहीं; मासल्यासाठीं थोडेसें देतों तेवढें घ्या व त्यांत समाधान माना " तर त्यांस " माफ करा; आम्हांला तें बिलकूल नको; आम्हांला पूर्वीप्रमाणेंच नोकरशाहीचे गुलाम म्हणून रहावयाचें असेल, आमच्या सर्व चळवळींवर नोकरशाहीचें पूर्ववत् नियंत्रण रहावयाचें असेल व नोकरशाहीच्या लहरीस येईल तेव्हां आमची गळेचेपी व्हावयाची असेल, तर अशा प्रकारच्या सुधारणा आम्हाला नकोत ! त्या जशाच्या तशा इंग्लंडला परत न्या ! ( टाळ्या ) " अशा प्रकारचें उत्तर अवघी जनता देईल अशी मला खात्री वाटते. असला जबाब द्यायला धैर्य लागेल, ही गोष्ट खरी. परंतु एवढें धैर्य आपल्या अंगीं नसेल, तर स्वराज्य मागायला तरी आपल्याला कोणता हक्क ? आतां ' बंगाली ' पत्रांतील १।२ उतारे देऊन सुरेंद्रनाथांचें पूर्वीचें मत कसें पालटलें, तें मी सांगणार आहे. सुरेंद्रनाथ १९१८ च्या मार्च महिन्यांत दिल्लीस गेले. तत्पूर्वी १९१७ च्या नव्हेंबरमध्यें ते ' बंगाली ' मध्यें लिहितात—

" हिंदुस्थानसरकारचें नियंत्रण असलेलीं खातीं सोडून, बाकीच्या सर्व प्रांतिक खात्यांचे बाबतींत आम्हांला संपूर्ण स्वायत्तता पाहिजे. हिंदुस्थानसरकारचें नियंत्रण असलेल्या खात्यांचा कारभार काँग्रेसच्या योजनेप्रमाणें चालावा. बंगालचें लोकमत असें आहे—आणि बंगालचें जें मत तेंच बहुधा अखिल हिंदुस्थानचें मत असतें—की लोकांना तात्काळ संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता द्यावी आणि काँग्रेस व मुस्लिम लीगनें सुचविल्याप्रमाणें वरिष्ठ कायदेकौन्सिल व इंडिया ऑफिस यांमध्यें सुधारणा कराव्या. एवढे सर्व अधिकार प्राप्त झाल्याशिवाय सुशिक्षित हिंदुस्थानचें कधींहि समाधान होणार नाहीं !"

११ नव्हेंबर रोजीं सुरेंद्रनाथांची अशी विचारसरणी होती. ते कालचे पुढारी असतील, तर त्यांनीं आपल्या त्या वेळच्या विचारसरणीस चिकटून रहावें ! ( ऐका, ऐका. ) सुरेंद्रनाथ बानर्जी आपल्या कालच्या विचारसर-

णीला बेइमान होणार नसतील, तर या घटकेला त्यांचा अनुयायी होण्यास मी तयार आहें ( टाळ्या ) ! संपूर्ण प्रांतिक स्वायत्ततेशिवाय आमचें कदापि समाधान होणें शक्य नाहीं, हे सुरेंद्रनाथांचे उद्गार मला मान्य आहेत [ टाळ्यांचा कडकडाट ]. सुरेंद्रबाबू पुढें ह्मणतात-" सुरवातीपासून अखेर-पर्यंत धैर्यानें वागणें, हेंच खऱ्या मुत्सद्देगिरीचें लक्षण आहे ! आमच्या सत्ताधाऱ्यांनीं खंबीर मनानें धैर्याचा अवलंब करावा, ह्मणजे त्याबद्दल अंतीं त्यांस योग्य बक्षीस मिळेल !" सुरवातीपासून अखेरपर्यंत धैर्य दाखविणें हेंच खऱ्या मुत्सद्देगिरीचें लक्षण आहे. मग सुरेंद्रांसारख्या बलिष्ठांचा अधःपात कसा बरें झाला ?

## आह्मांला ढोंग नको ! फसवणूक पुरे झाली !

सुरेंद्रनाथ दुसऱ्या एका लेखांत ह्मणतात-" आह्मांला खरोखरीच्या सुधारणा पाहिजे आहेत. आह्मांला खोट्या, बेगडी सुधारणा नकोत ! आजपर्यंत आमची फसवणूक पुष्कळ वेळां झाली आहे !" सुरेंद्रनाथांचे हे सर्व उद्गार मला तंतोतंत मान्य आहेत ! त्यांचे हे उद्गार इतके मोहक वाटतात कीं त्यांची सर्वच शिकवण अमलांत आणावी, असें मला वाटूं लागतें. परंतु आजचे बानर्जीच जर कालच्या बानर्जींपेक्षां निराळा सूर काढूं लागले, तर त्यांचें अनुयायित्व मी कसें पत्करावें ? आजच्या बानर्जींचें अनुयायित्व मला स्वीकारतां येत नाहीं, हा माझा अपराध काय ? कालचे सुरेंद्रनाथ मला वंद्य आहेत; परंतु आज जर ते आपल्या तत्त्वज्ञानाला बेइमान होणार असतील, तर मलाहि माझा धर्म सोडून देतां येणार नाहीं !

पुनः ता. २९ नव्हेंबरच्या अंकांत सुरेंद्रनाथ म्हणतात-" ज्या योजनेमुळें संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता मिळणार नाहीं, ज्या योजनेंत कॉंग्रेस-लीगनें मागितलेल्या किमानपक्ष अधिकारांपेक्षां कमी अधिकार दिलेले आहेत असली योजना आपोआपच कुचकामी ठरेल ती लोकांच्या पसंतीस कधींहि पडणार नाहीं व तीस त्यांचा पाठिंबाहि मिळणार नाहीं. सुधारणांच्या नांवाखालीं एकादी फाटकी तुटकी घोंगडी लोकांच्या अंगावर टाकल्यानें त्यांचें समाधान होणार नाहीं, उलट परिस्थिति अधिक विकट होईल !" आणि हेच सुरेंद्र-

नाथ आज सुधारणा समाधानकारक नसल्या तरीसुद्धां त्यांचा स्वीकार करा, असा उपदेश लोकांस करीत आहेत ! डिसेंबर महिन्यांतसुद्धां सुरेंद्रनाथांचें जुनें मत कायम होतें. त्यावेळीं ते आपल्या एका लेखांत लिहितात-" कॉंग्रेस-लीग-योजना ही लोकांची किमानपक्ष मागणी आहे. त्यांत बिलकुल छाटोछाट करितां येणार नाहीं. सध्यांच्या परिस्थितींत यापेक्षां अधिक नेमस्त योजना करितांच येणार नाहीं ! " पण आजचे सुरेंद्रनाथ मात्र तसली हक्क योजना प्रसवले आहेत [ हंशा ].

## सुरेंद्रनाथांची विलक्षण रंगपालट.

सद्‌गृहस्थहो, सुरेंद्रनाथांनीं जानेवारी व फब्रुवारी महिन्यांतहि अशाच प्रकारचे उद्गार काढिलेले आपणांस आढळतील. मार्च महिन्यात ते दिल्लीस गेले आणि तेव्हांपासून त्यांचा रंग पालटला ! काल असमाधानकारक व अपुऱ्या अशा सुधारणा स्वीकारण्यास तयार नसलेल्या सर सुरेंद्रनाथांनीं—माफ करा माझ्या तोंडून चुकून 'सर' हा शब्द आला; भावि गोष्टीचीं लक्षणें आधींपासून दिसूं लागतात असें दिसतें—आज स्टेटसेक्रेटरी जी कसली योजना पुढें करितील ती लोकांनीं मान्य करावी असें म्हणण्यास तयार व्हावें, याचें काय बरें कारण असावें ? बाबू सुरेंद्रनाथ यांस त्यांच्या अचानक मतांतराचें कारण विचारण्याचा आम्हाला हक्क आहे. आम्हांला त्यांच्याकडून योग्य जबाब पाहिजे आहे. ते बंगालचे पुढारी आहेत. निदान स्वतःला तसें ते समजतात तरी. मी त्यांचा पुढारीपणाचा हक्क मान्य करण्यास तयार आहें. पण आम्हांला—आज इतकीं वर्षें आम्हीं त्यांच्याशीं प्रेमानें वागत असतांना, त्यांचें अनुयायित्व पत्करून त्यांचा जयजयकार करीत असतांना, भक्तिमय अंतःकरणानें त्यांचा प्रत्येक शब्द झेलीत असतांना, आजच त्यांच्या वृत्तींत फरक कां पडला, असें विचारण्याचा सुद्धां हक्क नाहीं काय ? ( ऐका, ऐका ). ' रौप्य मुद्रांच्या आशेनें किंवा एखादी पदवी मिळविण्याच्या आशेनें ' हें मतांतर झालेलें नाहीं असें आम्हांला सांगण्यांत येतें. पण मग हें मतांतर कशासाठीं व कां झालें ?

## हा हस्तस्पर्श बाधला कीं कोणी कान उपटले ?

दिल्लीच्या वातावरणांत तर असें कांहीं अद्भुत नव्हतें ना की ज्यामुळें अशा प्रकारचें मतांतर एकदम व्हावें ? कोणतें तरी वचन किंवा कृति तर बाधक झाली नाहींना ? कां कोणी हस्तस्पर्श केला अगर कान लांब केले त्याचा हा परिणाम असावा ? हें मतांतर कां झालें ? वृद्धत्वांतल्या वाढत्या शहाणपणाचा तर हा प्रभाव नाहीं ना ? सुरेंद्रनाथांनीं लोकांच्या शंकांचें निराकरण करणें जरूर आहे. माझ्याविषयीं ह्मणाल, तर माझी बाजू स्पष्ट आहे. इंग्लंडचे लोक सुधारणा देण्यास तयार असोत अगर नसोत, त्यांनीं देऊं केलेल्या सुधारणांमुळें माझा नैसर्गिक हक्क मान्य होत असला, तरच मी त्यांचा स्वीकार करीन, एरव्हीं करणार नाहीं ! कारण देशांतील लोकांच्या नैसर्गिक हक्कांस मान्यता देणें, हाच प्रत्येक सुधारणायोजनेचा अर्थ आहे [ टाळ्यांचा कडकडाट ]. मला कोणाचेंहि उपकार नकोत. मला माझा हक्क पाहिजे आहे !

## आह्मांला आमचे हक्क पाहिजे आहेत !

माझ्या हक्कांची जाणीव जर माझे अंतःकरणांत झाली नसेल, तर ब्रिटिश लोक मला कसले हक्क देणार ? मनुष्य कधींतरी हक्क तयार करूं शकतो काय ? हक्कांची फक्त जाणीव व्हावयाची असते. आमचे हक्क आमच्याजवळच असतात; ते आह्मांला देवाकडून मिळालेले असतात; ते आमच्यापासून कोणताहि मनुष्य हिरावूं शकत नाहीं ! तुमच्या नैसर्गिक हक्कांची तुह्मांला जाणीव होईपर्यंत ब्रिटिश पार्लमेंटच काय, पण जगांतलें कोणतेंही पार्लमेंट ज्या गोष्टी तुमच्या नव्हत, त्या तुह्मांला देऊं शकणार नाहीं ! तुमच्या मालकीची गोष्ट प्राप्त करून घेण्यासाठीं आधीं प्रयत्न करा ! ब्रिटिश लोकांना मर्दपणानें सांगा कीं " हा माझा हक्क आहे ! " आणि अखिल राष्ट्राची अनुमति मिळवून आपली मागणी खरी करून दाखवा ! [ टाळ्या ]. एकदां आपला हक्क शाबीत केलात कीं मग त्यास मान्यता देणार नाहीं, अशी एकहि शक्ति या जगांत नाहीं ! [ टाळ्या ] हा माझा हक्क आहे, अशा प्रकारची जाणीव तुह्मांला होईपर्यंत तुमचे राज्यकर्ते हे हक्क तुमच्यापासून

दूर ठेवतील. हा माझा हक्क आहे, अशा प्रकारची जाणीव एकदां तुम्हांला झाली कीं मग मात्र तुमचे हक्क तुमच्यापासून कोणीहि हिरावूं शकणार नाहीं. ज्या घटकेला तुमच्या हक्कांची तुम्हांला जाणीव होईल, त्या घटकेला ते हक्क तुम्हांला मिळालेच पाहिजेत ! अर्धवट स्वरूपाच्या सुधारणा अशा प्रकारचें हक्कप्रदान करूं शकणार नाहींत. कोणत्याहि सुधारणायोजनांनीं आजपर्यंत राष्ट्रें निर्माण झालेलीं नाहींत व पुढेंहि होणार नाहींत ! राष्ट्रें हीं आपोआप निर्माण होत असतात असें सुरेंद्रनाथांनींच आम्हांला वारंवार सांगितलें आहेना ? [ टाळ्या ].

## कालच्या पुढाऱ्यांचें शहाणपण !

आम्हांला आमचें राष्ट्र तयार करावयाचें आहे. सुरेंद्रनाथ म्हणतात त्या मार्गाचा अवलंब केल्यानें राष्ट्र कधीं तरी तयार होईल काय ? राजकीय इतिहासांतील अत्यंत आणीबाणीचा प्रसंग सध्यां येऊन ठेपला आहे. अशा परिस्थितींत लोकांच्या पुढाऱ्यानें " तुम्हांला जें योग्य वाटेल तें द्या; आम्ही तें मान्य करूं " असें म्हणणें हें राजकारण कुठलें ? याला शहाणपणा म्हणतां येईल काय ? हा धडधडीत मूर्खपणा नव्हे काय ? खरोखर सुरेंद्रनाथांनीं लोकांच्या शंकांचें निरसन करणें जरूर आहे.

सद्गृहस्थहो, मी आज जें काय सांगितलें आहे, तें नीट लक्षांत ठेवा. नुसत्या शब्दांनीं हक्क केव्हांहि शाबीत झाले नाहींत. नुसत्या कायद्यांचीहि कांहीं किंमत नाहीं. आधींच अस्तित्वांत असलेल्या हक्कांस कायदे फक्त मान्यता देतात. तुम्हांला तुमच्या हक्कांची फक्त जाणीव झाली, तर हक्क तुमचे आहेत. त्यांत कसूर झाली, तर मात्र ते गेले म्हणून समजा [टाळ्या]. कसूर कराल, तर कायमचें नुकसान करून घ्याल ! आपल्याला हक्क आहेत हें जाणण्याची भीति वाटत असेल, तर स्वराज्यास तुम्ही नालायक आहांत ! भेकड लोकांच्या राष्ट्राला राष्ट्रीयत्वाचे हक्क आजपर्यंत कोणीहि दिलेले नाहींत ! ( ऐका, ऐका. )

## ४—एक भयंकर अन्याय !

चितागांग येथें, ता. १७ जून १९१८ रोजीं स्थानिक स्वराज्य-संघातर्फे बाबू जत्रमोहन सेन यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंत श्री. चित्तरंजन दास यांचें पुढील आशयाचें भाषण झालें. ते म्हणाले—

हिंदुस्थानच्या इतिहासांत सध्यांइतका आणीबाणीचा प्रसंग कधींच आला नव्हता, असें मी मागें एकदा म्हणालों होतों. आज मी आपणांस एका भयंकर अन्यायाची कथा सांगणार आहें ! माझी कथा ऐकण्यापूर्वी ब्रिटिश अंमल सुरू झाल्यापासून आपल्या राष्ट्रीय इतिहासांत काय काय गोष्टी घडून आल्या त्यांचें चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभें करा. आज दीडशें वर्षें होऊन गेलीं, तरीसुद्धां बंगालचे बहुतेक लोक अशिक्षित अवस्थेंत आहेत. आणि त्यांच्या या शिक्षणाभावामुळें ते स्वराज्यास नालायक आहेत, असें आमचे राज्यकर्ते ह्मणत आहेत. बहुजनसमाज सुशिक्षित नाहीं हा दोष कोणाचा, असा माझा अधिकाऱ्यांस सवाल आहे. आमच्या देशबांधवांना गेल्या १५० वर्षांत सुशिक्षित करतां आलें नाहीं, तर इतके दिवस आपण येथें करीत होतां तरी काय ? तुम्ही आमच्या देशबंधूंनां सुशिक्षित कां केलें नाहीं ? शिक्षणाचें कार्य हातीं घेतल्यानंतर तें तीस वर्षांच्या आंत पुरें केलें नाहीं, असें एक तरी राष्ट्रीय सरकार आपणांस या सुधारलेल्या जगांत दिसेल काय ? [ ऐका, ऐका ]. आह्मांला आज स्वराज्य मिळालें तर अवघ्या २० वर्षांच्या आंत आम्ही सबंध देश सुशिक्षित करून सोडूं ! आमच्या राज्यकर्त्यांनीं हें कार्य अद्यापपर्यंत कां केलें नाहीं ? नोकरशाहीनें या प्रश्नाचें उत्तर द्यावें. आमच्या बाबतींत झालेल्या भयंकर अन्यायाच्या सांखळींतला हा पहिला दुवा आहे ! ( ऐका, ऐका ).

### आमची शेती.

आतां आमच्या शेतीची दशा लक्षांत घ्या. सबंध जगानें हेवा करावा, अशी आमची पुराणकालीन ग्रामसंस्था होती. आज आमच्या खेड्यापा-

ज्यांची काय दशा झाली आहे ? आज आमच्या शेतीची काय दशा झाली आहे ? गेल्या १५० वर्षांत आमचीं शेती सुधारण्यासाठीं सरकारनें आपल्या मोठेपणास साजेसे कांहीं तरी प्रयत्न केले आहेत काय ? ( श्रोते—नाहीं, नाहीं ! ) ' नाहीं ' हाच जबाब मिळाला पाहिजे. सरकारनें आमची शेती सुधारण्याचे प्रयत्न कां केले नाहींत ? तर नोकरशाहीचा शेतीशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं म्हणून ! कदाचित नोकरशाहीला स्वतःचें हित साधण्यासाठीं एकादें खातें उघडून त्यास ' शेतकी खातें ' असें नांव देणें भाग पडलें असेल व तसें झालेंहि आहे. आमच्या नोकरशाहीनें आम्हांस नापसंत अशीं एक दोन कॉलेजें स्थापन केलीं आहेत. परंतु तेवढ्यानें शेतीची सुधारणा कशी होणार ? आमच्या शेतीची सुधारणा होणें हें नोकरशाहीच्या दृष्टीनें हिताचें आहे कीं नाहीं हें कोणास ठाऊक ? पण आम्हांला मात्र आमची शेती सुधारणें अत्यंत जरूर आहे. बंगालच्या शेतकऱ्यांची भरभराट व्हावी व त्यांनीं अधिक सुखांत रहावें, हें आमच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे ( ऐका, ऐका ) ! ज्यांना ज्यांना म्हणून स्वराज्य पाहिजे असेल, त्या सर्वांच्या दृष्टीनें तें महत्त्वाचें आहे ( ऐका, ऐका ) ! आपण सबंध बंगाली राष्ट्राकडे नजर फेंकली पाहिजे ! आपण अव्याहत कार्य करीत राहिलें पाहिजे. हिंदूमुसलमान मिळून सबंध बंगाली राष्ट्र आपल्या राष्ट्रीयत्वाच्या दिमाखानें जगापुढें छाती करून कधीं उभें राहतें, इकडे आपण डोळे लावून राहिलें पाहिजे ( टाळ्या ) ! आणि म्हणूनच आमच्या शेतकऱ्यांची स्थिति सुधारणें अत्यंत महत्त्वाचें आहे, असें मी म्हणतों. बंगालची जनता कोणाला म्हणावयाचें ? कोर्टांत खटले चालविणारे आम्ही वकील—आम्ही बंगालची जनता नव्हे ! म्याजिस्ट्रेट व जज्ज म्हणून काम करणारे लोकहि बंगालची जनता नव्हत ! मग बंगालची जनता कुठें आहे ? जे लक्षावधि शेतकरी, आमची जमीन कसतात, तेच खरी जनता होत ! तेंच आमचें खरें राष्ट्र होय ( टाळ्या ) ! आमच्या देशाचा कधीं काळीं उदय व्हावयाचा असेल—देवाच्या दयेनें तो होणार यांत बिलकुल शंका नाहीं—व जगामधील राष्ट्रांच्या पंक्तींत अभिमानानें बसण्याचें भाग्य त्यास लाधावयाचें असेल ( टाळ्यांचा कडकडाट )—तर त्यापूर्वीं कितीतरी दिवस आमच्या शेतीची सुधारणा आ-

म्हांला करावी लागेल. आणि यासाठींच आम्हांला स्वराज्य पाहिजे आहे! आमच्या बाबतींत झालेल्या भयंकर अन्यायाच्या सांखळींतला हा दुसरा दुवा आहे.

## आमचा व्यापार व उद्योगधंदे

आतां आमच्या व्यापाराची व उद्योगधंद्यांची काय स्थिति आहे, याचा विचार करूं. पहिल्यापासून यासंबंधींचा पाढा वाचण्याची माझी इच्छा नाहीं. त्याचप्रमाणें आमच्या व्यापाराची राखरांगोळी कशी करण्यांत आली व आमचे उद्योगधंदे कसे बुडविले गेले, यासंबंधींचा इतिहास सांगण्याचीहि माझी इच्छा नाहीं. मागें जें काय झालें तें होऊन गेलें. पण सध्यां तरी काय चाललें आहे? आमचा व्यापार व उद्योगधंदे यांस उत्तेजन देण्यासाठीं आमच्या सरकारनें गेल्या पांचपंचवीस वर्षांत काय केलें आहे? या प्रश्नाचें तात्काळ उत्तर देणें देशाच्या हिताच्या दृष्टीनें सध्यां अत्यंत अगत्याचें झालें आहे. नोकरशाहीनें या बाबतींत कांहीं तरी केलें आहे काय? देशाचा व्यापार व उद्योगधंदे यांची अभिवृद्धि करण्यासाठीं जरूर ती मदत करणें, हें प्रत्येक सुधारलेल्या सरकारचें कर्तव्यकर्म आहे. आमची नोकरशाही 'हें कर्तव्य आम्हीं बजाविलें आहे' असें आपल्या छातीवर हात ठेवून सांगूं शकेल काय? उत्तर नकारार्थींच येणार हें उघड आहे. आम्हांला स्वराज्य कां पाहिजे, याचें हें दुसरें कारण आहे. आमच्या अन्यायाच्या मालिकेंतला हा तिसरा दुवा आहे! (ऐका, ऐका). आपल्याला साक्षीपुरावा पाहिजे आहे काय? पाहिजे असल्यास हा पहा. बंगालच्या १॥ कोटींच्या जमीनमहसुलापैकीं अवघे २४ लाख रुपये सरकार शेतीसाठीं खर्च करितें. हा पैसा कोठें जातो? नोकरशाही म्हणते कीं, स्वराज्यासाठीं हांकाटी करणारे आम्ही लोक लोकांचे लोकप्रतिनिधि होण्यास नालायक आहों! मग सरकारनें तरी लोकांसाठीं इतक्या दिवसांत काय केलें आहे? सरकार शेतीसाठीं अवघे २४ लाख रुपये खर्च करतें अगर उडवतें! शेतीच्या बाबतींत तुम्ही कांहीं तरी सुधारणा केल्या आहेत काय? सुधारणा हीच तुमच्या कार्यकर्तृत्वाची कसोटी आहे. कोणत्याहि प्रकारची सुधारणा न करितां, लठ्ठ पगाराचे डोईजड अधिकारी मात्र तुम्ही सध्या पोशीत आहांत!

## पांच वर्षांत पन्नास लाख मृत्यु !

आतां, आमच्या आरोग्याची काय दशा आहे, ती पहा. आरोग्यविषयक सुधारणांच्या अभावामुळें गेल्या कांहीं वर्षांत आमचे लोक कसे पटापट मरत आहेत, याची हकीगत आतां मी आपणांस सांगतों. ऐका, हे आंकडे ऐका. एकट्या मलेरियानें १९११-१२ सालीं ९ लाख लोक मृत्यूच्या भक्ष्यस्थानीं पडले ! १९१२-१३ सालीं ९ लाख ५९ हजार; १९१३-१४ सालीं ९ लाख ६५ हजार; १९१४-१५ सालीं १० लाख ६१ हजार व १९१५-१६ सालीं १० लाख ६४ हजार लोक मलेरियाची मगरमिठी पडल्यामुळें इहलोकची यात्रा संपवून यमदरबारीं निघून गेले ! ५ वर्षांत ५० लाख जीवांचा संहार ! ( आवाज–अरे बापरे ! ) ग्रेट ब्रिटन व आयर्लंड यांच्या सध्यांच्या सैन्याची गोळाबेरीज केली, तरीसुद्धां ती या मृत्युसंख्येपेक्षां कोतीच पडेल ! ( आवाज–अरे बापरे ! ) या बाबतींत अर्जविनंत्या झाल्या, तज्ज्ञांचीं मतें मागविण्यांत आलीं व कांहीं प्रयोगहि झाले. परंतु, ही स्थिति सुधारण्यासाठीं सरकारनें आतांपर्यंत प्रत्यक्ष असें काय केलें आहे ? सरकारनें योग्य वेळीं योग्य प्रयत्न केले असते, तर या राक्षसी रोगाचा समूळ नायनाट होऊं शकला नसता काय ? आमचें सरकार राष्ट्रीय झालें, तर या रोगाचा समूळ नायनाट करितां येणार नाहीं, असें आपणास वाटतें काय ? बंगालच्या वाढत्या राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रतिवर्षी आमच्या प्रांतांतील मृत्यूंची संख्या झपाट्यानें वाढत आहे. याचा अर्थ असा कीं लोक कमताकद व दुबळे बनले आहेत, त्यांच्या शक्तीचा ऱ्हास झाला आहे. आणखी कांहीं दिवस अशाच स्थितींत आम्हीं राहिलों, तर आमचा पुनर्जन्म होणें अशक्य आहे. ( ऐका, ऐका ) ! मी येथें फक्त हिंवतापाच्या भक्ष्यस्थानीं पडलेल्या लोकांची संख्या दिली आहे. परंतु, याशिवाय सबंध देशभर हिंवतापानें बेजार झालेले असंख्य लोक आपली इहलोकची जीवितयात्रा कशीबशी कंठीत आहेत, त्यांची वाट काय ? सबंध बंगाल हिंवतापानें गांजलेल्या लोकांनीं गजबजला आहे ! त्यांच्या दुःखनिवारणार्थ सरकारनें काय केलें आहे ? (लोक–कांहीं नाहीं ! ) होय, सरकारनें जवळजवळ कांहींहि केलेलें नाहीं

## शिक्षणखर्च—दरमाणशीं दरसाल सवंध ३ आणे !

आतां शिक्षणासंबंधींचे कांहीं आंकडे सांगतों. सरकार शिक्षणासाठीं सरासरी ८५ लाख रु. खर्च करितें. बंगालची एकंदर लोकसंख्या ४॥ कोट आहे; म्हणजे दर ५ माणशीं प्रतिवर्षी १ रु. पडला ! याचा अर्थ असा कीं शिक्षणासारख्या पवित्र कार्यासाठीं सरकार प्रतिवर्षी दर माणशीं ३ आण्यांचा प्रचंड खर्च करितें ! [ हंशा ] ह्मणजे दर महिना दर माणशीं १ पैसा पडतो ! ( शेम, शेम ). आणि असें आहे तरीसुद्धां आह्मांला असें सांगण्यांत येतें की हिंदुस्थानांत शिक्षणप्रसार करणें हें इंग्लंडचें कर्तव्य आहे ! कां ? तर हिंदी लोकांसारख्या पतित लोकांचा उद्धार व्हावा ! ( हंशा ) आणि या पवित्र कार्यासाठीं प्रतिवर्षी दरमाणशीं सवंध ३ आणे खर्च होतात ! परंतु हा सवंध खर्च केवळ शिक्षणासाठीं होत असतो, असें मात्र समजू नका. त्यांत इमारत-खर्चाचाहि समावेश होतो [ हंशा ] ! त्यांत शाळापहाणीच्या खर्चाचाहि समावेश होतो !–आणि हा खर्च शिक्षकवर्गाच्या पगारापेक्षां जास्त असतो ( शेम ) ! तेव्हां हा सारा खर्च वजा जातां, केवळ शिक्षणासाठीं किती पैसा शिल्लक उरतो, याची आपणच कल्पना करा ! शिक्षणाच्या पोकळ गप्पा मारितात; पण शिक्षणाची पर्वा नोकरशाहीला आहे कोठें ?

## व्यापार व उद्योगधंदे.

व्यापार व उद्योगधंदे यांसाठीं जवळ जवळ कांहींच खर्च होत नाहीं, असें ह्मटलें असतां चालेल. मि. स्वान, आय. सी. एस., बंगालच्या औद्योगिक परिस्थितीसंबंधीं आपल्या रिपोर्टांत लिहितात " प्रांताची औद्योगिक प्रगति ही खासगी प्रयत्नांवरच अवलंबून असली तरी सरकारनें या बाबतींत अधिक प्रोत्साहन दिलें पाहिजे, असें मला वाटतें ! " सरकारनें अधिक प्रोत्साहन दिलें पाहिजे ! सिव्हिल सर्व्हिस मधला मनुष्य यापेक्षां जास्त काय लिहिणार ? मि. स्वान पुढें म्हणतातः—" हिंदी भांडवलावर व हिंदी व्यवस्थेखालीं चाललेल्या उद्योगधंद्यांस भरपूर भांडवलाची आवश्यकता आहे. कारण बँका व इतर कंपन्या यांजकडून त्यांस पैसा मिळूं शकत नाहीं ! " असा स्वानसाहेबांचा रिपोर्ट आहे. तेव्हां व्यापार व उद्योगधंदे यांचे बाबतींत सरकारकडून फारच थोडी मदत होते, ही गोष्ट उघड आहे.

## अत्याचारी क्रांतिकारकांची चळवळ

सध्यां परिस्थिति ही अशी आहे. आमच्या बाबतींत होणारा अन्याय आज अनेक वर्षे असाच चालू आहे. आम्ही झोंपलों होतों. दरवर्षाच्या अखेरीस आम्हीं कॉंग्रेस-बैठक भरवीत असूं. परंतु तेवढें एकदां होऊन गेलें कीं आमच्या हातून इतर कांहींहि होत नसे. १९०५ सालापासून मात्र देशांत स्वदेशीची प्रचंड चळवळ सुरू झाली; व या चळवळीबरोबरच ती दडपून टाकण्यासाठीं सरकारनें सोटेशाही सुरू केली. सरकारच्या या सोटेशाहीमुळें एका नवीन पक्षाचा जन्म झाला. या पक्षाच्या लोकांना सरकार अराजक म्हणतें. पण त्यांस अराजक म्हणतां येईल असें मला वाटत नाहीं. ते क्रांतिकारक मात्र आहेत. त्यांचे मार्ग चांगले आहेत, किंवा त्यास उत्तेजन दिलें पाहिजे. असें मी म्हणत नाहीं. परंतु ते अराजक नाहींत, एवढें मात्र खास. त्यांना सरकार ही संस्थाच अजिबात नको आहे, असें नाहीं. त्यांस फक्त सध्यांची राज्यपद्धति बदलावयाची आहे ( ऐका, ऐका )! अराजक म्हणून गणल्या जाणाऱ्या या लोकांचें ध्येय व कॉंग्रेस किंवा मुस्लिम लीगचें ध्येय यांमध्यें काडीचीहि तफावत नाहीं, असें मला वाटतें. फरक काय तो ध्येयसंपादनाच्या मार्गासंबंधीं आहे, ध्येयासंबंधीं नाहीं! त्यांचे मार्ग कायदा व शिस्त धाब्यावर बसविणारे असतात, तर कॉंग्रेस-लीगचे मार्ग पूर्णपणें कायदेशीर असतात. हाच काय तो दोहोंमध्यें फरक आहे. त्यांच्या मार्गांचा कडक निषेध केला पाहिजे; परंतु त्यांस अराजक म्हणणें हा मात्र भयंकर अन्याय आहे! तें कसेंहि असो. सरकारी सोटेशाहीचे तडाखे लोकांच्या पाठींत एकामागून एक बसूं लागतांच बंगालमध्यें क्रांतिकारकांचा एक नवीन पक्ष उत्पन्न झाला, एवढें मात्र खरें. या पक्षाच्या अस्तित्वामुळें आम्ही स्वराज्यास नालायक आहों, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. बंगालमध्यें क्रांतिकारक पक्ष आहे, ही गोष्ट मला कबूल आहे. परंतु राष्ट्रीय नसलेल्या अशा कोणत्याहि सरकारला क्रांतिकारकांची चळवळ बंद पाडतां येणार नाहीं, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी. या लोकांनीं ही चळवळ कशासाठीं चालविली आहे? त्यांना काय पाहिजे आहे? त्यांना स्वातंत्र्य पाहिजे आहे! त्यांना सध्याच्या परिस्थितींत फेरबदल व्हावयास पाहिजे आहे.

कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांचें जें ध्येय तेंच त्यांचेंहि ध्येय आहे ! याच्याहि पलीकडे जाऊन मी असे सांगतों कीं, त्यांच्या ध्येयास ब्रिटिश मंत्रिमंडळानेंहि मान्यता देऊन तें न्याय्य ठरविलें आहे ! गेल्या सालीं ऑगस्टमध्यें ब्रिटिश मंत्रिमंडळानें हिंदुस्थानांत कोणत्या तरी प्रकारची जबाबदार राज्यपद्धति सुरू केली जाणार, अशा अर्थाची घोषणा केली आहे. या घोषणेचा अर्थ काय ? तिचा अर्थ इतकाच कीं, सध्यां जी नोकरशाहीची राज्यपद्धति आहे ती बदलली पाहिजे. हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं सध्यांची राज्यपद्धती बदलली पाहिजे अशा प्रकारचा कबुलीजबाब ब्रिटिश मंत्रिमंडळानें दिला आहे. बंगालच्या क्रांतिकारकांचें ध्येय कॉंग्रेस-मुस्लीमलीगसारखें आहे इतकेंच केवळ नव्हे, तर त्यास इंग्लंडमधील सर्वश्रेष्ठ अशा अधिकारी मंडळाची मान्यता मिळाली आहे. क्रांतिकारकांच्या चळवळीस आळा बसावा अशी आपली इच्छा असेल, तर आधीं त्यांचे प्राण स्वातंत्र्याच्या क्षुधेनें व्याकुळ झाले आहेत ते शांत करा ! त्यांस स्वातंत्र्याची भूक लागली आहे, ती भागवा ! त्यांस स्वातंत्र्य द्या व एकदां लोक स्वतंत्र झाले कीं मग क्रांतिकारकांच्या चळवळीस आपोआप मूठमाती मिळेल याबद्दल खात्री बाळगा ! ( ऐका, ऐका ). अनेकवार अशा प्रकारचा उपदेश करण्यांत आला. परंतु नोकरशाहीनें तिकडे दुर्लक्ष केलें आहे. सद्गृहस्थहो आज परिस्थिती ही अशी आहे. एकीकडे आमची शेती, शिक्षण, आरोग्य व्यापारधंदे यांची हेळसांड होत आहे, तर दुसरीकडे देशांत क्रांतिकारकांचा जन्म झाला आहे. ही परिस्थिति पाहूनच ब्रिटिश मंत्रिमंडळानें गेल्या ऑगस्टांत आपली संस्मरणीय घोषणा केली. परंतु या घोषणेचा नूर एक, तर तिच्या जनकांची प्रत्यक्ष कृति दुसरीच आहे, हेंच आमच्या लोकांचें गाऱ्हाणें आहे..पाहिजे तर असें चक्क आम्हाला सांगा कीं, " बाबांनों, तुम्ही स्वराज्यास लायक नाहीं, सबब आम्हीं तुम्हाला तें देत नाहीं ! " या उत्तरांत कांहीं तरी अर्थ आहे. मला स्पष्टवक्तेपणा आवडतो. " आम्हांला जबाबदारीची राज्यपद्धती देतां येणार नाहीं. आमचें सरकार पूर्वी इतकेंच नोकरशाही स्वरूपाचें राहणार ! " असें स्पष्टपणें जाहीर करा, म्हणजे सध्यांची राजकीय चळवळ आम्हीं कायमची सोडून देऊं ! परंतु, आमचा ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या घोषणेवर विश्वास

आहे. आणि म्हणूनच आम्ही स्वराज्याच्या निरनिराळ्या योजनांचा विचार करीत असून त्यासाठीं ठिकठिकाणीं सभा भरवीत आहोंत. आमच्या सूचनांमुळें सरकारला मदत व्हावी व पार्लमेंटनेंहि त्यांचा विचार करावा अशी आमची इच्छा आहे.

## स्वराज्यवाद्यांच्या सूचनांची सरकारनें कशी वासलात लाविली ?

यानंतर ब्रिटनच्या मुख्य प्रधानाचा संदेश बाहेर पडला. हा संदेश अधिक संस्मरणीय होता. त्या वेळीं इंग्लंड व हिंदुस्थान यांजवर संकट गुदरण्याचा संभव होता ' म्हणून आमच्या मदतीस धांवून या व तें टाळा ' अशी विनंति त्यांनीं केली. आम्ही पुनः सभा भरविल्या व सरकारला सांगितलें कीं—" या प्रसंगीं संबंध हिंदुस्थान एक होणें जरूर आहे. स्वदेशासाठीं व साम्राज्यासाठीं पडेल तो स्वार्थत्याग करण्यास लोकांनीं तयार व्हावें असें आपणांस वाटत असेल, तर आधीं लोकांचे अंगांत उत्साह उत्पन्न करणें जरूर आहे. सरकारनें पहिल्या प्रथम सारे दडपशाही कायदे रद्द करावे व संशयावरून अटकेंत ठेविलेल्या लोकांची व इतर राजकीय कैद्यांची मुक्तता करावी ( टाळ्यांचा कडकडाट )! या लोकांना अटकेंत ठेवण्यांत सरकारनें भयंकर जुलूम केला आहे. हा जुलूम दूर करा ! स्वराज्यासंबंधीं निश्चित योजना पुढें मांडा ! म्हणजे सबंध देश तुमच्या पाठीशीं आहे, असें तुम्हांला दिसेल. हजारों हिंदी शिपाई तुमच्यासाठीं, हिंदुस्थानासाठीं व साम्राज्यासाठीं लढण्यास तयार होतील. श्रीमंतांचें सोनें व गरिबांची फुलाची पांकळी तुमच्या मदतीसाठीं आपोआप धांवत येईल ! देशाच्या सेवेसाठीं व साम्राज्याच्या वैभवासाठीं हरतऱ्हेचा स्वार्थत्याग करण्यास लोक आनंदानें तयार होतील ( टाळ्या )! " परंतु नोकरशाहीनें या सूचनांकडे काडीइतकेंहि लक्ष दिलें नाहीं.

आह्मी महायुद्धांत मदत करावी, अशी इंग्लंड विनंति करीत आहे. आह्मी इंग्लंडला कां मदत करावी ? आह्मी इंग्लंडला मदत करावयाची असेल, तर आधीं हा देश ' आमचा ' आहे, अशी आमची खात्री झाली पाहिजे [ टाळ्या ] ! ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानला योग्य तें स्थान मिळालें आहे,

अशी आमची खात्री झाली पाहिजे. [ टाळ्या ]! आमची मागणी ही अशी आहे. इंग्लंडच्या मोठमोठ्या मुत्सद्यांनींहि वारंवार अशाच प्रकारचे उद्गार काढले आहेत. तुमचाहि असाच हेतु असेल, तर या घटकेला लोकांनां सांगा कीं–हा देश तुमचा आहे; तुह्मी आपला राज्यकारभार पाहून घ्या, व स्वतःच्या देशाचा बचाव करा ! ह्मणजे मग आह्मी काय करूं शकतों तें तुह्मांला दाखवूं ( ऐका, ऐका ) ! हा देश आमचा आहे, एवढीच भावना फक्त आमच्या मनांत उत्पन्न व्हावी, अशी आमची इच्छा आहे. हा देश आमचा नसेल, तर मग त्याची काळजी नाहक आह्मी कशाला वाहवी ? [ टाळ्या ] हा देश आमचा असेल, तर लगेच त्याचा आमच्याशीं संबंध येतो, आमच्या स्वार्थाशीं व भवितव्याशीं त्याचा संबंध येतो आणि त्याचे साठीं वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास आह्मी तयार होऊं ! आह्मी इंग्लंडच्या अडचणीचा फायदा घेत आहों असें ह्मणण्यांत येतें. पण इंग्लंडहि आज आमच्या असहायतेचा फायदा घेत आहे असें आह्मी ह्मटलें तर तें मात्र निषेधार्ह ठरतें. जे लोक, हिंदुस्थान हा तुमचा देश असून तो ब्रिटिश साम्राज्याचा खराखुरा भाग आहे असें आपल्या देशबांधवांस सांगतात, ते सरकारच्या मतें इंग्लंडच्या अडचणीचा फायदा घेणारे ठरतात काय ? [ शेम ].

## बंगालच्या गव्हर्नरसाहेबांचा उपदेश.

दिल्लीच्या युद्ध परिषदेनंतर बंगालच्या गव्हर्नरसाहेबांनीं " तुह्मी आपली राजकीय चळवळ थांबवा " असा आह्मांला सल्ला दिला. कां ? तर शत्रू आपल्या हालचालींकडे किती शोधक दृष्टीनें पाहात आहे; आपणांमध्यें मतभेद माजले आहेत कीं काय, ब्रिटिश साम्राज्याच्या कोणत्याही भागांत ऐक्याचा भंग झाला आहे कीं काय, इकडे आपला शत्रू किती बारकाईनें पहात आहे त्याची हिंदी लोकांना कल्पना नाहीं. यासाठीं आपणांमध्यें ऐक्याचा अभाव आहे असें शत्रूला दाखवूं नका, असा गव्हर्नरसाहेबांचा आम्हांला सल्ला आहे. यांत वावगें कांहींहि दिसत नाहीं. उलट या बाबतींत त्यांचें आमचें पूर्ण मतैक्य आहे. आणि म्हणूनच तर आम्हीं लोकांतर्फे सरकारला कांहीं सूचना केल्या. इंग्लंडचा निश्चय ढळला आहे, किंवा

हिंदुस्थान लढण्यास तयार नाहीं, अशी शत्रूला कल्पना देखील येऊं देऊं नका. आणि म्हणूनच लोकांच्या असंतोषाची सारीं कारणें दूर करा, 'हिंदुस्थान हा आमचा देश आहे' अशी त्यांची खात्री होऊं द्या, स्वदेशाचा बचाव करणें हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे अशा प्रकारची भावना त्यांचे मनांत उत्पन्न होऊं द्या, जो साम्राज्याचा शत्रू तोच आमचा शत्रू, त्याच्याशीं सामना करणें हा आमचा हक्क आहे असें त्यांस वाटूं लागूं द्या.—अशी विनंति आम्हीं केली होती. तुम्हांला ऐक्य पाहिजे आहे ना? मग आमच्याशीं एकी कां करीत नाहीं? तुम्हांला खरोखरच एकी पाहिजे असेल तर लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं ती तुम्हांला संपादन करितां येईल (ऐका, ऐका)! तसें कराल तर शत्रूला आमच्यामध्यें फूट आहे, असें बिलकूल दिसणार नाहीं.

## कैसर कलकत्त्यास आला तर?

गव्हर्नरसाहेब पुढें म्हणतात—"कैसर कलकत्त्यास आला तर व्यक्तिस्वातंत्र्य, स्वराज्याचे हक्क, राजकीय सुधारणा इ० शब्दावडंबरास कोण भीक घालील?" या बाबतींतहि गव्हर्नरसाहेबांचें व आमचें पूर्ण मतैक्य आहे. उद्यां कैसर येथें आला, तर व्यक्तिस्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्याचा हक्क, सनदशीर हक्क, इ० भाषा बंद होईल असें मला वाटतें. आणि म्हणूनच कैसरला कलकत्त्यास येतां येऊं नये, अशी माझी इच्छा आहे (हंशा)! आणि म्हणूनच नोकरशाहीबद्दल नव्हे तर साम्राज्याबद्दल खरी निष्ठा लोकांचे मनांत उत्पन्न करण्यासाठीं दडपशाही कायदे रद्द करा; अशी सूचना मी सरकारला पुनः पुनः केली आहे! नुसत्या गोड शब्दांनीं ही राजनिष्ठा उत्पन्न होणार नाहीं, ती फक्त कृतीनेंच उत्पन्न होईल! लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं हें साध्य होण्यासारखें आहे (ऐका, ऐका व हंशा)!

## आम्हीं आमच्या भावना दडपाव्या काय?

आम्हीं आमची राजकीय चळवळ कां थांबवावी, याचें दुसरें कारण सांगतांना गव्हर्नर साहेब म्हणतातः—"ब्रिटिश लोकांचा स्वभाव कांहीं निराळाच आहे. कांहीं लोक त्यांना 'करड्या स्वभावाचे' म्हणतात. परंतु ते

अत्यंत न्यायतत्पर आहेत, असें मला वाटतें. तुम्ही सामोपचारानें त्यांस वाटेल तें सांगा, तुम्हीं त्यांची सहानुभूति व कृतज्ञताबुद्धि सहज संपादन करूं शकाल. परंतु आपल्या अडचणीचा कोणी फायदा घेत आहे, असा त्यांस नुसता संशय आला तरीमुद्धां लगेच त्यांस त्याचा तिटकारा वाटूं लागतो !" या उपदेशाचा अर्थ एवढाच कीं लबाड जर्मनांचे आमच्या राज्यघटनेंत कुठें बिघाड पडतो इकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष आहे. या गोष्टीचा विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणें आम्हीं ब्रिटिश लोकांची मनोरचनाहि विचारांत घेतली पाहिजे. कां? तर सध्याच्या परिस्थीतींत आम्हीं आमचे हक्क मागितले तर त्यांची तब्यत गरम होईल ! हिंदी लोकांचें हित व भावना मात्र कोणीहि पायाखालीं तुडवाव्या ( शेम ) ! जणूं काय, आम्हीं माणसेच नाहीं ! जणूं काय आह्मांला स्वतंत्र अस्तित्वच नाहीं ! जणूं काय आह्मांला भावनाच नाहींत ! आमच्या सत्ताधाऱ्यांच्या ज्या भावना त्याच आमच्याही भावना असल्या पाहिजेत ! हुकूम होईल तसली भावना आम्ही मनांत आणली पाहिजे ! आमच्या भावना आम्ही दडपून टाकल्या पाहिजेत ( शेम ) !

गव्हर्नरसाहेबांचें हें भाषण ऐकून मला अतिशय दुःख झालें. लोकांच्या भावना विचारांत घेणें हें सरकारचें कर्तव्यकर्म आहे. आमचे देशबांधव साम्राज्याशीं एकनिष्ठ आहेत. त्यांना नोकरशाहीचा कारभार आवडत नसेल व नाहींही. नोकरशाहीनें राज्याचा बंदोबस्त नीट राखला नाहीं हें लोकांचें ह्मणणें खोटें नाहीं, असें खुद्द ब्रिटिश मंत्रिमंडळानें जाहीर केलें आहे. लोकांना नोकरशाही पसंत नाहीं. तथापि साम्राज्याबद्दलची निष्ठा मात्र त्यांनीं सोडलेली नाहीं ! मेहेरबानी करून जपून वागा व लोकांच्या भावना पायाखालीं तुडवूं नका ! लोकांपासून साम्राज्यनिष्ठेऐवजीं नोकरशाहीबद्दलच्या निष्ठेची अपेक्षा करूं नका ! आमचे देशबांधव स्वराज्यासाठीं उतावळे झालेले आहेत, त्यांस तें सहन होणार नाहीं ! मेहेरबानी करून आमच्या बाबतींत झालेल्या घोर अन्यायाचें हें शेवटचेंच प्रकरण ठरूं द्या ? ( टाळ्यांचा कडकडाट ).



सौ. वासंतिकादेवी व दासबाबू.

## ५—असहकारिता.

१९२० सालीं नागपूर कॉंग्रेसमध्यें असहकारितेचा ठराव पुढें मांडतांना श्री. दास म्हणाले:—असहकारितेचा ठराव पुढें मांडण्यासाठीं मी आपणासमोर उभा राहिलों आहों. या ठरावांतील प्रत्येक ओळ, प्रत्येक शब्द लक्षपूर्वक वाचा. कारण विषयनियामक कमिटीनें पास केलेला ठराव कलकत्ता कॉंग्रेसच्या ठरावाच्या मानानें मवाळ आहे, असा त्यावर आरोप घेण्यांत आला आहे. हा आरोप सपशेल खोटा आहे. ( ठराव वाचतात. ) आमच्या गाऱ्हाण्यांची सबंध जंत्री मी येथें वाचूं इच्छित नाहीं. कारण ती लांबलचक आहे. या गाऱ्हाण्यांमुळेंच मी सध्यांचें धोरण स्वीकारिलें आहे. आमचीं गाऱ्हाणीं इतक्या भयंकर स्वरूपाचीं आहेत कीं तात्काळ स्वराज्य मिळविल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें आम्हीं या ठरावांत जाहीर केलें आहे ( ऐका, ऐका ) ! यानंतर आम्हीं असें जाहीर केलें आहे कीं, आतांपर्यंत स्वराज्यप्राप्तीसाठीं योजिलेले सारे मार्ग अपेशी ठरल्याकारणानें अनत्याचारी असहकारितेचा अवलंब केल्याशिवाय आतां गत्यंतर उरलेलें नाहीं ( ऐका, ऐका ). त्याचप्रमाणें स्वराज्यप्राप्तीसाठीं सबंध असहकारितेचा कार्यक्रम आम्ही अंमलांत आणूं, कलकत्ता कॉंग्रेसचा कार्यक्रम तर पुढें चालवूंच, पण आणखीहि अन्य दिशांनीं चळवळ चालवूं असें आम्ही अत्यंत स्पष्ट व निश्चित शब्दांत जाहीर केलें आहे. मग हा ठराव कलकत्ता कॉंग्रेसपेक्षां मवाळ कां वाटावा? कोणत्या दृष्टीनें हा ठराव मवाळ आहे? कलकत्ता कॉंग्रेसपेक्षां हा ठराव अधिक व्यापक व अधिक जहाल आहे. राष्ट्रीय सभेनें थेट कर नाकारण्यापर्यंतचा सर्व कार्यक्रम अंमलांत आणण्याचा निर्धार कलकत्त्याच्या ठरावांत प्रकट केला नव्हता. अर्थात कर नाकारण्याची पाळी आपणांवर कधीं तरी येईल, असें महात्माजींप्रमाणेंच मलाहि वाटत नाहीं. परंतु ती चळवळ करणें जरूर पडल्यास ती करण्यास मात्र आम्ही कदापि मागें घेणार नाहीं, ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी. तोंपर्यंत राष्ट्रीय सभेनें जो हुकूम सोडला आहे, तो प्रत्येकास अंमलांत आणावा लागेल. वकील,

४

विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी—देशांतील झाडून साऱ्या जातींच्या व धंद्याच्या लोकांस हा कार्यक्रम अंमलांत आणावा लागेल ( ऐका, ऐका ). सध्यां सरकारचें राज्ययंत्र हिंदी लोकांच्या सहकार्यानें चाललें आहे. राष्ट्रीय सभेचा हुकूम सुटतांच अखिल हिंदी लोकांना हें सहकार्य बंद करावें लागेल ( ऐका, ऐका ) असा या ठरावाचा अर्थ आहे. नोकरशाहीनें वाटेल त्या रीतीनें आपलें राज्ययंत्र हांकावें. परंतु तें हांकण्याचे बाबतींत आमच्या हातांचा उपयोग होणार नाहीं, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी ( ऐका, ऐका ) ! परंतु हा सबंध कार्यक्रम राष्ट्रीय सभेचा हुकूम झाल्यानंतर अंमलांत यावयाचा आहे. तोंपर्यंत कोणता कार्यक्रम अंमलांत आणावयाचा ? कलकत्याचा ठराव संकुचित होता. त्यांत फक्त विद्यार्थी, वकील व परदेशी मालावरील बहिष्कार यांचा ठोकळ प्रमाणांत समावेश झालेला होता. आमच्या ठरावांत आम्हीं शाळाबहिष्कार कायम ठेविला आहे; परंतु १६ वर्षांचे खालील व वरील विद्यार्थ्यांचे आम्हीं दोन वर्ग केले आहेत! वकिलांचे बाबतींत आम्हीं कलकत्याचा ठराव तर कायम ठेविलाच आहे; परंतु त्या ठरावाचे बाबतींत वकीलवर्गानें जी कुचराई दाखविली त्याबद्दल असमाधान व्यक्त केलें असून, त्याच्या अंमलबजावणीसाठीं अधिक जोराचे प्रयत्न झाले पाहिजेत, असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें लवादामार्फत खटले तोडण्याची विनंतीहि आम्ही केलेली आहे; व सरते शेवटीं परदेशी मालावरील बहिष्काराची योजना तयार करण्यासाठीं एक तज्ज्ञांची कमिटी नेमिली जावी, अशी सूचना आम्ही केली आहे. यानंतर कौन्सिलबहिष्काराचा प्रश्न उभा राहतो. या बाबतींत आमचा कौन्सिलबहिष्कार यशस्वी झाला असून, सध्यां कौन्सिलांत जे लोक बसले आहेत ते आमचे खरे प्रतिनिधी नव्हत, असें आम्हीं म्हटलें आहे ( ऐका, ऐका ) ! आम्ही एवढ्यानेंच थांबलों नाहीं. तर याच्याहि पलीकडे एक पाऊल टाकून, मतदारांनीं या लोकांपासून कोणत्याहि प्रकारचें राजकीय कार्य करून घेऊं नये, अशी विनंति आम्हीं केली आहे. अखेरीस दलितोद्धाराचे बाबतींत सर्वांनीं एक व्हावें, अशी विनंती केल्यानंतर आमची ही योजना आटोपली आहे. हा ठराव कोणत्या बाबतींत कमजोर आहे ? वकिलांच्या बाबतींत ? वकिलांच्या बाबतींत तो बिलकुल कमजोर

नाहीं. कारण असहकारितेचा ठराव पाळण्याबद्दल वकीलवर्गास पूर्वीसारखीच विनंती करण्यांत आली आहे. एका तरी बाबतींत आमचा ठराव कमजोर आहे काय ? विद्यार्थ्यांच्या बाबतींतही तो कमजोर नाहीं, असें माझें म्हणणें आहे. ज्या विद्यार्थ्यांना देशाची हांक ऐकूं आली व पटली त्यांनीं कशाचीहि पर्वा न करितां तात्काळ शाळा सोडून बाहेर पडावें असें सांगण्याचा या सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय सभेला पूर्णपणें अधिकार आहे, असें मला वाटतें ( ऐका, ऐका ) ! १६ वर्षांच्या खालील विद्यार्थ्यांचे बाबतींत आमचा ठराव कमजोर आहे काय ? असेल, तर मग आपली कमजोरपणाची अगर जोरकसपणाची व्याख्या तरी काय आहे ? आम्हीं या ठरावास अधिक न्याय्य व व्यवहार्य स्वरूप देऊन तो अधिक जोमदारच करीत आहोंत असें मला वाटतें ! आर्थिक बाबतींतहि आमचा ठराव कमजोर नाही. पूर्वीचा ठराव ठोकळ स्वरूपाचा असून तो म. गांधींनीं अंमलांत आणावयाचा होता. परंतु आमचा बहिष्काराचा कार्यक्रम अधिक पद्धतशीर व व्यवहार्य होणार आहे. या बहिष्काराची नुसती बडबड होणार नाहीं तर प्रत्येक स्वाभिमानी हिंदी माणसाला त्या बाबतींत कृति करावी लागणार आहे. मग आमच्या ठरावांत कमजोरपणा कुठें शिल्लक राहतो ? आपल्या संशयखोर वृत्तीमुळें हा ठराव आपणास कमजोर दिसत असेल. या बाबतींत मी स्वतःच्या वतीनें कोणतीहि विनंति करूं इच्छित नाहीं. परंतु एवढें मात्र लक्षांत ठेवा कीं मला वायफळ बडबड करण्याची संवय नाहीं. मी जें बोलतों त्याप्रमाणें वागत असतों. आपल्याला शंका वाटत असेल. पण त्यास माझा नाइलाज आहे, आपण कोणतीहि शंका विचारा; तिचें निराकरण करण्यास मी तयार आहें. हा ठराव आपण एकमतानें पास करावा, अशी माझी विनंति आहे. अखिल राष्ट्रानें आपल्या ईश्वरदत्त हक्कांची जाणीव करून घ्यावी. हक्क नेहमींच आपल्या जवळ असतात. पण त्यांची जाणीव मात्र व्हावी लागते. आपल्याला कांहीं हक्क आहेत अशी एकदां जाणीव होऊं द्या कीं जगांतील कोणतीही नोकरशाही तुमच्या हक्कांआड येऊं शकणार नाहीं. आम्ही आमच्या हक्कांची जाणीव करून घेऊन त्यांस मान्यता देण्यास तुह्मांला भाग पाडण्याचें ठरविलें आहे, असा इशारा मी नोकरशाहीस देऊन ठेवतों. हा ठराव पास करून त्याची अंमलबजावणी करण्याची ताकद ईश्वर आह्मांला देवो, अशी माझी प्रार्थना आहे ( टाळ्यांचा कडकडाट ) !

## ६—गया काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून !

सदतिसाव्या काँग्रेसचे अध्यक्ष या नात्यानें गया येथें देशबंधु चित्तरंजन दास यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. ते म्हणाले:—

बंधुभगिनींनो, महात्माजी आपणांत नाहींत याबद्दलच्या दुःखभावनेनें आज मी आपणांसमोर उभा आहे. महात्माजींच्या तुरुंगवासामुळें प्रत्येकाच्या मनांत आज केवढें काहूर माजलें आहे, हें शब्दांनीं सांगणें अत्यंत कठीण आहे. नोकरशाहीशीं संस्मरणीय असें द्वंद्व खेळल्यानंतर महात्मा गांधींस अटक झाली व त्यांस तुरुंगाच्या कोठडींत कोंडण्यांत आलें. आज आपण त्यांच्या नेतृत्वास मुकलों आहोंत. परंतु शत्रूच्या बालेकिल्ल्यांत शिरून त्यांनीं शत्रुपक्षावर जो शेवटचा हल्ला चढविला. नोकरशाहीच्या एजंटांबद्दल त्यांनी जी शेवटची तुच्छता प्रदर्शित केली–त्यामुळें आमच्या हृदयांत स्फूर्ति उत्पन्न झाली आहे. महात्माजींच्या इतकाच करुण, नैतिक दृष्ट्या उच्च व तितक्याच तोलाचा असा दुसरा दाखला आपणांस पहावयाचा असेल, तर दोन हजार वर्षांपूर्वी जनतेचा बुद्धिभेद केल्याचे आरोपावरून परकी न्यायाधिशापुढें जाब देण्यास उभ्या राहणाऱ्या येशू ख्रिस्ताकडेच आपणांस बोट दाखविलें.

महात्माजींची व्यवहारचतुरता दांडगी; त्याचप्रमाणें आपला निश्चय कृतींत उतरविण्याची त्यांची शक्तीहि दांडगी. देशाच्या वतीनें अखेरच्या प्रसंगी त्यांनीं जी वृत्ति स्वीकारिली ती खरोखरच अनुपमेय होय. आजपर्यंत जगांत उत्पन्न झालेल्या महात्म्यांपैकीं ते एक आहेत, यांत बिलकुल शंका नाहीं. जगाला त्यांची जरुरी आहे. आजकालचे वैभवसंपन्न लोक ख्रिस्तकालीन यहुदी व फारशी लोकांप्रमाणें त्यांस कितीहि हंसले व त्यांनीं त्यांची कितीहि थट्टा केली तरी ज्या राष्ट्राला त्यांनीं जयावर जय संपादन करून दिले, तें राष्ट्र आजच काय पण केव्हांही त्यांस विसरणें शक्य नाहीं. तें कृतज्ञतापूर्वक त्यांची आठवण कायम ठेवील.

## " कायदा व शिस्त ! "

सभ्यगृहस्थहो, वेळ अत्यंत आणीबाणीची आहे; आणि नोकरशाही व तिचे हिंदी दोस्त यांचेपासून प्रजा कां फटकून वागत आहे, याच्या कारणांचा विचार करणें अत्यंत जरूर आहे. गुदस्तां याच सुमारास दडपशाहीचें सत्र सुरू झालें. त्यावेळीं या कारणांचा विचार करणें आह्मांस भाग पडलें. या दडपशाहीच्या धोरणास सरकारच्या कार्यकारी मंडळांतील मवाळ पुढाऱ्यांनीं पाठिंबा दिला; व कांहीं कांहीं प्रसंगीं तर त्यांनीं स्वतः दडपशाही सुरू करण्यास फूस दिली. सरकारला पाठिंबा देणारांना मी अप्रामाणिक किंवा देशाभिमानशून्य म्हणत नाहीं. फक्त ते 'कायदा व शिस्त' या गर्जनेनें देहभान विसरून त्या कल्पनेंत वाहून गेले, एवढेंच माझें ह्मणणें आहे. आणि या मनःप्रवृत्तीच्या पाठीशीं कांहीं चुकीच्या तात्त्विक कल्पना आहेत असें वाटत असल्यामुळेंच मी या कायद्याच्या व शिस्तीच्या ढोंगाचा या ठिकाणीं परामर्ष घेणार आहें. सर्वंध जगांतील नोकरशाहीचें 'कायदा व शिस्त' हें अखेरचें हत्यार आहे.

एकट्या नोकरशाहीकडूनच नव्हे, तर तिचे कैवारी बनलेल्या मवाळपक्षाकडूनहि मोठ्या गंभीरपणें असें वजावण्यांत येतें कीं, सुस्थित सरकार ही रयतेची पहिली जरूरी आहे. सनदशीर मार्गाखेरीज इतर कोणत्याही मार्गांनीं आपलीं गाऱ्हाणी गांवच्या वेशीवर टांगण्याचा प्रजेस अधिकार नाहीं. येथें राज्यघटनेला मंजूर असा कोणताही मार्ग तो सनदशीर मार्ग असें मी समजतों. नोकरशाही व मवाळ यांचें ह्मणणें असें कीं, 'देशांतील कायद्यांच्या अंमलबजावणीचे बाबतींत तुमच्यानें सक्रिय सहकार्य करवत नसेल तर निदान जबाबदार नागरिक या नात्यानें प्रतिरोध न करितां ते मुकाट्यानें पाळणें हें तुमचें कर्तव्य आहे. तुमच्याकडून निदान प्रतिकार तरी होणार नाहीं, अशी अपेक्षा करण्याचा सरकारला अधिकार आहे.'' हाच नोकरशाहीचा सगळा राजकीय वेदांत आहे. सरकारनें कायद्याची व शिस्तीची अंमलबजावणी करावी व प्रजेनें बिलकुल विरोध न करितां तिच्यापुढें मुकाट्यानें मान वांकवावी एवढेंच नोकरशाहीला समजतें. परंतु विजयी

विल्यमपासून तहत दुसऱ्या जेम्सपर्यंत प्रत्येक इंग्रज राजानें हेंच राजकीय तत्त्वज्ञान उचलून धरलें नाहीं काय? रोमेनॉफ, हॉहेन्झॉलर्न व बुर्बोन वगैरे राजवंशांतील राजांचेंहि अशाच प्रकारचें राजकीय तत्त्वज्ञान नव्हतें काय? आणि असें होतें तरी सुद्धां अखेरीस स्वातंत्र्याचाच विजय झालेला आहे. आणि तो सुद्धां कसा? तर कायद्याच्या व शिस्तीच्या नांवाखालीं जे जे कायदे लागू करण्यांत आले, ते ते कायदे पायाखालीं तुडविल्यामुळेंच! जेथें सरकार एकतंत्री व जुलमी असतें व जेथें प्रजेचे नैसर्गिक हक्क सुद्धां धुडकावून लावण्यांत येतात, तेथें कायद्याची व शिस्तीची बडबड करीत बसणें व्यर्थ आहे.

## इंग्लंडांतील स्वातंत्र्याची चळवळ.

कायद्याचें व शिस्तीचें हें तत्त्व इंग्लंडांतून इकडे आलें आहे, हें उघड आहे. म्हणून त्याच्या सत्यासत्यतेबद्दलचा निर्णय करण्यासाठीं मी इंग्लंडच्या इतिहासाचा थोडासा विचार करणार आहें. त्या इतिहासांत असें नमूद केलें आहे कीं, सुलतानशाही गाजविणाऱ्या बहुतेक जुलमी इंग्रज राजांचे मनांतून प्रजेचें कल्याण आणि कायद्याची व शिस्तीची अंमलबजावणीच करावयाची होती. नॉर्मन राजांपासून तहत स्टुअर्टराजांपर्यंत इंग्रजी सुलतानशाहीनें या कायद्याच्या व शिस्तीच्या दिव्यांतूनच सनदशीर राज्यपद्धतीचें स्वरूप धारण केलें आहे. पहिल्या चार्लस राजानें फांसावर लटकण्यापूर्वी, जें करुणरसपूर्ण असें भाषण केलें, त्यावरून या सिद्धांतावर थोडक्यांत चांगलाच प्रकाश पडणार आहे. तो म्हणाला, "लोकांना स्वातंत्र्य असावें असें इतरांना जितकें वाटतें, तितकेंच मलाही वाटतें. परंतु सरकार असण्यांत व ज्या कायद्यांमुळें त्यांच्या जिवांवर व मालमत्तेवर त्यांची सत्ता चालू शकते ते कायदे असण्यांतच त्यांच्या स्वातंत्र्याचा समावेश होतो, एवढें मला येथें सांगून ठेविलें पाहिजे. सरकार प्रातिनिधिक असलें तरच स्वातंत्र्य असतें असें नाहीं; सरकारशीं लोकांचा कांहींही संबंध नाहीं. प्रजा व राजा या दोन्ही साफ भिन्न भिन्न अशा गोष्टी आहेत." कायद्याच्या व शिस्तीच्या तत्त्वाचें यापेक्षां अधिक स्पष्ट व चांगलें विवरण

दुसरें कोणीही करूं शकणार नाहीं. परंतु, इंग्रज राजांनीं जरी सनदशीर रीतीनें म्हणजे कायद्याच्या कलमांस व पाठीमागील दाखल्यांस अनुसरून राज्यकारभार केला, तरी त्यांची प्रजा आपणांस आपले नैसर्गिक हक्क शाबीत करण्याचा व राजाचे हातून ते बळजबरीनें अगर बंडें करून हिसकून घेण्याचा हक्क आहे, असें सतत प्रतिपादित असे. जॉन बादशहानें १५ जून १२१५ रोजीं मॅग्ना चार्टावर सही केली. त्यामुळें कायद्याच्या व शिस्तीच्या सिद्धांतास फारच भयंकर धक्का बसला. या हक्कपत्रिकेचें एकसष्टावें कलम आपल्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. कारण राजाकडून या हक्कपत्रिकेची योग्य अंमलबजावणी करून घेण्यासाठीं बंडाच्या मार्गाचेंहि अवलंबन करण्याचा प्रजेला अधिकार असल्याचें या कलमांत कबूल केलें आहे. इंग्लंडचा सनदशीर इतिहास लिहिणाऱ्या ॲडम्सनामक एका प्रसिद्ध लेखकानें, १२१५ सालीं इंग्रजी राज्यघटनेचे बुडाशीं करारात्मक बंड करण्याचा प्रजेचा हक्क जितका होता तितकाच आजहि आहे, असे उद्गार काढिले आहेत. परंतु कायद्याच्या व शिस्तीच्या तत्त्वाला जरी एवढा मोठा जबरदस्त धक्का बसला, तरीसुद्धां त्याचीं पाळेंमुळें अजिबात नष्ट झालीं नाहींत. कारण मध्यंतरींच्या काळांत केवळ अप्रत्यक्ष कर बसवून नव्हे, तर सक्तीचीं कर्जें व देणग्या उकळण्याचा आपणांस जन्मसिद्ध हक्क आहे असें सांगून राजानें त्याची अंमलबजावणीहि केली; व कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् शक्तीचा अवलंब करूनच नव्हे, तर जाहीरनामे काढून सुद्धां त्यानें पुष्कळसे कायदेशीर अधिकार बळकावले. हालम म्हणतो त्याप्रमाणें राजाचें म्हणणें असें कीं, "सध्यांच्या कायद्यांतील वैगुण्य घालवून त्याची योग्य रीतीनें अंमलबजावणी होईल असा फेरफार करण्याचा पुरवणी हक्क राजाला आहेच; परंतु, राजाचें व कौन्सिलचें सहमत होईल तेव्हां 'प्रजेच्या संरक्षणासाठीं' कायद्यानें मिळालेल्या अधिकारापेक्षांहि अधिक अधिकार गाजविण्याचा सर्वश्रेष्ठत्वाचा हक्क राजास मिळणें योग्य आहे, असा अभिप्राय कायदेकोर्टांनीं दिला आहे." ॲडम्स म्हणतोः—"कायद्याचीं कलमें हीं कायदेशीर खून करण्याचीं यंत्रें ठरलीं!" कायद्याच्या व शिस्तीच्या बुजगावण्यानेंच हे नूतनप्रस्थापित अधिकार राजाला पचूं शकले, ही गोष्ट येथें

लक्षांत ठेवणें जरूर आहे. " लोकांच्या सार्वजनिक कल्याणासाठीं नवीन कर बसविण्याचा अधिकार राजाला आहे " असा निकाल कोर्ट ऑफ एक्स्चेकरनें पुनःपुन्हा दिला. अॅडम्स म्हणतो त्याप्रमाणें " स्टुअर्ट राजांनीं आपल्या प्रत्येक कृत्याला कायद्याची संमति आहे असें सिद्ध केलें आणि एकंदर इतिहासानें राजांचीच बाजू उचलून धरली. "

## स्टुअर्ट राजांचें उदाहरण.

परंतु, कायद्याच्या व शिस्तीच्या ह्या हक्काची कॉमन्स सभेनें कशी वासलात लाविली? पार्लमेंटांत व पार्लमेंटाबाहेर कट्टर असहकारितावाद्यांची चळवळ चालली होती. पार्लमेंटांत घुसून, राजाकडून गाऱ्हाणीं दूर होईपर्यंत राज्याच्या बंदोबस्तासाठीं लागणारा खर्च मंजूर करण्याचें त्यांनीं पुनः पुन्हा नाकारिलें. तेव्हां राजानें प्रजेची खोड जिरविण्यासाठीं स्वेच्छेनुसार आयातनिर्गत मालावरील जकात ( कस्टम्स ड्यूटीज ) वाढविली व कायदेकोर्टांनीं त्यास पाठिंबा दिला. कॉमन्ससभेनें ' हे कर देणारांस इंग्लंडच्या स्वातंत्र्याचे घातक व शत्रू समजावें ' असा ठराव पास केला! देशांत बंडाळी सुरू झाली, यांविषयीं बिलकुल शंका उरली नाहीं; अखेरीस पेंचांत सांपडल्याकारणानें चार्लस राजानें ता. १७ जून १६२८ रोजीं प्रजाहक्कांच्या बिलाला ( बिल ऑफ राइटस ) आपली बादशाही मंजुरी दिली. प्रजाहक्कांचे बिल हा असहकारितावाद्यांचा विजय होय! कारण देशाच्या राज्यकारभारांत भाग घेण्याचें नाकारल्यामुळेंच कॉमन्ससभेनें राजाला प्रजेचे हक्क मान्य करण्यास भाग पाडलें! १६२९ ते १६४० ह्या सालांत घडून आलेल्या गोष्टींनीं इंग्लंडच्या इतिहासाची इमारत उठविली. प्रजाहक्कांचे बिल पास झालें, तरीसुद्धां राजानें आयातनिर्गत मालावरील जकात उकळण्याचा क्रम तसाच पुढें चालू ठेविला. आणि ईलियट व त्याचे सहकारी मित्र यांवर खटले झाले. त्यांनीं वकील देण्याचें नाकारिलें. त्यामुळें राजाच्या सुलतानशाहीस चांगलाच धक्का बसला. राजानें लोकांवर ' जहाजांचा कर ' ( शिप मनी ) लादला. ठिकठिकाणच्या चीफ कान्स्टेबलांनीं अशीं उत्तरें पाठविलीं कीं नगरशेटांस [शेरिफांस] पार्लमेंटच्या संमतीशिवाय कोणत्याहि

माणसावर कर लादण्याचा अधिकार नाहीं. लोकांनीं कर देण्याचें नाकारतांच त्यांचीं गुरेंढोरें जप्त करण्यांत आलीं; परंतु तीं विकत घेण्यास एकहि मनुष्य पुढें आला नाहीं. तेव्हां, " सबंध राज्याच्या कल्याणाचा व संरक्षणाचा प्रश्न पुढें आला असतां व सबंध राज्य संकटांत सांपडलें असतां, [ बरोबर हेच शब्द अक्षरशः सुधारणांच्या कायद्यांत उचलून घेतले आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे ] अशा संकटापासून राज्याचा बचाव व संरक्षण करण्यासाटीं वाटेल तितक्या काळपर्यंत माणसें, अन्न व दारूगोळा यांसह, जरूर तितकीं जहाजें पुरविण्याबद्दल हुकूम सोडण्याचा व त्याचा अनादर झाल्यास कायद्याच्या सत्तीनें प्रजेकडून त्याची अमलबजावणी करून घेण्याचा अधिकार राजाला नाहीं काय ? व तसा अधिकार असेल, तर राज्यावर संकट ओढवलें किंवा नाहीं, त्याचप्रमाणें तें टाळण्याचा प्रयत्न कसा व केव्हां करावयाचा, हें ठरविण्याचा अधिकारहि राजाकडेच येत नाहीं काय ?"—यासंबंधींचा निर्णय कोर्ट ऑफ एक्सचेकरकडून मागविण्यांत आला. न्यायमूर्तींनीं होकारार्थी उत्तर दिलें; व हॅमडनवरील सुप्रसिद्ध खटल्यांत त्यास दिलेलें उत्तर उचलून धरलें.

## संपूर्ण निष्प्रतिकाराचें तत्त्व !

मला एका मुद्यावर विशेष जोर द्यावासा वाटतो; आणि तो मुद्दा हा कीं स्टुअर्ट राजे व पार्लमेंट यांमध्यें झालेल्या लांबलचक पण जोरदार झगड्यांत आरंभापासून अखेरपर्यंत स्टुअर्ट राजांनीं कायद्याच्या व शिस्तीच्या संरक्षणासाटींच राज्यकारभार केला; आणि कायदा व गतेतिहास त्यांस अनुकूल होता यांत बिलकुल शंका नाहीं. इंग्लंडच्या भाऊबंदकीच्या युद्धाच्या अखेरीअखेरीस एका प्रश्नावर मतभेद झाला. तो प्रश्न असा—" कायद्याची व शिस्तीची अंमलबजावणी करीत असतांना प्रजेनें राजापुढें मुकाट्यानें मान वांकवलीच पाहिजे, अशी अपेक्षा करण्याचा राजाला अधिकार आहे, कीं राजाच्या हुकमास विरोध करण्याचा—मग त्या विरोधानें शिस्तीचा व कायद्याचाहि कां भंग होईना—प्रजेला अधिकार आहे ?" पार्लमेंटच्या उपासकांनीं लोकसत्तेचा पुरस्कार केला. पार्लमेंट स्वतंत्र व अधि-

कारसंपन्न असलें पाहिजे; प्रत्येक व्यक्तीला मतस्वातंत्र्य मिळून प्रतिकार करण्याचा व राजाला गादी सोडण्यास भाग पाडण्याचा किंवा त्यास पदच्युत करण्याचा हक्क प्रजेस असला पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांस सरकारच्या जुलमी सत्तेऐवजीं मनुष्यत्वाचे हक्क पाहिजे होते. राजाच्या भक्तगणांचें म्हणणें असें होतें कीं, कायद्याच्या व शिस्तीच्या नांवाखालीं प्रजेस मुकाट्यानें आपले हुकूम मान्य करावयास लावण्याचा व प्रजेकडून प्रतिकार होणार नाहीं अशी व्यवस्था ठेवण्याचा स्वयंभू अधिकार राजाला असला पाहिजे; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सरकारची जुलमी सत्ता व व्यक्तिस्वातंत्र्यापहारी असें सक्तीचें सहकार्य राजाच्या भक्तगणांस प्रजेपासून पाहिजे होतें.

अखेरीस निकाल पार्लमेंटाच्या वतीनें लागला. तरी व्यक्तिस्वातंत्र्याची ही आकांक्षा फार काळ टिकली नाहीं. प्रत्येक सशस्त्र युद्धांत असें व्हावयाचेंच. व्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टीनें जरी या भाऊबंदकीच्या लढाईचे परिणाम हानिकारक ठरले व व्यक्तिस्वातंत्र्याची स्थापना भरभक्कम पायावर करण्यासाठीं आणखी एका बंडाची जरुरी वाटूं लागली–अर्थातच हें नवीन बंड अनत्याचारी स्वरूपाचें व्हावयाचें होतें–तरीसुद्धां राजाच्या हक्कांचा निर्णय प्रजेनें दिला ही एकच बातमी प्रत्येकाच्या कर्णपटलावर आदळल्याकारणानें रूढीच्या व पूर्वापार चालत आलेल्या आदरभावनेच्या दडपणाखालून प्रजेच्या मानसिक उद्धाराला जोरानें सुरुवात झाली.

१६८८ च्या बंडामुळें–या बंडांत रक्ताचा एक थेंब देखील पडला नाहीं, तें Bloodless Revolution होतें–ज्याच्या अढळ पायावर कायद्याची व शिस्तीची अंमलबजावणी होऊं शकेल असा कायदेशीर राज्यकारभार इंग्लंडला प्राप्त झाला. दीर्घकालपर्यंत चाललेल्या पार्लमेंटानें ज्या कार्याचा 'श्रीगणेशा' घालून दिला व पहिल्या चार्लसला फांशी दिल्यामुळें ज्या कार्याची कुचंबणा झाली, तें कार्य या बंडानें पुरें केलें. परंतु, १६८८ चें हें शांतिमय बंड कसें घडवून आणण्यांत आलें, याचा इतिहास आपल्याला ठाऊक आहे काय? अधिकाऱ्यांचे हुकूम पायाखालीं तुडविल्याकारणानें

व सरकारनें प्रजेची मुस्कटदाबी करण्यासाठीं निर्बंधपणें कोणतेही जुलमी व लहरीस येतील तसले हुकूम सोडले तर त्यास प्रतिकार करण्याचा अप्रतिहत हक्क प्रजेस आहे या तत्त्वास चिकटून बसल्याकारणानेंच हें बंड घडून आलें.

## एक इतिहासप्रसिद्ध दाखला.

ज्या तत्त्वासाठीं १६८८ चें बंड घडून आलें, तें डॉ. सचीवरेल यांचे सुप्रसिद्ध खटल्यांत यशस्वी झालें. एका धार्मिक प्रवचनांत त्यानें पुढील विचार प्रदर्शित केले आहेत. तो म्हणतोः—"वरिष्ठ सत्तेचे कोणतेहि कायदेशीर हुकूम पूर्णपणें व बिनशर्त पाळणें हें प्रजेचें कर्तव्य असून कोणत्याहि सबबीवर तिनें त्यांचा प्रतिकार करणें बेकायदेशीर आहे, अशा दृढ विश्वासावरच आमच्या सरकारची सुरक्षितता व इमारत उभी आहे." हेंच निष्क्रिय आज्ञापालकत्वाचें व निष्प्रतिकाराचें तत्त्व होय. याचेंच दुसरें नांव कायदा व शिस्त. या कायद्याची व शिस्तीची घोषणाच देशांतील काळेगोरे सर्व ब्युरोक्रॅट आज करीत आहेत. आणि प्रजेचें कर्तव्य व सरकारचे हक्क यांतील सारसर्वस्व वरील शब्दरचनेंतच आहे. परंतु, १७१० सालीं इंग्लंडांत हा प्रश्न कसा सोडविला गेला तें लक्षांत ठेवा. व्यक्तिस्वातंत्र्याला इतकें विघातक असें मत बोलून दाखविल्याबद्दल कॉमन्स सभेनें डॉ. सचीवरेल यांजवर खटला केला व लॉर्डांनीं बहुमतानें त्यास दोषी ठरविलें. खटला चालू असतांना झालेलीं भाषणें मोठीं मनोरंजक आहेत. या भाषणांपैकीं कांहीं वाक्यें मी पुढें देतों. सर जोसेफ जेकील आपल्या भाषणांत म्हणाले, " ज्या अर्थी कायद्यावरून राजाची सत्ता व प्रजेची गुलामगिरी यांचें प्रमाण दिसून येतें त्या अर्थी कायद्याचें अस्तित्व व त्याचा अंमल ही परस्परांच्या समाईक मतावर अवलंबून ठेवणें म्हणजे त्यासंबंधींचें बंधन काढून घेणें आहे. परस्परांच्या समाईक संमतीच्या या कल्पनेमुळें राजा व प्रजा या दोघांनांहि कायदे पाळणें बंधनकारक होते......मनसोक्त निष्प्रतिकाराचें तत्त्व बंडाच्या दिवसांत जाणून बुजून सबंध राष्ट्रानें टाकून दिलेलें आहे. या तत्त्वत्यागाचे निदर्शक असे बरेचसे कायदे त्यानंतर पार्लमेंटानें पास केले......आणि

म्हणून आत्मनाश करणारी व सरकारची घटना उखडून टाकण्यास भाग पाडणारी अशी जुलमी सत्ता उत्पन्न करण्यासाठींच कायदे केलेले आहेत, असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं. सरकारी घटनेची स्थापना व बचाव करणें हाच कायद्याचा उद्देश आहे." मि. वॉलपोल यांनीं आपली विचारसरणी थोडक्यांत पुढीलप्रमाणें मांडली आहे. ते म्हणाले, "अनिर्बंध व विनशर्त अशा निष्क्रिय आज्ञापालकत्वाचें तत्त्व प्रथमतः एकतंत्री व जुलमी सत्तेला पाठिंबा मिळावा म्हणूनच शोधून काढण्यांत आलें. व पुढेंमागें त्याचा उपयोग करण्याचा हेतू नसलेल्या कोणत्याहि सरकारकडून त्यास उत्तेजन किंवा अनुकूलता मिळाली नाहीं." कायद्याच्या व शिस्तीच्या विरुद्ध मताची मांडणी यापेक्षां अधिक स्पष्टपणें अगर जोरानें करितां येणार नाहीं. कारण या प्रतिपादनाचा अखेर सारांश असा दिसतो कीं, जर कायद्याच्या व शिस्तीच्या नांवानें सुलतानशाही सत्ता अधिक स्थिर अगर प्रबळ होणार असेल तर हें तत्त्व प्रामाणिकपणानें पुढें आलेलें नाहीं, असें म्हटलें पाहिजे. मी आणखी एक उतारा येथें देतों. मेजर जनरल स्टॅनहोप आपल्या भाषणांत म्हणतात, "संपूर्ण निष्प्रतिकाराच्या तत्त्वाचा विचार करूं गेलें असतां तें बुद्धीच्या व निसर्गाच्या कायद्यांस विसंगत असून सर्व काळच्या व सर्व देशांच्या आचाराच्या विरुद्ध आहे हें पुरावे पुढें मांडून सिद्ध करण्याची बिल्कुल जरुरी नाहीं." आणि खरोखर जगांतील अखिल धर्मपंथांच्या, अखिल राज्यांच्या व अखिल राष्ट्रांतील नागरिकत्वाच्या संघटनांवर हल्ले चढले असतां व तीं जुलमानें त्रस्त झालीं असतां त्या त्या संस्थांनीं कोणत्या प्रकारचें आचरण केलें तिकडेहि सर्वांनीं लक्ष पोंचविणें जरूर आहे.

इंग्लंडांतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास हा असा आहे. इंग्रजी प्रजेच्या नैसर्गिक हक्कांस मान्यता मिळाली ती कायद्याच्या व शिस्तीच्या तत्त्वास कवटाळून मिळाली नाहीं हेंच अनुमान त्या इतिहासावरून निर्विवाद निघतें. वर मी केलेल्या परीक्षणावरून पुढील गोष्टी आपोआप सिद्ध होतातः—(१) लोकांची संमति नसलेला कोणताहि कायदा हा कायदा नव्हे. (२) ज्या कायद्यास लोकांची संमति नसेल, तो पाळण्यास लोक कोणत्याहि प्रकारें बांधलेले नाहींत. (३) कायदे लोकसंमतीच्या पायावर उभे

नसून शिवाय त्यांमुळें जनतेच्या नैसर्गिक हक्कांवर घाला पडत असेल, तर आपल्या मनगटाच्या जोरावर अगर बंडाच्या उठावण्या करून ते परत घेण्यास लावण्याचा जनतेला हक्क आहे; (४) अनियंत्रित सत्ताधाऱ्यांनींच कायद्याची व शिस्तीची सबब सर्वत्र सांगितली आहे. आणि ( ५ ) कायद्याची खरी सत्ता सुरू होण्यापूर्वी कायदाहि अस्तित्वांत नसतो किंवा शिस्तहि नसते.

हा प्रश्न अत्यंत नाजूक असल्याकारणानें मी त्याचें लांबलचक विवरण केलें आहे. अझूनहि कित्येक मवाळांचें असें म्हणणें आहे कीं, सरकार कायद्याची व शिस्तीची अंमलबजावणी करीत असतां त्यांस मदत करणें हें प्रत्येक राजनिष्ठ प्रजाजनाचें कर्तव्य आहे. आज सत्ताधाऱ्यांच्या हातीं जे जुलमी व लहर लागेल त्याप्रमाणें वागतां येण्याजोगें अमर्याद अधिकार आहेत त्यांच्या अंमलबजावणीवरच हिंदुस्थानांतील जनतेचें व्यक्तिस्वातंत्र्य अवलंबून आहे. जेथें जेथें असले अधिकार वापरण्याची मोकळीक असेल तेथें तेथें कायद्याचा अधिकार चालत नाहीं असें समजावें. शांत डोक्याच्या विद्वान माणसांचे मनावर कायद्याचें व शिस्तीचें हें खूळ केवढा जबरदस्त पगडा बसवितें हें पहावयाचें असेल, तर दडपशाही–कायद्यांची चौकशी करण्याकरितां नेमिलेल्या कमिटीचा रिपोर्ट एकदां वाचून पहा, म्हणजे काय तें कळेल. त्यांत तुम्हाला देशाभिमानाची छटा दिसणार नाहीं, किंवा मुत्सद्याचा शहाणपणाहि दिसणार नाहीं; फक्त त्यांत कायद्याची व शिस्तीची बेसुमार स्तुति केलेली तुम्हांला आढळेल. या कायद्याचें व शिस्तीचेंच ढोलकें आज सर्वत्र वडविण्यांत येत असून त्याचा खरा अर्थ तर पुष्कळांस समजलेला नाहीं. १८१८ चा तिसरा कायदा दुरुस्त करून कायदे–बुकावर अद्यापि कायम ठेवण्याचें काय बरें कारण? दुसरें तिसरें कांहींही नाहीं. हिंदुस्थानच्या सरहद्दीचे संरक्षणासाठीं त्याचप्रमाणें हिंदी संस्थानांसंबंधींची हिंदुस्थान सरकारवरील जबाबदारी पुरी करण्यासाठीं कोणत्या ना कोणत्या प्रकारचें तरी कायदेशीर हत्यार सरकारच्या हातीं पाहिजे होतें. म्हणूनच हा कायदा कायम ठेवण्यांत आला. इतर कोणत्याहि फौजदारी कायद्याच्या कैचींत न सांपडणाऱ्या लोकांच्या चळवळीला कोणत्या ना

कोणत्या प्रकारें आळा घालण्यासाठींच सदर कायद्याची योजना आहे. १९०८ चा समित्यांचा कायदा [ इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट ] व १९११ चा राजद्रोही सभाबंदीचा कायदा (प्रिव्हेन्शन ऑफ सिडिशस मीटिंग्ज ॲक्ट) हे दोन्ही अद्यापि कां बरें कायम ठेवण्यांत आले आहेत ? सदर रिपोर्ट लिहिणाऱ्या सभासदांस, या कायद्यामुळें अंमलबजावणीखात्याचे हातीं अमर्याद व एकतंत्री सत्ता जाऊन पडते व त्यामुळें असल्या बेकायदेशीर कायद्यांच्या जुलमाचा प्रतिकार करून तो पायाखालीं तुडविणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य होऊन बसतें याची जरासुद्धां जाणीव झालेली दिसत नाहीं. हे कायदेच मुळीं कायद्याचा व शिस्तीचा भंग करणारे आहेत. कारण कायदेशीर सत्ता हीच खरी 'कायदा व शिस्त' होय ! कायद्याप्रमाणें चालणारे नागरिक या नात्यानें तुम्ही असले कायदे पाळलेच पाहिजेत, असें तुम्हांला म्हणतां येणार नाहीं.

## व्यक्तिस्वातंत्र्य.

राष्ट्रीय चळवळीच्या गेल्या कांहीं वर्षांच्या इतिहासांत असल्या कायद्याचा व शिस्तीचा अनुभव आम्हांस पुष्कळ आला आहे. समित्यांचे कायद्यान्वयें कांग्रेस स्वयंसेवकांची कायदेशीर चळवळ बेकायदेशीर व शिक्षार्ह ठरविणारा हुकूम सोडून सरकारनें राष्ट्राचा उपमर्द केला आहे. कायद्याची व शिस्तीची अंमलबजावणी होत असतां तिला पाठिंबा देणें हें प्रत्येक राजनिष्ठ प्रजाजनाचें कर्तव्य आहे या सबबीवर आमच्या मवाळ मित्रांनीं तो हुकूम उचलून धरिला. कायद्याचें व शिस्तीचें हें तत्त्व इंग्लंडच्या किनाऱ्यापासून मध्यंतरींचा सर्व रस्ता आक्रमित इकडे येऊन ठेपलें आहे. परंतु, आज हिंदुस्थानसरकार ज्या ज्या सबबी पुढें करीत आहे, त्या त्या सर्व स्टुअर्ट राजांनीं तितक्याच जोरदार शब्दांत पुढें मांडल्या नव्हत्या काय ? अशी एकतरी सबब आज शिल्लक आहे काय कीं जी स्टुअर्ट राजांनीं पुढें मांडिली नाहीं ? कोर्टाची सत्ता कोणत्याही प्रकारें धुडकावून लावणाऱ्या लोकांस वाटेल तेव्हां तुरुंगांत खेंचण्याचा अधिकार स्टुअर्ट राजांनीं वळकाविला त्यावेळीं राष्ट्राच्या संरक्षणासाठीं असला अधिकार

आम्हांला असणें जरूर आहे, अशी सबबच त्यांनीं पुढें केली होती. आणि या अधिकाराचा लोकांनीं प्रतिकार केला तो सदर अधिकाराचा उपयोग राष्ट्राकार्यासाठीं कधींच झाला नाहीं म्हणून नव्हे; तर तो अधिकार जनतेच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कांस विसंगत होता म्हणून. जाहीरनामे काढून अगर 'कर्तुमकर्तुकमन्यथाकर्तुम्' अधिकारांच्या सहाय्यानें कायदे करण्याचा हक्क राजाला असला पाहिजे अशी जी स्टुअर्ट राजांनीं मागणी केली, तीसुद्धां 'सार्वजनिक संरक्षणा' साठींच केली होती. त्याचप्रमाणें त्यांनीं वाटेल तेव्हां करांत वाढ करण्याचा हक्क मागितला तेव्हांसुद्धां भलत्याच प्रसंगीं आम्हीं त्याचा उपयोग करणार नाहीं, असें सांगितलें. "साधारणपणें सबंध राज्याच्या सुरक्षिततेचा अगर कल्याणाचा प्रश्न असेल व सबंध राज्यावर एकादें संकट कोसळणार असेल-तेव्हांच फक्त आम्हीं या हक्काचा उपयोग करूं" असें त्यांनीं सांगितलें होतें. ह्या अधिकाराचा इंग्रज प्रजेनें प्रतिकार केला. कां ? तर राजानें उकळलेले कर देशाच्या कल्याणासाठीं व सुरक्षिततेसाठीं जरूर नव्हते म्हणून नव्हे; तर लोकप्रतिनिधींच्या संमतीनें लोकांच्या फायद्यासाठीं जेवढे कर बसविण्यांत येतील तेवढेच फक्त भरण्याच्या प्रजेच्या नैसर्गिक हक्कास वरील अधिकारानें बाध येत होता, म्हणून ! कायदेमंडळानें फेंटाळून लाविलेली खर्चाची मागणी प्रजेसंबंधींची जबाबदारी पुरी करण्यासाठीं अत्यंत इष्ट आहे असें सर्टिफिकेट देऊन ती मंजूर करण्याचा सध्यांच्या गव्हर्नरांचा अधिकार; व स्टुअर्टराजांनीं मागितलेला वरील अधिकार यांत यत्किंचित तरी अंतर आहे काय ? यावरून आपण सध्यां खऱ्या कायद्याच्या नियंत्रणाखालीं नांदत नाहीं, याची प्रत्येकास जाणीव होईल. प्रजेस बंधनकारक अशीं मोठमोठ्या अधिकारांची हत्यारें अंमल-बजावणी खात्याच्या हातीं दिलीं असतांना 'कायद्याच्या व शिस्तीच्या' गप्पा मारणें व्यर्थ आहे असें इंग्लंडच्या इतिहासानें जाहीर केलें आहे. इंग्लंडच्या मर्दांनीं 'कायद्याच्या व शिस्तीच्या' या ढोंगाचा यशस्वी रीतीनें प्रतिकार केला. आज जर हिंदुस्थानांत मर्दपणा शिल्लक असेल, तर हिंदी लोकांनीं सुद्धां नोकरशाहीनें पुढें केलेल्या 'कायद्याच्या व शिस्तीच्या' ढोंगाचा यशस्वी रीतीनें प्रतिकार केला पाहिजे !

## " कायदा व शिस्त. "

इंग्लंडच्या इतिहासांतील बरेचसे दाखले मी वर दिले आहेत; याचें कारण इतकेंच कीं लोकपक्षीय चळवळींची थरकांप भीति वाटून ' कायद्याचा व शिस्तीचा ' उदोउदो करणाऱ्या बहुतेक लोकांस हे दाखले विशेष पटतात. इंग्लंडच्या धर्तीवरच हिंदुस्थानसारख्या थोर राष्ट्राची प्रगति झाली पाहिजे, असें त्या लोकांस वाटतें. मला मात्र ' कायद्याचें व शिस्तीचें ' हें ढोंग बिलकुल पसंत नाहीं. इतिहास त्याबद्दल नापसंती दर्शवितो म्हणून नव्हे, तर सत्याच्या सेवेसाठीं म्हणून बेकायदेशीर कायद्यांचा जोरानें प्रतिकार करणें हा प्रत्येक व्यक्तीचा व प्रत्येक राष्ट्राचा स्वयंसिद्ध हक्क आहे.

' कायदा व शिस्त ' हीं मनुष्याकरितां आहेत. मनुष्य हा कायद्याकरितां व शिस्तीकरितां नाहीं. राष्ट्रीयत्वाची वाढ हें पवित्र कार्य असून त्या कार्याचे आड येणारे कांटे राष्ट्रीयत्वाच्या सामर्थ्यानेंच बाजूला काढून टाकिले पाहिजेत. या महत्कार्याचे आड तुमचे सिद्धांत येत असतील तर ते धुळीस मिळविले पाहिजेत. कायदेशीर राज्याच्या संस्थापनेसाठीं व बचावासाठीं तुम्हीं कायद्याच्या व शिस्तीच्या हत्याराचा अवलंब कराल, तरच तुमच्या कायद्याबद्दल व शिस्तीबद्दल प्रजाजनांनीं आदर बाळगिला पाहिजे, असें ह्मणण्याचा तुह्मांला हक्क प्राप्त होईल. परंतु तसें नसेल व खऱ्या कायद्याची खची करण्याचा अगर त्यावर हल्ला चढविण्याचा तुमचा इरादा असेल, तर मात्र तुमच्या कायद्याबद्दल व शिस्तीबद्दल आदर बाळगण्यास आम्ही बांधलेलें नाहीं. कारण, दुसऱ्या एका वरिष्ठ कायद्यामुळें, नैसर्गिक कायद्यामुळें, ईश्वरी कायद्यामुळें तुमच्या कायद्याचा व शिस्तीचा जोरानें प्रतिकार करणें आह्मांला भाग आहे. ज्या ज्या वेळीं राष्ट्राची वाढ, विकास व आत्मीयत्वाची जाणीव यांची जाणूनबुजून खची करणारा असा कायदा कायद्याच्या व शिस्तीच्या गोंडस नांवाखालीं पास करण्यांत येतो, त्या त्या वेळीं तो कायदा व ती शिस्त हीं मनुष्यत्वावर घाला घालणारीं व ईश्वराचा उपमर्द करणारीं असतात, असें जाहीर करण्यास मला बिलकुल फिकीर वाटत नाहीं. जेव्हां जेव्हां कायद्याचें व शिस्तीचें बुजगावणें पुढें

करण्यांत आलें तेव्हां तेव्हां स्वातंत्र्याचें एकेक पाऊल पुढें पडलें आहे. जगांतील अखिल नोकरशाह्यांचा इतिहास अशीच साक्ष देत आहे.

## राष्ट्रीयत्व हेंच ध्येय !

आपण आपल्या डोळ्यांसमोर कोणतें ध्येय ठेवावें ? अर्थात्, राष्ट्रीयत्व हेंच आपलें प्रमुख ध्येय असलें पाहिजे. ज्याच्या सहाय्यानें राष्ट्र आपलें खरें स्वरूप प्रकट करितें व ज्यामुळें इतर राष्ट्रांच्या शत्रुत्वास अगर बहिष्कारास तें पात्र न होतां उलट इतर राष्ट्रांस आत्मीयत्वाची प्रतीति करून देण्यास मदत करितें त्या प्रतिक्रियेचें नांव राष्ट्रीयत्व ! यांत जितकी अनेकविधता तितकेंच ऐक्यहि कायम असतें. सबंध जगाचें ऐक्य प्रस्थापित होण्यासाठीं प्रत्येक राष्ट्राचें राष्ट्रीयत्व आपापल्या मार्गांनीं पूर्णत्वास पोंचणें अत्यंत इष्ट आहे. आत्मीयत्वाचें प्रगटीकरण व जाणीव होणें ह्मणजेच राष्ट्रीयत्वाचें पूर्णत्व होय. आमचें राष्ट्रीयत्व व युरोपमधील राष्ट्रीयत्वाची भावना या दोहोंमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. त्यांचें राष्ट्रीयत्व चढाईच्या स्वरूपाचें आहे. त्यांचें राष्ट्रीयत्व स्वार्थी, व्यापारी हर्षाचें व वैयक्तिक नफ्यातोट्याचें असतें. जें फ्रान्सला फायद्याचें तें जर्मनीला तोट्याचें व जें जर्मनीला फायद्याचें तें फ्रान्सला तोट्याचें असतें. आणि म्हणून फ्रान्सचें राष्ट्रीयत्व जर्मनीबद्दलच्या द्वेषबुद्धीवर व जर्मन राष्ट्रीयत्व फ्रान्सबद्दलच्या द्वेषबुद्धीवर फोफावत आहे. परंतु जर्मनीनें किंवा फ्रान्सनें परस्परांचें नुकसान करण्यांत सबंध मनुष्यजातीचें नुकसान होत आहे व अशा रीतीनें त्या उभयतांसहि अप्रत्यक्ष नुकसानीची आंच पोंचत आहे, याची जाणीव कोणालाही नाहीं. युरोपमधील राष्ट्रीयत्व हें असें आहे. त्याच्याविषयीं आज मी बोलत नाहीं. प्रत्येक राष्ट्रीयत्व ही ऐक्यसागरास जाऊन मिळणारी एक स्वतंत्र नदी आहे. परंतु प्रत्येक राष्ट्राला आत्मीयत्वाची व विश्वबंधुत्वाची जाणीव झाल्याखेरीज तें पूर्णत्वास पोंचणें शक्य नाहीं. स्वतंत्र सरित्प्रवाहाचें संशोधन हेंच राष्ट्रीयत्वाचें संशोधन होय. हा प्रवाह सांपडला कीं आत्मप्रतीतीस सुरवात झाली; आणि मग राष्ट्रीयत्वाची प्रगति कशानेंहि बंद होणें शक्य नाहीं.

आणि म्हणून आपण राष्ट्रीयत्वाची भावना उद्दीपित केली पाहिजे. स्वराज्यांतच हिंदुस्थानचा खरा उद्धार आहे. स्वराज्याची व्याख्या करितां येणार नाहीं. कोणत्याहि विशिष्ट राज्यपद्धतींत त्याची भेंसळ होतां कामा नये. स्वराज्य व साम्राज्य यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. स्वराज्य हें राष्ट्रीय मनाचें नैसर्गिक स्वरूप आहे. त्या स्वरूपाचें बहिरंग हाच त्या राष्ट्राचा इतिहास. जी खऱ्या राष्ट्रीय वाढीची सुरुवात, तीच स्वराज्याचीहि सुरुवात. कारण स्वराज्य हें राष्ट्रीय मनाचें प्रतिबिंब आहे. सारांश, राष्ट्रीयत्वाचा प्रश्न स्वराज्याच्या प्रश्नाहून निराळा नाहीं. हे दोनहि प्रश्न एकच आहेत. स्वराज्यप्राप्ति हाच हिंदुस्थानपुढें आज अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

## अनत्याचारी असहकारिता.

आतां मी स्वराज्यप्राप्तीच्या मार्गाकडे वळतों. स्वराज्याप्रत नेऊन पोंचविणारें असें सरकार प्रस्थापित करण्यास अनत्याचारी असहकारिता हा एकच मार्ग आहे, याविषयीं आतां बिलकुल शंका उरलेली नाहीं. असहकारितेच्या तत्त्वज्ञानाचा ऊहापोह करण्याची येथें मुळींच जरुरी नाहीं. परंतु तिची निरनिराळी स्वरूपें दाखविण्याचा मात्र माझा विचार आहे. राष्ट्रीय दृष्ट्या स्वतःची शक्ति केंद्रीभूत करून स्वतःच्या पायावर उभें राहण्याचा प्रयत्न करणें याचेंच नांव असहकारिता! नीतिशास्त्रदृष्ट्या राष्ट्राच्या प्रगतीस म्हणजेच सर्व मनुष्यजातीच्या प्रगतीस विघातक अशा गोष्टींपासून अलिप्त राहणें या आत्मशुद्धीच्या मार्गाला असहकारिता असें म्हणतात! आध्यात्मिक दृष्ट्या, साधनयोगांत ज्याला प्रत्याहार असें नांव आहे त्या स्थितीलाच—अनैसर्गिक अशा गोष्टींपासून परावृत्त होण्याच्या स्थितीलाच स्वराज्य असें म्हणतात. या दोन्ही स्थिती अज्ञानामुळें अदृश्य झालेल्या आत्मिक शक्तीच्या प्रादुर्भावासाठीं अत्यंत अवश्य आहेत. यापेक्षां या मुद्याचें मी जास्त विवेचन करीत नाहीं. परंतु कोणत्याहि दृष्टीनें पाहतां अनत्याचारी असहकारितेचा मार्ग हा 'स्वराज्यमार्गाशीं सदृश असाच' खरा मार्ग आहे हें कोणालाहि कबूल करणें भाग आहे.

## सामर्थ्य व अत्याचार.

अहिंसा तत्त्वाच्या योग्यायोग्यतेविषयीं कित्येकांचीं मनें साशंक आहेत, अनत्याचार ही एक ध्येयात्मक भावना असून ती आचारांत आणणें दुस्साध्य आहे आणि सामर्थ्याचा व अत्याचाराचा उपयोग केला तरच स्वराज्य मिळूं शकेल असें हिंदुस्थानांतील व बाहेरील पुष्कळशा हिंदी लोकांस वाटतें ही गोष्ट मला कबूल करणें भाग आहे. या लोकांच्या धैर्या-बद्दल, स्वार्थत्यागाबद्दल व देशाभिमानाबद्दल माझ्या मनांत बिलकुल शंका नाहीं. त्यांना जें खरें वाटतें त्यासाठीं त्यांनीं भरपूर देहदंड सोसला आहे, हीहि गोष्ट मला मान्य आहे. परंतु तत्त्वाचा वाद बाजूला ठेविल्यास सामर्थ्याच्या व अत्याचाराच्या जोरावर आजपर्यंत घडून आलेल्या एकूणएक क्रांत्यांची निष्फळता इतिहासानें वारंवार सिद्ध करून दाखविली आहे ही गोष्ट कोणा-लाहि कबूल करणें भाग पडेल. अत्याचारानें कधीं तरी स्वराज्य मिळणें शक्य आहे काय ? ' नाहीं ' असें इतिहासानें योग्य उत्तर दिलें आहे. जगां-तील कोणत्याहि क्रांत्यांचा इतिहास तपासून पहा.

## अनत्याचारी असहकारिता हा एकच मार्ग.

माझा बंडांमध्यें विश्वास आहे--परंतु अत्याचारामुळें स्वातंत्र्याचा विघात होतो हें मी पुनःपुन्हा सांगूं इच्छितों. अनत्याचारी बंड सावकाश होत जातें, परंतु तें नक्की यशस्वी होतें. पायरीपायरीनें राष्ट्राचा आत्मा जागृत होतो व मग तें स्वराज्यमार्गापर्यंत जाऊन पोंचतें. निदान हिंदुस्थानांत तरी स्वराज्य हस्तगत करण्याचा अनत्याचारी असहकारिता हाच एक मार्ग आहे. ज्या लोकांना हा मार्ग अव्यवहार्य वाटत असेल त्यांनीं मेहेरबानी करून अकाली लोकांच्या चळवळीकडे लक्ष द्यावें. अमृतसरास जखमी अकालींच्या जखमा पाहत असतां ज्यावेळीं " इतकी चिथावणी मिळाली तरी सुद्धां आमच्या मनांत ठोशास ठोसा देण्याची इच्छा उत्पन्न झाली नाहीं " असे त्यांच्या तोंडचे उद्गार माझ्या कानीं पडले, त्याचवेळीं ' हा अनत्याचाराचा निःसंशय विजय होय ! ' असें मी मनांतल्या मनांत म्हणालों. अनत्याचार ही स्वप्नसृष्टि नाहीं. ' आतां तरवार म्यान करा ' असें महात्माजींनीं उगाच

जाहीर केलें नाहीं. या मार्गानें स्वराज्यप्राप्तीचा प्रयत्न करणाऱ्या हिंदी राष्ट्राला सरकारकडून भयंकर दडपशाहीचें उत्तर मिळालें. आपल्या चळवळीच्या यशापयशाचा आढावा आज काढल्यास तें वावगें होणार नाहीं. आमच्या चळवळीचा आत्मा चिरडून टाकण्यासाठीं सरकारनें दडपशाहीचा वरवंटा फिरविला तरीमुद्धां अखेरीस आमचाच विजय झाला आहे हें मी विनदिक्कत म्हणूं शकतों.

## अनत्याचारी असहकारितेचा विजय.

परंतु आपली अनत्याचारी असहकारितेची चळवळ यशस्वी झाली कीं नाहीं याविषयीं आज कित्येकांस शंका वाटत आहे. हे लोक असें गृहीत धरून चालतात कीं, प्रत्येक चळवळ ही पूर्णपणें यशस्वी किंवा अयशस्वी झालीच पाहिजे. परंतु जगांत प्रामाणिकपणानें सुरू झालेल्या सर्व चळवळी पाहिल्या. तर त्या सर्वस्वी यशस्वी झाल्या नाहींत किंवा सर्वस्वी अयशस्वीहि झाल्या नाहींत, असें दिसून येईल. कोणत्याहि प्रामाणिक चळवळीचा उद्भव हा एकाद्या विशिष्ट ध्येयापासून होत असतो व ध्येय हें परिणामापेक्षां नेहमीं उच्च दर्जाचें असतें. उदाहरणार्थ. फ्रान्समधील राज्यक्रांति घ्या. ती यशस्वी झाली कीं अयशस्वी ? याचें निश्चयात्मक उत्तर देणें ही ऐतिहासिक दृष्ट्या घोडचूक होईल. हिंदुस्थानांतील असहकारितेची चळवळ यशस्वी झाली काय, असा कोणी प्रश्न केल्यास 'होय, तींत आम्हांला प्रचंड विजय मिळाला' असेंच मी उत्तर देईन. कारण या चळवळीनें आसेतुहिमाचल जी प्रचंड स्वराज्यपिपासा उत्पन्न केली ती लक्षांत घेतां वरील उत्तर देणेंच भाग आहे. या चळवळीमुळें राष्ट्रांत प्रचंड फंड जमला, हजारों लोक कांग्रेसचे सभासद झाले व परदेशी मालावर कडकडीत बहिष्कार पडला. या गोष्टी लक्षांत घेतां तींत आम्हांस प्रचंड विजय मिळाला असेंच म्हणणें भाग आहे. इतकेंच नव्हे तर आपल्या चळवळीमुळें सरकारी शिक्षणसंस्था, कोर्टें व सुधारलेली कौन्सिलें यांच्या इभ्रतीचें पूर्णपणें दिवाळें वाजलें. अद्यापहि या संस्थांचा आश्रय करण्यांत येत असेल तर तो केवळ आपल्या देशबांधवांच्या दुर्बलतेमुळेंच करण्यांत

येत आहे. येथपर्यंत गणिताच्या दृष्टीनें आमच्या यशाची बेरीज झाली तरी-सुद्धां झालें तेवढें थोडें असून आणखी पुष्कळ करावयाचें उरलें आहे या गोष्टीकडे आमचें लक्ष वेधणें जरूर आहे. अद्यापि पुष्कळशा गोष्टी आम्हांला साध्य करावयाच्या आहेत. आमची अनत्याचाराची प्रवृत्ति अधिक दृढ झाली पाहिजे. त्याचप्रमाणें असहकारितेचें कार्य अधिक प्रखर करून तिचें क्षेत्रहि अधिक व्यापक केलें पाहिजे. आपणांस स्वार्थत्यागबुद्धि अधिक प्रदीप्त करावयाची असून पूर्वीपेक्षांहि अधिक विघातक व विधायक अशी कामगिरी करावयाची आहे. आम्हांस पुष्कळशा बाबतींत अपयश आलें असलें तरी कित्येक बाबतींत आमचा विजय झाला तो तरी तुम्ही कबूल कराल कीं नाहीं ? असा आमच्या टीकाकारांस माझा सवाल आहे.

## होय ! आम्ही हा गुन्हा केला !

आम्ही देशांतील तरुणांचा बुद्धिभेद केला अशा तऱ्हेची हाकाटी मवाळ लोक आमच्या नांवानें करीत आहेत. मुलांनीं बापांचें ऐकूं नये. विद्यार्थ्यांनीं शिक्षकांची आज्ञा मानूं नये व प्रजेनें सरकारच्या म्हणण्यास भीक घालूं नये अशा अर्थाचें शिक्षण आम्ही दिलें, असा मवाळांचा आमच्यावर आरोप आहे. हा आरोप मला पूर्णपणें मान्य आहे.

जगांतील प्रत्येक धार्मिक चळवळीचा आहांस पाठिंबा आहे. खुद्द येशू ख्रिस्तावर देखील लोकांचा बुद्धिभेद केल्याच्या आरोपावरूनच खटला झाला होता. त्या प्रसंगीं त्यानें दिलेलें जोरदार उत्तर खरोखरच लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. तो म्हणालाः—

"मी जगांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं आलों आहें असें समजूं नका; मी शांतता प्रस्थापित करण्यासाठीं आलेला नसून यादवी माजविण्या-साठीं आलों आहें."

"कारण मुलानें बापाविरुद्ध, मुलीनें आईविरुद्ध व सुनेनें सासूविरुद्ध झगडावें असा उपदेश करण्यासाठींच माझा या जगांत अवतार आहे."

## भिन्न भिन्न जातींच्या हक्कांचा जाहीरनामा.

हिंदुस्थानांत स्वराज्य झाल्यावर देशांतील निरनिराळ्या जातींना कोण-कोणत्या प्रकारचे हक्क दिले जातील याबद्दलचा जाहीरनामा कॉंग्रेसनें प्रथम जाहीर करावा. हिंदुमुसलमानांच्या दिलजमाईचा विचार करितांना लखनौ-कॉंग्रेसनें पास केलेल्या तडजोडीस कॉंग्रेसनें पुनः जोराची मान्यता द्यावी. याशिवाय परस्परांचे हक्कहि मान्य करून परस्परांनी ' देवाण घेवाणा 'च्या तत्त्वावर परस्परांसाठीं थोडथोडा स्वार्थ-त्याग करण्यास तयार व्हावें. उदाहरणार्थ, हिंदूंनीं मशिदीवरून वाद्यें वाज-ल्यास त्यास प्रत्येक मुसलमानाची हरकत असते; व मुसलमान लोक गोवध करतात तो हिंदू लोकांस नापसंत असतो. अशा परिस्थितींत हिंदूंनीं कधींहि मशिदीवरून वाद्यें न वाजविण्याचें कबूल केलें व मुसलमानांनीं कधींहि गोवध करावयाचा नाहीं असें वचन दिलें, तर हिंदूमुसलमानांमधील तंट्याचा कायमचा निकाल लागणें शक्य नाहीं काय ? अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें देतां येतील. प्रत्येक जातीनें स्वराज्यासाठीं कोणकोणत्या प्रकारचा स्वार्थत्याग करावा याची कांग्रेसनें एक यादीच तयार करून ठेवावी. देशांत आपलें बहुमत आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन स्वराज्याच्या कारभारांत हिंदुमुलमानांनीं शीख, ख्रिस्ती, पार्शी वगैरे समाजांस त्यांच्या प्रमाणशीर प्रातिनिधित्वापेक्षांहि अधिक अधिकार द्यावे. या सर्व जातींशीं कांग्रेसनें खरोखरीचे करारमदार घडवून आणून त्यांचे हक्कांस मान्यता द्यावी म्हणजे एकूणएक अल्पसंख्याक जातींचे मनांतील शंका व भीति आपोआप दूर होईल. ख्रिस्ती समाजामध्यें मी केवळ हिंदी ख्रिस्त्यांचाच नव्हे, तर अँग्लोइंडियनांचा व जे जे म्हणून हिंदुस्थान ही आपली मातृ-भूमि समजतात त्या सर्वांचा समावेश करितों. अशा प्रकारच्या करारमदारांची जरुरी नेहेमींच असते. परंतु आपणांपुढील कार्याकडे नजर टाकतां त्याची या घटकेला अत्यंत जरुरी आहे असें मला वाटतें.

## परदेशांतील चळवळ

या बाबतींत गेलीं दोन वर्षें आपण जें अलिप्त राहण्याचें सोंवळेपणाचें धोरण पत्करिलें आहे तें सोडून द्यावें असें मला वाटतें. कारण प्रत्येक देशांत

निःस्वार्थ असे स्वातंत्र्योपासक अनेक आहेत. प्रत्येक देश स्वतंत्र झाला पाहिजे असें त्यांस वाटतें. अतःपर त्यांच्या सहानुभूतीस व सहकार्यास आम्हांला आंचवितां येणें शक्य नाहीं. माझ्या मतें अमेरिकेंत व एकूण एक युरोपियन राष्ट्रांत कांग्रेसच्या शाखा उघडल्या पाहिजेत. जगांत कोणकोणत्या चळवळी चालल्या आहेत इकडे सदैव लक्ष ठेऊन जगांतील सर्व स्वातंत्र्यप्रेमी लोकांशीं आपण वारंवार आपला संबंध ठेविला पाहिजे.

## आशिया खंडांतील राष्ट्रांचा संघ.

सध्यां आशियाखंडांतील अखिल राष्ट्रांचा जो एक बडा संघ निर्माण होऊं पाहत आहे, त्यांत हिंदुस्थाननें भाग घेणें अत्यंत अगत्याचें आहे असें मला वाटतें. पूर्वी अत्यंत संकुचित अशा धोरणावर सुरू झालेली 'पॅन इस्लामिक' चळवळ आतां अजिबाद नष्ट झाली असून तिचें आशिया खंडांतील लोकांचा एक बडा संघ निर्माण करण्यांत रूपांतर होत आहे. याविषयीं आतां मला बिलकुल शंका वाटत नाहीं. आशियाखंडांतील जुलमानें गांजलेल्या निरनिराळ्या लोकांचा तो संघ होणार आहे. या संघापासून हिंदुस्थान अलिप्त राहणार काय ? आम्ही स्वतः आमच्या पायांवर उभें राहून स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थान स्नेहाच्या, प्रेमाच्या, सहानुभूतीच्या व सहकार्याच्या रज्जूनीं आशियाखंडांतील इतर राष्ट्रांशीं, किंबहुना सबंध जगांतील स्वातंत्र्यप्रेमी अशा लोकांशीं निगडित झाल्यास त्यापासून सबंध जगांत शांतता प्रस्थापित होईल असें मला वाटतें. प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र होणें याचाच अर्थ जगाची शांतता प्रस्थापित होणें होय, असें मला वाटतें. किंबहुना, याच्याहि पलीकडे जाऊन मी असें म्हणतों कीं, कांहीं राष्ट्रें गुलामगिरींत खितपत पडलीं असतांना बाकीच्या राष्ट्रांस प्राप्त झालेलें स्वातंत्र्य हें खरें स्वातंत्र्यच नव्हे. आम्हीं आजपर्यंत ज्या धोरणाचा पुरस्कार केला तें आमच्या कार्यांचें एकीकरण करण्यासाठीं अत्यंत इष्ट होतें व त्यास माझा संपूर्ण पाठिंबा होता. एका वर्षात सबंध स्वराज्य अगर निदान त्याचा बराच मोठा हिस्सा तरी मिळण्याची आशा आम्हास वाटत होती म्हणूनच अशा प्रकारचें एकी-

करण करणें अत्यंत इष्ट होतें आणि त्याच कार्यासाठीं आज आमचा दृष्टिकोन जरा अधिक विस्तृत करणें जरूर आहे.

## पंजाब, खिलाफत व स्वराज्य यांसंबंधींच्या मागण्या.

सध्यां जगांत मोठमोठ्या घडामोडी घडून येणार, अशीं लक्षणें दिसत आहेत. जगांतील राजकारणाचा वारा आम्हांस अनुकूल असा वाहात आहे. मुस्तफा केमालपाशाच्या विजयामुळें सर्वच आशिया खंड जागृत झालें असून त्यास जिवंत स्थिति प्राप्त झाली आहे. प्रत्येक युरोपियन राष्ट्रांत तेथील लोकांनीं खरेंखुरें स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची जी जोराची चळवळ चालविली आहे ती पाहून जगांतील सर्व गुलाम लोकांचे बुद्धींत विलक्षण क्रांति घडून आली आहे. जी क्रांति आजपर्यंत दुःसाध्य म्हणून केवळ स्वप्नवत् वाटत होती तीच आज अगदीं व्यवहार्य राजकारणाच्या टप्प्यांत येऊन पोंचली आहे व हिंदुस्थानला तिची रूपरेषा समजली आहे. अशा प्रसंगीं आपल्या मागण्यांचा पुनश्च विचार होऊन त्या पुनः मांडल्या जाणें इष्ट झालें आहे. पंजाबसंबंधींच्या आपल्या बऱ्याचशा मागण्या आपणांस प्राप्त झाल्या असल्याकारणानें त्यांमध्यें योग्य ती दुरुस्ती करून त्या पुनः पुढें मांडल्या पाहिजेत. खिलाफतीसंबंधींच्या आपल्या मागण्यांचाहि पुनश्च विचार होणें जरूर आहे. कारण त्यांपैकीं बऱ्याचशा साध्य झाल्या असून, लॅसेन कमिशनचें काम आटोपण्यापूर्वींच बाकीच्या बहुतेकांचा निकाल लागेल अशी आशा वाटत आहे. स्वराज्याची मागणी मात्र आपण जरा अधिक व्यवहार्य रीतीनें पुढें मांडिली पाहिजे. स्वराज्यास पायाभूत अशा भावि राज्यपद्धतीची स्पष्ट योजना आंखलेली नाहीं. मुद्दामच आपण अशा प्रकारची योजना आंखली नाहीं. कारण मनःक्रांतीच्या स्वरूपाचें स्वराज्य मिळविण्याकडेच इतके दिवस आमचें लक्ष वेधलें होतें. परंतु आज परिस्थिति बदलली आहे. स्वराज्यासाठीं आम्ही आज अगदीं उतावळे झालेले आहोंत. म्हणून आम्हांस कोणत्या प्रकारची राज्यपद्धति पाहिजे यासंबंधांची योजना कॉंग्रेसनें देशापुढें मांडणें हें तिचें कर्तव्य आहे. मी सध्यां सांगितल्याप्रमाणें स्वराज्याची व्याख्या करितां येणें शक्य नाहीं.

आणि म्हणून त्याची इतर कोणत्याहि विशिष्ट राज्यपद्धतीशीं भेसळ होऊं देतां कामा नये. असें आहे तरी सुद्धां आज राष्ट्राची विचारसरणी कशी आहे ती प्रगट होणें जरूर आहे. आणि स्वराज्याच्या बाह्य स्वरूपांत राष्ट्राचा सबंध इतिहास अंतर्भूत होत असला, तरीसुद्धां अशा प्रकारच्या मागणीची योजना इतःपर लांबणीवर टाकतां येणें शक्य नाहीं.

## स्वराज्यांतील राज्यपद्धतीची योजना

अशा प्रकारच्या राज्यपद्धतीची तपशीलवार योजना येथें अध्यक्ष या नात्यानें आंखण्याचा मला फारसा अधिकार आहे, असें वाटत नाहीं. तथापि, यासंबंधीं माझें मत काय आहे हें आपणांस सांगण्याची आजच्यासारखी संधि मी वायां दवडूं इच्छित नाहीं. लोकांकडून व लोकांच्या कल्याणार्थ चालविली जात नाहीं अशी कोणतीहि सरकारी राज्यपद्धति स्वराज्यास पायाभूत होणें शक्य नाहीं. पार्लमेंटच्या धर्तीचें सरकार हें लोकनियंत्रित व लोकांच्या कल्याणार्थ असतें अशी माझी पक्की खात्री झाली आहे. आमच्यापैकीं पुष्कळांची अशी समजूत आहे कीं, सर्वसाधारण जनसमूहासाठीं मध्यमवर्गानेंच स्वराज्य मिळविलें पाहिजे. कोणत्याहि विशिष्ट वर्गानें सुरू केलेली चळवळ ही कधींहि स्वराज्याची चळवळ होऊं शकेल, असें मला वाटत नाहीं. आज जर ब्रिटिश पार्लमेंट आम्हांला प्रांतिक स्वायत्तता व मध्यवर्ती सरकारांतील थोडीशी जबाबदारी देऊं म्हणेल, तर निदान मी तरी त्यास कसून विरोध करीन. कारण त्यामुळें सर्व सत्ता मध्यमवर्गाचे हातांतच येऊन पडेल. मग एकदां हातीं आलेली सत्ता मध्यमवर्ग राजीखुपीनें सोडून देईल असें मला वाटत नाहीं. आज गोऱ्या लोकांची नोकरशाही आमच्यावर अधिकार गाजवीत आहे. तिच्या जागीं उद्यां काळ्या मध्यमवर्गाची हिंदी नोकरशाही आमच्यावर अधिकार गाजवील. पण त्यामुळें हिंदुस्थानचा काय फायदा? नोकरशाही ही नेहमी नोकरशाहीच राहणार. तिचें अस्तित्व स्वराज्याशीं विसंगत आहे. स्वराज्यप्राप्तीसाठीं लोकांचें सहकार्य मला मिळेपर्यंत माझें स्वराज्याचें ध्येय कधींच साध्य व्हावयाचें नाहीं. त्यांच्या सहकार्याशिवाय मिळालेलें स्वराज्य

हें कधींहि खरें स्वराज्य होणार नाहीं. त्यास युरोपियन समाजसत्तावादी 'मध्यमवर्गाचें सरकार' (बूर्ज्वा गव्हर्नमेंट) म्हणतात त्याचें स्वरूप प्राप्त होईल. फ्रान्स, इंग्लंड व इतर युरोपिअन राष्ट्रांत मध्यमवर्गानेंच स्वातंत्र्याच्या लढाया मारल्यामुळें अद्यापपर्यंत सर्व सत्ता त्यांचे हातांत कायम आहे. आतां ती ते सोडूं इच्छित नाहींत. मध्यमवर्गाच्या हातांतली ही सत्ता हिसकून घेण्यासाठीं--खऱ्या स्वातंत्र्यासाठीं सध्यां सर्वंध युरोपखंडांत लढा चालू आहे. हिंदी जनसमूहानें अनत्याचारी रीतीनें स्वराज्य मिळवून सर्वंध जगाला मार्ग दाखविणें जरूर आहे.

## ग्रामस्वातंत्र्याची योजना.

मला प्रांतिक स्वायत्ततेपेक्षां किंवा मध्यवर्ती सरकारांतील जबाबदारीपेक्षांहि ग्रामसंघटनाची व लहान लहान ग्रामसंघांच्या स्वायत्ततेची किंमत अधिक वाटते. मला कोणी 'प्रांतिक स्वायत्तता पाहिजे कीं ग्रामसंघांची स्वायतत्ता पाहिजे?' असा प्रश्न विचारल्यास मी विनदिक्कत दुसरीच गोष्ट पत्करीन. यावरून देशांतील निरनिराळे ग्रामसंघ एकमेकांपासून विभक्त असावेत असें मला वाटतें असें मात्र कोणी समजू नये. त्यांत सहकार्यपद्धतीनें एकसूत्रीपणा घडवून आणिला पाहिजे. सध्यांपुरती प्रांतिक व वरिष्ठ सरकारांचे हातीं सत्ता असावी. परंतु मध्यवर्ती अगर प्रांतिक सरकारचें काम ग्रामसंघांस फक्त सल्ला देण्याचें व विशिष्ट प्रसंगीं त्यांजवर हुकमत गाजविण्याचें आहे हें ध्येय मात्र कायमचें मंजूर झालें पाहिजे. या ग्रामसंघांस सरकारची सर्व सत्ता मिळाली तरच खरें स्वराज्य अस्तित्वांत येईल असें माझें ठाम मत आहे. आणि म्हणून कॉंग्रेसनें राष्ट्रास मान्य होईल अशा प्रकारच्या राज्यपद्धतीची योजना तयार करण्यासाठीं एक कमिटी नेमावी. ही योजना तयार करितांना पुढील गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत—

(१) पूर्वकालीं हिंदुस्थानांत अस्तित्वांत असलेल्या ग्रामसंघटनेच्या धर्तीवरच स्थानिक केंद्रांची स्थापना झाली पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

( २ ) या परस्पर केंद्रांतील ऐक्याच्या जोरावर मोठमोठ्या गटांची वाढ झाली पाहिजे.

( ३ ) अशा प्रकारच्या गटांनीं सबंध सरकार बनलें पाहिजे.

( ४ ) खेडेगांवांचीं केंद्रें व मोठमोठे गट हे बहुतांशीं स्वतंत्र असले पाहिजेत.

( ५ ) मध्यवर्ती सरकारचे हातीं नियंत्रणाचा अधिकार असावा; परंतु, विशिष्ट प्रसंगीं तेवढाच या अधिकाराचा उपयोग करण्याची त्याला मुभा असावी. खेडेगांवांच्या स्वातंत्र्यावर घाला न पडतां मध्यवर्ती सरकारचें खऱ्या ऐक्यतापूर्ण सरकारांत रूपांतर होणें सुलभ होईल. अशा प्रकारच्या अटी तो अधिकार देतांना घालून ठेवाव्या. सल्लामसलत देणें हेंच मुख्यतः मध्यवर्ती सरकारचें काम राहील.

## कायदेकौन्सिलांवरील बहिष्कार.

आतां मी कौन्सिलबहिष्काराकडे वळतों. दुर्दैवानें या प्रश्नास फेरनाफेर वादाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. कांहींशा चुकीच्या समजुतीनें सदर वाद सुरू झाला आहे, असें मला वाटतें. आपल्या कार्यक्रमांत फेरफार करावा किंवा नाहीं, असा कांहीं आपणांपुढील प्रश्न नाहीं. आपली चळवळ यशस्वी करण्यासाठीं तिची दिशा बदलणें जरूर आहे कीं काय, एवढाच काय तो आज आपणांपुढें प्रश्न आहे. उदाहरणार्थ, बार्डोलीचा ठराव घ्या. त्या ठरावामुळें शाळा-कॉलेजांवरील बहिष्काराचे बाबतींत आपल्या चळवळीची दिशा बदलली आहे. परंतु त्यामुळें त्या बहिष्काराचें कोणत्याहि प्रकारें उच्चाटन झालेलें नाहीं. एका वर्षांत स्वराज्य मिळवावयाचें ठरलें त्या वर्षी विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजांतून बाहेर काढून तीं ओस पाडावीं असा कॉंग्रेसचा हेतु होता. राष्ट्रीय शाळाकॉलेजें काढण्यांत आलीं खरीं. परंतु तीं फक्त ‘ कमकुवत ’ विद्यार्थ्यांच्या सोयीसाठींच ! महात्माजींच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे सरकारी शाळाकॉलेजांवरील बहिष्कार हा ‘ राजकीय ’ होता, ‘ शैक्षणिक ’ नव्हता ! तथापि बार्डोलीच्या ठरावान्वयें राष्ट्रीय शाळाकॉलेजांची स्थापना हेंच राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचें

प्रमुख अंग ठरलें. पूर्वी शाळाकॉलेजांवरील बहिष्काराची कल्पना 'राजकीय' होती; बार्डोलीच्या ठरावामुळें तिला ' शैक्षणिक ' स्वरूप प्राप्त झालें. आणि अजूनहि सरकारी शाळा कॉलेजांतून विद्यार्थ्यांना बाहेर काढण्याची काँग्रेसची इच्छा असेल तर त्यांच्या राष्ट्रीय शिक्षणाची सोय करूनच काँग्रेसला ती पार पाडावी लागेल. त्यामुळें शाळाकॉलेजांवरील बहिष्कार उचलून धरिला जाईल खरा; परंतु आपल्या चळवळीची दिशा मात्र बदलेल. वस्तुतः अशा प्रकारचे फेरबदल प्रत्येक बंडांत—मग तें बंड हिंसामय असो अगर अहिंसामय असो—वडून आलेच पाहिजेत. कारण अशा प्रकारच्या फेरबदलामुळेंच ध्येयसिद्धीचे खरे प्रयत्न होत असतात.

शिवाय कायदेभंग–चौकशी–कमिटीनें एकमतानें केलेल्या शिफारशींकडेहि आपण दुर्लक्ष करितां कामा नये. लोकांची तयारी नसल्याकारणानें मोठ्या प्रमाणावर सविनय कायदेभंग सुरू करितां येणें शक्य नाहीं, अशा प्रकारची शिफारस सदर कमिटीनें एकमतानें केलेली आहे.

कोणत्याहि प्रकारचा सविनय कायदेभंग अंमलांत आणण्याचे बाबतीत काँग्रेसनें जीं निरनिराळीं बंधनें घातलीं आहेत तीं मला बिलकुल पसंत नाहींत, ही गोष्ट येथें नमूद करणें भाग आहे. माझ्या मतें काँग्रेसनें हीं बंधनें अजिबात काढून टाकावीं. कोणत्याहि विशिष्ट कायद्यांचा सविनय भंग करण्यासाठीं, जेथें अशा प्रकारें कायदेभंग सुरू करावयाचा त्या ठिकाणीं शेंकडा ८० लोकांनीं शुद्ध खादी वापरलीच पाहिजे, अशा प्रकारची अट कां घालण्यांत आली आहे याचें कारण मला अद्यापि समजलेलें नाहीं. सार्वत्रिक सविनय कायदेभंगाची कल्पना मला फारशी मान्य नाहीं. माझ्या मतें, सार्वत्रिक कायदेभंगाची कल्पना अव्यवहार्य आहे. परंतु, जे कायदे उघड उघड बेकायदेशीर आहेत, ज्या कायद्यांचा जन्म केवळ ' लॉ अँड ऑर्डर ' च्या नांवाखालींच झालेला आहे, जे कायदे सबंध मनुष्यजातीच्या हक्कांवर गदा आणूनच थांबत नाहींत, तर जे खुद्द ईश्वराचाहि उपमर्द करितात—असे कायदे पायांखालीं तुडवून मोडणें हें मात्र मला व्यवहार्य वाटतें. आणि अशा प्रकारचे कायदे मोडण्यासाठीं हरएक प्रकारचे प्रयत्न झाले

पाहिजेत, असें माझें मत आहे. आपण सत्याच्या पायावर उभे असूं तरच अंतीं आपलें स्वराज्यकार्य यशस्वी होऊं शकेल. आपण असल्या बेकायदेशीर कायद्यांपुढें मान वाकविणें म्हणजे सत्यास तिलांजलि देणें होय. ज्या बेकायदेशीर कायद्यांमुळें राष्ट्रीयत्वाचा उपमर्द होऊन राष्ट्रीय प्रगतीस धक्का पोंचतो, त्याविरुद्ध बिनदिक्कत बंडाचें निशाण न उभारण्याइतके जे लोक सत्यद्रोही बनले असतील त्यांस ऊर्जितावस्थेची आशा करण्यास जरा तरी जागा आहे काय ?

आतांच मी वर्णिलेली सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन कौन्सिलबहिष्काराच्या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे असें माझें मत आहे. मी सांगितलेला सविनय कायदेभंग करणें व कौन्सिलें सुधारण्याच्या अगर अजिबात मोडण्याच्या एकमात्र हेतूनें कौन्सिलांत जाणें या दोन कल्पनांत बिलकुल विरोध नाहीं. मी कौन्सिलबहिष्काराच्या विरुद्ध नाहीं. माझें फक्त एवढेंच मत आहे कीं, सुधारलेल्या कौन्सिलांची राज्यपद्धति, सिव्हिल सर्व्हिसची 'पोलादी चौकट ' आणि अनेकविध स्वार्थी यांनीं भरलेली द्विदल राज्यपद्धति, या सर्व गोष्टी हिंदी लोकांच्या स्वभावास व बुद्धीस पूर्णपणें अनैसर्गिक आहेत. हिंदी लोकांवर परकीय राज्यपद्धति बळजबरीनें लादण्याचा ब्रिटिश पार्लमेंटाचा तो एक प्रयत्न आहे. ह्या परकीय राज्यपद्धतीस खऱ्या स्वराज्याचा पाया म्हणण्याचें हिंदुस्थाननें सपशेल नाकारलें आहे. सुधारणा कमी असोत अगर जास्त असोत त्याची मला मुळींच फिकीर नाहीं व कदापि नसते. कारण खऱ्या स्वराज्यास पायाभूत अशा सुधारणा मला मिळणार असतील, तर त्यासाठीं वाटेल तितकें देवाणघेवाण करण्यास मी तयार असतों. त्याचप्रमाणें संपूर्ण व निर्मळ स्वातंत्र्याच्या प्राप्तीला आणखी ७ वर्षें लागतील कीं १० लागतील किंवा २० लागतील याचेंहि मला कांहीं महत्त्व वाटत नाहीं. राष्ट्राच्या आयुष्यक्रमांत ४।२ वर्षें कमी काय किंवा ४।२ वर्षें ज्यास्त काय, त्याची कांहींच किंमत नसते. परंतु स्वराज्याचा पाया म्हणून जी राज्यपद्धति आज आम्हांस मिळाली आहे ती स्वीकारण्यास मात्र हिंदुस्थान कदापि तयार होणार नाहीं, ही गोष्ट मी पुनः पुनः बजावून ठेवितों.

आणि म्हणून हीं कौन्सिलें सुधारलीं तरी पाहिजेत, किंवा कायमचीं धुळीस तरी मिळविलीं पाहिजेत. आजपर्यंत आम्हीं कौन्सिलांच्या बाहेर राहून त्यांवर बहिष्कार घातला. त्यांत आम्हांस बरेंच यशहि मिळालें; व कौन्सिलांची इभ्रत धुळीस मिळून त्यांतील खुर्च्या जे लोक अलंकृत करितात ते जनतेचे खरे प्रतिनिधि नव्हत अशी सर्व देशाची खात्री पटली. इतकें जरी यश आम्हांस मिळालें असलें तरीसुद्धां या कौन्सिलांचें अस्तित्व अद्यापि नष्ट झालेलें नाहीं. आतां त्यांमध्यें घुसून आंतून कौन्सिलबहिष्काराची चळवळ अधिक परिणामकारक रीतीनें चालविणें हें कॉंग्रेसचें कर्तव्य आहे. सुधारलेलीं कौन्सिलें हा नोकरशाहीनें आपल्या तोंडावर घेतलेला बुरखा होय! हा बुरखा काढून टाकून नोकरशाहीच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण करणें हें आपलें स्पष्ट कर्तव्य आहे. माझ्या मतें बहिष्काराची नुसती कल्पनाच साध्या अलिप्ततेपेक्षां कांहीं तरी विशेष दर्शविते. परदेशी मालावरील बहिष्काराचा तरी काय अर्थ आहे? आमच्या बाजारपेठांतून परदेशी मालाचा प्रवेश होणार नाहीं अशा प्रकारचे उपाय योजणें याचेंच नांव परदेशी मालावरील बहिष्कार. त्याचप्रमाणें आमच्या स्वराज्यप्रगतीच्या मार्गांत सध्यांचीं कौन्सिलें कोणत्याहि प्रकारचे कांटे पसरणार नाहींत अशा प्रकारची तजवीज करणें याचेंच नांव कौन्सिलबहिष्कार असें मला वाटतें. स्वराज्यप्राप्तीस पोषक अशा प्रकारची सुधारणा सध्यांच्या कौन्सिलांत केली किंवा तीं अजिबात नष्ट केलीं तरच कौन्सिलबहिष्कार यशस्वी झाला असें होईल. अशा प्रकारचाच बहिष्कार हिंदुस्थाननें कौन्सिलांवर घालावा असा माझा सल्ला आहे—

मी सांगतों तशा प्रकारचा कौन्सिलबहिष्कार अनत्याचारी असहकारितेच्या तत्त्वास सुसंगत आहे की विसंगत, याबद्दल देशांत बरीच भवति न भवति झालेली आहे. ज्या असहकारितेचा राष्ट्रीय सभेनें पुरस्कार व अंमलबजावणी केली त्यास वरील प्रकारचा बहिष्कार कोणत्याहि प्रकारें विघातक नाहीं, असें माझें ठाम मत आहे. मात्र तर्कशास्त्राच्या अगर तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतांचा येथें विचार करावयाचा नाहीं. कॉंग्रेसनें जें धोरण आंखलें व ज्याला असहकारिता असें नांव दिलें त्या धोरणाचाच विचार मी येथें करीत आहें.

या घटकेपर्यंत आपण नोकरशाहीशीं असहकारिता केलेली नाहीं ही गोष्ट आपणांस ठाऊक आहे काय ? आजपर्यंत आम्हीं आमच्या देशबांधवांस असहकारिता करण्यासाठीं फक्त तयार करीत होतों. माझ्या मताचे पुष्ट्यर्थ मी नागपूर कॉंग्रेसच्या ठरावांतील महत्वाचा भाग पुढें देत आहें:—

" ज्या अर्थी सध्यांच्या हिंदुस्थानसरकारवरील देशाचा विश्वास उडाला आहे व ज्या अर्थी स्वराज्यस्थापनेचा हिंदुस्थानच्या लोकांनीं निश्चय केला आहे, त्याअर्थी ही कॉंग्रेस असें जाहीर करिते कीं, राष्ट्रीय सभा अगर ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी ठरवील त्या तारखे-पासून आपखुषीचे सहकार्यसंबंध सोडून देण्यापासून तों तहत कर देण्याचें नाकारण्यापर्यंतची अनत्याचारी असहकारितेची योजना अंशतः अगर सर्वस्वी अंमलांत आणावी; व तोंपर्यंत अमल्या असहकारितेची तयारी करण्यासाठीं परिणामकारक अशा उपायांचा अवलंब करावा.

एवढें सांगितल्यानंतर राष्ट्रीय शिक्षण, कोर्टबहिष्कार, परदेशी मालाव-रील बहिष्कार इ. परिणामकारक उपाय कॉंग्रेसनें त्या ठरावांत सुचविले आहेत. परंतु, ते असहकारिता सुरू करण्यासाठीं व ती सुरू होईपर्यंतच अंमलांत आणावयाचे आहेत. यावरून कॉंग्रेसनें अद्यापि असहकारितेचें तत्त्व अंमलांत आणिलेलें नसून कॉंग्रेस ठरवील त्या वेळीं हिंदी राष्ट्राला अस-हकारिता पुकारतां यावी म्हणून फक्त कांहीं पूर्वतयारीच्या उपायांची शिफारस तिनें केली आहे, हें कोणासहि स्पष्टपणें दिसून येईल. आतां आपण या तत्त्वाचा तर्कशास्त्राच्या अगर तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें नव्हे, तर कॉंग्रेसनें ज्या चळवळीचा व कार्याचा अंगिकार केला आहे त्याच्या दृष्टीनें विचार करूं या. मी जेव्हां कॉंग्रेसच्या कार्यांचें परिशीलन करूं लागतों, तेव्हां कॉंग्रेसनें दोन तऱ्हेची चळवळ चालविली होती असें माझ्या लक्षांत येतें. कॉंग्रेसनें जी जी म्हणून चळवळ हातीं घेतली तींत विघातक व विधायक असे दोन्ही भाग होते. वकिलांच्या व कोर्टांच्या बहिष्काराचा अर्थ असा कीं, सध्यांच्या कायदेकोर्टांचा नाश व्हावा व पंचायती स्थापण्याचा हेतु असा कीं न्यायदानाच्या देशी संस्था निर्माण व्हाव्या. शाळाकॉलेजांवरील बहिष्काराचा अर्थ असा कीं, सध्यांच्या सरकारी शिक्षणखात्याचा अंत

व्हावा आणि राष्ट्रीय शिक्षणसंस्था अस्तित्वांत याव्या. परदेशी मालावरील बहिष्काराबरोबरच परदेशी कापड जाळण्याचें ठरलें त्याचा अर्थ असा कीं, आगाऊ देशांत आलेल्या परदेशी मालाचा नाश व्हावा व इतःपर परदेशी मालाचा देशांत प्रवेश होणार नाहीं अशी तजवीज व्हावी. उलटपक्षीं चरखे व हातमाग सुरू करण्याचा अर्थ असा कीं, देशांतील लोकांस स्वदेशी वस्त्रांचा पुरवठा व्हावा. ही तत्त्वपरंपरा लक्षांत घेतां सध्यांच्या कौन्सिलांना स्वराज्याप्रत नेऊन पोंचविणाऱ्या संस्थांचें रूप देण्याची अगर तीं अजिबात नष्ट करण्याची कोणी इच्छा बाळगिली तर त्यांत चुकलें कोठें ? मी ज्या प्रकारचा बहिष्कार कौन्सिलांवर घालावा असें म्हणतों त्यांत देखील सदर बहिष्कारास विधायक व विघातक स्वरूप देण्याचाच माझा उद्देश आहे.

मी सांगतों अशा प्रकारचा बहिष्कार पुकारल्यास तो सध्यांच्या चळवळीच्या नैतिक व धार्मिक स्वरूपास विघातक होईल असें कित्येकांचें म्हणणें आहे. ह्या दोन्ही मुद्यांचा आपण निरनिराळ्या रीतीनें विचार करूं. असहकारितेचा वेदांत बाजूला ठेवून तिच्या फक्त नैतिक बंधनाचा विचार करितां असें आग्रहपूर्वक सांगण्यांत येतें कीं, कौन्सिलांचा नाश करण्यासाठीं त्यांत घुसणें हें अयोग्य ( unfair ) व अप्रामाणिकपणाचें आहे. ह्या विचारसरणीचा इत्यर्थ असा कीं, सुधारलेलीं कौन्सिलें हीं सर्वस्वी सध्यांच्या नोकरशाहीच्या मालकीचीं असल्याकारणानें, केवळ नासधूस करण्याच्या हेतूनें आपण त्यांच्या मालकीच्या जागेंत प्रवेश करितां कामा नये. खऱ्या परिस्थितीकडे दुर्लक्ष झाल्यामुळेंच वरील प्रकारची विचारसरणी पुढें मांडण्यांत येते असें मला वाटतें. सुधारणा अपुऱ्या तर आहेतच. त्याविषयीं बिलकुल वाद नाहीं. परंतु सुधारणांचा कायदा ही ब्रिटिश पार्लमेंटानें दिलेली देणगी आहे एवढें मात्र कबूल करण्यास मी बिलकुल तयार नाहीं. सुधारणा कायदा ही देणगी नव्हे. महात्माजींच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे " लोकांच्या चळवळीचें तें फळ आहे. " स्वातंत्र्य प्राप्त करून घेणें ही लोकांची इच्छा; व सदर इच्छा दडपून टाकणें ही नोकरशाहीची इच्छा—ह्या दोन्ही इच्छांच्या ओढाताणीचाच सुधारणा हा परिणाम आहे. लोक व नोकरशाही यांच्या झगड्यामुळें सुधारणा धड लोकपक्षासहि सर्वस्वी अनुकूल अशा मिळाल्या

नाहींत; किंवा नोकरशाहीलाहि त्या सर्वस्वी अनुकूल अशा झाल्या नाहींत. हिंदुस्थानच्या जनतेला या सुधारणा पसंत नाहींत. परंतु त्याचबरोबर नोकरशाहीलाहि या सुधारणा पसंत नाहींत, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. कारण दोन विरुद्ध दिशांनीं चाललेल्या शक्तींच्या घर्षणाचा हा परिणाम आहे. त्यामुळें सुधारणांस ' धड ना हें ना तें ' असें ओढाताणीचें स्वरूप प्राप्त झालें आहे. परंतु त्यांत ज्या कांहीं थोड्याबहुत हक्कांस पार्लमेंटानें मान्यता दिली आहे, ते हक्क आमचे आहेत, त्यावर आमची मालकी आहे. आणि जे हक्क लोकांनीं ब्रिटिश पार्लमेंटाच्या हातांतून हिसकून घेतले आहेत त्यांचा उपयोग करणें यांत अनीति, अन्याय अगर अप्रामाणिकपणा बिल्कुल नाहीं. ज्या शक्तीच्या सहाय्यानें सुधारणा मिळूं शकल्या त्याच शक्तीच्या परिपूर्ततेसाठीं कौन्सिलें सुधारणें अगर ती धुळीस मिळविणें इष्ट असलें, स्वातंत्र्याचें युद्ध चालविण्यासाठीं ती सुधारणें अगर नष्ट करणेंच भाग असलें, तर त्यांत अनीति कोठें आहे? दोहोंपैकीं कोणताहि मार्ग पत्करिल्यास त्यांत अनीति आहे असें कोणी तरी ह्मणूं शकेल काय? सहकार्य करण्याचा निश्चित उद्देश; परंतु आंत मात्र कौन्सिलें मोडून तोडून टाकण्याची इच्छा—अशा प्रकारच्या चोरट्या रीतीनें आम्हीं कौन्सिलांत शिरलों असतों तर तो मात्र अप्रामाणिकपणा झाला असता, हें मी कबूल करितों. म. गांधींच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेनें युरोपियन डावपेंचांस तिलांजलि दिली आहे, अशी आमची समजूत आहे. आम्हीं छद्मीपणानें वागत नाहीं. उघड उघड काय तें बोलून त्याप्रमाणें आम्ही वागत असतों.

## यांत अनीति आहे काय ?

परंतु कौन्सिलें सुधारण्यासाठीं अगर मोडण्यासाठीं त्यांत घुसणें हें असहकारितेच्या दृष्टीनें अनीतीचें आहे असें कांहीं लोक म्हणतात. कारण त्यांत नाशाची कल्पना येते असें त्यांचें म्हणणें आहे. या देशाभिमानी लोकांच्या मतें—मला त्यांच्याविषयीं फार आदर वाटतो—नोकरशाही अस्तित्वांतच नाहीं असें कल्पून राष्ट्रीय जीवनाची उभारणी करणें हेंच असहकारितेचें कार्य असलें पाहिजे. कदाचित हें ध्येय प्रामाणिकपणाचें

असेल व तर्कशास्त्राच्या दृष्टीनें पाहतां असहकारितेचा हा गर्भित अर्थहि असूं शकेल. परंतु काँग्रेसनें ज्या असहकारितेचा पुरस्कार केला आहे ती इतकी तर्कशास्त्रविशुद्ध नाहीं. आणि म्हणून ज्या तत्त्वाचा काँग्रेसनें अंगिकार, पुरस्कार व अंमलबजावणी केली त्याच दृष्टीनें तुम्ही माझ्या कार्यक्रमाकडे पाहिल्यास असहकारितेचें पाऊल पुढें पडेल अशी मला खात्री वाटते. मी मघांच सांगितल्याप्रमाणें सदर तत्त्वाचा विघातक त्याचप्रमाणें विधायक कामगिरीस पाठिंबा आहे. आमच्या आजूबाजूला नोकरशाही उभी आहे, आमच्या भोंवतीं चहूंकडे नोकरशाहीचा गराडा पडला आहे. अशा परिस्थितींत विनाश केल्याशिवाय विधायक कामगिरी होणेंच अशक्य आहे. त्याचप्रमाणें आम्हांस विधायक कामगिरी करितां यावी म्हणूनच आम्ही मोडतोड करण्यास उद्युक्त होतों ही गोष्टहि आपण विसरतां कामा नये.

नुसतें कौन्सिलांत शिरणें हेंसुद्धां असहकारितेच्या ध्येयास विसंगत आहे, असें कित्येक लोकांचें म्हणणें आहे. मला ह्या म्हणण्याचा अर्थच कळत नाहीं ही गोष्ट कबूल करणें भाग आहे. समजा, काँग्रेसनें सशस्त्र बंडास संमति दिली असती, तर मग शत्रूच्या किल्ल्यांत प्रवेश करणें हेंसुद्धां असहकारितेच्या तत्त्वास विसंगत झालें असतें काय ? विसंगततेचा आरोप कशावर अवलंबून असेल तर तो कौन्सिलांत प्रवेश करणारांच्या हेतूंवर अवलंबून आहे. शत्रूच्या हद्दींत घुसणारी सेना शत्रूशीं सहकार्य करण्यासाठीं कांहीं त्याच्या हद्दींत घुसत नाहीं. तेव्हां अशा प्रकारचा प्रवेश करणारांच्या हेतूंवरच सहकारिता किंवा असहकारिता अवलंबून असली पाहिजे व असते. कांहीं लोक ' कौन्सिलप्रवेश ' असा शब्द कोठेंहि आढळला कीं लगेच त्याचा संबंध सहकार्याशीं जोडतात आणि मग अशा प्रकारच्या प्रवेशाची नुसती कल्पना देखील असहकारितेस विसंगत आहे अशी गर्जना करूं लागतात. परंतु अशा प्रकारचें चुकीचें तर्कशान कांहीं नवीन नाहीं-तें नेहमींच प्रत्ययास येतें. सहकारितेसाठीं कौन्सिलांत जाणें व असहकारितेसाठीं कौन्सिलांत जाणें या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. ते दोन्हीं वेगवेगळे सिद्धांत आहेत. पहिली वृत्ति असहकारितेस विसंगत असून, दुसरी पूर्णपणें सुसंगत आहे.

## चळवळीचें धार्मिकत्व.

आतां आपल्या चळवळीच्या धार्मिकत्वाविपर्याच्या प्रतिपक्षाच्या टीकेचा विचार करूं. कोणत्याहि विशिष्ट धर्माची आज्ञा व आपल्या चळवळीचें धार्मिकत्व या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत. त्यांची सरमिसळ होणार नाहीं अशी दक्षता आपण बाळगली पाहिजे. कौन्सिलांची सुधारणा अगर नाश करण्यासाठीं त्यांत घुसणें हें कोणत्याहि धर्माच्या आड येत असल्याचें मला ठाऊक नाहीं. कौन्सिलांत जाऊं नये अशा प्रकारची आज्ञा कुराणांत नसल्याचें पुष्कळशा मुसलमानांचे तोंडून मी ऐकिलें आहे. उलटपक्षीं त्या बाबतींत थोडीशी अडचण येण्याचा संभव आहे असेंहि कांहीं मुसलमानांनीं मला सांगितलें आहे. परंतु, त्या (धर्माज्ञेचे) बाबतींत बोलण्याचा मला अधिकार नाहीं. उलेमांचे महाय्यानें खिलाफत परिषदेनेंच ह्या प्रश्नाचा निकाल लाविला पाहिजे. आतां उलेमाचेंच जर असें मत पडलें कीं, सध्यांच्या परिस्थितींत कौन्सिलांत घुसणें हें धर्माच्या दृष्टीनें उपमर्दकारक आहे, तर मात्र कांग्रेसनें त्यांच्या निकालास मान्यता देणें भाग आहे. कारण या देशांत स्वराज्यप्राप्तीचें कोणतेंहि कार्य हिंदूमुसलमानांच्या मनःपूर्वक सहकार्याशिवाय तडीस नेतां येणें अशक्य आहे. परंतु मी विशिष्ट धर्माज्ञेचा येथें विचार करीत नाहीं. जें कोणत्याहि विशिष्ट ध्येयाच्या अगर धर्माच्या आड येत नाहीं अशा धार्मिक तत्त्वाचा मी विचार करीत आहें. या धार्मिक तत्त्वाचे दृष्टीनें पाहतां स्वराज्यप्राप्तीच्या मार्गातील कांटे वाटेल त्या कायदेशीर उपायांनीं बाजूला मारण्याचा आम्ही प्रयत्न केल्यास त्यांत कोणत्याहि प्रकारची अडचण येईल, असें मला वाटत नाहीं. आम्ही बिलकुल न बिचकतां परदेशी कापडाच्या होळ्या केल्या. त्या वेळीं आमच्या चळवळीच्या धार्मिकत्वास कोठें धक्का बसला नाहीं. त्याच धार्मिकत्वास अनुसरून आपण आजहि वागलें पाहिजे. धर्मांचीं व नीतींचीं बंधनें बाजूला ठेवून स्वातंत्र्याची व स्वराज्याची प्राप्ति हाच धार्मिकत्वाचा पाया राखला पाहिजे. मुक्ततेनंतर थोडक्याच दिवसांनीं ‘ आपल्या सर्व राष्ट्रीय चळवळी सत्याच्या पायावर उभ्या असल्या पाहिजेत ’ अशा प्रकारचे उद्गार मी एका भाषणांत काढिले होते. त्या दिवसापासून नानाप्रकारचे प्रश्न मला विचारण्यांत येत आहेत. तुमच्या

सत्याची व्याख्या तरी काय, अशा तऱ्हेचा प्रश्न मला विचारण्यांत आलेला आहे. मला सत्य मांगण्याची छाती होत नाहीं म्हणूनच केवळ असत्यासाठीं मी त्या व्यापक शब्दाची योजना केली असाहि आरोप कित्येकजणांनीं माझ्यावर लादला आहे. परंतु अझूनहि मी असें जोरानें म्हणतों कीं, आमच्या राष्ट्रीय जीवनाचे निरनिराळे तुकडे कल्पितां येणें शक्य नसून त्याची उभारणी सत्याच्या पायावर होणेंच जरूर आहे. परस्परांशीं संबंध नसलेले असे राष्ट्रीय जीवनाचे तुकडे पाडण्याच्या राजकारणांत माझा विश्वास नाहीं. मी पुनः असें जाहीर रीतीनें मांगतों कीं. जीवनाची व्याख्या करितां येत नाहीं म्हणून सत्याचीहि व्याख्या करितां येणें शक्य नाहीं. तर्कानें बसविलेली व्याख्या ही सत्याची कसोटी नव्हे. सत्याची कसोटी ही आत्मज्ञान करून देण्याच्या सत्याच्या वरचढ शक्तींतच आहे. सत्य भासमान झालें कीं, सत्य तुम्हांला कळलें. ईश्वराची व्याख्या करितां येत नाहीं, त्याचप्रमाणें सत्याचीहि व्याख्या करितां येत नाहीं. कारण सत्य हें ईश्वराचें स्वरूप आहे. दोन हजार वर्षांपूर्वी एका कुटाळ न्यायाधिशानें अशाच प्रकारचा प्रश्न देवपुत्रास [ येशू ख्रिस्तास ] विचारिला होता. त्याचें उत्तर त्यानें तोंडच्या शब्दांनीं दिलें नाहीं. त्यानें आत्मयज्ञ केला व सत्याचें स्वरूप प्रगट झालें.

## सत्य काय आहे ?

मी धार्मिकत्वाविषयीं बोलतों त्यावेळीं त्या सत्याविषयीं बोलण्याचाच माझा हेतु असतो. इतिहासांत मला ईश्वराचेंच स्वरूप दिसतें. परस्परांच्या जीवनास मदत करणारी व्यक्ति, राष्ट्र व मनुष्यजाति यांत मनुष्यास ज्ञात होणारें ईश्वराचें दृश्य स्वरूपच मला दिसतें. स्वातंत्र्याची व स्वराज्याची प्राप्ति हाच एक व्यक्तीला व राष्ट्राला पूर्णत्वास पोंचविण्याचा मार्ग आहे अशी माझी समजूत आहे. सर्व राष्ट्रीय चळवळी हाच अखिल विश्वाच्या सेवेचा खरा पाया असून तेंहि ईश्वराचेंच दृश्य स्वरूप आहे. या दृष्टीनेंच मी राष्ट्रीय चळवळीकडे पहात असतों. देवपुत्र येशुख्रिस्तानें जगांत शांतीचा संदेश आणिला नाहीं. त्यानें जगांत तरवार आणली. त्यानें जगांत स्मशान-शांतता, अनीति किंवा बुद्धिभेद आणला नाहीं, तर एक घांव दोन तुकडे

करणारी सत्याची तरवार आपली. आपणांस अनीतीशीं झगडाव-याचें आहे. असें केलें तरच आपणांस स्वातंत्र्यप्राप्ति होईल. व्यक्तीच्या, राष्ट्राच्या अगर सर्वच मनुष्यजातीच्या मार्गांत कितीहि अडथळे येवोत, त्या व्यक्तीला आपलें स्वातंत्र्य पाहिजे असेल, त्या राष्ट्राला पूर्णतेस पोंचावयाचें असेल अगर अखिल राष्ट्रांस सर्वच मनुष्यजातींची उन्नति व्हावी असें वाटत असेल, तर त्या प्रत्येकानें ते सर्व अडथळे आपल्या मार्गांतून काढून टाकिलेच पाहिजेत. यालाच मी चळवळीचें धार्मिक स्वरूप असें समजतों. हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गांत जे जे म्हणून अडथळे येतील ते सर्व चोरटेपणानें नव्हे, तर उघड उघड, अत्यंत आदरपूर्वक, सत्याच्या व ईश्वराच्या नांवानें काढून टाकण्यास मी तयार आहें. धार्मिकत्वाचें हें ध्येय लक्षांत घेतां, मी सांगितलेले उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं कौन्सिलप्रवेश करणें हें सत्याचें कार्य पुढें ढकलण्यासाठीं अत्यंत जरूर आहे. या दृष्टीनेंच या वादांतील प्रत्येक मुद्याचा विचार होणें जरूर आहे.

## राजनिष्ठेच्या शपथेची अडचण.

कायदेभंग-चौकशी-कमिटींतील ज्या सभासदांनीं कौन्सिलप्रवेशास अनुकूल असे अभिप्राय दिले आहेत त्यांच्या मतें कॉंग्रेस–सभासदांनीं कौन्सिलांसाठीं उमेदवार उभे राहावें कीं नाहीं, एवढाच काय तो देशापुढें आज प्रश्न आहे. तेव्हां राजनिष्ठेची शपथ घ्यावी कीं नाहीं, कॉंग्रेसवाल्यांस कौन्सिलां-तून बहुमत मिळेल किंवा नाहीं इ० गोष्टींचा आज विचार करण्याची बिलकुल जरुरी नाहीं. शपथ घेण्याच्या बाबतींत आज मी एवढेंच सांगून ठेवितों कीं कोणत्याहि विशिष्ट धर्माचें मत बाजूस ठेविलें, तर या शपथेच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारची अडचण आपले मार्गांत येईल असें मला वाटत नाहीं. शपथ ही राजकीय संघटनेसंबंधींची असते. राजा हा संघटनेचा प्रतिनिधि म्हणून समजला जातो. अशाच प्रकारची शपथ घेऊनसुद्धां इंग्लंडच्या संघटनेंत मोठमोठे फेरफार झालेले आहेत. आतां या शपथेचा अर्थ तरी काय, याचा आपण विचार करूं. जे अशा प्रकारची शपथ घेतात त्यांजवर पुढील गोष्टी बंधनकारक होतातः–[ १ ] त्यांनीं सुधारणा कायद्यामुळें

न मिळालेल्या अधिकारांचा उपयोग करावयाचा नाहीं. आणि [ २ ] आपलें कर्तव्य प्रामाणिकपणें पार पाडावयाचें. पहिलें बंधन माझ्या सूचनेच्या आड बिलकुल येत नाहीं. दुसऱ्या बंधनाच्या बाबतींत मात्र प्रत्येक सभासदानें नोकरशाहीसंबंधींचें आपलें कर्तव्य इमानदारीनें पार पाडण्यासाठींच वरील प्रकारची शपथ घ्यावयाची असते अशा प्रकारचा खोटा अर्थ कित्येक लोक करीत आहेत, याची मला पूर्णपणें जाणीव आहे. मला या बाबतींत एवढेंच सांगावेंसें वाटतें कीं, वरील प्रकारचा अर्थ खरा मानण्यास लागणारा सनदशीर पुरावा कोठेंहि नाहीं. सुधारणा कायद्यामुळें मिळालेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून आपल्या मतदारसंघासंबंधींचें कर्तव्य पार पाडावयाचें एवढाच ह्या शपथेचा अर्थ आहे, असें मला वाटते. आणि म्हणून शपथेचे आड कोणती अडचण येते तेंच मला कळत नाहीं. परंतु हा प्रश्न मुळीं सध्यां उद्भवतच नाहीं.

कौन्सिलांत आमचें बहुमत निवडून येईल कीं नाहीं व तें निवडून आल्यास आमचें कोणतें धोरण राहील इ. नाना तऱ्हेचे प्रश्न आम्हांस विचारण्यांत येत आहेत. देशाची सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां कौन्सिलांतून असहकारितावाद्यांचें बहुमत निवडून येईल, असें मला वाटतें. मला मताधिकाराचे बाबतींत उत्पन्न झालेले अडथळे टाऊक आहेत; व आमच्यापैकीं कित्येकांना उमेदवारीसंबंधींच्या नियमांमुळें कौन्सिलांसाठीं उभें राहणें अशक्य झालें आहे, हीहि गोष्ट मी विसरलों नाहीं. परंतु एवढ्या सर्व अडचणी आमचे मार्गांत असल्या तरीसुद्धां आमचें बहुमत निवडून येईल अशी मला खात्री वाटते. परंतु हा प्रश्न देखील आज संभवत नाहीं. त्याचा १९२३ च्या कांग्रेसचे प्रसंगींच विचार करणें इष्ट होईल. त्या वेळीं निवडणुकी आटपून जात असल्याकारणानें ' हातच्या कांकणाला आरसा कशाला ?' या न्यायानें आमचे किती लोक निवडून येतील हें सांगण्याची जरुरी उरणार नाहीं; कारण आमच्या पक्षाचे किती लोक निवडून आले याचा त्या वेळींच जाहीर निर्णय होणार आहे.

आमचें बहुमत निवडून आल्यास पुढें आमचें धोरण कोणत्या प्रकारचें राहील ? या प्रश्नाचें उत्तर सरळ व स्पष्ट आहे. आम्हीं आपल्या जन्म-

सिद्ध हक्कांस मान्यता देऊन त्यांची प्राप्ति करून देणारी व आम्हांस पाहिजे त्या प्रकारची राज्यपद्धति अंमलांत आणणारी अशी एक संघटना तयार करून ती सरकारकडे आमची मागणी म्हणून पाठवून देणार. हाच आमच्या कौन्सिलांतील कार्याचा आरंभ. आमच्या मागण्या सरकारनें मान्य केल्या तर आमची लढाईहि तेथेंच थांबली असें समजावें. आम्हांस वाटेल त्या प्रकारचें सरकार स्थापन करण्याच्या आमच्या हक्कास तेणेंकरून सरकारची मान्यता मिळेल; व अशा प्रकारचें सरकार स्थापण्याचा योग्य त्या प्रकारें आरंभ करण्यांत आला कीं मग देशाचें संपूर्ण सत्ताधिकारित्व आम्हांला आज मिळो, पाच वर्षांनीं मिळो, अगर वीस वर्षांनीं मिळो त्याची आम्हांला फारशी फिकीर नाहीं. परंतु जर कां आमच्या मागण्यांची अंमलबजावणी होणार नाहीं, तर मात्र आम्ही नोकरशाहीशीं पक्की असहकारिता सुरू करणार; आणि कौन्सिल-मधील प्रत्येक ठरावास व कामास आम्ही एकजात विरोध करणार. आम्हीं सबंध अंदाजपत्रक फेटाळून लावूं. त्यास बिलकुल संमति देणार नाहीं. शक्य तितक्या प्रसंगीं आम्हीं कौन्सिलची बैठक तहकूब करून लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करूं. व जें जें बिल सरकार पुढें मांडील त्यास सरांस विरोध करून तें हाणून पाडूं. आम्हीं अशाच प्रकारचें वर्तन कौन्सि-लांत ठेवूं कीं ज्यामुळें सरकारला आमच्या मागण्या कबूल करणें भाग पडेल. आमच्या मागण्या मान्य होईपर्यंत कौन्सिलचें कोणतेंहि काम आम्ही करणार नाहीं. सुधारणा कायद्यान्वयें वाटेल तो ठराव पास करून घेण्याचा ‘ सर्टि-फिकेशन’चा अधिकार अखिल गव्हर्नरांस मिळालेला आहे याची जाणीव मला आहे. परंतु, सर्टिफिकेशनच्या अधिकाराचा एकसारखा उपयोग करून चालणारें सरकार हें ‘व्हेटो’च्या अधिकाराच्या सहाय्यानें चालणाऱ्या सरकारा-इतकेंच अशक्य आहे. ह्या अधिकाराचा कांहीं थोड्या प्रसंगींच सरकारला उपयोग करितां येईल. परंतु थोडक्याच अवकाशांत नोकरशाहीला शरण यावें लागेल किंवा सुधारणा परत तरी घ्याव्या लागतील. कांहींहि झालें तरी त्यांत आमच्या राष्ट्राचा विजयच आहे. नोकरशाही शरण आली किंवा तिनें सुधारणा कायदा परत घेतला–दोहोंपैकीं कांहींहि झालें, तरी त्यामुळें आमचें ध्येय अधिक जवळ येणार आहे.

आणखी एक असा प्रश्न विचारण्यांत येतो कीं–समजा, आम्ही सुधारलेल्या कौन्सिलांचा नायनाट करूं शकलों, तर पुढें काय होणार ? आजपर्यंत ज्या काँग्रेसनें अनेक संस्था मोडून धुळीस मिळविण्याचें ठरविलें त्या काँग्रेसला देखील सदर संस्था धुळीस मिळविण्याचे बाबतींत अशाच प्रकारचा प्रश्न विचारतां येणार नाहीं काय ? काँग्रेसच्या प्रत्येक बहिष्काराबद्दल आम्हांला असा प्रश्न विचारतां येईल. समजा, शिक्षण खातें नष्ट करण्याचे आमचे प्रयत्न यशस्वी झाले, तर पुढें काय ? असा प्रश्न आम्हांला कोणी विचारल्यास त्याचें आम्ही काय उत्तर देऊं बरें ? आम्ही कायदेकोर्टें ओस पाडूं शकलों तर तोच प्रश्न आम्हांस कोणी विचारणार नाहीं काय ? आणि कोणी असा प्रश्न विचारल्यास तें कधीं तरी चुकीचें ठरेल काय ? वस्तुस्थिति अशी आहे कीं, केवळ विनाशानें स्वराज्य मिळणें कधींहि शक्य नाहीं. परंतु त्याबरोबरच विनाशाशिवाय विधायक कामगिरी पार पडणें शक्य नाहीं, हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. एकट्या ह्या चळवळीमुळें अगर त्या चळवळीमुळें स्वराज्य मिळणें कदापि शक्य नाहीं, ही गोष्ट आम्ही विसरतां कामा नये. आमच्या विनाशात्मक व रचनात्मक अशा दोन्ही प्रकारच्या अंगांस ज्यांत स्थान आहे, अशा प्रकारच्या संपूर्ण राष्ट्रीय चळवळीमुळेंच आम्हांस आमचें स्वराज्य मिळेल. एरव्हीं मिळणार नाहीं. सध्यांचीं सुधारलेलीं कौन्सिलें धुळीस मिळविण्याचे कामीं आम्हांस यश मिळालें, तर लगेच सबंध देशांत चैतन्य उत्पन्न झालेलें आपणांस आढळून येईल. मग वाटेल तेवढे अडथळे सरकार आमच्या मार्गांत उत्पन्न करो; दुप्पट जोरानें व निश्चयानें आम्हीं ते दूर करूं. आणखी अशी एक शंका घेण्यांत येते कीं, नोकरशाही कौन्सिलांमध्यें असहकारितावाद्यांचा शिरकाव केव्हांहि होऊं देणार नाहीं. असहकारितावादी लोकांचा शिरकाव कौन्सिलांत होणार नाहीं अशा प्रकारचे फेरफार ती आपल्या नियमांत करील. नोकरशाहीनें अशा प्रकारचें धोरण स्वीकारिलें तर त्याच्याइतका जोम दुसऱ्या कशानेंहि आमच्या चळवळीस प्राप्त होणार नाहीं. अशा प्रकारचा एखादा नियम नोकरशाहीनें केला तर मी त्याचें मनःपूर्वक स्वागत करीन व पुनः आपल्या चळवळीची दिशा बदलीन, हिंदुस्थानसारख्या बालराष्ट्राची प्रगति व वाढ व्हावयाची असेल तर

आपली चळवळ आपण अव्याहत चालविली पाहिजे. आपल्या देशांत अनत्याचारी बंडाचा प्रादुर्भाव झाला असून जसजशी परिस्थिति बदलेल तसतशी आम्हीं आपल्या चळवळीची दिशा बदलणें भाग आहे व त्याप्रमाणें आम्ही ती बदलूं ही गोष्ट कोणीहि विसरतां कामा नये. आज कौन्सिलांचा दरवाजा खुला आहे म्हणून आम्ही त्यावर हल्ला करण्याचें ठरविलें आहे. उद्यां तो बंद झाला तर परिस्थितीस योग्य असा दुसरा मार्ग आम्ही शोधून काढूं. जोराचा पाऊस पडूं लागला कीं आम्हीं काय करितों ? लगेच छत्री उघडून आम्हीं त्याला तोंड देतों. अगदीं हेंच उदाहरण डोळ्यासमोर ठेवून आमच्या राष्ट्रीय जीवनाच्या परिपूर्त्यर्थ जेव्हां जेव्हां आमच्या चळवळीची दिशा बदलणें जरूर पडेल, तेव्हां तेव्हां आम्ही ती बदलली पाहिजे.

## कौन्सिलांची आजपर्यंतची कामगिरी.

कौन्सिलांची गेल्या दोन वर्षांची कामगिरी न्याहाळून पाहतां असहकारितावाद्यांना कौन्सिलांत घुसल्यावांचून गत्यंतर नाहीं, असेंच आपणांस आढळून येईल. सध्यांच्या सुधारलेल्या कौन्सिलांमुळें नोकरशाहीचें बळ द्विगुणित झालें असून ज्या लोकांचा त्यांत सध्यां प्रवेश झाला आहे त्यांनीं साधारणतः नोकरशाहीच्या हाताला हात लावून तिचेच कार्यास मदत केली आहे. करांची वाढ तर बेसुमार झाली आहे, इकडेहि आपलें लक्ष वेधणें अत्यंत जरूर आहे. महायुद्ध १९१४ सालीं सुरू झालें. तत्पूर्वीच्या सालापासून म्हणजे १९१३-१४ पासून हिंदुस्थानसरकारच्या खर्चाचें ओझें प्रचंड फुगलें आहे. १९१३-१४ सालीं हिंदुस्थानसरकारचा सर्वंध खर्च ७९ कोटि ३७ लक्षांइतका झाला; तोच १९१९-२० सालीं १३८ कोटींपर्यंत व सुधारणा कायदा प्रथम अंमलांत आला त्या वर्षीं म्हणजे १९२०-२१ सालीं १४९ कोटींपर्यंत चढला. यंदाचा खर्च तर यापेक्षांहि बेसुमार फुगेल असा अंदाज आहे. वर्षांवर्षीं खर्चांत जी वाढ होत गेली तिची भरपाई करण्यासाठीं १९१६-१७, १९१७-१८, १९१९-२०, १९२१-२२ व १९२२-२३ या सालीं हिंदुस्थानच्या रयतेवर नवीन कर बसविण्यांत आले. येत्या वर्षींहि आणखी जादा कर बसविण्याच्या सूचना पुढें येतील असा

अंदाज आहे. गल्या नऊ वर्षांपैकीं सात वर्षे आमच्यावर नवीन नवीन जादा कर बसविण्यांत आले. तरीसुद्धां ह्या बहुतेक वर्षी आमच्या कपाळींची जमाखर्चाची तूट कांहीं चुकलेली नाहीं.

सध्यां सांपत्तिकदृष्ट्या आमची जी हलाखीची स्थिति झाली आहे तिचें खापर मुख्यतः लष्करी खर्चाच्या बेसुमार वाढीवरच फोडिलें पाहिजे. १९१३–१४ सालीं या खात्याचा खर्च जवळजवळ ३१॥ कोट रुपये झाला; व महायुद्धाच्या परिसमाप्तीनंतर मग १९१९-२० सालीं तो ८७॥ कोटीं-पर्यंत आणि १९२०-२१ सालीं ८८॥ कोटींपर्यंत चढला. मर विश्वेश्वरय्या यांनीं म्हटल्याप्रमाणें "मुलकी राज्यकारभार" खात्याच्या खर्चांतहि काय-मची वाढ झाली आहे. सुधारणा योजनेंतील एक उपयोजना म्हणूनच कीं काय, इंडियन सिव्हिल सर्व्हिस. एज्युकेशनल सर्व्हिस, मेडिकल सर्व्हिस इ. इंग्लंडांत उमेदवार-भरती होणाऱ्या सर्व खात्यांतील गोऱ्या नोकरांचे पगार ओझ्यांनीं वाढले आहेत आणि कनिष्ठ दर्जाच्या हिंदी नोकरांचे बाबतींत थो-डासा न्याय दाखवावा म्हणून त्यांचेहि पगारांत थोडीशी वाढ केलेली आहे.

निरनिराळ्या प्रांतांची सांपत्तिक स्थितीहि कांहीं फारशी बरी नाहीं. सुधारणायोजनेमुळें अस्तित्वांत आलेल्या नवीन सांपत्तिक योजनेमुळें सर्व प्रांतांस मिळून एकंदर २१ कोट रुपयांचा जादा चट्टा बसला आहे. या-शिवाय १९२०-२१ सालीं निरनिराळ्या प्रांतांजवळ मिळून एकंदर २१ कोटि ६८ लक्ष रुपये शिल्लक होते. परंतु गल्या दोन वर्षांत निरनिराळ्या प्रांतिक सरकारांचा खर्च देखील इतका प्रचंड वाढला आहे कीं, ज्या प्रांतांना आपण बरीचशी बचत करूं शकूं असें वाटत होतें ते देखील आज दिवाळखोरीच्या पंथास लागले आहेत. सुधारणांच्या पहिल्याच वर्षी बहुतेक प्रांतांच्या जमाखर्चांत तूट आली परंतु जुनी शिल्लक होती तिचे जोरावर त्यांस कशीबशी निरवानिरव करितां आली. चालू सालीं बहुतेक प्रांतांची सांपत्तिक स्थिति फारच कष्टप्रद झाली आहे. ब्रह्मदेशच्या अंदाजपत्रकांत १ कोटि ९० लाखांची तूट दाखविण्यांत आली असून, पंजाब, बिहार ओरिसा, मद्रास, संयुक्तप्रांत व मध्यप्रांत—या प्रांतांचे अंदाजपत्रकांत अन-

क्रमें १ कोट ३० लाख, ५१ लाख, ४१ लाख, २७ लाख व ३७ लाख इतकी तूट येणार आहे. मद्राससरकारच्या जमाखर्चांत याच्याहिपेक्षां जास्त तूट आली असती; परंतु त्या सरकारनें ७७॥ लाखांचे नवीन कर बसवून आपलें उत्पन्न वाढविल्यामुळें सध्यांइतकीच तूट आली आहे. प्रांतिक सरकारकडून मध्यवर्ती सरकारकडे द्यावयाची खंडणी माफ झाल्यामुळें व नवीन करांपासून एकंदर १ कोट ४० लाख रुपयांचें उत्पन्न होण्याची आशा असल्यामुळें बंगालसरकारनें मात्र आपल्या जमाखर्चांत शिल्लक दाखविली आहे. परंतु बंगालसरकारची ही आशा फलद्रूप होईल कीं नाहीं याविषयीं बराच संशय असून पुढील वर्षीं पुनः नवीन कर बसविले जाणार अशा प्रकारचीं लक्षणें आज दिसत आहेत. आसामनें नवीन कर बसवून सुद्धां १४॥ लाखांची तूट आपल्या अंदाजपत्रकांत दाखविली आहे. पंजाब, बिहार–ओरिसा, मध्यप्रांत व आसाम या प्रांतांत नवीन कर बसविण्याची वाटाघाट चालू आहे. संयुक्तप्रांतांत करवाढीचे ठराव सरकारनें पुढें मांडले; परंतु कौन्सिलनें ते फेटाळून लाविले.

## देशबांधवांस इषारा.

सुधारलेल्या कौन्सिलांचा दुष्ट हेतु साध्य होऊं देऊं नका, अशा प्रकारचा इषारा मी आपल्या देशबांधवांस देऊं इच्छितों. यापुढें जादा करांची वाढ होणार याविषयीं मला बिलकूल संशय वाटत नसून, अशीच परिस्थिति आपण पुढें चालू दिली तर आज लोक जे आपल्या पाठीशीं आहेत ते एकदम आपल्या विरुद्ध होतील व अशा रीतीनें त्यांच्या सहकार्यास आपण मुकूं. नोकरशाही आमच्या मागण्या धुडकावून लावणार असेल तर आपणहि त्यांचीं कौन्सिलें मोडून तोडून धुळीस मिळवूं या! नवीन कर बसविण्यांत आले–आणि ते बसणार याविषयीं बिलकुल शंका नाहीं–तर त्याची सर्व जबाबदारी नोकरशाहीवर राहूं द्या; आणि नंतर तुम्ही–मी व लोक एकजुटीनें आपल्या सत्ताधाऱ्यांशीं लढाई चालवूं या!

## देशांतील मजुरांचें संघटन.

कांग्रेसनें आतां मजुरांच्या व शेतकऱ्यांच्या संघटनाचें काम हातीं घ्यावें, असें मला वाटतें. मजुर–संघटनाच्या बाबतींत नागपूर–कॉंग्रेसनें एक

ठराव पास केला आहे; परंतु आजपर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. आपण मजुरांचा कांग्रेसच्या कार्यासाठीं उपयोग केला तर आपल्या असहकारितेच्या चळवळीस धक्का पोंचेल, अशा प्रकारची भीति कित्येक कांग्रेस-सभासदांस वाटत आहे. परंतु त्यांच्या म्हणण्याचा अर्थ मला समजत नाहीं ही गोष्ट प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. ' उपयोग ' ( एक्स्प्लॉयटेशन ) या शब्दाला आजकाल फारच हिडीस स्वरूप प्राप्त झालें आहे. आणि वरील प्रकारची भीति बाळगणारे लोक, मजुरांचा व शेतकऱ्यांचा आमच्या स्वराज्याच्या चळवळीस पाठिंबा नाहीं अशा प्रकारची भलतीच समजूत करून घेत आहेत असें त्यांच्या म्हणण्यावरून दिसतें. आमच्या पाठीशीं मजूर व शेतकरीवर्ग उभा नाहीं ही गोष्ट मी नाकबूल करितों. आज मध्यमवर्ग व सुशिक्षित वर्ग यांचेपेक्षांहि हिंदुस्थानांतील मजूर व शेतकरी वर्गासच स्वराज्यप्राप्तीबद्दल अधिक कळकळ वाटत आहे, अशी अनुभवावरून माझी पक्की खात्री झालेली आहे. आज जर आम्ही कोंवळ्या कोंवळ्या मुलांचा व कॉलेज-विद्यार्थ्यांचा उपयोग ( एक्स्प्लॉयटेशन ) करीत आहोंत, आज जर आम्ही देशांतील स्त्रियांचा आमचे कार्यासाठीं उपयोग करीत आहोंत, आज जर आम्ही धर्म, जात, धंदा वगैरेंचा विचार न करितां सर्व मध्यमवर्गाचा उपयोग करीत आहोंत, तर मग या उकळाउकळींतून व ' एक्स्प्लायटेशन ' च्या तडाक्यांतून मजूर व शेतकरीवर्गासच तेवढें आम्ही काय म्हणून वगळावें ? बहुधा या प्रश्नाचें उत्तर असें मिळेल कीं त्यांनीं पाहिजे तर कांग्रेसचें सभासद व्हावें; परंतु त्यांचेसाठीं स्वतंत्र संघटन होतां कामा नये ! त्यावर माझें असें म्हणणें आहे कीं, मजुरांचे हितसंबंध वेगळे असून परदेशी भांडवलवाल्यांच्या जुलमाखालीं ते एकसारखे भरडले जात आहेत. आणि हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांचा, नोकरशाहीची सदैव थुंकी झेलणाऱ्या एका विशिष्ट वर्गाकडून चुराडा होत आहे. तर मग अशा परिस्थितींत असल्या प्रकारचे वेगळे हितसंबंध असणाऱ्या लोकांचें संघटन केल्यास तें राष्ट्रीयत्वास यत्किंचित तरी विघातक होईल काय ? गरिबांच्या भाकरीची सोय पाहणें, विशिष्ट व्यापारांत अगर धंद्यांत पडलेल्या लोकांचे बाबतींत

न्याय मिळवून देणें—या सर्व गोष्टी स्वराज्यप्राप्तीच्या कार्यास कोणत्याहि प्रकारें विघातक अगर विसंगत आहेत काय ? ज्या ज्या गोष्टींमुळें राष्ट्रीय चळवळीस जोमदारपणा प्राप्त होणार असेल, ज्या ज्या गोष्टींमुळें देशांतील जनसमूहास पाठिंबा मिळणार असेल, त्या त्या गोष्टी स्वराज्याच्या चळवळीपासून बिलकुल भिन्न नाहींत. स्वराज्याचे बाबतींत कॉंग्रेसच्या इतर कार्यांची जितकी किंमत, तितकीच या गोष्टींचीहि किंमत आहे; आणि म्हणून कॉंग्रेसनें बिलकुल विलंब न लावितां देशांतील मजुरांस व शेतकऱ्यांस सुसंघटित करण्यासाठीं एक जोमदार व कार्यक्षम कमिटी नेमावी असा माझा कॉंग्रेसला सल्ला आहे. आजपर्यंत आपण या विषयाची फारच अवहेलना केली आहे. या बाबतींत कॉंग्रेस आपलें कर्तव्य बजावण्यास चुकेल तर मात्र आमच्यापासून स्वतंत्र असे मजूर व शेतकरीसंघ लौकरच देशांत अस्तित्वांत येतील. त्यांचा आपल्या स्वराज्य-कार्याशीं बिलकुल संबंध राहणार नाहीं व आपल्या शांतिमय धंद्याचे कार्यक्षेत्रांत वर्गावर्गांतील भांडणतंटे व विशेष हितसंबंध असलेल्या लोकांच्या दंडुकेशाहीचा नाहक प्रवेश होईल. अशा प्रकारच्या लज्जास्पद गोष्टी टाळण्याचा कॉंग्रेसचा इरादा असेल तर मजुरांचा व शेतकऱ्यांचा प्रश्न आपण आपले हातीं घेऊन त्यांच्या विशेष हितसंबंधांसाठीं योग्य अशा प्रकारचें संघटन आपण त्यांस तयार करून दिलें पाहिजे ! स्वराज्याच्या उच्च ध्येयाच्या दृष्टीनें त्यांच्या विशेष हितसंबंधांचें संरक्षण होणें व या हितसंबंधांचा स्वराज्याच्या उच्चतम ध्येयासाठीं उपयोग होणें अत्यंत इष्ट आहे. सध्यांच्या परिस्थितींत सुद्धां आपण मजुरांच्या व शेतकऱ्यांच्या स्वार्थबुद्धीचा उपयोग केला पाहिजे. कारण त्यांचा स्वार्थ साधूं शकला तर त्याचाहि आपल्या राष्ट्रीय संसारास बराच उपयोग होणार आहे.

## आगाऊ हातीं घेतलेलें कार्य.

आतां आधींच कांग्रेसनें जें कार्य हातीं घेतलें आहे त्याचा विचार करूं. कांग्रेसनें आज जीं जीं कामें हातीं घेतलीं आहेत त्यांपैकीं कोणतेंहि काम तिनें शरणागति पत्करून सोडून द्यावें, अशी माझी इच्छा नाहीं, ही गोष्ट मी प्रथम आपल्या निदर्शनास आणूं इच्छितों. मी ज्याप्रकारें कांग्रे-

सच्या चळवळीची दिशा बदलावी असें म्हणतों किंवा इतर बाबतींत मी जे व्यवहार्य फेरफार सुचविले आहेत त्यामुळें कांग्रेसनें शरणागति पत्करून आपल्या कार्यक्रमांतील कोणत्याहि कलमास कायमचा हरताळ फांसावा असें मी म्हणत नाहीं. कांग्रेसनें फक्त नवीन चळवळी व धोरणें आपल्या कार्यक्रमास जोडावीं एवढीच माझी इच्छा आहे.

## शाळा-कॉलेजांवरील बहिष्कार.

माझें असें मत आहे कीं, शाळाकॉलेजांवरील बहिष्कार पूर्वीइतक्याच परिणामकारक रीतीनें अंमलांत आणावा. सरकारी शाळाकॉलेजांतून मुलांना बाहेर काढून तीं ओस पाडण्याच्या विरुद्ध कायदेभंग चौकशी कमिटीनें जी सूचना केलेली आहे ती मला संमत नाहीं. हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे, असें मला वाटतें. देशांतील तरुणांच्या जिवावरच स्वराज्यकार्य बरेंचसें अवलंबून आहे. असें असतांना जें राष्ट्र गुलामगिरीचा व परकीय संस्कृतीचा शिक्का मिळविण्यासाठीं आपल्या मुलांना व तरुणांना राजीखुषीनें व जाणूनबुजून सरकारी शाळाकॉलेजांत पाठवितें-त्या राष्ट्रास उत्कर्षाची थोडीतरी आशा आहे काय ? या विषयाचा चालू प्रसंगीं अधिक बारकाईनें विचार करण्याची माझी इच्छा नाहीं. कारण पूर्वी अनेकवेळां यासंबंधींच मी आपले विचार जाहीर केले आहेत. तथापि, राष्ट्रीय शाळाकॉलेजें स्थापन करावीं ही कायदेभंग चौकशी-कमिटीनें केलेली शिफारस मला मान्य आहे.

## वकिलांचा व कोर्टांचा बहिष्कार.

वकिलांच्या व कोर्टांच्या बहिष्काराचे बाबतींतमुद्धां कमिटीनें केलेल्या प्रमुख शिफारसी मला मान्य आहेत. खटल्यांमध्यें बचाव [ डिफेन्स ] करण्याचा अधिकार कांग्रेसभक्तांस असावा कीं नाहीं व असल्यास त्याचा कोणत्या प्रसंगीं व कोणत्या हेतूनें उपयोग करावा-इत्यादि अनेक तऱ्हेचे प्रश्न विचारण्यांत येतात. मला अव्यवहार्य नियम करण्याची कांहीं आवड नाहीं. कारण निरनिराळ्या परिस्थितींस लागू पडणारे असे व्यापक नियम

तयार करितां येणें अशक्य आहे, असें मला वाटतें. कोर्टबहिष्कारावरील आपलें लक्ष आपण ढळूं देतां कामा नये, एवढाच फक्त माझा आग्रह आहे.

## हिंदुमुसलमानांचें ऐक्य.

हिंदुमुसलमानांचें ऐक्य, अस्पृश्यता-वगैरे बाबतींत चौकशी कमिटीनें केलेल्या शिफारसी मला मान्य आहेत. तथापि, एकीचे बाबतींत मला एवढेंच सांगावेंसें वाटतें कीं, हिंदी राष्ट्रांतील निरनिराळ्या जाती परस्परांशीं सहकार्य करितील व परस्परांचे हक्क मान्य करितील तरच त्यांजमध्यें खरें ऐक्य होऊं शकेल. आणि म्हणून देशांतील निरनिराळ्या जातींच्या हक्कांबद्दलचे करारमदार झाले पाहिजेत अशी माझी सूचना आहे. आम्ही अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या लोकांशीं वरिष्ठत्वाच्या नात्यानें वागलों तर त्यापासून काडीचाहि फायदा व्हावयाचा नाहीं. आपल्या कार्यांत आपण त्यांची योजना केली पाहिजे; व त्यांच्या खांद्याशी खांदा लावून तें पार पाडिलें पाहिजे.

## खादी.

आतां मी खादीकडे वळतों. खादीचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. मी पूर्वीच जाहीर केल्याप्रमाणें व्यापारी तत्त्वावर खादीची निपज करण्याच्या मी विरुद्ध आहें. ३१ मार्च १९२१ सालीं महात्माजींनीं बेझवाड्यास ऑ. इं. कमिटीपुढें मांडलेल्या ठरावास दुजोरा देतांना इतर गोष्टींबरोबर याही गोष्टीचा मी उल्लेख केलेला होता. लोकांना चरख्याचा उपयोग करावयास सांगण्यांत हिंदुस्थानांतील अगर बाहेरच्या परदेशी भांडवलवाल्यांनीं उत्पन्न केलेल्या मालास टक्कर देण्याचा आमचा हेतु नव्हता. आमचा इरादा असा आहे कीं, लोकांनीं आपल्या आर्थिक जीवनास स्वतंत्र स्वरूप द्यावें व फावल्या वेळीं त्यांच्या कुटुंबातील सर्व माणसांनीं आपणांस पुरेसा अधिक स्वस्त असा माल तयार करावा व अशा रीतीनें आपली स्थिति सुधारावी. आमच्या देशांतील लोक स्वावलंबी व अल्पसंतुष्ट व्हावे, एवढाच आमचा खादीप्रसार करण्यांत उद्देश आहे. हें काम कठीण आहे खरें; पण तें हितप्रद आहे. आणि म्हणून आपली सबंध शक्ति खर्च

करून आपण तें अंमलांत आणिलें पाहिजे. मोठ्या प्रमाणावर खादीचे कारखाने उघडण्यापेक्षां देशांतील थोडींशीं कुटुंबें स्वावलंबी झालीं तर त्यापासून मला अधिक समाधान होईल. कारखाने काढणें हें अदूरदर्शीपणाचें धोरण आहे. आणि तात्पुरतें जरी तें समाधानकारक वाटलें तरी पुढें त्यापासून फारच भयंकर असें संकट ओढवेल. हिंदुस्थानांत मँचिस्टर निर्माण करण्याच्या सूचनेस माझा विरोध आहे. विलायती मँचिस्टरचा आम्हांस अनुभव आला तेवढा बस्स आहे. अशा प्रकारचें हिंदी मँचिस्टर टाळणें शक्य असेल तर तें आम्हा टाळलें पाहिजे.

आम्हांला खादीनेंच फक्त स्वराज्य मिळेल असें वारंवार म्हणण्यांत येतें. खादीनें स्वराज्य मिळणें कसें शक्य आहे, हें माझे देशबांधव मला सांगतील काय? फक्त एकाच दृष्टीनें वरील विधान सत्य ठरण्याचा संभव आहे. खादी हेंच स्वराज्याचें चिन्ह आहे असें आपण समजलें पाहिजे. खादीमुळें बरेचसे लोक स्वावलंबी होऊं शकतात; म्हणून खादीच्या प्रसारामुळें सबंध राष्ट्र स्वावलंबी व स्वतंत्र होऊं शकेल अशी आशा कांग्रेसला वाटते, एवढाच या खादीच्या चिन्हाचा अर्थ आहे. माझ्या मतें अशा प्रकारच्या चिन्हाची पूजा करावयाची असेल, तर शक्य तितक्या दिशांनी असहकारितेच्या चळवळीचा प्रसार होणें जरूर आहे. असें केलें तरच स्वराज्य आपणांस त्वरित मिळणें शक्य आहे.

## उपसंहार.

आतां फक्त आशेचा व आत्मविश्वासाचा शेवटचा संदेश सांगण्याचें काम उरलें आहे. स्वातंत्र्याचा मार्ग निष्कंटक नाहीं. अंधारांतून कांटे तुडवीतच आपणांस स्वातंत्र्याचा पल्ला गांठला पाहिजे. परंतु तुमचें धैर्य व निश्चय अढळ असल्याकारणानें कधीं कधीं फारच भयंकर अशी पिच्छेहाट झाली तरीसुद्धां त्यामुळें तुमचा कार्यविनाश न होतां उलट द्रुतगतीनें तुम्ही परकीय सरकारच्या पाशांतून मुक्त व्हाल. तात्पुरत्या परिणामाला विजय म्हणूं नका. तात्पुरता परिणाम हा फक्त आभास आहे. आणि आभास हे नेहेमी खोटे ठरतात. आमच्या चळवळीचा दृश्य परिणाम

जरी वेताचा असला, तरी अखेरीस आम्हांस खास विजय मिळणार, हें मी आपणांस बजावून सांगतों. आमची चळवळ चिरडून टाकण्यासाठीं नोकरशाहीनें आजपर्यंत जे जे प्रयत्न केले व अझूनहि ती करीत आहे, त्या प्रयत्नांमुळें आम्हींच अंतीं यशस्वी होणार असें सिद्ध झालें आहे. आमची चळवळ दडपून टाकण्यासाठीं नोकरशाहीनें अतिशय जुलमी असे दडपशाहीचे कायदे रद्द करण्याचें नाकारिलें, अंमलबजावणी खात्याच्या जुलमी व एकतंत्री अधिकारांचा दुरुपयोग करण्यांत आला आणि नोकरशाहीच्या रागाचा बळी म्हणून आमच्या आवडत्या पुढाऱ्यांस तुरुंगांत खेंचण्यांत आलें. या सर्व गोष्टींमुळें अखेरीस विजयदेवता आमचेच गळ्यांत माळ घालणार हें निश्चित ठरलें असलें, तरी त्याची सर्व मदार तुमच्यावर व तुम्ही विरुद्धपक्षास किती निकरानें तोंड देतां त्यावर अवलंबून आहे. यहुदी व फारशी लोकांनीं कायद्याचा व शिस्तीचा बेसुमार उपयोग केला. त्यामुळें येशू ख्रिस्ताला आत्मबलिदान करावें लागलें. तुम्हांला नोकरशाहीस तोंड द्यावयाचें आहे; आधुनिक यहुद्यांस व फारशांसहि तोंड द्यावयाचें आहे. नोकरशाहीचें व तिच्या अखिल वैभवाचें संरक्षण करावयाचें हाच आजकालच्या यहुद्यांचा व फारशांचा उद्देश आहे. सत्यासाठीं व न्यायासाठीं आत्मबलिदान करण्याची संधि तुम्हांस प्राप्त होवो असें मी इच्छितों. कारण मग तुमच्या मुलांना व नातवंडांना तुमच्या तपश्चर्येचें फळ प्राप्त होईल. धार्मिक स्वरूपाचें युद्ध पुकारण्याची ताकद तुम्हांला प्राप्त होवो असें मी इच्छितों. कारण तसें केल्यामुळें विजयप्राप्तीनंतर तुमची नीतिमत्ता भ्रष्ट होणार नाहीं व स्वतःच्या हातांत सरकारी सत्तासूत्रें राखण्याचा मोहहि तुम्हांस होणार नाहीं. तुम्हांला धार्मिक युद्ध लढावयाचें असेल तर तुमचीं हत्यारेंहि धार्मिक योद्ध्यास साजेशींच असलीं पाहिजेत. तुम्ही क्रोधाविष्ट होतां कामा नये; किंवा कोणाचा द्वेष करण्याचीहि तुम्हांला परवानगी नाहीं. मनाची क्षुद्रता, नीचपणा किंवा असत्य यांचा तुम्ही त्याग केला पाहिजे. उपःकालची आशा व प्रभातकालचा विश्वास हीच तुमची संपत्ति आहे. एका ग्रीक गोष्टींत शृंखलाबद्ध टिटॅनसंबंधीं गाइलेलें पुढील गाणें हाच तुमचा आसरा आहेः—

To suffer woes which Hope thinks infinite;
To forgive wrongs darker than death or night;
To defy Power; which seems omnipotent;
To love and bear; to hope till Hope creates
From its own wreck the thing it contemplates;
Neither to change, nor falter, nor repent;
This like the glory, Titan is to be;
Good, great and joyous, beautiful and free;
This is alone Life; Joy, Empire and Victory.

(डिसेंबर १९२२.) वंदेमातरम्.

---

## ७—अध्यक्षपदाचा राजीनामा.

गया कांग्रेसनें एकतर्फी ठराव पास केल्यामुळें देशबंधु दास यांनीं ता. १ जानेवारी १९२३ रोजीं भरलेल्या ऑ. इं. कांग्रेस कमिटीच्या बैठकींत कमिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याचें जाहीर केलें. राजीनामा देतांना ते म्हणाले:—

" विषयनियामक कमिटींत ज्या ज्या ठरावांवर चर्चा झाली ते व यंदांच्या कांग्रेसनें जे जे ठराव पास केले ते पाहतां तत्त्वतःच परस्परांशीं भिन्न असे दोन पक्ष कांग्रेसमध्यें निर्माण झाले असल्याबद्दल माझी खात्री झाली आहे. या मतभेदांबद्दल मला बिलकुल वाईट वाटत नाहीं. कारण कोणत्याहि मजबूत संस्थेंत मतभेद हे असलेच पाहिजेत. गेल्या दोन वर्षांच्या अनुभवाचें निदान निरनिराळ्या प्रकृतीच्या माणसांनीं निरनिराळें करावें व तें परस्परविरोधी ठरावें हें साहजिकच आहे. सध्यांच्या मतभेदामुळें आमचें राष्ट्रीय जीवन अधिक बळकट झालें आहे. कांग्रेसमधील परस्परविरोधी

पक्षांच्या चळवळीची दिशा जरी वेगवेगळी असली तरी सुद्धा दोघांहि पक्षांनीं कांग्रेसच्या कक्षेंत राहूनच आपापली चळवळ वेगवेगळी चालू ठेवण्यास कोणत्याहि प्रकारची हरकत नाहीं. म्हणून माझ्याशीं सहमत असणाऱ्या माझ्या मित्रांबरोबरच माझ्या मताप्रमाणें काम करणें मला भाग आहे. गयाकांग्रेसमध्यें जे जे ठराव पास झाले ते मला मान्य नसल्याकारणानें व त्या ठरावांशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणें मला अशक्य असल्याकारणानें, कांग्रेसमध्यें राहूनच निराळ्या मार्गांनीं काम केल्याशिवाय मला गत्यंतर नाहीं! माझ्यापुढें दोन मार्ग मोकळे आहेत—[ १ ] मला राजकारणांतून अजिबात अंग तरी काढून घेतलें पाहिजे; किंवा [ २ ] राजकारण करावयाचेंच असेल तर कांग्रेसमध्यें राहून निराळा पक्ष तरी काढिला पाहिजे! स्वातंत्र्याच्या युद्धांतून अजिबात अंग काढून घेण्याची [ रिटायर होण्याची ] माझी इच्छा नाहीं. मला तसें करितां येणार नाहीं! कारण मी आपलें सबंध आयुष्य स्वराज्य–देवतेच्या चरणीं अर्पण केलें आहे! पुष्कळ वर्षांपासून मी ह्या स्वराज्याच्या लढ्यांत पडलेला असून मरेपर्यंत या लढ्यांत पडून असावें अशी माझी मनीषा आहे. आणि म्हणूनच माझा कार्यक्रम पसंत असणाऱ्या कांग्रेसभक्तांबरोबर स्वतंत्र चळवळ चालविणें मला क्रमप्राप्त आहे! अर्थात बहुमतवाल्यांना आपल्या मताप्रमाणें वागण्याचा हक्क आहे, हीहि गोष्ट मला अमान्य नाहीं. त्यांचा कार्यक्रम मनोभावें अंमलांत आणणारे लोकच त्यांनीं आपल्या कार्यकारी मंडळांत व अधिकारपदांवर नेमणें जरूर आहे. तसें करणें हें त्यांचें कर्तव्यकर्म आहे. त्यांच्या कार्यक्रमांत माझा बिलकुल विश्वास नाहीं; आणि म्हणूनच त्यांच्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध न ठेवणें हें माझें कर्तव्य आहे. असें करण्यांत माझी चूक होत असेल, तर कालांतरानें ती चूक मला कळून येईल. परंतु, तोंपर्यंत या कमिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणें मला भाग आहे. मी कॅांग्रेस सोडीत नाहीं! मला स्वतंत्र रीतीनें राष्ट्रकार्य करावयाचें असलें, तरी ‘ लौकरच माझ्या पक्षाकडे बहुमत झुकेल ’ अशी मनांत खूणगांठ बांधून कॅांग्रेसच्या कक्षेंतच काम करण्याचें मी ठरविलें आहे. गया कॅांग्रेसनें तडजोडीची प्रत्येक सूचना फेटाळून लाविली, त्याचा येथें

उल्लेख करणें अत्यंत जरूर आहे. कौन्सिलांसंबंधींची चर्चा लांबणीवर टाकण्याची प्रत्येक सूचना गया कॉंग्रेसनें फेटाळून लाविली व कायदेभंगाची चळवळ अधिक व्यवहार्य करण्याचे अनेक प्रयत्न करण्यांत आले असतां ते सर्व निष्फळ ठरवून, कॉंग्रेसनें भलताच एक ठराव केला आहे. या ठरावामुळें कॉंग्रेसची चळवळ व्यवहार्य होणें तर बाजूलाच राहिलें, उलट ती अशक्य मात्र झाली आहे! समजा, उद्यां युद्ध सुरू झालें, तर हिंदु-मुसलमानांनांच काय, पण प्रत्येक हिंदी गृहस्थास सरकारशीं असहकारिता करून एकदम कायदेभंग सुरू करणें भाग पडेल, असें मला वाटतें. तुर्की युद्ध हें एकट्या तुर्कस्थानचें युद्ध नसून सबंध आशियाखंडाच्या स्वातंत्र्याचें युद्ध आहे. खिलाफत-परिषदेनें अशाच प्रकारचा ठराव पास केला आहे, असें मला कळतें. परंतु, कांग्रेसनें मात्र अशा प्रकारच्या वादविवादासाठीं मागितलेली कामतहकुबीची सूचनासुद्धां सपशेल फेटाळून लाविली आहे. अशा परिस्थितींत अध्यक्ष या नात्यानें काम करणें मला अशक्य असल्याकारणानें कमिटीचें काम सुरू होण्यापूर्वीं मेहेरबानी करून माझे जागीं दुसरा अध्यक्ष निवडा, अशी माझी आपणां सर्वांस नम्र विनंति आहे."

---

## ८—मुंबईकडील मोहीम.

ता. २५ जानेवारी रोजीं गुरुवारीं, स्वराज्यपार्टीच्या कार्यक्रमाची दिशा ठरविण्यासाठीं देशबंधु दास हे मुंबईस येऊन दाखल झाले. वाटेंत प्रत्येक स्टेशनावर त्यांचा सन्मान करण्यांत आला. बोरिबंदर स्टेशनावर देशबंधूंचे स्वागतार्थ हजारों लोक जमले होते. गाडींतून उतरतांक्षणींच मुंबई प्रां. कां. कमिटीच्या अध्यक्षांनीं त्यांचें स्वागत केलें. नंतर चार शुभ्र घोड्यांच्या भव्य रथांतून त्यांची मिरवणूक काढण्यांत आली. ता. २६ रोजीं दुपारीं बॅ. जयकर यांचे घरीं स्वराज्यपार्टीच्या संघटनेविषयीं खासगी चर्चा झाल्यानंतर त्याच दिवशीं सायंकाळीं गांधर्व महाविद्यालयाचे पटांगणांत श्री.

२७७१

पटेल यांचे अध्यक्षतेखालीं दासबाबूंचें जाहीर व्याख्यान झालें. त्याप्रसंगीं ते म्हणाले—

" मुंबईंत आल्यापासून अतिशय काम पडल्यामुळें मी अगदीं थकून गेलों आहें. अशा परिस्थितींत लांबलचक भाषण करितां येणें शक्य नाहीं. तथापि, आज ज्या बाबतींत देशांत प्रचंड वाद माजला आहे, त्यासंबंधींचे माझे विचार मी स्पष्टपणें आपणांपुढें मांडणार आहें. पुष्कळ लोकांचें असें म्हणणें आहे कीं, गयेस तडजोडीला माझा विरोध होता. माझ्या सबंध आयुष्यांत मी तडजोडीला कधींहि विरोध केलेला नाहीं. गया कांग्रेसपुढें माझीं स्पष्ट मतें मांडणें हें माझें कर्तव्य होतें. कांग्रेसला माझा सल्ला पटला नाहीं. देशांत आज पुनर्घटना चालू असतांना मी माघार घेतली, तर परमेश्वराच्या घरीं मी भ्याड ठरल्यावांचून राहणार नाहीं. मी माझा कार्यक्रम जनतेपुढें मांडीत आहें व तो यशस्वी करण्यासाठीं मी प्रांतोप्रांतीं हिंडून सर्व देशभर प्रचंड खळबळ उडवून देणार आहें.

कांग्रेसमध्यें दोनतृतीयांश लोक आमच्याविरुद्ध आहेत. पण बाकीचे एकतृतीयांश लोक म्हणजे एकतृतीयांश राष्ट्र आमच्या पाठीशीं आहे. मतभेदाची मला पर्वा वाटत नाहीं. आजपर्यंत कोणत्या राष्ट्राला मतभेद झाल्याशिवाय स्वराज्य मिळालें आहे ? राष्ट्राच्या पदरांत यश पडण्याची ही वेळ आहे असें माझें मत आहे. असहकारितेच्या वृत्तीशिवाय तरणोपाय नाहीं, ही गोष्ट मला मान्य आहे. पण कोणत्याहि तत्त्वापेक्षां जिवंतपणाची योग्यता मला अधिक वाटते. तत्त्व झालें तरी तें आपल्या चैतन्याला व झगडणाच्या प्रवृत्तीला मारक होऊं देतां कामा नये. नोकरशाहीशीं विजय प्राप्त होईपर्यंत लढण्याचा एकदां निर्धार केल्यानंतर धार्मिक व आध्यात्मिक तत्त्वांना मी माझ्या मार्गांआड येऊं देणार नाहीं.

आमच्या पक्षानें गयेला कौन्सिलप्रवेशाचा प्रश्न मांडला तो मुद्दां असहकारितेसाठींच. चरखा व खादी यांचें महत्त्व सांपत्तिक दृष्ट्या कितीहि मोठें असलें तरी स्वराज्यप्राप्तीचा तोच एक मार्ग आहे, असें म्हणतां येणार नाहीं. कौन्सिलांत जाऊन असहकारिता करा व कौन्सि-

लांचा नाश करा, हेंच आम्हीं गया येथें सांगितलें. तुम्ही मतदारांच्या हातांपायां पडून त्यांस मतदानापासून पराङ्मुख केलें तरी दोन मतांनीं देखील प्रतिनिधि कौन्सिलांत जाऊं शकतो व कौन्सिलें मोठ्या दिमाखानें चालू शकतात ! परदेशी कापडावर बहिष्कार घालून त्याचें ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतून समूळ उच्चाटन करूं पाहतां, त्याचप्रमाणें आम्हीं कौन्सिलें मोडून अधिकारीवर्गाला अडचणींत आणण्याचा प्रयत्न करितों. सरकारनें जर एखादें राष्ट्रहिताचें बिल कौन्सिलापुढें मांडलें तर त्याला तुम्ही विरोध कराल काय, असा प्रश्न वारंवार विचारण्यांत येतो. त्याला उत्तर हेंच कीं, असहकरितेच्या तत्त्वाच्या दृष्टीनें आमच्या होणाऱ्या क्षुल्लक फायद्याचा व हिताचा आपण त्यागच करणें प्राप्त आहे. आम्ही कौन्सिलांत जाऊन आमची किमानपक्ष मागणी सरकारपुढें मांडूं. सरकारनें जर तिला संमति दिली तर ती स्वराज्याची सुरुवातच म्हणावयाची; नाहींतर सरकारशीं एकदां झगडा सुरू झाल्यावर आम्ही कौन्सिलांच्या आंत, बाहेर, सर्वत्र अडचणी उत्पन्न करून असहकरितेची चळवळ पूर्णत्वाला नेऊन पोंचवूं.

देशाला स्वराज्य मिळवून देण्याची आम्ही प्रतिज्ञा केली आहे; मग तें स्वराज्य घर्मबिंदूंनीं प्राप्त होवो, वा रक्तबिंदूनीं होवो ! माझी खात्री आहे कीं, मी आखलेला मार्ग सत्याचा व स्वराज्यप्राप्तीचा आहे. मी लढवय्या आहें. प्रतिपक्षाचे शेंकडों प्रहार मी सहन केलेले आहेत. सरकारशीं एकदां लढाई जुंपल्यावर वाटेल त्या उपायांनीं सरकारी राज्यशकट बंद पाडणें व राज्यव्यवस्था अशक्य करून सरकारला वठणीवर आणणें हाच स्वराज्याचा खरा मार्ग होय. ”

## ९—पुणें म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास उत्तर.

ता. २ फेब्रु० १९२३ रोजीं प्रातःकाळीं देशबंधु दास यांची स्वारी पुणें मुक्कामीं दाखल झाली. तेथें त्यांचें स्वागत एकाद्या बादशाही पाहुण्याप्रमाणें अपूर्व झालें. शहरांत ठिकठिकाणीं कमानी उभ्या करण्यांत आल्या असून म्युनिसिपालिटीतर्फे मानपत्रदानसमारंभ साजरा करण्यासाठीं मुद्दाम एक मंडप उभारण्यांत आला होता. सदर सभारंभ आटोपल्यानंतर देशबंधु दास यांनीं केसरी-मराठा संस्था, टिळक राष्ट्रीय पाठशाळा, गोपाळक्लब, न्यू पूना कॉलेज, अनाथ विद्यार्थीगृह वगैरे संस्थांस भेटी दिल्या. केसरी-छापखाना पाहून देशबंधूंस फारच समाधान वाटलें. म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास उत्तर देतांना देशबंधु दास म्हणालेः—

" मानपत्र देऊन माझा सन्मान केल्याबद्दल प्रथमतः पुणें म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष श्री० न० चिं० केळकर व इतर सभासद यांचे मी मनःपूर्वक आभार मानितों. या मानपत्रांत कांहीं थोर विभूतींबरोबर माझ्या नांवाचा उल्लेख केला आहे तो पाहून तर माझें मन अगदीं गोंधळून गेलें आहे. असो. गेल्या दोन वर्षांत बरेंचसें राष्ट्रकार्य झालें. परंतु तें अपुरें होतें. राजकीय क्षेत्रांत इतस्ततः पडलेल्या बीजांचें तें फळ होतें. त्याची पेरणी चहूंकडे सारखी झालेली नव्हती. अनेक कर्मठ सांप्रदाय राजकारणांत शिरल्यामुळें राजकारणाची धूळधाण झाली ! आज राष्ट्रीय चळवळीला व्यवहार्य स्वरूप देण्याची उत्कृष्ट संधि आहे; आणि ज्या थोर विभूतींचा या मानपत्रांत उल्लेख केला आहे त्यांच्या पुण्यस्मरणानें आपण पुनः सध्यांची चळवळ व्यवहार्य करूं शकूं, असा मला विश्वास वाटत आहे. रानडे, चिपळूणकर, टिळक, गोखले वगैरेनींच हिंदी राष्ट्रीयत्वाला व्यवहार्य स्वरूप दिलें. त्यांच्या पुण्यस्मरणानें पुढील कार्य तडीस नेऊन पोंचविण्याची ताकद व मदत आपणांस मिळेल अशी मला खात्री वाटते. या थोर विभूतींचें राष्ट्रीयत्व व असहकारितेची चळवळ यांचें कवडी किंमतीच्या कर्मठ सांप्रदायांत व तत्त्वज्ञानांत रूपांतर होण्याचा संभव आहे. या आपत्तीपासून आपण आपल्या राष्ट्रीयत्वाचा व असहकारितेचा

बचाव केला पाहिजे. पूर्वीच्या वैभवपूर्ण राष्ट्रीयत्वाचा प्रसार आणखी करण्याचें काम आपणांपुढें आहे. हें काम अत्यंत मोठें तसेंच महत्त्वाचें आहे. आज आपण मला मानपत्र दिलेंत–आपण माझ्याबरोबर काम करण्यास तयार असल्याचीच ती साक्ष आहे असें मी समजतों. पुढाऱ्यांचे मनांत आत्मविश्वास व धैर्य उत्पन्न होईल अशा प्रकारची सहानुभूति व निष्ठा लोकांनीं त्यांचेबद्दल दाखविली पाहिजे. तसें होईल तरच कोणताहि पुढारी लोकांचें नेतृत्व पत्करूं शकेल; एरव्हीं नाहीं. माझ्या मनांत तशा प्रकारचें धैर्य व आत्मविश्वास उत्पन्न केल्याबद्दल मी पुणेकरांचे आभार मानितों. असहकारितेच्या चळवळीस व्यवहार्यतेचें स्वरूप देणें भाग आहे, हें मी पुनः जाहीर करितों. कारण तसें केलें तरच आपलें अंतिम ध्येय साध्य होऊं शकेल. राष्ट्रानें स्वराज्यप्राप्ति हें आपलें ध्येय ठरविलें आहे. आणि सांपडेल तें हत्यार हातीं घेऊन आपणांस नोकरशाहीशीं दोन हात करावयाचे आहेत. मेहेरबानी करून आपलें कार्य असहकारितेच्या चळवळीस सुसंगत आहे कीं विसंगत आहे, अशा प्रकारचा वाद घालूं नका! शब्दांचा कीस पुरे झाला. असहकारिता हा नोकरशाहीशीं लढण्याचा एक मार्ग आहे. आणि या दृष्टीनेंच मी तो पसंत केला आहे. परंतु पोकळ कर्मठपणा हाच जर असहकारितेचा अर्थ असेल तर मात्र ती मला नको, असें सांगण्यास मला बिलकुल दिक्कत वाटत नाहीं. स्वराज्य हें राष्ट्राचें ध्येय आहे आणि सुसंघटित अशा नोकरशाहीशीं आपला सामना आहे. आपण स्वराज्याचे शिपाईगडी आहोंत हें लक्षांत बाळगून आपण नोकरशाहीवर चहूंकडून हल्ले चढविले पाहिजेत. म्युनिसिपालिट्यांतील सर्व जागा काबीज करा! लोकलबोर्डें काबीज करा! आणि कौन्सिलेंहि काबीज करा! नोकरशाहीस चहूंकडून भंडावून सोडा! वेळ आणीबाणीची आहे. एक क्षणहि फुकट दवडतां येणार नाहीं. अशा परिस्थितींत 'कां' हा प्रश्न न विचारतां सतत कार्य करीत राहा, किंवा कार्य करितां करितां आपल्या देहाचें बलिदान करा!"



दासबाबू १९२२ सालीं तुरुंगातून सुटल्यावर.

# १०—प्रतियोगी सहकारितेचें रहस्य.

पुण्याच्या सार्वजनिक सभेतर्फे दे. शिवरामपंत परांजपे यांचे अध्यक्षतेखालीं दासबाबूंचा जाहीर सन्मान करण्यांत आला. त्या वेळीं दासबाबू म्हणाले:—

" मागें मी पुण्यास आलों असतां लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखालीं प्रचंड जनसमूहासमोर माझें व्याख्यान झालें त्याची आठवण मला अद्यापि आहे, आणि त्याबद्दल मला अभिमान वाटत आहे. लोकमान्यांना त्यावेळीं भाषण करण्याची बंदी होती आणि अध्यक्षाचें काम त्यांनीं मौनवृत्तीनें वजावलें; परंतु ती त्यांची मुग्धता माझ्या सर्व भाषणांपेक्षां अधिक वक्तृत्वपूर्ण होती, या गोष्टीची मला अद्यापि आठवण आहे. असो; आतां मी अध्यक्षांच्या टीकेकडे वळतों. अध्यक्ष म्हणाले कीं प्रथमारंभीं सार्वजनिक सभा अर्जे-विनंत्या करण्यांत समाधान मानीत असे; परंतु पुढें कोपयुक्त निषेधांत व अखेरीस निषेधांतून असहकारितेंत तिचें अवस्थांतर झालें ! परंतु देशांतील एकूणएक संस्थांची अशाच प्रकारें उत्क्रांति होत असते. प्रत्यक्ष कांग्रेसचीहि अशीच उत्क्रांति झाली आहे. एका बाबतींत मात्र माझा मतभेद आहे. माझ्या मतें नुसत्या नांवापेक्षां त्या नांवाखालीं प्रतिपादिल्या जाणाऱ्या कल्प-नांची व धोरणांची किंमत अधिक असते. उदाहरणार्थ श्री. केळकरांची प्रतियोगी सहकारिताच घ्या ना. तिचा नामोच्चार केल्याबद्दल श्री. केळकरांवर शिव्यांच्या लाखोल्या वाहिल्या जात आहेत. मला त्यांच्या म्हण-ण्याचा अर्थ पूर्णपणें समजला आहे. जनतेच्या मागणीचा जोर तिच्या पाठीशीं उभ्या असलेल्या शक्तीवर अवलंबून आहे. एकटे श्री. केळकरच नव्हत, तर खुद्द मी सुद्धां सरकारकडे आमची मागणी पाठविणार आहे ! आणि सदर मागणी नामंजूर कराल तर स्वतःचा राज्यकारभार अशक्य करून सोडण्यास मदत कराल अशीहि ताकीद आम्ही सरकारला देणार आहों. याचेंच नांव प्रतियोगी असहकारिता ! सरकारनें आमची मागणी अमान्य केल्यास त्यांस सतावून सोडण्याची ताकद आमच्या अंगीं असतांना त्या मागणीला तुम्हीं भिक्षांदेहि म्हणाल काय ? सहकारिता म्हणाल काय ? प्रतियोगी सहका-

रिता म्हणाल काय ? कीं असहकारिता म्हणाल ? नुसत्या शब्दांचा कीस काढूं नका ! शब्दावडंबर न माजवितां सरळ कार्य करीत चला ! प्रतियोगी सहकारिता व प्रतियोगी असहकारिता या दोहोंच्या बुडाशीं एकच तत्व आहे. आपणाला स्वराज्याची लढाई खेळावयाची आहे. त्यासाठीं आपला सर्व उत्साह आपणांस खर्च करावयाचा आहे. आपल्या बलाबलवरच अखेरचा निकाल अवलंबून आहे. इंग्लंडनें हक्कांचा अर्ज ( पिटिशन ऑफ राइट्स् ) राजाकडे पाठविला; तो साधा ' अर्ज ' होता; पण त्याच्यामागें एवढी प्रचंड शक्ति उभी होती कीं अखेरीस प्रजेचे हक्क राजाला मान्य करावे लागले ! कलकत्ता व नागपूर कांग्रेसचे ठराव पहा. कॅाँग्रेसनें अद्यापि प्रत्यक्ष असहकारितेच्या अंमलबजावणीस सुरुवातच केलेली नाहीं. कलकत्त्याच्या व नागपूरच्या ठरावांत निर्भेळ प्रतिरोधाचें तत्व भरलेलें आहे. बहिष्काराचे ठरावहि प्रतिरोधाच्या पायावरच उभे आहेत. यापेक्षां त्यांत दुसरें कांहींहि नाहीं. असहकारितेंत प्रतिरोधाचा समावेश होत नाहीं, असहकारिता प्रतिरोधशून्य, असा कोणी असहकारितेचा अर्थ केल्यास तो मला मान्य होणें शक्य नाहीं ! आपली चळवळ दुहेरी असली पाहिजे. ती जशी विधायक तशीच ती विघातकहि असली पाहिजे !

शेवटीं, पुनः एकदां अध्यक्षांचे व सभेच्या सभासदांचे आभार मानून मी आपली रजा घेतों. "

---

## ११—शिवाजी-मंदिरांतील टोलेजंग सभा.

ता. २ फेब्रुवारी रोजीं सायंकाळीं पुणें येथें शिवाजीमंदिराच्या विस्तीर्ण पटांगणांत श्री. न. चिं. केळकर यांचे अध्यक्षतेखालीं देशबंधु दास यांचा जाहीर सन्मान करण्यांत आला. लोकसमुदाय अलोट जमला होता. अध्यक्षांनीं श्रोत्यांस गौरवपूर्ण शब्दांत व्याख्यात्यांचा परिचय करून दिल्यानंतर दासबाबू म्हणाले:—

" बंधूभगिनींनो, आज आपण मोठ्या विलक्षण परिस्थितींत येथें जमलों आहों. कोणत्या मार्गानें स्वातंत्र्य संपादन करावयाचें याविषयीं सबंध हिंदुस्थानचें मन आज व्यग्र झालेलें आहे. वर्तमानपत्रांतून व व्याख्यानांतून निरनिराळ्या मार्गाचा ऊहापोह सध्यां होत आहे. अशा प्रसंगीं आपण मोठमोठ्या शद्बांच्या जाळ्यांत सांपडून फसूं नका, एवढेंच माझें आपणाला सांगणें आहे. आज माझ्यावर व आपणा सर्वांवर एवढी शिव्यांची लाखोली वाहिली जात आहे, तरीसुद्धां आपण धीर सोडतां कामा नये. तरुणांच्या व अपरिपक्क मध्यवयी लोकांच्या हातून अशा चुका व्हावयाच्याच ! शिव्यांची विलकुल पर्वा न करितां तें एक जागृतीचेंच चिन्ह आहे अशा उदार दृष्टीनें आपण त्यांकडे पाहूं या ! सबंध हिंदुस्थान आपली भवितव्यता गांठण्यास आज उत्सुक झाला असून त्याच्या नसानसांत राष्ट्रीय जीवनाचा संचार होत आहे. आपलें भवितव्य कोणत्या मार्गानें गांठतां येईल, ही एकच हुरहूर प्रत्येक हिंदी देशभक्तास लागली आहे. गुलामगिरीचीं बंधनें तुटून स्वराज्य प्राप्त व्हावें अशी इच्छा न बाळगणारा एकतरी हिंदी मनुष्य या प्रचंड जनसमूहांत सांपडूं शकेल काय ? बिलकुल नाहीं !

गेल्या दोनतीन वर्षांतील चळवळ ही खुद्द असहकारितेची चळवळ नसून असहकारितेच्या तयारीची चळवळ होती. या चळवळीचा इतिहास मोठा मनोरंजक व बोधप्रद आहे. महायुद्धाचे समयीं हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली स्वराज्याकांक्षा तृप्त करण्याकरतां हिंदुस्थानास सुधारणा देण्यांत आल्या. त्यांस आजहि आम्ही फारशी किंमत देत नाहीं; किंवा पूर्वीहि देत नव्हतों. त्या निराशाजनक व असमाधानकारक होत्या तरी त्या सरकारास लोकमतापुढें मान वांकवूनच द्याव्या लागल्या. १९१७ सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेची बैठक भरली त्यावेळीं प्रत्येक प्रांतास स्वातंत्र्य किती असावें व सबंध देशास किती असावें याची आम्हीं कसून वाटाघाट केली. तिचें आज स्मरण झालें म्हणजे माझें मलाच हसूं आल्याशिवाय राहत नाहीं. सुधारणांच्या कायद्यानें द्विदलराज्यपद्धतीस जन्म दिला आहे. आणि तींतच दुफळी माजविण्याचें बीज आहे.

देशांत प्रतिकाराच्या वृत्तीस अमृतसरच्या राष्ट्रीय सभेपासून सुरुवात झाली. त्या सभेंत म. गांधींनीं सहकारितेचा ठराव पुढें आणला. त्यास लो. टिळकांनीं व मी विरोध केला. सरकारवर विश्वास ठेवून पहा असें गांधींजी ह्मणत. माझा सरकारवर काडिमात्र विश्वास नव्हता ह्मणून मी त्या ठरावास विरोध केला. गेल्या दीडशें वर्षांचा ब्रिटिश राज्यपद्धतीचा आपणांस आलेला अनुभव ब्रिटिशांवर विश्वास ठेवावा कीं ठेवूं नये, हें ठरविण्यास पुरेसा नाहीं काय ? परक्यावर विश्वास ठेवण्याबद्दल आम्हां हिंदी लोकांची ख्याति आहे. परंतु पंजांबांतील अत्याचार करणाऱ्या सरकारवर विश्वास ठेवण्याइतका मी हिंदू नाहीं ! सुधारणा त्याज्य असल्या तरी त्यांचा उपयोग करून पहा, असें मी म्हणत होतों. सुधारणांचा कायदा वांझ असला तरी त्याचा उपयोग प्रतिकारबुद्धीनें करण्यांत एक प्रकारची सत्ताच हातीं येते. अमृतसरची राष्ट्रीय सभा आटोपल्यानंतर दोनच महिन्यांनीं राष्ट्रीय सभेनें नेमलेल्या पंजाब-चौकशीकमिटीचा रिपोर्ट बाहेर पडला. त्या कमिटीचा मीहि एक सभासद होतों. गंगेच्या पवित्र तीरावर बसून आम्ही त्या रिपोर्टावर सह्या केल्या. रिपोर्टांतील आमच्या मागण्या अगदींच सौम्य होत्या. त्या सरकारनें मान्य कराव्या म्हणूनच मुद्दाम सौम्य राखिल्या होत्या. एका दृष्टीनें तो रिपोर्ट अगदींच ढिला होता म्हटलें तरी चालेल. सरकारनें या मागण्या मान्य न केल्या तर सरकारसंबंधीं शिफारसवजा ठराव करण्याचें युग संपलें असें समजून चालण्याचें आम्हीं ठरविलें होतें.

सरकारनें आमच्या सौम्य मागण्याही धाब्यावर बसविल्यामुळें असहकारितेचा जन्म झाला. जी असहकारिता सत्याच्या पायावर उभी आहे, ती सत्याग्रही असहकारिता होय. मीहि सत्याचीच कांस धरली असल्याकारणानें सत्याग्रही असहयोगीच आहें. म. गांधींनीं असहकारिता पुकारिली तेव्हां त्यांच्या डोळ्यांस पंजाबांतील अत्याचारांशिवाय दुसरें कांहीही दिसत नव्हतें. त्यांना स्वराज्यापेक्षांहि पंजाबांतील अत्याचारांचीच मातबरी विशेष वाटत होती. पण पुढें त्यांचा विचार पालटला. खिलाफत व स्वराज्य हीं अंगें चळवळीस मागाहून जोडण्यांत आलीं ! कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याचा विचार मला मुळींच पसंत नव्हता. माझ्या मतें या प्रकारचा बहिष्कार

निरुपयोगी होता. कौन्सिलांवर बहिष्कार घालावयाचा तो कौन्सिलांत घुसून प्रतिरोधाच्या रूपानेंच घातला पाहिजे. माझ्याच सूचनेवरून नागपूरच्या ठरावांत म. गांधी यांनीं स्वराज्याचें महत्त्व कबूल करून त्यास योग्य स्थान दिलें. राष्ट्रीय शिक्षण व कोर्टावरील बहिष्कार या असहकारितेकडे नेणाऱ्या पायऱ्या आहेत. ती असहकारिता नव्हे. नागपूरच्या ठरावाप्रमाणें असहकारितेची आपण फक्त तयारी करीत आहोंत. तुम्ही जर सरकारशीं असहकारिता केली म्हणतां तर सरकारचीं कोर्टें व शाळा अद्यापि चालू कशा? सरकारास कर न देणें ही खरी असहकारिता होय. आणि आपण तर कर भरून सरकाराला धष्टपुष्ट करीत आहोंत. हा मलिदा चारण्याचें आपण नाकारीपर्यंत खरी असहकारिता होणें शक्य नाहीं. सरकारशीं खरी असहकारिता करावयाची तर लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या व कौन्सिलें आपण काबीज केलीं पाहिजेत. माझा कौन्सिलविध्वंसनाचा मार्ग सरळ आहे. कौन्सिलांत घुसल्यानें असहकारितेच्या व्रताचा बिलकुल भंग होत नाहीं. नोकरशाहीरूपी सिंहाचे शाळा, कोर्टें इत्यादि चार पाय होत; हे पाय मोडले तर हा सिंह मरेल, असें नाफेरवाले म्हणतात. पण त्या पायांना पुष्ट करणारें कौन्सिलरूपी पोट फाडलें तर तो सिंह अधिक लौकर मरणार नाहीं काय? सगळ्या दुःखाचें मूळ कौन्सिलांत आहे. तें दुःख दूर करावयाचें तर हीं कौन्सिलेंच प्रतिकारानें मोडलीं पाहिजेत. मी स्वतः कल्पनासृष्टींत संचार करणारा आहे. पण या माझ्या सृष्टींत पंथ, सांप्रदाय आणि स्मृतिवचनें यांचें बंड नाहीं. मी आपले हातपाय आध्यात्मिक कल्पनांनीं जखडून घेण्यास तयार नाहीं. या सांप्रदायाच्या बंडामुळेंच सरकारशीं करावयाची असहकारिता बाजूस राहून आम्ही एकमेकांशींच असहकारिता करूं लागलों आहों. यासाठीं हें बंड मोडून आपण आपसांतील असहकारिता बंद पाडली पाहिजे. आमच्या टीकाकारांचा असा एक वर्ग आहे कीं ज्यानें आपल्या पदरास या चळवळींत काडीचीही तोशीस लावून घेतलेली नाहीं. वकिलांनींच असें कोणतें पाप केलें आहे कीं त्यांजवरच तेवढा बहिष्कार घालण्यांत यावा? वकील हे डॉक्टर नव्हत, म्हणून त्यांच्यावर बहिष्कार घालतां कीं काय?

नुसतें सूत काढणें व कापड विणणें ही असहकारिता नव्हे. नुसतें सूत काढण्यानें स्वराज्य मिळत नसतें. स्वराज्य मिळवावयाचें तर कौन्सिलें काबीज करून त्यांत स्वराज्यासंबंधाची आपली रास्त मागणी आपण सरकारपुढें मांडली पाहिजे व सांगितलेल्या मुदतींत ती सरकारनें मान्य न केली तर हरघडी त्यांचे कारभारांत अडवणूक करण्यास सुरवात केली पाहिजे. असहकारितेच्या चालू कार्यक्रमाची मात्रा लागू पडत नाहीं असें दृष्टीस पडल्यावर म. गांधींनीं आपल्या कार्यक्रमांत खात्रीनें फेरफार केला असता. म. गांधींच्या अंतःकरणाचा अंत कोणासहि लागणें शक्य नाहीं. यासाठीं गांधींचे नुसते जुने कागदी दाखले चाळीत न बसतां त्यांच्या असहकारितेचें मर्म लक्षांत आणा. विधायक कार्यक्रमाचा मोठा देव्हारा माजविण्यांत आला आहे; पण नुसत्या विधायक कार्यक्रमानें स्वराज्याची स्थापना होणार आहे काय ?

आजकाल प्रतियोगी सहकारिता, प्रतियोगी असहकारिता, सत्याग्रही असहकारिता वगैरे शब्दासंबंधीं बराचसा वादविवाद चालू आहे. परंतु माझी मदार नुसत्या शब्दांवर नाहीं. वास्तविक पाहतां कौन्सिलांतील कार्यासंबंधींची माझी कल्पना व प्रतियोगी सहकारिता किंवा श्री० केळकरांची प्रतियोगी असहकारिता यांत बिलकुल अंतर नाहीं. हीं सर्व एकच आहेत. सबंध चळवळीच्या मागें प्रतिरोधाची शक्ति उभी असली पाहिजे, एवढेंच माझें म्हणणें आहे. नुसत्या शब्दांनीं भुलून जाऊं नका ! सत्याच्या पायावर उभे रहा एवढीच माझी आपणांस विनंति आहे."

## मद्रास इलाख्यांतील मोहीम.

देशबंधु दास यांनीं सबंध जून महिना मद्रास इलाख्यांत दौरा काढिला होता. ठिकठिकाणीं त्यांचें जंगी स्वागत झालें. मानपत्रांचा तर त्यांच्यावर सारखा पाऊसच पडत होता. ता. ३० मे रोजीं देशबंधु दासांचें मद्रासच्या त्रिप्लिकेन बीचवर व्याख्यान झालें. तत्प्रसंगीं मद्रास-महाजन सभा, मद्रास खिलाफत कमिटी. तामील नाडू स्वराज्य पार्टी, अमरकलाविलासिनी सभा वगैरे संस्थांतर्फे त्यांस मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं. महाजन सभेच्या दिवाणखा-

त्यांत लो. टिळक व म. गांधी यांच्या तसबिरींचा अनावरण-समारंभ देशबंधु दास यांचे हस्तें साजरा करण्यांत आला. याशिवाय ब्राह्मणेतर समाजाकडून त्यांचा गौरव करण्यांत आला व त्याजपुढें त्यांचीं २।३ व्याख्यानेंहि झालीं. कित्येक ब्राह्मणेतर पुढारी स्वराज्य पक्षाचे सभासद झाले. ता. ३ जून रोजीं दासबाबू वेलोर येथें गेले. तेथील कॉंग्रेस कमिटीतर्फे त्यांस मानपत्र अर्पण करण्यांत आलें. ता. ४ रोजीं कांजीवरम् येथें व्याख्यान देऊन ता. ५ रोजीं दासबाबू पांडिचेरीस गेले. तेथें त्यांनीं महर्षि अरविंद बाबू यांची भेट घेतली. ता. ६ रोजीं चिदंबरम् म्युनिसिपालिटीतर्फे त्यांस मानपत्र देण्यांत आलें. ता. ७ रोजीं शियाली येथें व्याख्यान दिल्यानंतर देशबंधूंची स्वारी तिरुपति, सालेम, तुतिकोरिन, कुंभकोणम् मायावरम वगैरे ठिकाणीं गेली. कुंभकोणम् येथें त्यांस बहुमानपुरस्सर थैली अर्पण करण्यांत आली. सालेम येथें म्युनिसिपालिटी, क्षत्रिय-संघ, खिलाफत कमिटी वगैरे संस्थांतर्फे त्यांस मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं. तुतिकोरिन येथें नागरिकांच्या वतीनें त्यांस मानपत्र देण्यांत आलें. राजमहेंद्री म्युनिसिपालिटींत 'जस्टिस' पक्षानें विरोध केला, तरीसुद्धां दासबाबूंस मानपत्र देण्याचा ठराव बहुमतानें पास झाला. यानंतर दासबाबूंची स्वारी तिनेवेल्ली, कोइमतूर, मदुरा, चितूर, तिरुपति, नेलोर वगैरे ठिकाणीं गेली. कोईमतूर येथें नागरिक कॉं. कमिटी, बार असोसिएशन वगैरे संस्थांतर्फे त्यांस मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं. ता. २९ रोजीं गुंतूर येथें दासबाबूंचें शेवटचें व्याख्यान होऊन तेथेंच त्यांचा मद्रासचा दौरा खलास झाला. गुंतुरास दासबाबूंस एकंदर ४ मानपत्रें मिळालीं.

## १२—मद्रासेंतील पहिलें व्याख्यान.

ता. ३० रोजीं मद्रास येथें श्री. रामदास यांचे अध्यक्षतेखालीं त्रिप्लिकेन बीचवर दासबाबूंच्या सन्मानार्थ प्रचंड जाहीर सभा भरली होती. तेथें त्यांस निरनिराळ्या संस्थांकडून मानपत्रें देण्यांत आलीं. त्यांस उत्तरादाखल भाषण करतांना देशबंधु म्हणाले—

## मी बंडखोर आहें काय ?

सभ्य गृहस्थहो, मला कित्येक लोक बंडखोर म्हणत आहेत. ( हंशा ) ! मला कांहीं बंड आवडत नाहीं अशांतला भाग नव्हे ( हंशाच हंशा ). सबंध असहकारितेची चळवळ हेंच मुळीं एक मोठें थोरलें बंड आहे. तें एक अत्यंत शांतपणें चाललेलें असें अनत्याचारी बंड आहे ! आणि मलासुद्धां मनापासून बंडखोर होणें आवडतें. मी आजपर्यंत हरएक प्रकारच्या जुल्माविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें आहे ! मी कॉंग्रेसच्या 'जुल्माविरुद्ध' बंडाचें निशाण उभारलें एवढाच फक्त मला 'बंडखोर' म्हणणारांचा अर्थ असेल तर तो अर्थ मला मान्य आहे. मी बंडखोर आहें. कारण स्वतःचें मत निर्भीडपणें देशापुढें मांडण्याचें माझ्या अंगांत धैर्य आहे. परंतु कॉंग्रेसला विघातक अशी चळवळ मी करीत आहें हाच जर मला 'बंडखोर' म्हणणारांचा उद्देश असेल, तर मात्र तो आरोप मी सपशेल नाकारतों. कोणताही मनुष्य कॉंग्रेसचा सभासद असल्याशिवाय आमच्या पार्टीचा सभासद होऊं शकत नाहीं. मी कॉंग्रेसविरुद्ध कोणत्या प्रकारें बंड उभारलें आहे तें मेहेरबानी करून आपण मला सांगा. मी कॉंग्रेसमधून फुटून बाहेर पडलों नाहीं. मी अद्यापहि कॉंग्रेसच्या कक्षेंतच काम करीत आहें. कॉंग्रेसनें माझें ऐकावें म्हणून मी आपल्या पक्षाचा 'प्रॉपेगॅंडा' करीत आहें. कॉंग्रेसनें आज माझें म्हणणें अर्धवट ऐकिलें आहे. उद्यां ती सबंध ऐकेल अशी माझी उमेद आहे. कां ? तर मी एक मोठी थोरली व्यक्ति आहें म्हणून नव्हे; तर माझ्याकडे सत्याचा कांटा झुकत आहे म्हणून ! मी यःकश्चित मनुष्य आहें. परंतु मी जें कार्य करीत आहें—मग त्या कार्याला तुम्हीं बंड म्हणा अगर क्रांति म्हणा—तें कार्य माझ्या प्राणांपेक्षांहि मला अधिक प्रिय आहे व तेंच अंतीं यशस्वी होणार, अशी माझी मनोदेवता मला इषारा देत आहे !

## कौन्सिलप्रवेश.

आतां मी कौन्सिलप्रवेशाच्या प्रश्नाकडे वळतों. ऑ. इं. कमिटींतील सभासदांनीं तडजोड केली याबद्दल मी त्यांचे आभार मानितों. कारण त्यामुळें

आपली हास्यास्पद अवस्था तरी टळणार आहे. कॉंग्रेसच्या एका अंगानें निवडणुकी लढवून कौन्सिलें काबीज करावयाचीं; व त्याच कॉंग्रेसच्या दुसऱ्या अंगानें ' मतें देण्यास जाऊं नका ! ' असा मतदारांस उपदेश करावयाचा हा देखावा हास्यास्पद झाला नसता काय ? आपसांत लढालढीची जरुरी असेल, तर त्यांतसुद्धां मी कांहीं माघार घेणार नाहीं; परंतु या लढालढींपासून देशाचा बचाव केल्याबद्दल ऑ. इं. कमिटींतील माझ्या मित्रांचें मला अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाहीं. हल्लीं पुष्कळसे लोक कौन्सिलां-संबंधींच्या आमच्या भावी कार्यक्रमासंबंधानें शंकाकुशंका काढीत आहेत. ' कौन्सिलांचा आजपर्यंत काय थोडा अनुभव आला ? आतां तुम्हीं तरी आंत जाऊन काय करणार ? ' अशी पृच्छा कांहींजण करीत आहेत. त्यांस माझें असें उत्तर आहे कीं आजपर्यंत आम्हीं कौन्सिलांचा अनुभव घेतला हें म्हणणें खरें नाहीं. आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें आम्हीं त्यांचा आजतागायत उपयोग केलेला नाहीं. याउप्परहि ' कौन्सिलांत जाण्यांत काय अर्थ आहे ? ' असा प्रश्न विचारावयाचा असेल, तर मग ' आज-पर्यंत असहकारितेचा काय थोडा अनुभव आला ? मग ती कशाला पुढें चालवितां ? ' असा कोणी उलट प्रश्न विचारिल्यास त्यांत काय बरें बावगें होईल ? महात्माजींच्या नेतृत्वाखालीं असहकारिता सुरू होण्यापूर्वींहि थोडी-बहुत असहकारिता झालेली होती आणि त्याच्यापूर्वीं गेलीं दोन वर्षें जशी तुम्हीं यथाशक्ति असहकारिता करीत आहांत त्याचप्रमाणें संप पुकारून यथाशक्ति असहकारिता करण्यांत आली होती. या दोन चळवळींची तुलना करण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं. परंतु, वस्तुस्थिति काय आहे आणि खरोखरी आपणांस यश कितीसें मिळालें आहे, या ' फॅक्टस '-कडे आपली डोळेझांक होतां कामा नये, एवढीच माझी इच्छा आहे. आपण आजपर्यंत असहकारिता केलेलीच नाहीं. फक्त असहकारितेस लाग-णारी मनोभूमि आपण थोडीशी तयार केली आहे. आणि हा थोडाबहुत उत्साहहि आपल्या कृतिशून्यतेमुळें नाहींसा होण्याच्या पंथाला लागला आहे, मरण्याच्या पंथाला लागला आहे. आज कॉंग्रेसच्या चळवळींत करण्यासारखें काय आहे, तें तरी मला सांगा. आज कार्य तरी कोणतें

होत आहे ? मुंबईपासून ठिकठिकाणच्या स्टेशनांवर कांग्रेसप्रतिनिधि मला भेटण्यासाठीं आले होते. मी प्रत्येकाला हा प्रश्न विचारला— " आज कॉंग्रेसची स्थिति चांगली आहे कीं हलाखीची आहे ?" कॉंग्रेसचें अस्तित्व अजिबात नष्ट झाल्यासारखें झालें आहे, असें प्रत्येकाला कबूल करणें भाग पडलें. तर मग खऱ्या देशभक्तांचीं मनें गुंग होतील असा कोणता कार्यक्रम आज तुमच्यापाशीं आहे ? कोणतें युद्ध तुम्ही पुकारणार आहांत ? कोणतेंहि नाहीं ! कोणत्या तरी प्रकारच्या चढाईशिवाय अगर युद्धाशिवाय प्रतिरोधशक्तीची जोपासना व वाढ होईल असें आपणांस वाटतें काय ?

## कौन्सिलप्रवेशाचीं कारणें.

आतां कौन्सिलप्रवेशाचे बाबतींत हरकती तरी कोणत्या आहेत ? कौन्सिल-प्रवेशामुळें असहकारितेस धक्का पोंचतो काय ? मी जास्त ऊहापोह करूं इच्छित नाहीं. परंतु, शाळाकोर्टांवरील बहिष्कारासारख्या असहकारितेच्या इतर कार्यक्रमापेक्षां माझी असहकारिताच अधिक प्रखर व खऱ्या स्वरूपाची आहे. कोर्टें व शिक्षणसंस्था यांवरील बहिष्कार यशस्वी करण्याचा काडिमात्र प्रयत्न तुमच्या हातून आतांपर्यंत झालेला नाहीं. आज कोणालाहि सदर बहिष्कार मान्य नाहींत. असें असतांना ते उचलून धरण्यासाठीं तुम्ही गयेस ठराव पास केलेत ! कोणीहि आपले ठराव पाळीत नसतां ते पुनरपि पास करण्यास तुम्हांला कांहींच हरकत वाटत नाहीं, तर मग कौन्सिलांत घुसायला तरी तुम्हीं कां भितां ? कौन्सिलांत शिरण्यास तुमची कां हरकत असावी ? ती सहकारिता होईल असें तुम्हांला वाटतें ? मला ती सहकारिता होईल असें वाटत नाहीं. परंतु आज प्रत्येक क्षणाला तुम्हीं सरकारशीं सहकारिता करीत नाहीं काय ? तुम्हीं आपली मुलें सरकारी शाळाकॉलेजांतून पाठवितां ! तुम्हीं ब्रिटिश कोर्टांत आपल्या फिर्यादी दाखल करितां ! तुम्हीं वकिलांना उत्तेजन देतां ! तुम्ही कर भरून सरकारला घष्टपुष्ट करितां ! तुम्ही करीत नाहीं काय ? प्रत्येक दिवशीं तुम्ही सरकारशीं सहकारिता करीत आहांत. मग कौन्सिलांचें तेवढें नांव काढिलें कीं तुमच्या अंगावर

कांटा कां उभा राहतो ? तुमच्या बुद्धींत कोठें तरी फरक पडला आहे असा अर्थ त्यावरून निघत नाहीं काय ? तुमची बुद्धीच थोडीशी पालटली आहे; आणि म्हणून तुह्मांला कौन्सिलांची थरकांप भीति वाटते. काय ह्मणे कौन्सिलांत जाणें ही सहकारिता आहे ! मला ही गोष्ट बिलकुल कबूल नाहीं. कौन्सिलांत तुम्हीं आमचें बहुमत निवडून द्याल तर सरकारशीं आम्ही सहज असहकारिता करूं. आतां आमचें बहुमतच निवडून येणार नाहीं, असें तुम्हीं ह्मणाल. परंतु तसें झालें तर त्याचा दोष कोणाकडे येतो ? कौन्सिलांत जाणें ही सहकारिता आहे, असें सांगून तुम्हीच जनतेचा बुद्धिभेद केलात ना ? मग तुमच्याकडेच त्याचा दोष येत नाहीं काय ? एकदम याच्या उलट उपदेश केला तरी तुमचें बहुमत निवडून येणार नाहीं, असें तुम्ही ह्मणतां. परंतु हे गुलामी प्रवृत्तीचे ( slave mentality ) विचार आहेत. मला ते मान्य नाहींत. कांहीं काँग्रेसभक्त असें ह्मणतात कीं, आमची कौन्सिल-प्रवेशाला हरकत नाहीं; पण तसा हुकूम ( मँडेट ) कांग्रेसनें दिला पाहिजे ! गुलामी प्रवृत्तीचें हें दुसरें उदाहरण ! काँग्रेस, काँग्रेस ह्मणजे तरी कोण आहे ? ती तुमचीच, काँग्रेसभक्तांचीच बनलेली असते ना ? मग तुम्ही जें कराल तेंच तिनें केलें असें होणार नाहीं काय ? तुमची इच्छा असेल तर कौन्सिलप्रवेशास परवानगी देणारा 'मँडेट' काँग्रेस तुह्मांला सहज देऊं शकेल. तुमची शिथिलता, तुमचा आळसटपणा व मेंदूला ताण देण्याची तुमची अनिच्छा—याच गोष्टी तुह्मांला आज भोंवत असल्याकारणानें तुम्ही कौन्सिलप्रवेश टाळूं पाहत आहां ! पुष्कळसे लोक असें ह्मणतात—" आम्हांला तुमचा बुद्धिवाद पटतो; आमची कौन्सिलप्रवेशास बिलकुल हरकत नाहीं. परंतु काँग्रेसचा तसा 'मँडेट' नाहीं ना ? त्यामुळें आमचे हातपाय बांधले गेले आहेत ! त्यास आमचा नाइलाज आहे ! " बंगाली भाषेंत एक गोष्ट आहे. ती अशी—एका माणसाचे एका हातांत तरवार होती व दुसऱ्या हातांत ढाल होती. परंतु चोरानें घर फोडून जेव्हां त्यांतील द्रव्य लांबविलें, तेव्हां त्यास एकानें विचारिलें कीं—' चोरानें घर फोडलें तेव्हां तुझे हात काय केळीं खायला गेले होते ? ' त्या माणसानें लगेच उत्तर दिलें—' मग मी तरी काय करूं ! माझ्या एका हातीं तरवार होती व

दुसऱ्या हातीं ढाल होती ! माझे हात मोकळे कोठें होते ? ' यांतलाच प्रकार सध्यां चालू आहे. आमचे कॉंग्रेसभक्तहि आज ह्मणत आहेत कीं 'काय करावें हो ! आम्हांला तुमचें सगळें तत्त्वज्ञान पटतें, पण कॉंग्रेसचा ' मँडेट ' कोठें आहे ? ' अरे, पण मग तुम्ही तो बदलून कां घेत नाहीं ? कांग्रेस कांहीं निराळी नाहीं. तुम्ही स्वतःच कॉंग्रेस आहांत ! तुह्मांला कौन्सिलप्रवेश मान्य आहे, तर तसा ठराव तुम्ही कां करीत नाहीं ? तसा 'मँडेट ' तुह्मी कॉंग्रेसपासून कां घेत नाहीं ! पण छेः ! तें कसें होणार ! "कॉंग्रेसचें पावित्र्य बिघडवायचें कसें ! " स्वातंत्र्य ही कॉंग्रेसपेक्षांहि अधिक पवित्र चीज आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवा ! तुह्मी पाहिजे तर स्वातंत्र्यापासून परावृत्त व्हा—पण मी होणार नाहीं ! मी आपल्या देशबांधवांना प्रतिरोधाच्या मार्गानेंच नेणार. माझ्या पाठोपाठ ते येतील, अशी मला खात्री आहे. माझें क्षेत्र तुमच्याहि पेक्षां मोठें आहे. माझ्याजवळ ६० लाख मतदार आहेत. मी त्यांचीं आर्जवें करीन. कॉंग्रेससभासदांच्या कितीतरी पटीनें त्यांची संख्या मोठी आहे !"

## सविनय कायदेभंग.

तुह्मी कायदेभंगाविषयीं गप्पा मारितां. परंतु आज मारून मुटकून कायदेभंग सुरू कराल तर तो सुरू होण्यापूर्वीच मरेल ही गोष्ट लक्षांत ठेवा. कां ? असा प्रश्न तुम्ही विचाराल. मी संबंध हिंदुस्थानभर हिंडून आलों आहें. आज कायदेभंग सुरू केल्यानें यत्किंचित सुद्धां उत्साह पैदा होणार नाहीं हें मी आव्हानपूर्वक सांगतों. आज मुळीं कायदेभंग करितांच येणार नाहीं. मी स्वतः कायदेभंग केलेला आहे. मी स्वतः लोकांना तुरुंगाच्या दारांत खेंचलें आहें. मी स्वतः बंगालमध्यें कायदेभंगाची चळवळ सुरू केली. पहिला बळी माझ्या मुलाचा दिला ( टाळ्यांचा कडकडाट ) ! दुसरा बायकोचा दिला. नंतर मी स्वतः तुरुंगांत गेलों (टाळ्यांचा कडकडाट) ! कारण तसें करण्यांतच विद्युल्लतेची शक्ति पैदा होणार आहे हें मी जाणलें ! त्या वेळीं दृग्गोचर झालेल्या प्रतिरोधशक्तीच्या प्रचंड स्वरूपापुढें कोणत्याहि गर्विष्ठ सरकाराम मान वांकविणें भाग पडेल ही गोष्ट मला ठाऊक होती, आणि त्याप्रमाणें जगांतील अत्यंत गर्विष्ठ अशा सरकाराला त्या शक्तीपुढें मान

चांकविणें भाग पडलें ! परंतु, तुम्हीं सगळा घोंटाळा केलात ! तुम्ही त्या संधीचा योग्य तो फायदा घेतला नाहीं. तुम्ही त्या वेळीं हातचें घालविलेंत ! आणि आतां पुनः लोकांना ' चरखे चालवा ! सूत काढा !' असा उपदेश करण्याला तुमची तयारीच ! जगांतील अत्यंत गर्विष्ठ असें सरकार तुमच्या पुढें नमलें होतें. आतां मी गुलदस्तांत कांहींच ठेवूं इच्छित नाहीं. माझ्या-कडे तहाच्या अटी आल्या. त्या मी सेनाधिपतींकडे पाठविल्या. कारण त्या वेळीं मी तुरुंगांत होतों. त्या वेळीं मी तुरुंगांत नसतों तर त्यांचा स्वीकार करण्यास मी देशाला भाग पाडलें असतें. आणि त्या तुम्ही मान्य केल्या असत्या तर आज देशांत कांहीं निराळीच परिस्थिति तुम्हांला दिसली असती. विजयासारखा दुसऱ्या कशाचाहि विजय होत नाहीं. लोकांना त्यांच्या विजयाचा अनुभव व जाणीव जर कां एकदां झाली असती, तर त्यांचेपुढील सर्वंच दृश्यच पालटलें असतें. परंतु विजय मिळाला, आणि आम्ही तो झिडकारून टाकला ! सरकारच्या अटी नाका-रिल्या तर मग आमचें युद्ध आम्हांला तसेंच पुढें चालविणें भाग होतें. पण तें तरी आम्ही केलें काय ? आम्ही पुढें लढलों काय ?—छेः ! नंतर आम्ही नम्र होऊन सरकारची पायधरणी केली ! सरकार आमची पायधरणी करणें बाजूलाच राहिलें ! आतां याच्यापलीकडची तपशीलवार हकीकत मी सांगत बसत नाहीं. अखेरीस सरकारला आम्ही एक निर्वाणीचा खलिता पाठविला आणि बार्डोलीच्या ठरावाबरोबरच आम्ही आपलीं शस्त्रें खालीं ठेवून शस्त्रसंन्यास पुकारला ! अद्यापिहि

## याच मताचा मी पुरस्कार करितों !

माझें जुनेंच मत कायम आहे. जो काय उत्साह देशांत पैदा झाला होता, तो आम्ही अजिवात बेचिराख केला, त्याचा आम्ही खून केला ! आणि आतां पुनः ' कौन्सिलांत जाऊं नका !–यंव करूं नका, त्यंव करूं नका !' असें म्हणण्याची आमची तयारीच ! तुम्ही करणार आहांत तरी काय, असा माझा प्रश्न आहे. महिनेच्या महिने तुम्ही सविनय कायदेभंगाची तारीख पुढें ढकलीत आहांत. आतां तर तुम्ही वर्षेच्या वर्षें तो सुरू करीत

नाहीं; हें मला पक्कें ठाऊक आहे. फेब्रुवारी महिन्यांत तडजोडीच्या गोष्टी सुरू होत्या. दोन महिनेपर्यंत आपली चळवळ बंद ठेवा, बिलकुल हूं कीं चूं करूं नका असें मला सांगण्यांत आलें. बरें आहे, कांहीं करीत नाहीं असें मी म्हटलें. कारण पुनः कायदेभंग तहकूब ठेवण्यांत येणार हें मी जाणून होतों. मला माझ्या देशाची पक्की माहिती आहे. आज मी ५२ पावसाळे या देशांत काढिले आहेत. लोकांच्या मनोवृत्ति काय आहेत, हें मी पुरतेपणीं जाणतों. आतां सविनय कायदेभंग अजिबात अशक्य आहे ! परंतु, सविनय कायदेभंग हाच स्वराज्याचा एकमात्र रस्ता आहे. सविनय कायदेभंग हें ध्येय आहे, आणि तें आपण प्राप्त करून घेतलें पाहिजे. पण कृत्रिम उपायांनीं तुम्हांला हें ध्येय गांठतां येणार नाहीं. कृत्रिम उपायांनीं तुम्हांला कायदेभंग सुरू करितां येणार नाहीं. तो बनावट सुरू करण्याचा कांहीं कोठें कारखाना नाहीं. ‘ आम्ही हा कायदा मोडूं आणि तो मोडूं ’ ही तुमची बडबड व्यर्थ आहे. सविनय कायदेभंग सुरू होणें भाग असतें, त्याच वेळीं तो सुरू होत असतो. ज्या वेळीं ईश्वरी कायदा पाळण्याची सक्ति व निकड लोकांस भासूं लागते त्याच वेळीं कायदेभंगाचा प्रादुर्भाव होत असतो. अशी परिस्थिति उत्पन्न होईल तेव्हांच कायदेभंग सुरू होईल. असें आहे तरीसुद्धां लोकांमध्यें उत्साह उत्पन्न करण्यासाठीं ‘ कायदेभंग, कायदेभंग, कायदेभंग ’ असा नुसता जप तुम्ही चालूच ठेविला आहे ( हंशा ) ! पुढें काय होणार. तें मला चक्क दिसत आहे. एप्रिल अखेरपासून जून अखेरपर्यंत तो तहकूब ठेवण्यांत आला आहे. आणि पुढेंहि काय होणार त्याबद्दल मला बिलकुल शंका नाहीं. कारण, जूनच्या अखेरीस पुनः तो डिसेंबरपर्यंत तहकूब ठेविला जाणार, हें मला ठाऊक आहे ( हंशा ) ! डिसेंबरांतसुद्धां सध्यांचाच पुराणमताभिमान कायम राहिला तर आणखी मार्चपर्यंत तो तहकूब राहील ! आणखीसुद्धां तीन महिने तो पुढें ढकलण्यांत येईल ?

## मी काय करणार ?

आतां, मी पुढें काय करणार तें आपणांस सांगून वर्तमानपत्रांतून जे नानाप्रकारचे गैरसमज पसरविण्यांत आले आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न

करितों. दुर्दैवानें आज माझ्या हातीं माझें असें वर्तमानपत्र नाहीं. त्यामुळें दर दिवशीं माझीं मतें विपर्यस्त स्वरूपांत प्रसिद्ध झालेलीं आढळतात; माझीं भाषणें चुकीचीं छापिलीं जातात; आणि माझ्या विरुद्ध नानाप्रकारचे खोटे आरोप करण्यांत येऊन भलतेच गैरसमज पसरविले जातात. अर्थात ते कधींना कधीं तरी दूर झालेच पाहिजेत. तुरुंगांतून बाहेर पडतांक्षणींच ' मी पुनः वकिली सुरू करणार ! ' असें माझ्या मित्रांजवळ मी बोलल्याची पहिली कंडी पिकविण्यांत आली. ती खोटी आहे, असें म्हणण्याचे भानगडींत मी पडलों नाहीं. कारण अशा कितीहि खोट्यानाट्या कंड्या पिकविण्यांत आल्या, तरीसुद्धां असा एक दिवस उजाडेल कीं ज्या दिवशीं ' इतःपर वकिली करण्याचा माझा इरादा नाहीं ' ही गोष्ट माझ्या देशबांधवांस कळून येईल, अशी माझी ठाम समजूत होती. आतां अशी कंडी पिकविण्यांत आली आहे कीं माझी दिवाणगिरीसाठीं धडपड चालली आहे ( हंशा ) ! हा माझा मी अपमान समजतों. स्वराज्यपार्टीच्या कोणत्याहि माणसानें कोणतीहि सरकारी जागा पत्करूं नये अशा प्रकारचें तत्त्व आमच्या पार्टीच्या संघटनेंत गोंवलेलें आहे. किंबहुना या मूलभूत तत्त्वाच्या पायावरच माझी पार्टी उभी आहे. असें असतांना या पार्टीचा मी जो जनक—तो मी स्वतः दिवाणगिरीसाठीं हपापलों आहें असें लोकांनीं म्हणणें—यासारखी अधिक हास्यास्पद व अधिक असत्य अशी दुसरी कोणती तरी गोष्ट असूं शकेल काय ? ( हंशा ) परंतु अशा प्रकारची कंडीसुद्धां कांहीं हिंदी वर्तमानपत्रांतून पिकविण्यांत आली आहे. परंतु पिकविलेल्या कंड्यांचा व असत्याचा कधींहि विजय होणार नाहीं, ही गोष्ट या वर्तमानपत्रांनीं ध्यानांत ठेवावी. कारण एका सच्चा माणसाशीं तुमची गांठ आहे. ज्याला कोणत्याहि प्रकारचा स्वार्थ साधावयाचा नाहीं, ज्याला चूक काय, बरोबर काय तें कळतें व आपणांस जें बरोबर वाटतें तें बोलण्याचें धैर्य ज्याचे अंगीं आहे—अशा एका माणसाशीं तुम्हांला तोंड द्यावयाचें आहे ! म्हणून वाटतील तितक्या असत्य गोष्टी व कंड्या तुम्हीं पसरवा ! मला त्याची काडीइतकीहि पर्वा नाहीं. कारण सूर्यप्रकाश सकाळच्या धुक्याचा नाश करितो त्याचप्रमाणें काळ ह्या गोष्टी असत्य ठरवील !

## सरकारला हरघडी पेंचांत पाडणार !

आतां, तुम्हीं कोणकोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत तें सांगतों. प्रथमतः तुम्हीं कौन्सिलांत घुसा, तेथें बहुमत मिळवा व राष्ट्राची मागणी सरकारपुढें मांडा., सरकारनें ती झिडकारून लाविली तर कौन्सिलपुढें येणाऱ्या कोणत्याहि ठरावास विरोध करा—मग तो ठराव चांगला असो, वाईट असो अगर इतर कोणत्याहि प्रकारचा असो—सरकारच्या प्रत्येक कामकाजास विरोध झाला पाहिजे. कौन्सिलांच्या द्वारें तें आमच्यावर राज्य करूं शकणार नाहीं, अशा-प्रकारची परिस्थिति मला उत्पन्न करावयाची आहे. सुधारलेल्या कौन्सिलांच्या द्वारें सरकारला राज्यकारभार चालविणें अगदीं अशक्य करून सोडा. ‘ मग सरकार आपल्या निर्णायक सत्तेचा उपयोग करून कौन्सिलांशिवाय राज्य-कारभार चालवील ! ’ असें कित्येक म्हणतात. त्यांस माझा एवढाच उलट सवाल आहे कीं—‘ समजा, तुमचा बहिष्कार यशस्वी झाला—तो यशस्वी होणें कदापि शक्यच नाहीं—पण समजा तो यशस्वी झाला, एकहि मनुष्य मतदानासाठीं गेला नाहीं व कौन्सिलांतील सर्व जागा रिकाम्या पडल्या—तरी सुद्धां कौन्सिलांशिवाय सरकार राज्यकारभार चालवीलच कीं नाहीं ? ’ तुमच्या बहिष्कारानें तरी जुलमी सरकारचा अंत कोठें होणार आहे ? तेव्हां तुमच्या मार्गानें गेलें काय, किंवा माझ्या मार्गानें गेलें काय, दोहोंचाहि परिणाम एकच. त्यामुळें सुधारलेल्या कौन्सिलांचा अंत होणार आहे, आणि तेंच आम्हांस पाहिजे आहे. कां ? तर मला सरकारला ‘ इकडे आड तिकडे विहीर ’ अशा प्रकारच्या पेंचांत पाडावयाचें आहे—[ १ ] सरकारनें आह्माला नकोशा झालेल्या ह्या घाणेरड्या सुधारणा तरी परत घ्याव्यात, किंवा [२] आमची मागणी तरी मान्य करावी. आमची मागणी मान्य झाली, तर त्याच बरोबर सध्यांच्या घाणेरड्या सुधारणांनाहि आपोआप मूठमाती मिळेल व खऱ्या स्वराज्याच्या पायास सुरुवात होईल. सरकार सुखासुखीं सुधारणा परत घेईल असें आपल्याला वाटतें काय ?—छेः ! तसें करण्याची त्यांची छाती नाहीं. आम्हीं सुधारणा कस्पटासमान लेखतों, कारण त्या आम्हांला पाहिजेत तशा नाहींत. नोकरशाहीलासुद्धां त्या नकोशाच आहेत.

आम्हीं नको म्हणून सुधारणांचें एक टोक ओढतों, नोकरशाही दुसरें ओढते त्यामुळें मधल्यामध्यें ओढाताण होत आहे. पण, ह्या सुधारणा आम्हांला मिळाल्या तरी कां? पार्लमेंटनें केवळ उदारबुद्धीनें प्रेरित होऊन त्या आम्हांस दिल्या असें आपल्याला वाटतें काय? पार्लमेंटला कांहीं दयामाया किंवा उदारबुद्धि आहे असें मला वाटत नाहीं. येथें माझ्यांत व महात्माजींच्या मनांत तात्त्विक विरोध आहे. केवळ प्रेमानें किंवा उदारमनस्कतेमुळें पार्लमेंट आपल्याला कधीं तरी कांहीं देईल, असें मला बिलकुल वाटत नाहीं. पार्लमेंटला दयामाया बिलकुल नाहीं. नोकरशाहीला सध्यांच्या सुधारणा नको होत्या, तर पार्लमेंटनें त्या मंजूर तरी कां व कशा केल्या? पार्लमेंटला एकादी तरी पळवाट शिल्लक असती तर सुधारणा कायदा त्यांनीं कधीं तरी पास केला असता काय? केव्हांहि नाहीं. लोकपक्षाच्या जोरदार मागणीपुढें त्यांना मान वांकवावी लागली. आणि जितके अधिकार देण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें तेवढेच त्यांनीं आह्मांला दिले. ह्मणून आपल्या मागणीच्या पाठीशीं प्रचंड शक्ति उभी असेल, तर त्यांना आणखी हक्क देणें भाग पडेल. केवळ लोकांच्या प्रचंड चळवळीचा तात गळ्यास बसला ह्मणूनच त्यांनी आह्मांला सध्यांच्या सुधारणा दिल्या. त्यांची छाती असेल तर त्या त्यांनीं परत घ्याव्या असें मी त्यांस आव्हानपूर्वक सांगतों. त्यांनीं सुधारणा परत घेतल्या तरी त्याची मला बिलकुल फिकीर नाहीं. कारण मग निदान सरकारच्या तोंडावरचा बुरखा तरी दूर होऊन सरकार व आम्ही एकमेकांसमोर कायमचे दंड थोपटून उभे राहूं. एका बाजूला अरेराव सरकार तर दुसऱ्या बाजूला प्रचंड लोकशक्ति–अशा प्रकारची परिस्थिति उत्पन्न होईल आणि तीच मला पाहिजे आहे. तसें झालें तरच आपलें कार्य सिद्धीस जाईल. तशी परिस्थिति उत्पन्न झाली तरच मवाळ आपणांस येऊन मिळतील; आणि देशांतील प्रत्येक इसम आपल्या चळवळीचा भागिदार होईल. आधीं नोकरशाहीच्या डोकीवरचा बुरखा आपण दूर करूं या आणि नंतर नोकरशाहीच्या समोर दंड थोपटून उभे राहूं या! त्यानंतर लोकपक्ष व सरकार यांजमधील प्रचंड झुंजीस सुरुवात होईल.

## कौन्सिलांतून स्वराज्य मिळेल काय ?

कांहीं लोक विचारतात कीं, तुमचें स्वराज्य पार्लमेंटांतून किंवा कौन्सिलांतून येणार आहे काय? त्यांचें असें म्हणणें आहे कीं, दासबाबूंना कौन्सिलांतून स्वराज्य पाहिजे आहे. ही गोष्ट मी सपशेल नाकारितों. माझें स्वराज्य कौन्सिलांत नाहीं. कौन्सिलांतून स्वराज्य मिळेल अशा प्रकारचा विश्वास बाळगण्याइतका मी मूर्ख नाहीं! आम्हांला स्वराज्य देण्याचा कौन्सिलांना मुळीं अधिकारच नाहीं. नोकरशाहीवर चहूं बाजूंनीं हल्ले चढवावे, एवढाच माझा कौन्सिलांत घुसण्यांत हेतु आहे. मला कौन्सिलांत घुसून तिचा राज्यकारभार अशक्य करून सोडावयाचा आहे; आणि बाहेर असहकारितेच्या कार्यक्रमाची अधिक उत्साहानें अंमलबजावणी करून व त्यांत अधिक जीवन भरून नोकरशाहीला भंडावून सोडावें, असा माझा उद्देश आहे. आंतून व बाहेरून दोहींकडून नोकरशाहीवर हल्ला चढवा! लोकांचा व माझा आज थोडे दिवसांचा कां संबंध आहे? लोक मला ओळखत नाहींत काय? माझे मित्र व पुराणमताभिमानी असहयोगी मला कितीहि दूर लोटोत—पण खरोखर ते माझ्यापासून दूर आहेत काय? माझी चळचळ त्यांच्या चळवळीपेक्षां निराळी आहे काय? आपण एकमेकांत भेदाभेद पाहूं—पण हे भेद खरे नव्हत. बाहेरच्या चळवळीचा कौन्सिलांतील चळवळीवर व आंतील चळवळीचा बाहेरच्या चळवळीवर अनुकूल परिणाम झालाच पाहिजे. या दोन्ही चळवळी अन्योन्याश्रयी आहेत. त्या दोन्ही चळवळी एकरूप व एका ध्येयाकडेच जाणाऱ्या आहेत. चळवळीचीं दृश्यें दोन, पण तीं आहेत एकाच लोकपक्षाचीं! सध्यां देशांत जो सामना सुरू आहे तो नोकरशाही व लोकपक्ष या दोहोंमध्येंच सुरू आहे. आमच्या चळवळीमुळें असहकारितेच्या तत्त्वास बाध येतो अशा प्रकारची बडबड माझे ‘ नाफेर ’ मित्र करोत, परंतु माझ्या चळवळीमुळें प्रतिरोधवृत्तीला, आत्मार्पणबुद्धीला किंवा खुद्द असहकारितेच्या वृत्तीला थोडा तरी धक्का पोंचत असेल, असें मला वाटत नाहीं. सरकारशीं दोन हात केल्यानें उलट ही वृत्ति अधिक बळकटच होणार आहे. बाहेरच्या व आंतील चळवळीच्या माऱ्यामुळें नोकरशाहीची पांचावर

धारण वसावी, अशी माझी फार इच्छा आहे ( टाळ्या ) ! नोकरशाहीचा चक्काचुराडा होईल, अशा प्रकारची वृत्ति देशांत तयार करण्याची मी खटपट करितों म्हणून मी बंडखोर ठरतों काय? म्हणून माझ्यावर शिव्यांची लाखोली वाहिली जावी काय ? नोकरशाहीचा चुराडा व्हावा अशी तर आपणां सर्वांची इच्छा आहे. जंगलांत पळून जाणें हाच कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याचा शहाणपणाचा मार्ग आहे, असें तुम्हांस वाटत असेल तर खुशाल तुम्ही आपली तशी आपली फसवणूक करून घ्या. माझी त्यास बिलकुल हरकत नाहीं. परंतु, तुमच्यावरोबर मीहि जंगलांत येण्याचें नाकारलें तर तुम्ही मला शिव्या देणार काय ? कौन्सिलांवर बहिष्कार घातला पाहिजे असें तुम्ही म्हणतां. परंतु, अखिल मतदारांस मतदानापासून परावृत्त करितां येणार नाहीं व कांहीं लोक मतें नोंदण्यास जाणार—हें तुम्हांस ठाऊक आहे. मग माझाच मार्ग चुकीचा कां म्हणतां ?

## जरा निराळ्या दृष्टीनें पहा !

या प्रश्नाकडे जरा निराळ्या दृष्टीनें पहा. कोणत्या मार्गानें मी माझ्या दुर्दैवी देशबांधवांना न्यावें असें तुम्हांला वाटतें ? कोणता मार्ग मोकळा आहे ? नोकरशाहीची सत्ता नाहीं असें कोणतें क्षेत्र आज शिल्लक आहे ? जंगलांत धांवत गेलांत तरी तेथील लांकडें तोडण्याची सुद्धां तुम्हांला बंदी आहे. राष्ट्रीय शाळा काढाल ? चरखे चालवाल ?—तरी सुद्धां १४४ कलम नोकरशाहीजवळ जय्यत तयार आहेच ! मग कोणत्या मार्गानें तुम्ही जाणार ? बंधूभगिनींनो, आपण गुलामांपेक्षांहि गुलाम आहोंत याची जाणीव आपण विसरलांत काय ? नोकरशाहीच्या सत्तेपासून स्वतंत्र अशी एक रेंसभर जागा देखील आपल्या ताब्यांत नाहीं, ही गोष्ट तुम्ही विसरलांत काय ? अशा परिस्थितींत नोकरशाहीशीं झगडल्याखेरीज आपल्या संस्थांची वाढ करूं पाहणें हें अडाणीपणाचें लक्षण आहे. नोकरशाहीला गचांडी दिल्याशिवाय आपल्याला कोणतेंहि विधायक कार्य करितां येणार नाहीं ! विधायक कार्यक्रम नको, असें मी म्हणत नाहीं. परंतु या कार्यक्रमाबरोबरच तुम्हीं प्रतिरोध-वृत्तीची वाढ व जोपासना करणार नाहीं, तर तुमचा कार्यक्रम मध्येंच बंद

पडल्याशिवाय राहणार नाहीं. देशांत प्रतिरोधवृत्ति नांदत असेल तरच राष्ट्राचें निशाण अखंड फडकत राहील !

## डायरेक्ट अॅक्शन.

कांहीं लोक असें म्हणतात कीं, मला पार्लमेंटरी पद्धतीची चळवळ चालवावयाची आहे. सद्गृहस्थहो, आजकाल आपणांवर नानाप्रकारच्या शब्दांचा व शब्दसमुच्चयांचा भडिमार व जुलूम होत आहे. आपण युरोपियन शास्त्रांतील शब्द व म्हणी उचलतों; परंतु त्या आपल्या देशास लागू पडतात कीं नाहीं हें आपण पहात नाहीं—त्यामुळें तर हा जुलूम अधिक तीव्र झाला आहे. मला पार्लमेंटरी पद्धतीची चळवळ पाहिजे किंवा काय, या प्रश्नाचीं मी अनेकवार उत्तरें दिलीं आहेत. तुम्हांला पार्लमेंटरी पद्धतीची चळवळ पाहिजे कीं ' डायरेक्ट अॅक्शन ' पाहिजे ? हे दोनच प्रश्न व पारिभाषिक शब्द ह्या लोकांना पाठ आहेत. आतां या दोन्ही शब्दांची मी थोडी फोड करितों. कारण या शब्दजालाच्या धुक्यामुळेंच लोकांना खरें दृश्य दिसत नाहीं. पार्लमेंटरी पद्धतीची चळवळ म्हणजे काय ? जरूर ते कायदे पास करून देशाला सुस्थिति प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करणें याचेंच नांव ' पार्लमेंटरी अॅक्शन ' ! म्हणजे अशा प्रकारच्या ' पार्लमेंटरी अॅक्शन ' साठीं आधीं देशांत पार्लमेंट असलें पाहिजे. हिंदी कौन्सिलें हें पार्लमेंट आहे काय ? वरिष्ठ कायदेकौन्सिल हें पार्लमेंट आहे काय ? पार्लमेंटची सत्ता या संस्थांस आहे काय ? बिलकुल नाहीं. हिंदी कायदेमंडळें हीं कनिष्ठ दर्जाचीं कौन्सिलें आहेत. ब्रिटिश पार्लमेंटाला उद्यां चुटकीसरशीं आपली सबंध घटना बदलतां येईल. हिंदी कौन्सिलांना किंवा असेंब्लीला तसें करतां येणार नाहीं. मग मला 'पार्लमेंटरी अॅक्शन ' पाहिजे अशा कंड्या पिकविण्यांत काय अर्थ ? ' पार्लमेंटरी अॅक्शन'चा अर्थ न समजण्याइतका मी मूर्ख आहें काय ? मलासुद्धां संघटनेसंबंधींच्या कायद्याचें थोडेसें ज्ञान आहे, असें मला वाटतें. सद्गृहस्थहो, पार्लमेंटरी पद्धतीची चळवळ चालविण्याचा, 'पार्लमेंटरी अॅक्शन' करण्याचा माझा बिलकुल इरादा नाहीं ! मला माझ्या ' नाफेर ' पुराण—मताभिमानी असहयोग्यांप्रमाणें ' डायरेक्ट अॅक्शन'च पाहिजे आहे. फक्त कोणतेंहि

युद्धक्षेत्र आपल्या चळवळीच्या कक्षेंतून सोडावयाचें नाहीं एवढीच माझी इच्छा आहे. कौन्सिलांच्या बाहेर त्याचप्रमाणें आंतहि मला अत्यंत तीव्र स्वरूपाचें ' डायरेक्ट ॲक्शन ' करावयाचें आहे. आमच्या कौन्सिलांना ' कुर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् ' असा अखेरचा निर्णयात्मक अधिकार नाहीं म्हणून सर्व युद्धक्षेत्रें आपणांस मोकळीं आहेत. कायदे करून मला काडीइतकाहि फायदा होणार नाहीं, ही गोष्ट मला ठाऊक आहे. परंतु बाहेरून असहकारिता करून ज्याप्रमाणें तुम्ही नाफेर असहयोगी सरकारला नमवूं इच्छितां; त्याचप्रमाणें कौन्सिलांतील चळवळीनेंहि त्यांस नमवावें अशी माझी इच्छा आहे. तुमच्या रणक्षेत्रास जोडूनच मी आणखी एक रणक्षेत्र निर्माण करीत आहें, एवढेंच काय तें.

## तर मग बोला हरहर महादेव !

म्हणून माझी आपणां सर्वांस अशी विनंती आहे कीं, सध्यांची परस्थिति लक्षांत घेऊन हलकेहलके सरकारशीं रणसंग्रामास सुरवात करा. पहिला हल्ला निवडणुकींत भाग घेऊन चढवा. सरकार तुमचेविरुद्ध हुकूम सोडल्याशिवाय राहणार नाहीं. तसें झालें कीं, तुमच्या संग्रामास सुरवात झाली. निवडणुकी लढवा, कौन्सिलांत घुसा, तेथें 'डायरेक्ट ॲक्शन' साठीं प्रयत्न करा; आणि कसेंहि करून सरकारला नमविण्याचे प्रयत्न चालू ठेवा. तुमची शक्ति तुमचें ऐक्य, तुमचा उत्साह व आजपर्यंत तुम्ही पैदा केलेली तुमची प्रतिरोधशक्ति–हेंच तुमचें रणसाहित्य! या साहित्यासह सज्ज होऊन नोकरशाहीसमोर दंड थोपटून उभे रहा ! बाहेरील व आंतील असहकारितेमुळेंच फक्त आपण नोकरशाहीचा नक्षा उतरवून तिला नमवूं शकूं. आपण बाहेरच्याप्रमाणेंच आंतहि असहकारिता करणार नाहीं तर मग नोकरशाही म्हणेल—' खुशाल जंगलांत चालते व्हा, कारण त्यामुळें मवाळ लोक कौन्सिलांत शिरतील ! ते आमचे दोस्त आहेत !' मवाळ लोक सरकारपुढें सतरा वेळां नाक घांसतील. एकादें बिस्कीट किंवा रोटीचा चतकोर तुकडा अंगावर पडला तर लगेच ते तो कुत्र्यासारखे चघळत बसतील, तो मिळविल्याबद्दल स्वतःस धन्यवाद देतील व स्वतःस मोठे भाग्यवान समजतील. तुम्ही कौन्सिलें काबीज न केलीं तर अशीच परिस्थिति सतत चालू रहाणार

च तुमच्या असहकारितेस धक्का पोंचणार, हें तुम्हांला कळत नाहीं काय ? स्वातंत्र्याच्या मार्गांतील मवाळ कौन्सिलें हा कांटा आहे. म्हणून कौन्सिलांतील सर्व जागा काबीज करा; आणि असहकारितेची चळवळ दूरदृष्टीनें व जोमानें पुढें चालवा ! मी सांगतों त्याच्या निम्म्यानें देखील सध्यां तुमचे हातून कार्य होत नाहीं. तुम्हीं सविनय कायदेभंगाच्या गप्पा मारितां ! पुनः एकदां मी तुह्मांला माझा ' डायरेक्ट ॲक्शन ' चा अर्थ सांगतों. ' डायरेक्ट ॲक्शन'चा शेवट नेहमीं अत्याचारी बंडांत होत असतो. आपणांस अत्याचारी बंड करावयाचें नाहीं. आपणांस फक्त सविनय कायदेभंग करावयाचा आहे. अनत्याचारी असहकारितेंत आमचा विश्वास आहे. ' डायरेक्ट ॲक्शन ' हाच माझा हेतु आहे ही गोष्ट तुमच्यापैकीं पुष्कळांपेक्षां मला अधिक चांगली ठाऊक आहे. माझी खात्री आहे कीं, माझ्या ' डायरेक्ट ॲक्शन ' मुळें कौन्सिलांत प्रचंड शक्ति पैदा होऊन तिच्या ज्वाळा सर्वंत्र देशभर पसरतील व कौन्सिलांबाहेरील चळवळीच्या शक्तीची आग कौन्सिल व असेंब्ली हॉलांत जाऊन थडकेल. अशा परिस्थितींत सरकार लोकमत पायाखालीं तुडविण्याचें धाडस करील, तर ६० लाख मतदारांशीं त्यांची गांठ आहे, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी. आणि हे मतदार तरी कोणत्या प्रकारचे आहेत ? ते कांहीं लुंगेसुंगे लोक नसून सरकारला कर देणारे लोक आहेत. त्यांच्या सहाय्यानें सविनय कायदेभंग करावयाचा असेल तर एव्हांपासूनच रणसंग्रामास सुरुवात करा.

## शेवटपर्यंत लढा !

लोकांनीं एकजुटीनें केलेली मागणी लाथाडण्याइतकें सरकार मूर्ख ठरलें तर तुम्हीं आपापल्या जागांचे राजीनामे द्या व कौन्सिलांतून बाहेर पडा ! प्रत्येक दुकान बंद ठेवा ! वकिलांच्या व पक्षकारांच्या अभावामुळें कोर्टें ओस पाडा ! शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांस बाहेर काढून तींहि ओस पाडा ! ६० लाख मतदारांना सरकारला कर देण्याचें नाकारण्याविषयीं उपदेश करा ! तोच खरा सविनय कायदेभंग होईल ! आतां फक्त कायदेभंगाच्या गप्पा मारीत आहांत. असल्या शाब्दिक युद्धाला सरकार काडीइतकीहि भीक घालणार नाहीं. कारण, स्वतःचे शब्द खरे करून दाख-

विण्याचा मनोनिर्धार व शक्ति तुमच्या शब्दांमागें नाहीं, ही गोष्ट सरकार जाणून आहे. कारण कौन्सिलांमध्यें तुम्हीं त्यास निर्धास्त करून ठेविलें आहे ( You have put them at ease ) ही गोष्ट तें जाणून आहे. कौन्सिलांबाहेर काम कराच पण खुद्द कौन्सिलांत देखील त्यांस स्वस्थ झोंप मिळूं देऊं नका, असें माझें तुम्हाला सांगणें आहे. मनापासून लढाई खेळा व ती शेवटपर्यंत चालवा ! मला शिव्या देतां काय ? आणखी हजार दिल्यात तरी त्या सहन करण्याची माझ्या अंगांत ताकद आहे ! त्या सर्वांचें गाठोडें बांधून तें खांद्यावर टाकून चालण्याइतके माझे खांदे खास बळकट आहेत ( हंशा ) ! परंतु नोकरशाहीशीं निकराची लढाई खेळा व ती शेवटपर्यंत चालवा ! नोकरशाहीला स्वस्थ झोंप येऊं देऊं नका ! तिच्या शस्त्रागारांतून हत्यारामागून हत्यार बाहेर पडूं द्या ! त्याची पर्वा नाहीं. परंतु तिच्याशीं चहूंबाजूंनीं, लढा, एवढीच माझी विनंति आहे.

आणि मग सविनय कायदेभंगाची पाळी आली–ती येणारच नाहीं, अशी माझी खात्री आहे; कारण लोकमताच्या प्रचंड शक्तीपुढें जगांतील सर्व नोकरशाह्यांना नमावेंच लागलें आहे असा अनुभव आहे. तथापि कायदेभंगाची पाळी आलीच–तर त्याचें नेतृत्व मीं पत्करिलेलें तुह्मांला दिसेल ( टाळयांचा कडकडाट ) !

---

## १३—मद्रासेंतील दुसरें व्याख्यान.

ता. १ जून रोजीं दासबाबूंचें मद्रास येथें दुसरें व्याख्यान झालें. 'जस्टिस' पार्टीचेहि कांहीं लोक व्याख्यानास हजर होते. दासबाबूंचें व्याख्यान इतकें परिणामकारक झालें कीं बरेचसे ब्राह्मणेतर पक्षाचे लोक स्वराज्य पार्टीस येऊन मिळाले. दे. बं. दास आपल्या व्याख्यानांत ह्मणाले:—

" लखनौ येथें हिंदू–मुसलमानांत तडजोड झाली, त्याच सुमारास [ १९१६ सालीं ] मद्रासेस ब्राह्मणेतर पक्षाची चळवळ सुरू झाली. ब्राह्मणेतरांनीं आपल्या समाजाच्या उद्धारासाठीं चळवळ सुरू केल्याचें वृत्त ऐकून मला

अत्यानंद झाला. आतां लौकरच हिंदुस्थानाचा उद्धार होणार, असें मला वाटूं लागलें. कारण सर्व लोकपक्ष एकजुटीनें उभा राहून लढाईत सामील होणार अशीं चिन्हें मला दिसलीं आणि या आशेनेंच मी त्या चळवळीचें मनःपूर्वक स्वागत केलें. ह्या चळवळीमुळें स्वातंत्र्याचा रस्ता खुला होणार, असें खरोखर मला वाटत होतें. परंतु अखेरीस माझी निराशा झाली. गेल्या कांहीं वर्षांच्या चळवळींत ब्राह्मणेत्तरांनीं कोणती कामगिरी केली याचा उल्लेख मी येथें करूं इच्छित नाहीं. खरोखर सरकारशीं लढण्याला तुम्ही तयार असाल, तर आज या घटकेला आम्ही सर्वजण रागानें किंवा त्रस्त झाल्यामुळें नव्हे, तर तुमच्याबद्दल आदरभाव बाळगून, या चळवळींतून बाजूला होण्यास तयार आहों, अशी हमी मी तुम्हांस देतों ! द्विदल राज्य-पद्धतीमुळें आपापसांत भांडणें कशीं माजतात; व जातिभेद कसा फैलावतो याचा अनुभव आजपर्यंत आपणांस आलेलाच आहे. असें असतांना देखील लोक अहमहमिकेनें कौन्सिलांत गेले. कां ? तर तेथें दिवाणगिऱ्या, सेक्रेटरीच्या जागा वगैरेंसारखीं आमिषें होती ना ? त्या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, दिवाणगिऱ्यांसारख्या सरकारी आमिषांस बळी पडल्याकारणानें लोक आपल्या मातृदेशाला विसरले !

## ब्राह्मणेतर पक्षावर टीकास्त्र !

गेलीं तीन वर्षें ब्राह्मणेतर पक्ष कौन्सिलांतून अधिकारांत होता. सर्व दिवाणगिऱ्या त्यांचेच पदरांत पडल्या होत्या. असें असतांना देशाभिमानी लोकांचे बाबतींत त्यांनीं कोणतें धोरण पत्करिलें ? ज्यांनीं देशासाठीं स्वातंत्र्याचा झेंडा फडकाविला त्यांची संभावना या लोकांनीं कोणत्या प्रकारें केली ? हिंदूंची धार्मिक वर्पासनें-वगैरे बाबतींत या लोकांनीं नाठाळपणाचें धोरण स्वीकारिलें नाहीं काय ? मला ब्राह्मणेतर पार्टीच्या पाठीशीं एकहि तत्त्व दिसत नाहीं ! त्यांची पार्टी तत्त्वहीन आहे ! अर्थात या पार्टींतील ज्या सभासदांचा वरील कृत्यांशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं, अशांबद्दल मला कांहींहि बोलावयाचें नाहीं. ज्या द्विदल राज्यपद्धतीमुळें वरच्यासारखीं घातुक कृत्यें होऊं शकतात, तिचें अस्तित्व एक क्षणभरदेखील जास्त टिकूं देणें योग्य आहे

काय, याचा विचार करा! वरच्यासारखीं घाणेरडीं व लज्जास्पद कृत्यें अशक्य करून सोडण्यासाठीं सर्वांनीं एकजुटीनें जोराची चळवळ करणें इष्ट नाहीं काय? याचाहि आपण विचार करा अशी माझी आपणास प्रार्थना आहे. सरकारला राज्यपद्धति ह्मणून द्विदल राज्यपद्धति इतःपर कायम ठेवतां येणें अशक्य आहे. कौन्सिलच्या प्रश्नाचाहि आपण योग्य प्रकारें विचार करावा, अशी माझी विनंति आहे. अजूनहि सध्यांचा असह्य जुलूम सहन करण्याची आपली इच्छा आहे काय? असा माझा ब्राह्मणेतर पक्षास सवाल आहे. मेहेरबानी करून मी काय ह्मणतों तें नीट ऐका व प्रांतिक कौन्सिलांतील सर्व जागा काबीज करा! तुह्मी देशाचे स्वातंत्र्यासाठीं सरकारशीं मनोभावानें लढण्यास तयार असाल, तर ब्राह्मण लोक आज मागें राहून मोठ्या आनंदानें तुह्मांला जागा करून देतील, अशी मी तुह्मांस पुनः एकवार हमी देतों. तुमच्या आगमनामुळें त्यांस राग येणार नाहीं किंवा त्यांस त्रासहि वाटणार नाहीं. केवळ स्वातंत्र्यासाठीं स्वार्थत्यागबुद्धीनें ते मागें राहतील. ब्राह्मणेतर पक्षाला आपलें अस्तित्व सिद्ध करण्याची संधि मिळावी, या एकमात्र हेतूनें ते मागें राहतील! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याची तयारी असेल तर आपली स्वतंत्र पार्टी तयार करा!

## १४—तेल गेलें तूप गेलं, धुपाटणें हातीं आलें!

देशबंधु दास तुरुगांत असतां, सरकारकडून ज्या तहाच्या अटी सुचविण्यांत आल्या, त्यासंबंधींची हकीकत दासबाबूंनीं आपल्या एका व्याख्यानांत सांगितली होती. त्याबद्दल दासबाबूंवर अनेक लोकांनीं टीकेचा भडिमार केला. सदर टीकाकारांस उत्तर देतांना दासबाबू मदुरा येथें ह्मणाले:—

“ तडजोड स्वीकारावयास सांगण्यांत मी देशाची इभ्रत गमावण्याचा प्रयत्न केला, मी देशाच्या अब्रूचा विक्रय केला—अशा प्रकारचा आरोप कांहीं लोकांनीं माझ्यावर लादला आहे. सदर आक्षेपकांस माझें असें सांगणें

आहे कीं, तडजोडीचे बाबतींत माझ्यांत व महात्मा गांधींच्या मतांत फारच थोडा फरक होता, ही गोष्ट विसरूं नका.

## मतभेदाचीं कारणें.

दोन जादा अटी घालण्याचे बाबतींत महात्माजींत व माझ्यांत मतभेद झाला. या जादा अटी मला कां नापसंत होत्या, तें मीं आतां तुह्मांस सांगतों. प्रथमतः माझ्यामतें राऊंड-टेबल-परिषदेंतील प्रतिनिधींच्या विशिष्टत्वाविषयीं कोणत्याहि प्रकारची अट आपण घालावयास नको होती. ज्यांना राऊंड-टेबल-परिषद पाहिजे होती त्यांना ती भरूं द्यावयाची; व तिचा निर्णय आपणांस नापसंत झाला, तर असहकारितेची चळवळ तशीच पुढें चालू ठेवावयाची-हें धोरण आपण स्वीकारिलें असतें तर अधिक चांगलें झालें असतें, असें मला वाटतें. कोणत्याही प्रकारें आपले हातपाय बांधले जाऊं नयेत, अशी माझी इच्छा होती. आजच्या प्रमाणेंच मला त्यावेळींहि असें वाटत होतें कीं, कितीही राऊंड-टेबल परिषदा भरल्या तरी नोकरशाही आम्हांला आमचें स्वराज्य कधींहि देणार नाहीं. असें जरी होतें तरी सुद्धां त्या राऊंड-टेबल-परिषदेंत आणाभाका घेऊन नोकरशाहीनें दिलेलीं अभिवचनें बेइमानपणें पुढें तिनें पाळलीं नसतीं तर काय भयंकर परिणाम झाला असता, लोकमत किती प्रक्षुब्ध झालें असतें व असहकारितेची चळवळ किती वेगानें पुढें गेली असती याचा आपण विचार करा. आह्मांला असें वाटत होतें ह्मणूनच मी व मौ. अबुल कलम अझद यांनीं तहाच्या अटी स्वीकारण्याचें ठरविलें.

आतां मी दुसऱ्या अटीकडे वळतों. सर्व फतवा कैद्यांची-विशेषतः अलीबंधूंची मुक्तता झाली पाहिजे, अशी दुसरी अट होती. माझी अशी भावना होती कीं, समित्यांच्या कायद्याखालीं काढिलेला हुकूम परत घेतल्याकारणानें त्या कायद्याअन्वयें पकडलेले सर्व कैदी सोडून देणें सरकारला भाग पडेल व राऊंड-टेबल-परिषदेच्या निकालानंतर बाकीच्या कैद्यांची साहजिकच मुक्तता होईल. कारण त्यांचा समित्यांच्या कायद्याशीं संबंध नव्हता. त्यांचा फक्त स्वराज्याशीं संबंध होता. ह्मणून या दोन जादा

अटी तहाच्या मसुद्यांत घालूं नयेत, असें मला वाटत होतें. परंतु म. गांधींविषयीं माझ्या मनांत अत्यंत आदर व भक्ति वसत असल्याकारणानें राऊंड-टेबल-परिषदेंत कोणते सद्‌गृहस्थ असावेत, याची यादी मी सरकारकडे पाठविली. सरकारनें ती यादी पसंत केली. आणि अलीबंधूंच्या मुक्ततेच्या बाबतींत मी त्यांस असें कळविलें कीं, " आतां त्यांची मुक्तता करण्याची तुमची इच्छा नसेल, तर ती होईपर्यंत तुम्हीं मला व मौ. अबुल कलम अझद यांस मेहेरबानी करून केदेंतून सोडून देऊं नका ! "—हें सर्व कागदोपत्रीं पहावयास सांपडेल. परंतु मी त्याविषयीं जास्त कांहींहि बोलूं इच्छित नाहीं.

असो. अशी वस्तुस्थिति असतांना मी लोकांची इभ्रत धुळीस मिळविण्याचा प्रयत्न केला असें कोणी तरी सत्यप्रिय मनुष्य ह्मणूं शकेल काय ? मला तर उलट असें वाटतें कीं तडजोडीचें धोरण स्वीकारण्यांत मी लोकांची इभ्रत कायम राखून, असहकारितेची चळवळ यशस्वी झाली हें जगास सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न करीत होतों. मी जगाला असें सिद्ध करून दाखविणार होतों कीं—" ही पहा नोकरशाही ! हिनें दोन महिन्यापूर्वी एक कायदा पास केला; परंतु दोन महिन्यांच्या आंतच तिला तो परत घेणें भाग पडलें ! " ज्या असहयोगी वीरांना सरकारनें अटकेंत टाकलें त्यांना तसेंच तुरुंगांत ठेवण्याची सरकारची छाती नाहीं हें मी जगाला दाखविणार होतों आणि राऊंड-टेबल-परिषद आटोपल्यानंतर एक मोठें युद्ध सुरू करण्यासाठीं मी देशाला तयार करीत होतों. मी हिंदुस्थानच्या थकलेल्या प्रजेला असें सांगणार होतों कीं, बंधूहो, एका वर्षांत आपणांस संपूर्ण स्वराज्य मिळालें नाहीं, तरी बरेंचसें यश प्राप्त झालें आहे ! त्यावेळीं माझें धोरण मी स्पष्टपणें पुढीलप्रमाणें मांडलें होतें:—( १ ) तहाच्या अटी मान्य करून त्यांच्या जोरावर अधिक हक्कांसाठीं झगडा; किंवा ( २ ) त्या झुगारून द्यावयाच्या असतील तर सरकारशीं चाललेलें युद्ध तरी जोरानें पुढें चालवा ! परंतु या दोहोंपैकीं काहींच झालें नाहीं. 'तेल गेलें, तूप गेलें, हातीं धुपाटणें आलें ' अशांतली स्थिति झाली. आणि अखेरीस फेब्रुवारी महिन्यांत चौरीचौऱ्याच्या दंग्यानंतर महात्माजींनीं हत्यारें खालीं ठेवून शस्त्रसंन्यास

पुकारला ! त्यांच्या दृष्टीनें त्यांचें करणें बरोबर असेल किंवा चुकीचें असेल. मला त्याच्याशीं कर्तव्य नाहीं. कारण तें बरोबर होतें कीं चूक होतें हा सध्यां प्रश्न नाहीं. त्यांच्या कृत्यामुळें देशाची काय अवस्था झाली, याचाच फक्त आपणांस विचार करावयाचा आहे. मी तुरुंगांत जातांना राष्ट्रांत जो जिवंतपणा उसळलेला मला दिसत होता, तो जिवंतपणा आज कोठें गेला ? ज्या चळवळीच्या जोरापुढें नोकरशाहीला मान वांकवावी लागली, ती चळवळ आज कोठें गेली ? नोकरशाहीच्या गेल्या १५० वर्षांच्या कारकीर्दींत तुह्मांला अशा प्रकारचा देखावा पूर्वीं कधीं तरी दिसला होता काय ? सरकारनें आपण होऊन आमच्याकडे पाठविलेल्या अटी हा असहकारितेच्या यशस्वितेचा पुरावा होता ! सरकारनें त्या आमच्याकडे पाठविल्या त्यावेळीं आह्मीं त्यांचा स्वीकार केला नाहीं. त्या स्वीकारा ह्मणून सांगण्यांत मी चुकलों कीं बरोबर होतों, याचा तुमचा तुह्मींच विचार करा. त्या बाबतींत तुमचें माझें सहमत होवो अगर मतभेद होवो, त्याची मला फिकीर नाहीं. परंतु तुह्मांला माझा एकच सवाल आहे— माझ्या संबंध भाषणांत म. गांधींवर शिंतोडे उडविण्याचा मी जरा तरी प्रयत्न केला होता काय ? आजपर्यंत महात्माजींवर कधींहि कोणत्याहि प्रकारचे शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न मी केलेला नाहीं. तुमच्यापेक्षां माझ्या मनांत महात्माजींविषयीं अधिक आदर व भक्ति वसत आहे, ही गोष्ट माझ्या टीकाकारांनीं लक्षांत ठेवावी.

## या घटकेला काय केलें पाहिजे ?

सध्यां देशांत पसरलेलें शैथिल्य घालवावयाचें कसें ? हाच या घटकेला आपणांपुढील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. सध्यां देशांत शिथिलता पसरली आहे ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. असा एक कांग्रेससभासद नाहीं— मग तो सभासद अल्पमतवाला असो, बहुमतवाला असो अगर बहुमतवाल्यांतूनहि फुटलेला असो—कीं ज्याला ही गोष्ट मान्य नाहीं. असें आहे तर मग ही कोंडी फोडावयाची कशी ? जुने सिद्धांत व जुने ठराव घोंटीत बसल्यानेंच सध्यांच्या कोंडीमधून आपली सुटका होईल, असें आपणांस वाटतें काय ? आजपर्यंत पास केलेले ठराव पुनश्च घोंटीत बसणें हेंच

सध्यांच्या स्थितींत जरूर आहे असें खरोखर तुह्मांस वाटत असेल, तर तें सोडून द्या असें मी कधींहि तुह्मांला सांगणार नाहीं. माझ्या कार्यक्रमानेंच प्रस्तुत कोंडमाऱ्यांतून आपली सुटका होईल, इतर कशानेंहि होणार नाहीं, अशी बढाईहि मी मारूं इच्छित नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, सद्यःस्थितींत मला माझ्या कार्यक्रमापलीकडे दुसरें कांहींहि शक्य दिसत नाहीं. माझ्या उत्साहहीन देशबांधवांस मला पुनश्च उत्साहपूर्ण करावयाचें आहे. तसें मी करणार नाहीं तर तें पाप होईल, असें माझी सदसद्विवेकबुद्धि मला सांगत आहे. आज तुह्मीं कांग्रेसच्या घटनेसंबंधींचीं भांडणें जोरजोरानें भांडत बसला आहांत खरें; परंतु दुसरीकडे तुमची संबंध चळवळ धुळीस मिळण्याच्या पंथाला लागली आहे ही गोष्ट तुह्मी विसरूं नका. पोकळ सिद्धांत, नियम व दाखले यांचा सारखा खल करण्यांत तुह्मी गढलेले असतांना प्रत्यक्ष कांग्रेसचा अंत होण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे, इकडे तुमचें लक्ष्य आहे काय ? मेहेरबानी करून कांग्रेसमध्यें नवीन जोमदारपणा उत्पन्न करा ! जिवंतपणास विघातक असे ठराविक मंत्रोच्चार आतां पुरे झाले ! राष्ट्रांत जिवंतपणा आणण्याची शक्ति ज्या मंत्रांत नाहीं ते मंत्र काय कामाचे ? लोकांना नुसते मंत्रोच्चार करीत बसण्याचा कधींच कंटाळा नाहीं ! तुमच्या मंत्रांचे घोष करून सुद्धां लोक ऐदी, आळसट व पतित स्थितींत मला आढळले तर तुमचे हे सगळे मंत्र निष्परिणामी व टाकाऊ आहेत असें म्हटल्याशिवाय मी कधींहि राहणार नाहीं !

## १५—श्री. राजगोपाळाचार्यांस उत्तर.

नाफेरपक्षाचे पुढारी श्री. राजगोपाळाचार्य यांच्या टीकेस उत्तर देतांना देशबंधु दास सालेम येथें म्हणाले:—

" मद्रासच्या जनतेचें प्रेम संपादन केल्याबद्दल मी स्वतःस खरोखर धन्य समजतों. माझ्या टीकाकारांची मात्र माझ्यावर खप्पा मर्जी झाली आहे. वास्तविक पाहतां, माझ्या भाषणांची भाषा अगदीं साधी व कोणत्याही प्रामाणिक

व सरळ माणसास सहज समजण्यासारखी होती. परंतु कांहीं अतिशहाण्या लोकांस ती समजली नाहीं असें दिसतें आणि म्हणून त्यांनीं आपल्या चलाख बुद्धीस अनुसरून माझ्याविरुद्ध वकिली डावपेंचाचीं भापणें करण्यास सध्यां सुरुवात केलेली आहे. मी वकिली डावपेंच केव्हांच सोडले आहेत. वकिली सोडली तेव्हां वकिली कावाहि मी मागेंच टाकून दिला. परंतु माझ्या पाटची ही वकिली काव्याची साडेसाती मात्र सुटत नाहीं ! ती टीकाकारांच्या रूपानें माझ्या पाटीशीं सारखी हात धुवून लागली आहे !

## श्री. राजगोपाळाचार्यांची हजेरी.

आतां मी बहुमतवाल्या पक्षांतून फुटून बाहेर पडलेल्या नाफेरवाल्या असहयोग्यांच्या टीकेकडे वळतों. प्रथमतः श्री. राजगोपाळाचार्यांच्या टीकेस मला उत्तर दिलें पाहिजे. कारण त्यांनीं इंग्रजींत भापण केलें असें मला कळतें. तसें करण्यांत त्यांचा हेतु हा कीं मला तें भाषण नीट समजावें व मी त्यास उत्तर द्यावें. तेव्हां त्यांच्या भापणाची प्रथम हजेरी घेतल्यास त्यांचा अनादर केल्याचा आरोप माझ्यावर येणार नाहीं. त्यांनीं आपल्या सबंध भापणांत इतके नाजूक हल्ले माझ्यावर चढविले आहेत कीं तसले हल्ले मला एकाद्या कायदेकोर्टांतच पहायला मिळाले असते. त्यांच्या विपयप्रतिपादनासंबंधींच्या नैपुण्याबद्दल खरोखरच मला त्यांची तारीफ करावीशी वाटते. श्री. विजयराघवाचार्यांची कड घेऊन त्यांनीं माझ्यावरील टीकेस सुरुवात केली आहे. विजयराघवाचार्यांबद्दल श्री. राजगोपाळाचार्यांच्या मनांत इतकें अलोट प्रेम वसत आहे, हें पाहून मला मोठा आनंद वाटतो. विजयराघवाचार्यांच्या बाजूनें भांडल्याबद्दल ते त्यांचे खास आभार मानतील, याबद्दल मला बिलकुल शंका वाटत नाहीं. विजयराघवाचार्य मला पहिल्यापासून पाण्यांत पाहतात, असें म्हणण्यांत मी भयंकर मोठी चूक केली असें राजगोपाळाचार्यांचें म्हणणें आहे. परंतु त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांतून एक लहानसा मुद्दा अजिबात सुटला आहे, असें मला वाटतें. विजयराघवाचार्य माझ्याशीं जाणूनबुजून शत्रुत्वाचे नात्यानें वागतात, असें मी कधींहि म्हटलेलें नाहीं. ते अजाणतांच

माझ्याशीं शत्रुत्वाचे नात्यानें वागतात, असें मी ह्मटलें होतें. आणि एवढाच माझा गुन्हा असेल, तर तो मला कबूल आहे. मात्र विजयराघवाचार्यांना अजाणतां होणाऱ्या या द्वेषाचा थोडासा तरी सुगावा असला पाहिजे असें मला आतांपर्यंत वाटत होतें. परंतु ती माझी चूक होती असें दिसतें. कारण विजयराघवाचार्यांचे मनांत कोणाबद्दलही, कसल्याही प्रकारचा द्वेष अगर शत्रुत्व वसत नाहीं, असें राजगोपाळाचार्य मला खात्रीपूर्वक सांगत आहेत ना ! खरोखर राजगोपाळाचार्यांच्या तोंडून बाहेर पडलेले हे उद्गार मला मान्य करणें भाग आहे.

## कांहीं नाजूक हल्ले !

आतां मी कांहीं नाजूक हल्ल्यांकडे वळतों. राजगोपाळाचार्यांनीं सुरवातीस माझ्याशीं सहमत असल्याचें प्रदर्शित केलें आहे. त्यांनीं आपल्या श्रोत्यांस असें सांगितलें कीं, आजपर्यंत आपल्या हातून व्हावें तितकें काम झालें नाहीं हें दासबाबूंचें म्हणणें बरोबर आहे. आणि म्हणून अधिक जोरानें खादीप्रसार करून तुम्हीं दासबाबूंना गार करून टाकलें पाहिजे. यानंतर पुढील नाजूक हल्ला त्यांनीं चढविला. ते म्हणाले—" परंतु आपल्या हातून पुरेसा खादीप्रसार होऊं शकला नाहीं, म्हणून आपण कौन्सिलांतच गेलें पाहिजे ही गोष्ट मात्र मला मान्य नाहीं ! " मी हे उद्गार काढिले असें त्यांनीं आपल्या श्रोत्यांस सांगितलें नाहीं; परंतु मीच वरील प्रकारचे उद्गार काढिले असावे, अशा प्रकारची गैरसमजूत होण्याइतकी फट मात्र त्यांनीं ठेऊन दिली. " आपल्या हातून पुरेसा खादीप्रसार झाला नाहीं, म्हणून आपण कौन्सिलांतच गेलें पाहिजे " असें मी कदापि म्हटलें नाहीं व म्हणत नाहीं, ही गोष्ट राजगोपाळाचार्यांस ठाऊक नाहीं काय ? ज्यांचा फक्त विधायक कार्यक्रमांतच विश्वास आहे, त्यांनीं हल्लींपेक्षां तो अधिक जारीनें अंमलांत आणला पाहिजे, एवढेंच फक्त मी म्हणालों होतों. परंतु यापासून " तुमच्या हातून व्हावें तितकें खादीकार्य झालें नाहीं, म्हणून तुम्हीं कौन्सिलांतच गेलें पाहिजे " असा ध्वनि कसा निघूं शकतो, तें मला समजत नाहीं. यानंतर पुनः " कांग्रेस–सभासदांची संख्या वाढवा " असा मी उप-

देश केला, याबद्दल राजगोपाळाचार्यांनीं आपलें सहमत प्रगट केलें आहे. परंतु त्याच्या पाठोपाठ पुढील नाजूक हल्ला त्यांनीं चढविला आहे. ते म्हणतातः—" परंतु कौन्सिलांत सभासद पाठविल्यानें कॉंग्रेस-सभासदांची संख्या वाढण्यास सुरुवात होईल, हें दासबाबूंचे म्हणणें मात्र मला पटत नाहीं ! " मी कधींहि असें बोललों नाहीं; किंवा माझ्या कोणत्याहि भाषणांतून असा अर्थ निष्पन्न होत नाहीं. परंतु, तसे उद्गार काढण्याचा मूर्खपणा मी केला असें राजगोपाळाचार्यांचें भाषण वांचून मात्र कोणासहि वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

## हिंदूमुसलमानांच्या ऐक्याचा मार्ग.

नंतर ते हिंदुमुसलमानांच्या ऐक्याकडे वळले आहेत. ते रागारागानें अशी पृच्छा करितात कीं, " दासबाबूंच्या 'कॅनव्हासिंग' मुळें हिंदुमुसलमानांची कधीं तरी एकी होणें शक्य आहे काय ? " व्यासपीठावर उभें राहून नुसती व्याख्यानबाजी केल्यानें तरी हिंदुमुसलमानांची एकी होईल, असें श्री. राज-गोपाळाचार्यांस वाटतें काय? मी मदुरा येथें कॉंग्रेसकमिटीला "हिंदुमुसलमा-नांची एकी घडवून आणण्यासाठीं तुम्हीं काय केलें आहे ? कोणत्या व्यवहार्य उपायांची तुम्हीं योजना केली आहे ?" असा सवाल केला होता. केवळ विधायक कार्यक्रम घोटीत बसल्यानेंच स्वराज्य मिळेल असें ज्यांस वाटतें, त्यांस 'नुसत्या विधायक कार्यक्रमानें स्वराज्य कधीं तरी मिळेल काय ?' असा सवाल मी टाकला होता. त्यांत वावगें काय झालें ? फक्त खांद्याशीं खांदा लावून काम करा, म्हणजे आपोआप एकी होईल, असें मी म्हटलें आहे. नुसत्या गप्पा मारून एकी कधींहि होणें शक्य नाहीं. आणि ह्मणून माझी अशी सूचना आहे कीं, सबंध कॉंग्रेसनें विधायक कार्यक्रमाबरोबरच कौन्सिलप्रवे-शाचा प्रश्नहि हातीं घेतला तर कौन्सिलें काबीज करण्यासाठीं सर्व हिंदूमुस-लमान खांद्यास खांदा लावून काम करूं शकतील. सदर दोन्ही समाजांचा एकमेकांशीं अधिकाधिक संबंध येऊन त्यांजमधील स्नेहभाव वृद्धिंगत व्हावा ह्मणून कॉंग्रेसनें आपलें कार्यक्षेत्र अधिक व्यापक केलें पाहिजे, असें माझें ह्मणणें आहे. ज्या हिंदूमुसलमानांची केवळ विधायक कार्यक्रमावरच श्रद्धा

आहे ते एकजुटीनें काम करतील; व ज्या हिंदूमुसलमानांस कौन्सिलप्रवेश मान्य आहे तेहि एकजुटीनें काम करतील. हिंदूमुसलमानांच्या एकीचा प्रश्न हा कांहीं निराळा नाहीं. कॉंग्रेसचें कार्य जितक्या सचोटीनें होत जाईल, तितक्या प्रमाणांत हा प्रश्न सुटणार आहे. कॉंग्रेसमध्यें जिवंतपणा होता, त्या-वेळीं पंजाबांतील हिंदूमुसलमानांत खरी एकी नांदत होती. परंतु कॉंग्रेस-मध्यें शिथिलता पसरतांक्षणींच हजारों प्रकारचे तंटेबखेडे त्यांच्यामध्यें सुरू झाले. तुम्ही त्यांना मोकळे ठेवूं नका. काम भरपूर असलें कीं त्यांना तंटेब-खेडे करण्यास वेळच मिळणार नाहीं व दोन्ही समाजांत खरी एकी नांदूं लागेल. अशा परिस्थितींत केवळ मला गप्प बसविण्यासाठीं—' तुमच्या कौन्सिल–कॅनव्हासिंगमुळें तरी थोडीच एकी होणार आहे ? ' असें उत्तर देणें न्याय्य होईल काय ? नुसता कार्यक्रम पुढें मांडल्यानें–मग तो कोणाचाहि असो, एकी कधींहि होणार नाहीं. तो कार्यक्रम एकजुटीनें अमलांत आला तरच एकी होऊं शकेल. ह्मणून निरनिराळया प्रवृत्तीच्या माणसांस एके ठिकाणीं काम करण्याची संधि देण्यासाठीं आपला कार्यक्रम अधिक व्यापक करा, असें माझें कॉंग्रेसला सांगणें आहे.

## कौन्सिलविध्वंसन.

आतां आपण कौन्सिलविध्वंसनाच्या तत्त्वाकडे वळूं. कौन्सिलविध्वंसन या शब्दाचा श्री. राजगोपाळाचार्यांनीं आपल्या वकिली काव्यास साजेसा अर्थ केला आहे. " कौन्सिलचे नियमच असे आहेत कीं तेथें फक्त शाब्दिक लढाईच शक्य आहे !" असें राजगोपाळाचार्य म्हणतात. राजगोपाळाचार्य कौन्सिलचे नियम विसरले असावे असें मला वाटतें. बजेट नामंजूर कर-ण्यासारखे अधिकारहि कौन्सिलांच्या नियमाअन्वयें लोकांना मिळाले आहेत असें मला वाटतें. तुमचें बहुमत असेल तर सरकारनें पुढें आणलेला कोण-ताही ठराव हाणून पाडण्याची तुम्हांला नियमांनीं परवानगी दिली आहे. त्याचा फायदा घेऊन तुम्ही सरकारचा प्रत्येक ठराव हाणून पाडाल तर तें कौन्सिलविध्वंसनच होणार नाहीं काय ? 'व्हेटो'चा अधिकार हा अंमलबजा-वणीखात्याचा आहे. परंतु ' बुडत्याला काडीचा आधार ' या न्यायानें

या ' व्हेटो ' च्या अधिकाराचा उपयोग करूनच सरकार राज्यकारभार हांकणार असेल, तर मग सुधारणा धुळीस मिळण्याचें तें कोठें बाकी राहिलें ? सुधारणांचा विध्वंस करण्यासाठीं म. गांधींनीं कौन्सिलबहिष्कार पुकारला त्यावेळीं त्यांचा तरी काय उद्देश होता ? समजा, कॉंग्रेसचा ठराव पूर्णपणें यशस्वी झाला असता, एक मतदारहि मत देण्यास गेला नसता व कौन्सिलांतील सर्व जागा ओस पडल्या असत्या—तर त्यामुळें तरी सुधारणांचा विध्वंस कोणत्या प्रकारें झाला असता ? त्यावेळीं तरी अंमलबजावणीखात्याचे अधिकार नष्ट झाले असते काय ? केव्हांहि नाहीं ! कॉंग्रेसचा कौन्सिलबहिष्कार पूर्णपणें यशस्वी झाला असता तरीसुद्धां सरकार फक्त सुधारलेल्या कौन्सिलांच्या द्वारें आपला राज्यकारभार हाकूं शकलें नसतें. याचेंच नांव कौन्सिलविध्वंसन ! आणि तेंच मला पाहिजे आहे. तुमचा कार्यक्रम अयशस्वी झाला, म्हणून माझा कार्यक्रम हातीं घ्या, असें माझें म्हणणें आहे. पण माझ्या बाबतींत तेवढें ' कौन्सिलविध्वंसन झालें तरी अंमलबजावणी सरकार कायम राहील ना ? ' असें तुम्हांला विचारतां येतें; पण तुमच्या धोरणानें तरी तें कोठें कायम राहत नाहीं ? अंमलबजावणी–सरकारच्या अस्तित्वामुळें आमची बाजू पडणार असेल, तर तुमच्या धोरणाचाहि तोच परिणाम होणार आहे. असा परिणाम होणें हें वैगुण्य असेल तर तुमच्या व माझ्या दोघांच्याहि कार्यक्रमांत तें सारखेंच कायम आहे. महात्माजींना या साऱ्या गोष्टी समजत होत्या. त्यांना अंमलबजावणी-सरकारचा अंत करावयाचा नव्हता. त्यांना फक्त सुधारणांचा अंत करावयाचा होता ! माझा देखील तोच उद्देश आहे. आणि तो मला पूर्णपणें मान्य आहे. फक्त तो उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं कॉंग्रेसनें योजलेल्या उपायांचे बाबतींत माझा मतभेद आहे. मी म्हणतों, निराळ्या मार्गानें चला. महात्माजींचा लोकांवर फार विश्वास. माझा तेवढा नव्हता. मला लोकांच्या स्वभावाचा महात्माजीपेक्षां जास्त अनुभव आहे. कॉंग्रेसनें कौन्सिलांत जाऊं नका असें सांगितलें व बहुसंख्याक मतदारांनीं मतें दिलीं नाहीं, तर मवाळ लोकसुद्धां कौन्सिलांत जाणार नाहींत असें महात्माजींना वाटत होतें. मनुष्यस्वभावावर केवढा प्रचंड विश्वास हा ! खरोखर त्याबद्दल

प्रत्येकाला महात्माजींची कींवच वाटेल. स्वतःच्या लोकांबद्दल एवढा दांडगा विश्वास बाळगणारा मनुष्य मी आजपर्यंत पाहिला नव्हता. नागपूरचा ठराव वाचून पहा. त्यांतसुद्धां, आपणांस बहुसंख्याक मतदारांनीं मतें दिलीं नाहींत म्हणून मवाळ कौन्सिलर आपापल्या जागांचे राजीनामे देतील, असा विश्वास त्यांनीं प्रगट केलेला दिसून येईल. या आशेच्या हांकेला मवाळांनीं कोणत्या प्रकारची ' ओ ' दिली, हें आतां आपणां सर्वांच्या प्रत्ययास आलेलेंच आहे. आम्हीं कौन्सिलबहिष्कार पुकारला तरी कौन्सिलें ओस न पडतां तीं पूर्वींप्रमाणेंच जोरानें चालू आहेत. परंतु हा पराभव सरळ रीतीनें राजगोपाळाचार्य थोडाच मान्य करणार? त्यांचें असें म्हणणें आहे कीं, आम्हीं कौन्सिलें केव्हांच मोडून टाकलीं ! तुम्हांला वाटेल कीं मी थट्टा करीत आहे. परंतु ही थट्टा नव्हे. राजगोपाळाचार्यांच्या अगदीं तोंडचे हे शब्द आहेत. ते म्हणतात कीं, "ज्या तऱ्हेचें कौन्सिलविध्वंसन शक्य होतें, तें केव्हांच होऊन गेलेलें आहे !" पूर्वींइतक्याच जोरानें कौन्सिलें चाललेलीं डोळ्यासमोर चक्क दिसत असतांना, आम्हीं कौन्सिलांचा विध्वंस केला असें ह्मणणें हें आश्चर्य नव्हे काय ? श्री. राजगोपाळाचार्य म्हणतात कीं, कौन्सिलें ही ' माया ' आहे ! मग त्या कौन्सिलानीं जे ठराव पास केले ते सुद्धां ' माया'मयच काय ? समित्यांच्या कायद्याखालीं आमचे हजारों तरुण तुरुंगांत गेले, ही सुद्धां मायाच होती ना ? मिठावरील कर हीसुद्धां मायाच अं ? नंतर राजगोपाळाचार्यांनीं आपल्या विध्वंसन–सिद्धांताचें विवरण केलें आहे. ते म्हणतातः—

### " कौन्सिलांचा विध्वंस केव्हांच होऊन गेला !"

" कौन्सिलांचा उपयोग करणें याचा अर्थ तीं निरुपयोगी करून टाकणें हाच होय !" आजचीं कौन्सिलें निरुपयोगी ठरलीं आहेत काय ? या घटकेलासुद्धां नोकरशाहीच्या हातांत तें एक जबरदस्त हत्यार बनून राहिलेलें आहे. " कौन्सिलांचा उच्छेद करणें म्हणजे कौन्सिलांसंबंधींच्या मिथ्याभावनेचा उच्छेद करणें होय !" शाबास, तुम्हीं कौन्सिलांसंबंधींच्या मिथ्याभावनेचा फक्त उच्छेद करणार काय ? आणि हिला मिथ्या भावना तरी कां समजतां ? तर " कौन्सिलांमधून तुम्हांस स्वराज्य प्राप्त होणार नाहीं म्हणून." हें मात्र

खरें. "स्वराज्यास पायाभूत असे हक्क देखील तेथें तुम्हांस मिळणार नाहींत." परंतु, तुम्हांस स्वराज्य देणें हा मुळीं कौन्सिलांचा उद्देशच नाहीं हें तुम्हीं कां विसरतां? कौन्सिलांतून स्वराज्य मिळालें नाहीं, म्हणून ती माया ठरते काय? पंजाबांतील लोकांवर जे अत्याचार झाले तीसुद्धां मायाच होती काय? हातांत बिड्या ठोकून आमच्या हजारों देशबांधवांना तुरुंगांत टाकण्यांत आलें, हीसुद्धां मायाच काय? त्यांत सत्यांश बिलकुल नव्हता काय? कौन्सिलें ही माया आहे असें म्हटल्यानें आम्हीं कौन्सिलांचा भंग केला, असें त्यांचें म्हणणें आहे. राजगोपाळाचार्यांचे पुढील ठळक उद्गार पहा. ते म्हणतातः—"कौन्सिलांचा विनाश होऊं नये अशा प्रकारचे संरक्षक नियम सरकारनें केलेले आहेत!" यावरून राजगोपाळाचार्यांनीं कौन्सिलांचा भंग केला असला तरी त्यांचा अजिबात नाश ते करूं शकले नाहींत ही गोष्ट त्यांस कबूल आहे असें स्पष्ट दिसतें. पण या घटकेलासुद्धां, ते ऑ. ई. कां. कमिटीचा निर्णय धाब्यावर बसवून कौन्सिलप्रवेशेच्छु लोकांचें मार्गांत अडथळे उत्पन्न करीत आहेत. आतां असें कां करितां? कौन्सिलांचा भंग तुम्हीं पूर्वींच केलेला आहे ना? मग भंगलेल्या कौन्सिलांत आम्हीं जाऊंच शकणार नाहीं, असें तुम्हांस वाटावयास नको काय? तुम्हीं कौन्सिलें पूर्वींच मोडलीं आहेत ना? मग आम्हांला अडथळा कां करितां? कौन्सिल-विध्वंस अशक्य करून सोडणारे नियम सरकारनें करून ठेविले आहेत तर मग कौन्सिलबहिष्कार पुकारण्यांत तरी काय अर्थ? कारण कोणत्याहि परि-स्थितींत कौन्सिलें कायमच राहणार! खरी मौज अशी आहे कीं, कौन्सिल-भंगाचे बाबतींत राजगोपाळाचार्यांची जीभ बांधली गेली आहे. त्यांना त्याविरुद्ध 'ब्र' देखील काढितां येणार नाहीं. कारण महात्माजींनीं कौन्सिलभंगाचा पुरस्कार केला होता! तेव्हां आतां कौन्सिलांचा भंग केव्हांच होऊन गेला, असें त्यांस म्हणणें भाग आहे. परंतु आपली बाजू ढांसळली आहे याची त्यांना देखील जाणीव आहे. आणि म्हणूनच कौन्सि-लांचा भंग झाला असला तरी त्यांचा अद्यापि अंत झाला नाहीं, ही गोष्ट त्यांनीं मान्य केली आहे. त्यास माझें एवढेंच उत्तर आहे कीं—" तर मग तुम्ही पुढें व्हा; आणि कौन्सिलांचा नायनाट करा!"

## कांचनमृगाची शिकार !

श्री. राजगोपाळचार्यांना रामायण नीटसें समजलें नाहींसें दिसतें. ते म्हणतात:—“ मला कौन्सिलांत मारीच राक्षस दिसतो. कांचनमृगानें सीतेचें चित्त हरण केलें त्याचप्रमाणें हीं कौन्सिलें आपणांस धोक्यांत पाडणार आहेत असें मला वाटतें. लक्ष्मण म्हणाला, रामा हा मृग नसून राक्षस आहे. तरीसुद्धां राम त्याच्या शिकारीस निघाला व सीता गमावून बसला ! त्याच प्रमाणें आमचे राम श्री. दास हे म्हणत आहेत कीं, मला कौन्सिलांची शिकार व नाश केलाच पाहिजे ! परंतु वाल्मीकीनें रामायणांत काय लिहून ठेविलें आहे ? कांचनमृगाच्या शिकारींत दंग झाल्यामुळेंच रामानें सीता गमाविली !” राजगोपाळचार्यांनी रामायण वाचलें, पण व्यर्थ. मी राम नाहीं. सुधारणांच्या पाठीशीं लागलेला राम दुसराच कोणीतरी आहे. मला सुधारणाकायद्याच्या श्रृंखलांनीं बद्ध झालेली आमची सीतादेवी मात्र लंकेमध्यें बंदिवासांत पडली आहे असें दिसतें. तिचे हातपाय घट्ट बांधले गेले आहेत. आतां राजगोपाळाचार्य असें विचारितात कीं, राम शिकारीस गेले म्हणून लक्ष्मणानेंसुद्धां त्यांचे बरोबर जावें कीं काय ? मी म्हणतों, होय गेलेंच पाहिजे ! कारण सीतादेवी–आमची मातृभूमि बंदिवासांत आहे ! राम, लक्ष्मण व त्यांचें सबंध सैन्य समुद्रपार होऊन लंकेंत जाऊन थडकणार नाहीं, तर सीतादेवीचें बंधविमोचन व्हावें कसें ? सीतादेवीला बंधमुक्त करण्यासाठींच तुम्हीं माझ्या पाठोपाठ चला, अशी माझी तुम्हांला विनंति आहे. रामायणाचा संदेश आपण पुरा केला पाहिजे. हें स्वराज्याच्या सैनिकांनों ! सीतादेवीला बंधविमुक्त करून स्वातंत्र्यभूमींत परत आणण्यासाठीं तुम्हीं शत्रूच्या बालेकिल्ल्यांत प्रवेश करून तेथें हरहरमहादेव पुकारा, अशी माझी तुम्हांला आग्रहाची विनंति आहे. धर्मयुद्धांत सामील होण्याचें तुम्हीं नाकाराल काय ? ”

---

[library stamp]

## १६—स्वराज्यपार्टीच्या टीकाकारांस !

चितूर येथील व्याख्यानांत देशबंधू दास म्हणाले:—" देशाला अमका कार्यक्रम मान्य आहे आणि तमका नाहीं–अशा प्रकारचीं विधानें पुष्कळ लोक करितात. त्यावर तुम्ही कदापि विश्वास ठेवूं नका असें माझें तुम्हांला सांगणें आहे. मी सबंध देशभर हिंडून आलों आहें. देश माझ्या कार्यक्रमास विरुद्ध आहे, अशा प्रकारचीं विधानें वारंवार करण्यांत येतात. त्यांत बिलकुल जीव नाहीं, अशी माझी खात्री झाली आहे. देश माझ्या पाठीशीं आहे कीं तुमच्या पाठीशीं आहे हा प्रश्नच मुळीं आज उद्भवत नाहीं. ज्यांना थोडेंसें तरी देशहित करावेंसें वाटतें, त्यांनाच उद्देशून मी बोलत आहें. देशांतील शैथिल्य कसें घालवावयाचें हा सध्यां आपणांपुढील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि त्या दृष्टीनें सध्यांच्या परिस्थितीचा विचार करणें, हें प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी माणसाचें कर्तव्य आहे. ज्या कार्यक्रमानें आपली शिथिलता जाऊन आपण स्वातंत्र्याच्या मार्गाप्रत जाऊन पोहचूं, तोच कार्यक्रम धर्म व नीति यांस धरून आहे, असें समजलें पाहिजे. आज सबंध देश माझ्या विरुद्ध असून माझा कार्यक्रम नीतिशुद्ध असेल, तर सबंध देश माझ्याविरुद्ध आहे हें कारण माझ्या कार्यक्रमाविरुद्ध दाखवितां येणार नाहीं. उलट पक्षीं सबंध देश माझ्या पाठीशीं असून माझा कार्यक्रम पंगू असेल, तर सबंध देश पाठीशीं असणें हें माझ्या कार्यक्रमास अनुकूल कारण म्हणतां येणार नाहीं ! देश आज ज्या गोष्टी झिडकारून टाकतो त्याच तो उद्यां शिरसामान्य समजतो, असा अनुभव आहे. देशसेवा करूं इच्छिणारे लोक आत्मार्पण करण्यास कितपत तयार आहेत, यावरच देशाचा जय अगर पराजय अवलंबून असतो.

तर्कशास्त्राच्या कसोटीवर माझा कार्यक्रम घांसून पहाण्याची तुमची इच्छा असेल तर तसें मात्र आपण जरूर करा. मद्रासच्या लोकांना तर्कशुद्ध गोष्टी फार आवडतात, असें मला कळलें आहे. मी तर्कवादाला कधींच भीत नाहीं. परंतु जो तर्कवाद आमच्या धर्मप्रवृत्तीच्या चौकटींत बसूं शकणार नाहीं, त्याविरुद्ध मात्र कोरडे ओढल्याशिवाय मी राहणार

ग्रंथ संग्रहालय नं.

नाहीं. माझ्या उच्च प्रवृत्तीशीं जो तर्कवाद मला सुसंगत वाटतो, तोच मला पटतो व आवडतो. खरा तर्कवाद व खरी धर्मप्रवृत्ति ह्या दोन्ही गोष्टी परस्परांशीं नेहमीं निगडित असल्या पाहिजेत.

## विघातक व विधायक कामगिरी.

आजकाल शब्दप्रामाण्यानें फारच गोंधळ उडवून दिला आहे. विधायक कार्य व विघातक कार्य म्हणजे काय, याविषयीं सध्यां बरीच लढालढी सुरू आहे. ही शाब्दिक लढाई लढतांना, आज नोकरशाही हिंदुस्थानांत पूर्वीं इतकीच कायम आहे, इकडे मात्र या लोकांचें दुर्लक्ष होत आहे. नोकरशाहीचा नाश हेंच सर्वांत मोठें विधायक कार्य होय, असें मला वाटतें. नोकरशाहीच्या नाशांतच संबंध हिंदी राजकारणाचें रहस्य भरलेलें आहे. नोकरशाहीला कायमची गचांडी दिल्याशिवाय या देशांत तुम्हांला इतर कोणतेंही विधायक कार्य करितां येणार नाहीं. नोकरशाहीची सत्ता नाहीं असें एक तरी चळवळीचें क्षेत्र आज मोकळें आहे काय? मँचेस्टरला थप्पड दिल्याशिवाय खादीचा प्रसार कधीं तरी होईल असें आपणांस वाटतें काय? मँचेस्टर हें तरी नोकरशाहीचेंच दुसरें स्वरूप नव्हे काय? मँचेस्टरचा नायनाट केल्याशिवाय खादीची निपज वाढणें अशक्य आहे. या देशांतील लोकांचीच काय, पण इतर कोणत्याही देशांतील लोकांची, वर्षानुवर्ष सारखा स्वार्थत्याग करण्याची तयारी असते, असें तुम्हांस वाटतें काय? नोकरशाही असेच कायदे पास करील कीं ज्यामुळें खादी सतत महाग दरानें विकावी लागेल व सर्वांस ती विकत घेतां येणें अशक्य होईल. आपल्या चळवळीनें मँचेस्टरचा नायनाट होणार, अशीं स्पष्ट चिन्हें दिसल्यावर नोकरशाही कधीं तरी स्वस्थ बसेल काय? कधींहि नाहीं. तेव्हां आपल्या निरुपद्रवी विधायक कार्यक्रमांत देखील विघातक कार्यक्रमाचा थोडासा समावेश करणें जरूर झालें आहे. नोकरशाहीला दाबांत ठेवल्याशिवाय खादीचें विधायक कार्य जोरानें चालवितां येणें अशक्य आहे, असें कोणी म्हटल्यास त्यास तुमचें काय उत्तर आहे? नोकरशाहीपासून तुम्हीं दूर पळून जाल. पण त्यापासून नोकरशाहीचें काडी-इतकेंहि नुकसान होणार नाहीं. कितीही मंत्रतंत्र केलेत तरी त्यांचा नोकर-

शाहीवर यत्किंचितहि परिणाम व्हावयाचा नाहीं. मला खरें विधायक कार्य पाहिजे आहे. कारण, त्यामुळें नोकरशाहीशीं सारखी झुंज खेळतां येईल ! माझा कार्यक्रम अशाच प्रकारचा आहे. परंतु ' खादी, खादी ' असा नुसता शंखध्वनि आणि कृतीच्या नांवानें मात्र आवळयाएवढें पूज्य—हा कार्यक्रम मात्र मला पसंत नाहीं. विधायक कार्यक्रमांतील इतर कलमांचीहि हीच गत आहे. हिंदू व मुसलमान खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्याच्या रणक्षेत्रांत प्रवेश करीपर्यंत त्यांच्या एकीचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं. आणि तें एकजुटीनें राष्ट्रकार्य करूं लागतील, तरच लोकांच्या दृष्टीनें विधायक व नोकरशाहीच्या दृष्टीनें विघातक कार्य होऊं शकेल. परंतु, जोंपर्यंत शब्द, भाषणें व लेख यांतच संबंध चळवळ भरली आहे असें लोकांस वाटतें, तोंपर्यंत त्यांची चळवळ विधायक स्वरूपाची होणार नाहीं किंवा विघातक स्वरूपाचीहि होणार नाहीं.

## कौन्सिलप्रवेश.

नोकरशाहीशीं असहकारिता करून तिचा नाश करण्याच्या एकमात्र निश्चयानें कौन्सिलांत जाणें, यांतहि कांग्रेसच्या इतर तीन बहिष्कारांइतकीच असहकारिता भरलेली आहे. कौन्सिलें ह्या कांहीं नुसत्या इमारती नाहींत; त्या संस्था आहेत व एका विशिष्ट कायद्याअन्वयें त्या चाललेल्या आहेत. सुधारणांच्या कायद्याविरुद्ध आमची लढाई आहे व त्याअन्वयें चाललेलें काम आम्हांस अशक्य करून सोडावयाचें आहे. त्यांत आह्मांला यश मिळेल कीं नाहीं, हें परिस्थितीवर अवलंबून आहे. जी परिस्थिति असहकारितेच्या इतर कलमांनां लागू, तीच कौन्सिलनाशाच्या कार्यक्रमालाहि लागू. तुमची लढण्याची तयारी असेल व देशांतील सर्व समाजांत एकी पैदा होईल तर विजय ठेवलेला आहे. कसेंहि करून विजय मिळाला पाहिजे अशी माझी इच्छा आहे. ज्या मार्गानें कौन्सिलबहिष्कार यशस्वी होईल, तो मार्ग मला मान्य आहे. कौन्सिलबहिष्काराचा काँग्रेसप्रणीत मार्ग यशस्वी होणार नाहीं अशी माझी खात्री पटली, तेव्हांच मी दुसरा मार्ग सुचविला. एकहि मतदार मत देण्यास जाणार नाहीं अशा प्रकारची

परिस्थिति निर्माण करूं, असें अद्यापिहि तुह्मांला वाटत असेल, तर बेधडक माझ्या मार्गांत अडथळे उत्पन्न करा! तुमच्या प्रयत्नानें सर्व जागा ओंस पडल्या तर त्यामुळें मला आनंदच होईल. मी मोठ्या आनंदानें माझा कार्यक्रम मागें घेईन! परंतु, एकहि मतदार मत देण्यास जाणार नाहीं, किंवा एकहि सभासद कौन्सिलांत बसणार नाहीं, अशी खात्री जर तुह्मांस वाटत नसेल, तर मग उगाच सांवलीच्या मागें कां धांवतां? दोन मतें मिळालीं तरीसुद्धां कौन्सिल उमेदवारें निवडून येतील. मी सर्व कार्यकर्त्या कॉंग्रेसभक्तांचें या बाबतींत मत घेतलें आहे. कौन्सिलांतील एकूण एक जागा ओंस पाडतां येणें अशक्य आहे, अशा प्रकारची कबुली त्या सर्वांनीं दिली आहे.

## कौन्सिलें अद्यापि नष्ट झालीं नाहींत!

कौन्सिलांचा पूर्वींच भंग झाला ही गोष्ट मला मान्य नाहीं. त्यांचा अद्यापि भंग झाला नसून प्रत्येक क्षणाला स्वातंत्र्यापहारक असे कायदे तीं पास करीत आहेत. कौन्सिलें केव्हांच मोडण्यांत आलीं, अशा प्रकारच्या लंगड्या सबबी तुम्हीं आमच्या तोंडावर किती दिवस फेंकीत राहणार? कायद्याच्या व शिस्तीच्या नांवाखालीं तुमचे हातपाय बांधून टाकण्यासाठीं नवीन नवीन शृंखला त्यांनीं घडविलेल्या तुह्मांला टाऊक नाहींत काय? आणि या सर्व गोष्टींबद्दल जबाबदार कोण? तुम्हींच या सर्व गोष्टींबद्दल जबाबदार आहांत! तुम्ही, मी व इतर कॉंग्रेसभक्त–आपण सर्व जण ह्या परिस्थितीबद्दल जबाबदार आहोंत. आम्ही आमच्यांतल्या उत्तमोत्तम माणसांना कौन्सिलांत जाऊं नका असें सांगून घरीं बसविलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, मोठमोठ्या जागांसाठीं व मानमरातबासाठीं हपापलेले लोक तेथें जाऊन बसले ( टाळ्या )! त्यांच्या हातांतून कौन्सिलांचे हत्यार आपण हिसकून घेतलें पाहिजे. तसें करितांना नोकरशाहीनें आपल्या अंमलबजावणीच्या–अधिकारांचा उपयोग केला, तर त्यांत मला आनंदच आहे. कारण मग नोकरशाही व लोकपक्ष यांमध्यें लढाईच जुंपली असें ह्मणावें लागेल. या लढाईंत आम्हीं पराभूत झालों, तर आमचा पराभव होणेंच

योग्य आहे, असें आम्ही समजूं. सुधारणांचा नायनाट होणार नाहीं तोंपर्यंत शत्रू कौन्सिलांच्या बालेकिल्ल्यांतच सुरक्षित दबा धरून बसणार ! आम्ही व नोकरशाही यांच्यामध्यें हा सुधारणांचा ' शिखंडी ' उभा आहे ( हंशा ) ! नोकरशाहीनें आपण व लोकपक्ष यांमध्यें उत्पन्न केलेला हा एक तट आहे. सुधारणांचा अद्यापि भंग झालेला नाहीं. त्या मात्र तुमच्या चळवळीचा धुव्वा उडविण्याच्या बेतांत आहेत. म्हणून वेळींच सावध व्हा ! कौन्सिलांचा भंग आधींच होईल कसा ? कुरुक्षेत्रांत अर्जुनानें हल्ला करण्यापूर्वीच कौरव योद्धे पटापट मरण पावले असें म्हणण्यासारखेंच तें हास्यास्पद नाहीं काय ? सुधारणांचा नायनाट होणार यांत शंका नाहीं. कारण तसेंच त्यांच्या नशिबांत लिहिलें आहे. हे हिंदी स्वातंत्र्यवीरांनो, कौन्सिलांत घुसा व त्यांच्या नाशाचें कार्य पुरें करा ! "

---

## १७—नागपूरची ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी.

ता. ८, ९ व १० जुलै १९२३ रोजीं नागपुरास ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक भरली होती. तींत नागपूर सत्याग्रह, जादा कॉंग्रेस व बंडखोर प्रांतिक कमिट्यांस इषारा—यांसंबंधींच्या ठरावांवर देशबंधु दास यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. ते म्हणाले:—

### नागपूरचा सत्याग्रह.

" नागपूरच्या निशाण-सत्याग्रहाची चळवळ अत्यंत संथपणें चालली असून कदाचित् आणखी १० वर्षेंहि ती अशीच चालेल म्हणून पं. जवाहिरलाल नेहरू यांस ती पटली. पण अगदीं त्याच कारणासाठीं मला ती पटत नाहीं. हा स्वभावभेद आहे. ही चळवळ ज्या प्रकारें चालविली गेली पाहिजे तशी ती चालविली जात नाहीं, असें माझें मत आहे. परंतु ज्या दिवशीं मला ही चळवळ पटेल, त्या दिवशीं मीच तिचा पुढाकार घेईन, ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी ( टाळ्या ). जे शेंकडों स्वयंसेवक या चळ-

चळींत सामील होऊन स्वार्थत्याग करीत आहेत, त्यांच्याबद्दल आम्हांला अत्यंत कौतुक व आदर वाटतो. पण कदाचित् वर्षानुवर्षे चालत राहणाऱ्या असल्या थेंबथेंब स्वार्थत्यागानें कांहीं परिणाम किंवा कार्य होईल, असें आम्हांस प्रामाणिकपणें वाटत नाहीं. या चळवळीमुळें उत्साह उत्पन्न होत नाहीं, आणि म्हणूनच तींत आम्हीं सामील होऊं शकत नाहीं. याबद्दल आपण गैरसमज करून घेऊं नका, एवढीच आपणास माझी विनंति आहे."

## जादा कॉंग्रेस नको !

जादा कांग्रेसच्या ठरावावर बोलतांना देशबंधु दास म्हणाले, "मुंबईच्या समेटाचा ठराव जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत हा ठराव पुढें आणतांच येत नाहीं. हा ठराव तुम्ही पास केल्यास मुंबईचा ठराव मातिमोल ठरेल. एक ठराव कायम आहे तोंपर्यंत त्या ठरावास हरताळ फांसणारा दुसरा ठराव तुम्हांस पास करितां येणार नाहीं. मुंबईचा समेटाचा ठराव पास करण्यास आम्हीं तुम्हांस विनविलें नव्हतें; आमच्या मताप्रमाणें आमचा कार्यक्रम चालविण्यास आम्ही तेव्हांहि तयार होतोंच. तुम्हीं कोणतें तरी एक स्पष्ट धोरण स्वीकारा. तडजोड पाहिजे तर तडजोड करा; नाहीं तर खुशाल ती फेंटाळून लावा. परंतु, जें काय करावयाचें तें येथें या बैठकींत करा ! त्यासाठीं जादा कांग्रेसची वाट कशाला पाहतां ? कांग्रेस कांग्रेस म्हणजे तरी काय ? ती आपलीच बनलेली असते ना ? तुम्ही आम्ही जें ठरवूं तेंच ती ठरविणार ! कांग्रेसच्या नुसत्या ठरावामुळें एकी नांदेल असें आपणांस वाटतें काय ? जादा कांग्रेसनें तडजोड केली, तर राजगोपाळाचार्य ती अमान्य करणार व माझ्या विरुद्ध निकाल लागला तर मीहि तो अमान्य करून माझ्या पक्षाचा प्रचार करणार ! कांहीं लोक माझें ऐकतील; कांहीं लोक राजगोपाळाचार्यांचें ऐकतील ! मग एकी राहिली कुठें ? तडजोड नुसत्या ठरावानें होत नाहीं; त्यासाठीं मनाची वृत्ति तयार असावी लागते. ती वृत्ति तयार असेल, तर आज या हॉलमध्यें बसून आपल्यामधील मतभेद मिटविण्यास कोणती हरकत आहे ? ( हियर, हियर व टाळ्या ). मुख्य प्रश्न पुढाऱ्यांमधील मतभेद मिटविणें हा आहे आणि ते आपण येथेंहि मिटवूं शकतों. त्यासाठीं स्पेशल कांग्रेसची

आवश्यकता नाहीं. आम्हीं गयेस निराळा पक्ष निर्माण करून कौन्सिल-बहिष्काराचा ठराव न मानण्याचें कां ठरविलें ? असा प्रश्न मला विचारण्यांत येतो. त्यास माझें उत्तर उघड आहे. मला तो ठराव पटला नाहीं, तो ठराव पाळूं नकोस असा माझ्या सदसद्विवेकबुद्धीनें मला इषारा दिला म्हणूनच मी तो ठराव न मानण्याचें ठरविलें [ हियर हियर ] ! असले ठराव करून कधींतरी समेट झाला आहे काय ? थोडेंसें देवाणघेवाण होईल तरच समेट होऊं शकतो. मला नोकरशाहीशीं झुंज खेळावयाची आहे. ज्या कार्यक्रमानें लोकांत उत्साह पैदा होईल, नोकरशाहीस प्रतिकार करण्याची त्यांची शक्ति वाढेल तोच कार्यक्रम मी स्वीकारीन. जादा कांग्रेसमुळें कोणताच फायदा होणार नाहीं. सबब माझा या ठरावास विरोध आहे."

## बंडखोर प्रांतिक कमिट्यांस इषारा.

ऑल इंडिया कांग्रेस कमिटीनें मुंबईस पास केलेला समेटाचा ठराव धाब्यावर बसविण्याचा उपक्रम तामीलनाडू प्रां. कां. कमिट्यांसारख्या कांहीं कमिट्यांनी केला होता. हें वर्तन उघड उघड बंडखोरीचें व गैरशिस्तीचें होतें. म्हणून त्यांची खरडपट्टी काढून त्यांस इषारा देण्याचा ठराव वर्किंग कमिटीनें पास केला होता. तो ठराव विचारार्थ पुढें आला असतां देशबंधु दास म्हणाले:—

" बंडखोरीचा आरोप थोडाबहुत माझ्यावरहि आहेच. परंतु ह्या ठरावांत फक्त राजगोपाळाचार्यांसच दोष दिला आहे. यामुळें मुख्य आरोपी तेच आहेत. म्हणून मी अगोदर बोलून शेवटीं बोलण्याचा अधिकार त्यांस देतों. कांग्रेसघटनेच्या २१ कलमाअन्वयें कांहीं बाबतींत नवे कायदे करण्याचा अधिकार ऑल इंडिया कमिटीला कॉंग्रेसतर्फे आहे. तिला परिस्थित्यनुरूप कॉंग्रेसचे ठराव बदलण्याचाहि अधिकार आहे. गया-कांग्रेसचा ठराव केव्हां व कसा अंमलांत आणावा हें ठरविण्याचा अधिकार त्या ठरावांतच ऑल इंडिया कमिटीस दिला आहे. ऑ. इं. कमिटीचा ठराव प्रांतिक कमिट्यांस बंधनकारक आहे, यांत वाद नाहीं. आणि म्हणून त्या तो न पाळतील तर त्यांना शिक्षा केलीच पाहिजे. वर्किंग कमिटीतर्फे

पुढें आलेला हा इषाऱ्याचा ठराव योग्य आहे; तो मिळमिळीत आहे, असें मला वाटत नाहीं. तो ऑ. इं. कांग्रेस कमिटीनें पास करणें जरूर आहे. तसें होणार नाहीं, तर कोणीहि कोणाचें ऐकणार नाहीं. आम्ही-स्वराज्यपक्षानें बंड केलें असें सांगण्यांत येतें. आमच्या वर्तनाला तुम्हीं खुशाल 'बंड' म्हणा ! पण, आमचें बंड व राजगोपाळाचार्यांचें बंड यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे ! आम्ही कांग्रेसचा एक ठराव न पाळ-ण्याचें ठरविलें हें अगदीं खरें आहे. पण आम्ही तो ठराव मोडून कौन्सिलसाठीं उभे राहणार ते कांग्रेसच्या नांवानें किंवा कांग्रेसतर्फे म्हणून उभे राहणार नाहीं. आम्ही स्वतःच्यातर्फे उभे राहणार. आम्ही कांग्रेसचें नांव सांगत नाहीं; कांग्रेस कमिट्यांचा पैसा खर्च करीत नाहीं; किंवा आम्हीं कांग्रेस कमिट्यांकडून कांग्रेसच्या संस्थेविरुद्ध बंडहि करविलें नाहीं ! कोणत्याहि संस्थेंत अल्पसंख्याकांस ज्या प्रकारचें 'बंड' करण्याचा अधि-कार आहे तशाच प्रकारचें बंड आम्ही केलें. राजगोपाळाचार्यांचें वर्तन तंतोतंत याच्या विरुद्ध आहे.

---

## १८—स्वराज्यपक्षाचा नूतन कार्यक्रम.

### साम्राज्यापेक्षां स्वातंत्र्य अधिक प्रिय !

ता. १६ ऑगष्ट १९२४ रोजीं कलकत्ता येथें भरलेल्या स्वराज्य पक्षाच्या सभेंत अध्यक्ष देशबंधु दास यांचें पुढील आशयाचें भाषण झालें. ते म्हणाले—

आपल्या पक्षाचा कार्यक्रम आज मी आपणांपुढें मांडणार आहें. स्वराज्य-प्राप्ति हें स्वराज्यपक्षाचें ध्येय असलें, तरी 'कोणत्या प्रकारचें स्वराज्य तुम्हांला पाहिजे' असा प्रश्न आम्हांला कित्येक लोक आज विचारीत आहेत. या लोकांना भावी स्वराज्यपद्धतीबद्दल इतकी भयंकर काळजी लागली आहे कीं, त्या काळजीच्या भरांत ज्या मूलभूत तत्त्वांवर अखिल स्वराज्याची चळवळ उभी आहे तीं तत्त्वेंच ते विसरून जात

आहेत. आम्हांला कोणत्याहि विशिष्ट प्रकारची राज्यपद्धति नको आहे. आमचें देशी सरकार प्रस्थापित करण्याचा अधिकार आम्हांला पाहिजे आहे ( ऐका, ऐका ) ! आमची राज्यपद्धति प्रस्थापित करण्याचा हक्क आम्हांला मिळणें–याचेंच नांव स्वराज्य. स्वतःचें सरकार प्रस्थापित करण्याचा हक्क व कोणत्याहि विशिष्ट अशा राज्यपद्धतीची मागणी–या दोन गोष्टी साफ भिन्न-भिन्न आहेत. त्यांची सरमिसळ होतां कामा नये. नुसती राज्यपद्धति काय, आज येते आणि उद्यां जाते. एका दिवसांत राज्यपद्धति स्थापितां येते; पण दुसऱ्याच दिवशीं ती कोलमडून जाऊन तिचें जागीं दुसरी अस्तित्वांत येते. आमची बुद्धि व स्वभाव यांस अनुरूप अशा प्रकारची राज्यपद्धति प्रस्थापित करणें हा आमचा हक्क आहे, अशा प्रकारची घोषणा अखिल देशबांधवांनीं करावी व या आमच्या हक्कास आमच्या परदेशी राज्यकर्त्यांकडून मान्यता मिळावी अशी आमची मागणी आहे.

## ब्रिटिश साम्राज्य व हिंदुस्थान.

तुम्हांला साम्राज्यांतर्गत स्वराज्य पाहिजे कीं साम्राज्याबाहेरचें पाहिजे, अशा प्रकारचे प्रश्न आम्हांला वारंवार विचारण्यांत येतात. विशेषतः इंग्लिश वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींनीं मला या बाबतींत फार भंडावून सोडलें आहे. या प्रश्नास माझें उत्तर सरळ आहे. मला माझें स्वातंत्र्य पाहिजे आहे. स्वतःची राज्यपद्धति प्रस्थापित करण्याचा हक्क मला पाहिजे आहे. हा हक्क साम्राज्यांत राहूनहि मला मिळणार असेल, तर साम्राज्यांतर्गत स्वराज्यास माझी कोणत्याहि प्रकारची हरकत नाहीं. परंतु तसें होणार नसेल तर मात्र मला साम्राज्यापेक्षां माझें स्वातंत्र्य अधिक प्रिय वाटतें. [ ऐका, ऐका व टाळ्या ]. उगाच भविष्यकाळाच्या अंधारांत चांचपडत बसण्यांत कांहींहि हंशील नाहीं. आज आपण काय केलें पाहिजे, इकडे सर्वांचें लक्ष वेधणें जरूर आहे. आपली चळवळ योग्य दिशेनें व योग्य तत्त्वांस अनुसरून चालली आहे किंवा नाहीं, इकडे आपण लक्ष पुरविलें कीं आपलें काम झालें. स्वतःचा राज्यकारभार चालविण्याचा हक्क प्राप्त करून घेणें हें आमच्या चळवळीचें आद्यतत्त्व असून त्याबरहुकूम आमची चळ-

वळ चालली पाहिजे. कोणती राज्यपद्धति आमच्या देशास इष्ट आहे व कोणती अनिष्ट आहे हें ठरविण्याचा अधिकार आमचा आहे. त्यांत इतर कोणीहि ढवळाढवळ करतां कामा नये.

## स्वराज्यप्राप्तीचा एकमात्र मार्ग-असहकारिता !

येथपर्यंत आमच्या भावि स्वराज्यपद्धतीचें विवेचन झालें. आतां हें स्वराज्य प्राप्त कसें करून घ्यावयाचें हा प्रश्न उपस्थित होतो. इतर लोक असहकारितेचा कोणताहि अर्थ करोत; माझा अर्थ मी अनेकवार व्याख्यानां-मधून जाहीर केलेला आहे. तो लक्षांत घेतां सध्यांच्या सरकारशीं लढण्याचा व त्याचेपासून स्वराज्याचे हक्क हिसकून घेण्याचा असहकारिता हा एकमात्र उपाय आहे, असें माझें मत आहे [ऐका, ऐका). जेथें जेथें म्हणून शक्य होईल तेथें तेथें असहकारितेच्या तत्त्वाची अंमलबजावणी झाली पाहिजे. आम्हीं स्वराज्यपक्षाची स्थापना केली त्या वेळीं या असहकारितेची व्याख्या–नव्हे वर्णन आम्ही केलें होतें. मला आजकाल व्याख्यांची फार भीति वाटते. कारण आमचे टीकाकार लगेच व्याख्यांचीहि व्याख्या विचारूं लागतात [ हंशा ]. सर्वत्र प्रतिकाराचें वातावरण उत्पन्न करून, नोकरशाहीमार्फत चालणारा राज्यकारभार अशक्य करून सोडण्यासाठीं ज्या ज्या चळवळींचा उपयोग होऊं शकेल त्या सर्व अंमलांत आणणें असा आमच्या पक्षानें अनत्याचारी असहकारितेच्या धोरणाचा अर्थ केला होता. हा अर्थ बाहेर पडतांच " विध्वंसकांनों, अखिल सरकार अशक्य करून सोडण्याचाच तुमचा उद्देश दिसतो " अशा प्रकारची टीका आमच्या टीकाकारांनीं आमच्यावर केली. आम्हांला कोणत्याहि प्रकारचें सरकार नको असें आम्हीं कधींहि म्हटलेलें नाहीं. आम्हांला फक्त नोकरशाहीमार्फत चालणारा राज्यकारभार बंद पाडा-वयाचा आहे. देशांत सर्वत्र अंदाधुंदी माजावी अगर कोणत्याहि प्रकारच्या सरकारचा राज्यकारभार बंद पाडावा असे आम्हीं केव्हांहि म्हटलेलें नाहीं. सध्यांच्या नोकरशाहीचा राज्यकारभार आम्हांला नको, एवढेंच फक्त आम्ही म्हटलें होतें व अजूनहि म्हणतों. आमच्या चळवळींत राष्ट्रीय मागणी साध्य करून घेण्यासाठीं एकपक्षीं प्रतिकारशक्ति उत्पन्न करणाऱ्या व नोकरशाहीचा राज्य-

कारभार अशक्य करून सोडणाऱ्या अशा सर्व चळवळींचा समावेश व्हावा व दुसऱ्या पक्षीं ज्या सहकार्यावर नोकरशाहीचें जीवनसर्वस्व अवलंबून असतें तें सहकार्य पायरीपायरीनें काढून घेण्यास ज्या ज्या गोष्टी करण्याची जरूर असेल त्या त्या सर्व गोष्टींचा समावेश व्हावा—असें आमचें म्हणणें होतें व आहे. आमच्या असहकारितेच्या कल्पनेचें स्वरूप हें असें दुहेरी आहे. आमच्या कार्यक्रमाचा तपशील कोणताहि असो; पण त्याची उभारणी प्रतिकारशक्तीच्या पायावरच झाली पाहिजे असें माझें अद्यापहि म्हणणें आहे. आह्मांला सध्यांच्या नोकरशाहीविरुद्ध प्रतिकारशस्त्राचा उपयोग करावयाचा आहे. या घटकेला नोकरशाही लोकांच्या संमतीनें राज्यकारभार हांकीत आहे, ही गोष्ट कोणाला तरी नाकबूल करितां येण्यासारखी आहे काय ? लोकांची संमति नसेल, तर नोकरशाहीचा राज्यकारभार चालणें केव्हांहि शक्य नाहीं. अशा परिस्थितींत नोकरशाहीच्या सरकारचा कायमचा नायनाट करावयाचा असेल, तर लोकांमध्यें आधी प्रतिकारवृत्ति उत्पन्न केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ही वृत्ति उत्पन्न करणें केव्हांहि चुकीचें होणार नाहीं. प्रतिकारवृत्ति हें समाजाच्या जिवंतपणाचें नैसर्गिक स्वरूप आहे. त्यांत कृत्रिमपणा असूं शकत नाहीं. आह्मांला स्वतःच्या पायांवर उभें राहावयाचें आहे. आह्मांला नोकरशाहीचा नाश करावयाचा आहे. आणि म्हणून लोकांच्या अंतःकरणांत प्रतिकारवृत्ति उत्पन्न केल्यावांचून आह्मांला गत्यंतर नाहीं. ही प्रवृत्ति उत्पन्न झाली असें गृहीत धरून चाललें तर मग पुढें काय ? पुढें आम्ही सरकारला सांगितलें पाहिजे कीं, आमची मागणी अशी आहे—जिवंत रहाणें हा आमचा हक्क आहे. आह्मांला स्वतःचा राज्यकारभार चालविण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. आमच्या स्वभावास अनुरूप अशा प्रकारची राज्यपद्धति प्रस्थापित करणें हा आमचा हक्क आहे. त्या हक्कास तुम्हीं आज, उद्यां अगर आणखी कांहीं वर्षांनीं मान्यता द्या अगर देऊं नका; प्रत्येक राष्ट्रांतील लोकांच्या मुठींत हा हक्क असतो. त्याची फक्त त्यांस जाणीव व्हावयाची असते. ही जाणीव आमच्या देशबांधवांस होईपर्यंत तुम्हीं आम्हांला हा हक्क देऊं नका. कारण तो देण्याचा अधिकार तुम्हांला नाहीं. राष्ट्र जिवंत असेल, तर त्यास स्वराज्याचा हक्क द्यावा लागत नाहीं. तो प्रत्येक

नं.

राष्ट्रानें हिसकावून घ्यावयाचा असतो. हा हक्क हिसकावून घेतल्यानंतर मग सरकारला त्यास मान्यता देण्यास भाग पाडावयाचें असतें. अखिल राष्ट्राला या हक्काची जाणीव झाली कीं मग तो बिलकुल दूर नाहीं. आम्हीं सरकारला आज बरोबर हेंच सांगितलें आहे. आपल्या या जन्मसिद्ध हक्कास सरकार-कडून मान्यता मिळेपर्यंत सध्यांची सरकारी राज्यपद्धति बंद पाडण्यासाठीं त्यांचेशीं असलेले सगळे सहकार्यसंबंध हलकेहलके तोडून टाकणें हें आपलें कर्तव्य आहे. कोणत्याहि प्रकारचें सरकार अस्तित्वांत राहूं नये असें आमचें म्हणणें नाहीं. सध्यांची लोकहितविघातक राज्यपद्धति नष्ट झाली पाहिजे, एवढेंच आमचें म्हणणें आहे.

## सहकारिता कीं असहकारिता–असला वाद नको !

आमचा मार्ग असहकारितेचा आहे कीं नाहीं, याबद्दल वितंडवाद माज-विण्यांत येत असतो. आमच्या कार्यक्रमाची कल्पना मी सर्वांना दिली आहे. आतां या कार्यक्रमास तुम्हीं वाटेल तें नांव द्या. त्याला असहकारिता म्हणा, अगर म्हणूं नका. त्याची मला पर्वा नाहीं. मला शब्दांचा कीस काढीत बसण्याची संवय नाहीं. " तुमचें तारूं प्रतियोगी सहकारितेच्या दर्यांत भरकटूं लागलें " असें पुष्कळ लोक म्हणत असतात. माझ्या हक्काचा ध्रुवतारा माझ्या डोळ्यांसमोर असला व माझा हक्क अमुक मार्गानें गेलें असतां मी काबीज करूं शकेन असें मला वाटत असलें कीं मग माझें तारूं प्रतियोगी सहकारितेच्याच काय, पण कोणत्याहि दर्यांत भटकत राहिलें तरी त्याची मला पर्वा नाहीं. माझ्या कार्यक्रमाला तुम्हीं असहकारिता म्हणा, प्रतियोगी सहकारिता म्हणा, अगर श्री. केळकर म्हणतात त्याप्रमाणें प्रति-योगी असहकारिता म्हणा, त्याची मला पर्वा नाहीं. माझें उद्दिष्ट मात्र साध्य झालें पाहिजे. तेवढें साध्य होत असलें कीं मग माझ्या कार्यक्रमाला तुम्हीं वाटेल तें नांव द्या. दोन वर्षांपूर्वीं बुलढाणा येथील परिषदेंत प्रतियोगी असह-कारितेचें हें तत्त्व पुढें आलें. मी त्यास संमति दर्शविली. कारण सरकारकडे मागणी पाठविणें हा प्रतियोगी सहकारितेचाच एक भाग होता. ही मागणी सरकारनें नाकारली कीं मग प्रतियोगी असहकारितेस सुरुवात व्हावयाची

होती. असो. माझा कार्यक्रम स्पष्टपणें मी आपणांसमोर मांडिला आहे. आमच्या न्याय्य हक्कांस मान्यता मिळेपर्यंत आम्ही तुमच्या राज्यपद्धतीचा नायनाट करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहीं, असें आम्हीं सरकारला निक्षून सांगितलें पाहिजे. सध्यांच्या राज्यपद्धतीचा नायनाट केल्याशिवाय आमची राज्यपद्धति अस्तित्वांत येणें शक्य नाहीं, म्हणूनच आम्ही विघातक धोरण अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. आम्हांला विनाश करण्यांत आनंद वाटत नाहीं. परंतु आमच्या मार्गांतील अडथळे दूर केल्याशिवाय आम्हांला गत्यंतर नाहीं.

## द्विदल पद्धतीचा नायनाट झाला पाहिजे !

हल्लींची परिस्थिति अशी आहे. निरनिराळ्या प्रांतांतील कायदेमंडळें व असेंब्ली यांमधून आम्हीं आपला कार्यक्रम शक्य तितका अंमलांत आणिला आहे. मध्यप्रांतीय कौन्सिलांत आम्हीं आपला कार्यक्रम पूर्णपणें अंमलांत आणिला असून, तेथें ' डेडलॉक ' उत्पन्न झाला आहे. बंगाल कौन्सिलांत सुद्धां ' डेडलॉक ' उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवा. असेंब्लींतहि घटनेच्या कायद्यानें शक्य होतें तितक्या प्रकारचा ' डेडलॉक ' आम्ही अंमलांत आणिला आहे. ' घटना ' हा शब्द उच्चारतांच ' तुमची सध्यांची चळवळ सनदशीर आहे काय ? ' अशा प्रकारच्या प्रश्नांचा भडिमार आमच्यावर करण्यांत येतो. घटना या शब्दाचा अर्थ सुधारणा कायद्याअन्वयें मिळालेला अगर न मिळालेला हक्क असाच असेल तर कौन्सिलांमधून आम्ही चालविलेली चळवळ पूर्णपणें सनदशीर आहे, असें ह्मणावें लागेल. आमच्या देशबांधवांनीं सुधारणा-कायद्यास मान्यता देण्याचें नाकारिलें आहे ही गोष्ट लक्षांत घेतली तर मात्र आमची चळवळ सनदशीर ठरणार नाहीं. परंतु सुधारणा कायद्याचा दृष्टीनें ती पूर्णपणें सनदशीर आहे. समजा, कौन्सिलांत ' डेडलॉक ' उत्पन्न झाला; समजा, बंगाल कौन्सिलनें दिवाणांचे पगार पुनः फेटाळून लाविले, तर मग पुढें आमचें धोरण कोणतें राहील ? या प्रश्नाचें उत्तर सरकार कोणतें धोरण स्वीकारतें यावर अवलंबून आहे. सरकार जितक्या कठोर स्वरूपाचें धोरण अंमलांत आणील तितक्याच कठोर प्रकारचें धोरण आम्ही प्रत्युत्तर ह्मणून

अंमलांत आणूं. सरकार पुनः आपले डावपेंच बदलील, तर आम्हीहि आपले डावपेंच बदलल्याशिवाय राहणार नाहीं. असें करतांना कदाचित तत्त्वभंगाचा आरोप आमच्यावर लादण्यांत येईल. परंतु हा आरोप मला कबूल नाहीं. काळ व परिस्थिति जसजशी बदलत जाईल, तसतसा आम्ही आपल्या तत्त्वांच्या अंमलबजावणीचे बाबतींत फेरफार करणार आहों. अह्मांला देशांतील द्विदल पद्धतीचा अंत करावयाचा आहे. सरकार नमेपर्यंत आम्ही तेच तेच डावपेंच पुनश्च अंमलांत आणल्याशिवाय राहणार नाहीं. अखेरीस आमचा विजय झाला, तर पुढें काय होईल ? सरकार बहुधा सोंपींव खात्यांचा कारभार आपल्या हातीं घेईल. असें झालें तर पुष्कळसे लोक घाबरून जातील, ही गोष्ट मला ठाऊक आहे. आमचा देश आधींच दुर्दैवाच्या चक्रांत सांपडलेला आहे. मग सोंपींव खात्यांचा कारभार सरकारनें आपल्या हातीं घेतला, तर त्यामुळें आमचें अधिक नुकसान तें काय होणार आहे ? सरकारच्या हातचीं बाहुलीं बनलेल्या दोन दिवाणांऐवजीं गव्हर्नरच्या व एक्झिक्यूटिव कौन्सिलच्या एका सभासदाचे हातीं सोंपींव खात्यांचा कारभार गेला, तर त्यामुळें आकाश थोडेंच कोसळणार आहे ? सरकारनें सोंपींव खातीं आपल्या हातीं घेतलीं, तर त्याचा तुमच्या मनावर काय परिणाम होईल कोणास ठाऊक, पण मला मात्र बराचसा भार कमी झाल्यासारखें वाटेल व मी सुखाचा एक उसासा टाकीन. माझा विजय झाला असें मी समजेन. नोकरशाहीच्या तोंडावरचा बुरखा दूर करून मी तिचे हिडीस स्वरूप जगाच्या निदर्शनास आणिलें आहे, असें मी म्हणेन. आपल्या नशिबांत असलें महद्भाग्य लिहिलेलें असलें तर मेहेरबानी करून त्याबद्दल विषाद बाळगूं नका व निराश होऊं नका. कारण आज नोकरशाहीनें सोंपींव खातीं आपल्या हातीं घेतलीं, तर उद्यां तिला स्वराज्याचे हक्क देणें भाग पडेल ही गोष्ट लक्षांत ठेवा. इजिप्शन लोकांचे हक्कांस मान्यता मिळण्यापूर्वी तेथें लष्करशाही सरकार अस्तित्वांत होतें हें विसरूं नका !

## द्विदलपद्धति सात पुरुष खोल गाडा !

असेंब्ली व प्रांतिक कौन्सिलें यांमधील चढाई चालवितांना ज्या दोन तत्त्वांचे पायांवर आम्हीं आपल्या पक्षाची स्थापना अलाहाबादेस केली, तीं तत्त्वें

आम्ही सतत डोळ्यांसमोर ठेविलीं होतीं. परंतु लक्षांत ठेवा कीं ठराविक नियमांच्या बंधनानें जिवंतपणा कायम राहूं शकत नाहीं. तो कायम ठेवण्यासाठीं परिस्थिति जसजशी पालटेल, तसतसा आपल्या वर्तनांतहि फेरफार झाला पाहिजे. नोकरशाहीची राज्यपद्धति नष्ट करणें हें आमचें ध्येय आहे. तें कधींहि पालटणें शक्य नाहीं. आम्हांला सध्यांची राज्यपद्धति बिलकुल नको. द्विदलपद्धतीचा केव्हांच नायनाट झाला आहे. ती पुनः वर तोंड काढूं पाहील, तर सरकारलाहि 'द्विदलपद्धति मेली' असे उद्गार काढणें भाग पडेल, अशा प्रकारची चळवळ आपण केली पाहिजे. द्विदलपद्धतीचा अंत झाला ही गोष्ट सरकारला पूर्णपणें ठाऊक आहे. परंतु तसें सांगण्याची त्यांस भीति वाटत आहे. 'द्विदलपद्धति मेली, तिला सात पुरुष खोल गाडा !' असे उद्गार काढण्यास आपण त्यांस भाग पाडलें पाहिजे.

## लॉर्ड ऑलिव्हियर यांस उत्तर.

कांहीं लोकांनीं स्वराज्यपक्षाच्या कार्यपद्धतीबद्दल शंका प्रदर्शित केली आहे. आमच्यावर नाना प्रकारचे आरोप लादण्यांत आले आहेत. हे आरोप कोणत्या तरी अंतःस्थ हेतूनें लादण्यांत आले आहेत, याबद्दल वर्तमानपत्रें काळजीपूर्वक वाचणारांची केव्हांच खात्री होऊन चुकली असेल. आतां आमच्यावर एक नवीनच आरोप लादण्यांत आला आहे. सदर आरोप येथील वर्तमानपत्रांनीं अगर बंगालच्या गव्हर्नरसाहेबांनीं आमच्यावर लादला असता, तर त्याची मी पर्वा केली नसती. परतु सध्यांचे स्टेटसेक्रेटरी लॉर्ड ऑलिव्हियर यांनीं हा आरोप केला आहे. आम्हीं लांचलुचपतीच्या व इतर अनीतीच्या मार्गांचा अवलंब केला, असें त्यांचें म्हणणें आहे. मी लॉर्ड ऑलिव्हियर यांस बिलकूल दोष देऊं इच्छित नाहीं. कारण ते आगाऊ तयार केलेलें भाषण वाचीत होते. यांत आश्चर्यकारक असेंहि कांहींच नाहीं. कारण सत्याची गळेचेपी करण्यासाठीं जगांतील प्रत्येक नोकरशाही अशाच प्रकारचे डावपेंच अमलांत आणीत असते. स्वातंत्र्योत्पादक चळवळी चिरडून टाकण्यासाठीं अशाच प्रकारचे डावपेंच अमलांत आणावे लागतात. इतिहासाच्या सुरवाती-

पासून प्रत्येक नोकरशाहीस अशाच प्रकारचे डावपेंच अमलांत आणिलेले आपणांस दिसून येतील. लॉर्ड ऑलिव्हियर यांनीं आमच्यावर लांचलुचपतीचा आरोप कां व कसा केला, हें सारें मला ठाऊक आहे. सदर आरोप येथेंच–हिंदुस्थानांत तयार झाला. अँग्लोइंडियन वर्तमानपत्रांनीं त्यास सुंदर पोशाख चढविला व हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यास ज्या लोकांच्या उकळाउकळीस आळा बसेल अशा स्वार्थसाधू लोकांनीं त्याची विलायतेंत रवानगी केली. या स्वार्थसाधू लोकांनींच लांचलुचपतीचा खोटा आरोप आमच्यावर लादला आहे. लॉर्ड ऑलिव्हियर यांचा ' बोलाविता धनी ' वेगळाच आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवा.

## स्वराज्यपक्षाचा नवीन कार्यक्रम.

लोकांस अधिकाधिक अधिकार प्राप्त व्हावे व तितक्याच प्रमाणांत नोकरशाहीची सत्ता ढिली होत जावी या दोन तत्त्वांवर स्वराज्यपक्षाचा सध्यांचा कार्यक्रम उभा आहे. या तत्त्वांत आम्हीं केव्हांहि फेरफार केलेला नाहीं किंवा करणार नाहीं. फेरफार काय तो सदर तत्त्वांच्या अंमलबजावणीच्या पद्धतींत होईल. देशाची परिस्थिति जसजशी पालटत जाईल, नोकरशाही आपलें धोरण जसजसें बदलत जाईल तसतसें आम्हीहि आपलें धोरण बदलत जाऊं. परंतु आमच्या तत्त्वांपासून आम्ही केव्हांहि च्युत होणार नाहीं.

## अर्ध्या भाकरीनें आमचें समाधान होणार नाहीं !

राष्ट्रसंवर्धनास पोषक व तितक्याच प्रमाणांत नोकरशाहीस नाशकारक अशा बिलांस अगर ठरावांस पाठिंबा देण्यास आम्ही परवानगी दिली आहे. या परवानगीचा उपयोग नोकरशाहीच्या विनाशाच्या हेतूनेंच झाला पाहिजे. समजा, उद्यां एकाद्या क्षेत्रावरील नोकरशाहीचें वर्चस्व अजिबात दूर होईल अशा प्रकारचें बिल कौन्सिलपुढें आलें, तर आपली विघातक वृत्ति कायम ठेवूनहि आपण त्यास पाठिंबा दिला पाहिजे. आपण त्या बिलाची रचना अगर सुधारणा अशाच प्रकारें केली पाहिजे कीं जेणें करून नोकरशाहीला तें बिल व्हेटोच्या अधिकारानें फेंटाळून लावावें लागेल. नोकरशाहीनें आपल्या 'व्हेटो'चा उपयोग केला नाहीं तर ठीकच झालें. कारण तेवढ्या प्रमाणांत

नोकरशाहीची सत्ता कमी झाली. बरें, तिनें 'व्हेटो'चा उपयोग केलाच तरी मुद्धां कांहीं बिघडलें नाहीं. कारण त्यामुळें तिचाच पाय अधिक खोलांत जाणार आहे. तिच्या पापांच्या घड्यांत आणखी एका पापाची भर पडणार आहे. लोकहितकारी ठरावांस, त्यामुळें थोडें तरी हित साधणार आहे या भावनेनें आम्ही पाठिंबा देणार नाहीं. आम्हांला असल्या अर्ध्यामुर्ध्या हिताची पर्वा नाहीं. "सर्वनाशे सत्पमुत्पन्ने अर्धंत्यजति पंडितः" ही म्हण मला पसंत नाहीं. माझें अर्ध्या भाकरीनें समाधान होणार नाहीं. 'मुळींच भाकरी न मिळाण्यापेक्षां अर्धी बरी' हें तत्त्व विषमय आहे. तें मला पसंत नाहीं. आम्ही असली अर्धी भाकरी घेण्याचें नाकारलें पाहिजे. स्वतःला लागणारी भाकरी भाजण्याची ताकद आमचे अंगीं आल्याशिवाय असले तुकडे स्वीकारणें म्हणजे आत्मनाश करून घेणें आहे.

## सांपत्तिक लुटालूट थांबविली पाहिजे !

देशाच्या संपत्तीची सध्यां जी उकळाउकळ चालली आहे ती थांबविण्या-संबंधीचा विचार करितांना येथील नोकरशाहीचें दुहेरी स्वरूप लक्षांत घेतलें पाहिजे. नोकरशाही एका हातानें देशाचा राज्यकारभार चालविते व दुसऱ्या हातानें देशाच्या संपत्तीची उकळाउकळ करिते. या दोन्ही हातांकडे आपलें लक्ष असलें पाहिजे. फक्त एकाच हाताकडे लक्ष दिलें तर त्यांत आपला तोटा आहे. नोकरशाहीचा राज्यकारभार म्हणजेच आपल्या संपत्तीची उक-ळाउकळ होय. राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं असल्याशिवाय उकळाउकळ करितां येणें शक्य नाहीं. "उकळाउकळ व राज्यकारभार या दोन्ही गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून चालल्या पाहिजेत" ही लॉर्ड कर्झन यांची उक्ति आमच्या पूर्णपणें लक्षांत आहे. नोकरशाहीच्या आमदानींत या दोन्ही गोष्टी एकसमयावच्छेदें करून चालल्या असून, त्यामुळें आमच्या स्वातं-त्र्याचा व वित्ताचा नाश झाला आहे. आज चहूंकडे लोकांची उपास-मार चाललेली आहे याचेंहि कारण कर्झनसाहेबांनीं सांगितलेलें धोरणच होय ! तेव्हां आपल्याला नोकरशाहीचा नाश करावयाचा असेल, तर तिच्या दोन्ही स्वरूपांकडे आपलें लक्ष असलें पाहिजे.

## कमिट्यांमधून निवडून यावें.

प्रांतिक कौन्सिलें अगर असेंब्ली यांमार्फत निवडल्या जाणाऱ्या कमिट्यांचे बाबतींत आपल्याला म्हणण्यासारखे अधिकार मिळालेले नाहींत. तथापि राष्ट्राचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं किंवा तितक्याच प्रमाणांत नोकरश हीचें वर्चस्व कमी करण्यासाठीं लोकनियुक्त प्रतिनिधि म्हणून कमिट्यांमध्यें बसतां येणें शक्य असेल तर तसें करण्यास या नवीन कार्यक्रमानें परवानगी दिली आहे.

## मजूर-संघटन.

देशांतील मजुरांचें संघटन केलें पाहिजे असेंहि आम्ही आपल्या कार्यक्रमांत म्हटलें आहे. सध्यां युरोपांतील मजूरपक्षानें भांडवलवाल्यांविरुद्ध जी चळवळ चालली आहे तिचें निव्वळ अनुकरण करणें मात्र चुकीचें होईल. कारण युरोपियन राष्ट्रें स्वतंत्र आहेत आणि आम्ही अद्यापि स्वराज्यहीन आहोंत. आमच्या देशांतील मजूर व शेतकरी स्वराज्याची लढाई लढण्यास समर्थ कसे होतील, इकडे आपण आधीं लक्ष दिलें पाहिजे. आमच्या देशांतील तागाचा व्यापार ही नोकरशाहीच्या हातची एक प्रबल शक्ति आहे. कदाचित हें विधान आपणांस अतिशयोक्तिपूर्ण वाटेल. परंतु त्यांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवा. मी आज अनेक वर्षें या प्रश्नाचा अभ्यास केला असून बंगालमधील तागाच्या व्यापाराचीं सूत्रें कशी हालवावीं हें आपणांस नीट समजलें तर नोकरशाही तात्काळ बलहीन होईल ही गोष्ट लक्षांत ठेवा [ ऐका, ऐका ].

## अखेरची विनंति.

स्वराज्यपक्षाच्या नवीन कार्यक्रमाचा तपशिलवार विचार केल्यानंतर देशबंधु ह्मणाले—मी नोकरशाहीला अगर स्टेटसेक्रेटरीला कोणत्याहि प्रकारची विनंति करूं इच्छित नाहीं. आपल्याला मात्र माझी अशी विनंति आहे कीं, आपल्या तत्त्वांपासून च्युत होऊं नका. सदैव आपल्या तत्त्वांस चिकटून रहा. आपल्याला कार्य करून दाखवावयाचें आहे. शंकाकुशंका काढीत बसूं नका. आज वीस वर्षें मी स्वराज्याच्या प्रश्नाचा कसून विचार केला असून माझें उर्वरित आयुष्य देशकार्यासाठींच खर्च करण्याचा माझा संकल्प आहे. ईश्वराची कृपा असेल तर स्वराज्य प्राप्त झाल्याशिवाय मी डोळे मिटणार नाहीं याबद्दल खात्री बाळगा. ( टाळ्यांचा कडकडाट ).

## १९—'दरिद्र नारायणा'ची सेवा.

कलकत्ता-कॉर्पोरेशनचे पहिले मेयर या नात्यानें देशबंधु दास यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. ते म्हणाले—आपण आज माझा जो सन्मान केलात, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. हा सन्मान माझा नसून मी जें कार्य आज १०।१५ वर्षें करीत आलों आहें, त्या कार्याचाच हा सन्मान आहे, असें मी समजतों. तपशील बाजूला ठेविला तर भिन्न भिन्न जातींच्या व धर्मांच्या पॅन् इंडियन लोकांचें एक मोठें थोरलें राष्ट्र बनवावयाचें हेंच तें कार्य होय. या कार्पोरेशनमध्यें राहून हें कार्य बरेंचसें तडीस नेतां येण्यासारखें आहे, असें मला वाटतें. शक्य होईल तोंपर्यंत कोणत्याहि जातीच्या विशिष्ट हिताकडे मी दुर्लक्ष करणार नाहीं, ही गोष्ट आपणांस लौकरच आढळून येईल. आतां हे हितसंबंध समाजाच्या हितास विघातक असतील, तर मात्र गोष्ट वेगळी.

### कार्पोरेशनचा विध्वंस करण्यासाठीं आम्ही आलों नाहीं.

प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें भाषण करणें मला कठीण जात असलें, तरीसुद्धां कांग्रेसपक्षानें कार्पोरेशन काबीज केल्यामुळें कित्येक वर्तमानपत्रांनीं प्रदर्शित केलेली भीति दूर करणें जरूर आहे. आम्ही कार्पोरेशन काबीज केलें याचा अर्थ काय तेंच मला समजत नाहीं. कांग्रेसमध्यें नसलेले लोक जसे उमेदवार म्हणून उभे राहिले व निवडून आले त्याचप्रमाणें आम्हींहि निवडून आलों. येथें जसे कांग्रेसप्रतिनिधि दिसतात तसेच कांग्रेसमध्यें नसलेले लोकहि दिसतात. मग यांत भीति बाळगण्यासारखें असें काय आहे? मला तरी निदान कार्पोरेशनमध्यें भीतिदायक असें कांहींच दिसत नाहीं. हें कार्पोरेशन आतां सरकारविरोधी होणार, असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. या आरोपास उत्तर म्हणून मी या कॉर्पोरेशनपुढें जो कार्यक्रम मांडणार आहें, त्यांतील महत्त्वाच्या बाबी आपणांस सांगतों. सदर कार्यक्रम अंमलांत आणल्यानें कॉर्पोरेशन सरकारविरोधी होईल कीं काय, याचा आपणच विचार करा. मला सदर कार्यक्रमांत सरकारविघातक असें कांहींच दिसत नाहीं. कलकत्याच्या नागरिकांच्या



कलकत्त्याचे पहिले " मेयर " दासबाबू.

हिताबद्दल खरी कळकळ बाळगणाऱ्या कोणत्याहि सरकारला सदर कार्यक्रमांत विरोधात्मक असें कांहींहि दिसणार नाहीं. कॉर्पोरेशन माझा सल्ला मान्य करण्यास तयार असेल, तर येथें कोणत्याहि प्रकारें अडवणूक करण्याचा माझा विचार नाहीं, हें मी आपणांस सांगून ठेवतों. विधायक कार्यक्रमाचे बाबतींत आपल्याला योग्य मार्ग दाखवावयाचा एवढेंच फक्त माझें धोरण राहील. आम्ही कॉर्पोरेशनचा विध्वंस करण्यासाठीं येथें आलों नाहीं. सुधारलेल्या मार्गांनीं तें चालविण्यासाठींच आम्ही येथें आलों आहों. कलकत्याच्या नागरिकांचें कल्याण करावें हाच आमचा एकमात्र उद्देश आहे. सरकारशीं कोणत्याहि प्रकारची लढाई लढण्यासाठीं आम्ही येथें आलों नाहीं. परंतु सरकारनेंच आम्हांला लढाई करण्यास भाग पाडलें, तर मात्र कलकत्याच्या नागरिकांच्या अन्नासाठीं आम्हीं दंड थोपटण्यास कमी करणार नाहीं, ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी.

## युरोपियनांवरहि आमचा दांत नाहीं !

आम्हीं युरोपियनविरोधी धोरण अंमलांत आणूं, अशा प्रकारची टीकाहि आमच्यावर करण्यांत आली आहे. ही टीका मीं वाचली तेव्हां मला हंसूं आल्याशिवाय राहिलें नाहीं. या कॉर्पोरेशनला युरोपियनविरोधी धोरण अंमलांत आणतां येणें कसें शक्य आहे, तेंच मला समजत नाहीं. हिंदी लोकांचें हित हेंच जर युरोपियन लोकांचें अहित होणार असेल, तर मात्र गोष्ट वेगळी. आम्ही शहरांतील युरोपियन विभागाच्या हिताची हेळसांड करूं, अशा अर्थाचा आरोप आमच्यावर लादण्यांत आला आहे. आपल्याला हा आरोप कदापि कबूल होणार नाहीं, अशी मला खात्री वाटते. एखाद्या विशिष्ट भागाच्या कल्याणासाठीं शहरांतील इतर सर्व विभागांच्या कल्याणावर घाला घालण्याचा प्रसंग येईल तर त्यास मात्र आम्ही कदापि तयार होणार नाहीं ही गोष्ट येथें नमूद करून ठेवणें जरूर आहे. यालाच जर आपण युरोपियनविरोधी धोरण म्हणणार असाल, तर मात्र अशा प्रकारचें धोरण आम्ही अंमलांत आणल्याशिवाय राहणार नाहीं.

## आमच्या कार्यक्रमाची रूपरेषा.

म्युनिसिपल कायदा व परिस्थिति अनुकूल असेल त्या मानानें पुढील गोष्टी अंमलांत आणाव्या असें मी कार्पोरेशनला सांगणार आहें–( १ )

प्राथमिक शिक्षण मोफत करावें. ( २ ) गरिबांस मोफत औषधपाणी मिळेल अशी व्यवस्था करावी. ( ३ ) अधिक शुद्ध व स्वस्त अशा अन्नाचा व दुधाचा पुरवठा करावा. ( ४ ) 'फिल्टर' केलेल्या व न केलेल्या पाण्याचा अधिक पुरवठा करावा. ( ५ ) अतिशय मनुष्यवस्ती असलेल्या भागांत आरोग्यरक्षणाचे बाबतींत अधिक चांगली व्यवस्था करावी. ( ६ ) गरिबांसाठीं घरांची व्यवस्था करावी. ( ७ ) कलकत्त्याच्या निकटवर्ती गांवांची सुधारणा करावी. ( ८ ) दळणवळणाच्या साधनात सुधारणा करावी. ( ९ ) कमी खर्चांत कॉर्पोरेशनचा कारभार अधिक व्यवस्थित रीतीनें चालवावा.

हा कार्यक्रम मी आंखला, त्या वेळीं प्रत्यक्ष अंमलबजावणीपेक्षां कागदावर नुसत्या रेघोट्या ओढणें फार सोपें असतें, असा विचार माझ्या मनांत आला. या दृष्टीनें पाहतां कार्पोरेशनपुढील कार्य अत्यंत बिकट आहे. परंतु तें अशक्य मात्र नाहीं. हा संबंध कार्यक्रम आम्ही येत्या तीन वर्षांत अंमलांत आणूं शकूं असा माझ्या म्हणण्याचा आशय नाहीं. कार्पोरेशननें तो अंमलांत आणण्यासाठीं कसोशीचे प्रयत्न केले पाहिजेत, एवढीच माझी इच्छा आहे.

## गरिबांची सेवा हीच देवसेवा !

दीन व दरिद्री लोकांना आम्हीं हिंदी लोक 'दरिद्रनारायण' समजतों. दरीद्रा लोकांची सेवा करणें हें आह्मां हिंदी लोकांचें फार उच्च असें ध्येय आहे. ईश्वर गरिबांच्या रूपानें अवतरत असतो, अशी आमची समजूत आहे आणि ह्मणूनच गरिबांची सेवा हीच आह्मांला देवसेवा वाटते. यासाठीं कॉर्पोरेशननें गरिबांच्या सेवेकडे विशेष लक्ष द्यावें असा माझा कॉर्पोरेशनला सल्ला आहे. गरिबांच्या सेवेचें हें व्रत डोळ्यांसमोर ठेवूनच मी मघां सांगितलेला कार्यक्रम आंखला आहे. गरिबांसाठीं घरांची सोय झाली, गरिबांसाठीं मोफत शिक्षणाची व औषधपाण्याची सोय झाली—तर ते आपणांस दुवा देतील. यांपैकीं थोडेंसें जरी कार्य कॉर्पोरेशननें करून दाखविलें, तरी सुद्धां पुरे आहे.

## २०—जादा कॉंग्रेस व स्वराज्यपक्षाचा विजय !

दिल्लीच्या जादा कॉंग्रेसमध्यें स्वराज्यपक्षाचा अपूर्व विजय झाला. तिनें तडजोडीचा ठराव मान्य करून धार्मिक अगर सदसद्विवेकबुद्धीची हरकत नसणाऱ्या कॉंग्रेसभक्तांस कौन्सिलप्रवेश करण्याची परवानगी दिली. कायदेभंगाचा विचार करण्यासाठींहि एक बड्या लोकांची कमिटी नेमण्याचा ठराव पास झाला. सदर दोन्ही ठरावांवरील दासबाबूंची भाषणें थोडक्यांत पुढें दिलीं आहेत. तडजोडीचा ठराव मौ. महंमदअल्ली यांनीं पुढें मांडला. त्यास अनुमोदन देतांना देशबंधु दास ह्मणाले:—

### तडजोडीच्या ठरावावरील भाषण.

"आज कॉंग्रेस हा तडजोडीचा ठराव एकमतानें पास करील, तर स्वराज्य नक्की जवळ आलें आहें असें ह्मणण्यास मला बिलकुल हरकत वाटणार नाहीं. आज आपण आपसांतील मतभेद मिटवून सर्वांच्या एकमात्र ध्येयाच्या सिद्धीसाठीं एकजुटीनें प्रयत्न करणें अत्यंत जरूर आहे. तर्कशास्त्राच्या दृष्टीनें हा ठराव आपणांस थोडासा सदोष दिसेल; परंतु कोणताहि तडजोडीचा ठराव असाच सदोष असावयाचा. तो तर्कशास्त्राच्या चौकटींत बसणें कधींच शक्य नाहीं. कारण तर्कशास्त्र पहात बसाल तर तडजोड होणें कदापि शक्य नसतें. परंतु तर्कशास्त्रापेक्षां जीवनाची किंमत अधिक आहे, असें मी समजतों ! आपणांला कॉंग्रेसचें जीवन पैदा करावयाचें आहें; सबंध राष्ट्राचें जीवन पैदा करावयाचें आहें. कारण त्यावरच स्वराज्य मिळणें न मिळणें अवलंबून आहे. आपणांला यांतील कांहीं भाग सम्मत नसला, तरीसुद्धां आपण हा ठराव पास केला पाहिजे. कारण आपणांस ऐक्य साधावयाचें आहे. परस्परांच्या हातांत हात घालून कार्य करावयाचें आहें. श्री. महमदअल्ली ह्मणतात कीं, मला कौन्सिलप्रवेशाचा तिटकारा वाटतो. खुशाल वाटूं द्या. मला त्यांच्यासारखा तिटकारा वाटत नाहीं. या ठरावानें अनत्याचारी असहकारितेच्या तत्त्वाबद्दल अढळ निष्ठा व्यक्त केली आहे, ही

गोष्ट लक्षांत ठेवा. आज आमच्या कार्यक्रमाबद्दल नानाप्रकारच्या शंका-कुशंका घेण्यांत येत असून आम्हीं असहकारितेच्या कार्यक्रमापासून च्युत होत आहोंत, अशा प्रकारचा आरोप आमच्यावर लादण्यांत येत आहे. स्वराज्य हें आमचें ध्येय असून, तें साध्य करण्याचा अनत्याचारी असहकारिता हा एकमात्र मार्ग आहे, असें मी आजपर्यंत सतत ह्मणत आलों आहें. या ठरावानें सर्व कौन्सिलप्रवेशेच्छु लोकांस काँग्रेसनें असा हुकूम सोडला आहे कीं, अनत्याचारी असहकारितेच्या तत्त्वास विसरूं नका व कौन्सिलांत अनत्याचारी असहकारितेच्या तत्त्वास चिकटून रहा. कांहींजण ह्मणतात कीं, हें अशक्य आहें. परंतु, मला तें सर्वस्वी शक्य वाटतें. आह्मी बाहेरून असहकारिता करूं व आंतूनहि करूं!—आणि असें होईल तरच अनत्याचारी असहकारितेची व्याप्ति पूर्ण होईल. ( हियर, हियर )

## असहकारिता म्हणजे काय ?

असहकारितेचा अर्थ तरी काय आहे ? तुमच्या वृत्तीला व तुमच्या राष्ट्रीय आत्म्याला--या आत्म्याचेंच स्वराज्य हें बाह्य स्वरूप आहे--ज्या ज्या गोष्टी विसंगत व विघातक असतात, त्या सर्व गोष्टींशीं असलेले संबंध तोडणें याचेंच नांव असहकारिता ! म्हणून ज्या असत्य गोष्टींवर आज आपल्या राष्ट्रीय जीवनाची इमारत उभी आहे, त्यांच्या कचाटींतून प्रथमतः सुटणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. ह्याच असहकारितेचा अर्थ नसेल, तर मला असहकारिता संमत नाहीं. माझा तिला विरोध आहे. हीं कायदेमंडळें असत्य आहेत, मग त्यांचा नायनाट करणें हें माझें कर्तव्य नाहीं काय ? तुमच्या राष्ट्रीय जीवनाशीं त्यांचा कोणत्याहि प्रकारचा संबंध येत नाहीं, त्यांच्यामुळें तुमच्या जीवनाचा चुराडा होत नाहीं, असें तुम्हांला कधींतरी म्हणतां येईल काय ? सध्यांच्या कौन्सिलांच्या अस्तित्वामुळें तुमच्यावर भयंकर आपत्ति कोसळत नाहींत, असें तुम्हांला कधींतरी म्हणतां येईल काय? हे शब्द माझे नाहींत. म. गांधींच्या तोंडचे आहेत. राष्ट्रीय जीवनाचा चुराडा करणाऱ्या सुधारणांचा भंग मला करावयाचा असून आत्मीयत्वाची जाणीव मला करून घ्यावयाची आहे. कौन्सिलें ह्या

कांहीं नुसत्या इमारती नाहींत. त्या संस्था असून आमच्या जीवनरक्ताचें सारखें शोषण करीत आहेत. कौन्सिलद्वारां चालणारा राज्यकारभार अशक्य करून सोडणें हाच त्यांचा नायनाट करण्याचा रामबाण उपाय आहे! मी अनत्याचारी असहकारितेच्या तत्त्वापासून कदापि च्युत होणार नसून चार दोन तुकड्यांच्या लालचीनें कौन्सिलांत जाणाऱ्या लोकांशीं माझा कांहींहि संबंध राहणार नाहीं, हें मी आपणांस जाहीर रीतीनें सांगून ठेवितों. सुधारणाराक्षसीचा अंत करण्यासाठींच मी कौन्सिलांत जाणार (हियर, हियर)! या तडजोडीच्या ठरावानें अनत्याचारी असहकारितेचें तत्त्व कायम ठेविलें आहे हें पाहून मला अत्यंत आनंद वाटत आहे. ज्या लोकांस कौन्सिलप्रवेश करण्यास धार्मिक अगर सदसद्विवेकबुद्धीची अडचण वाटते त्यांस हा ठराव बंधनकारक नाहीं. आणि तें रास्तच आहे. कारण कांग्रेसमध्यें दोन धर्मपंथांची मंडळी असली म्हणून आपण कांग्रेसचे तुकडे करणें कधींतरी योग्य होईल काय? तुमचा कुराणांत विश्वास नाहीं म्हणून तुम्हीं कांग्रेसमधून चालते व्हा, असें मुसलमानांनीं हिंदूंस सांगणें किंवा अशाच प्रकारचा जबाब हिंदूंनी मुसलमानांस देणें कधींतरी रास्त होईल काय? कधींहि नाहीं. आणि म्हणूनच या ठरावानें धार्मिक अगर सदसद्विवेकबुद्धीची अडचण असणारांस कौन्सिलप्रवेश कोणात्याहि प्रकारें बंधनकारक केलेला नाहीं. या ठरावाचा तिसरा भाग विधायक कार्यक्रमाविषयीं आहे. कांहीं जण असें म्हणतात कीं, कौन्सिलप्रवेशेच्छु लोकांना विधायक कार्यक्रम नको आहे. या ठरावाच्या जोरावर मी आपणांस असें निक्षून सांगतों कीं, अनत्याचारी असहकारितेची वृत्ति कायम ठेवून आम्हांला कौन्सिलप्रवेश करावयाचा आहे. आमचा कौन्सिलप्रवेश विधायक कार्यक्रमास कोणत्याहि प्रकारें विरुद्ध नाहीं. आमच्या विधायक कार्यक्रमाच्या आड जे जे अडथळे आले त्यांचा नायनाट करण्यासाठींच आम्हीं कौन्सिलांत जाणार आहों. तुमच्याबरोबर सहकारिता करण्यास जो तयार आहे, स्वराज्याचें ध्येय ज्याला मान्य आहे व स्वराज्यासाठीं स्वतःचा होम करण्याचीहि ज्याची तयारी आहे—अशा एका बंधूबद्दल तुम्हीं सहिष्णुता दाखविलीत, तर त्यामुळें तुमच्या कार्याचा कोणत्याहि

प्रकारें विघाड होणार नाहीं. वेळप्रसंग पडल्यास तुम्हीं सांगाल तो स्वार्थ-त्याग करण्यास मी तयार आहें ! परंतु कसेंहि करून परस्परांच्या मतांबद्दल सहिष्णु बनून आपसांतील मतभेद आपण आज मिटवूं या ! मेहेरबानी करून या ठरावास विरोध करून आपण ऐक्याचा भंग करूं नका, एवढीच माझी आपणांस आग्रहाची विनंति आहे. ”

## सविनय कायदेभंगाचा ठराव.

सविनय कायदेभंगासाठीं एक कार्यक्षम कमिटी नेमण्याचा ठराव कॉंग्रेस-पुढें आला असतां, त्यास दासबाबूंनीं जोराचा पाठिंबा दिला. त्या वेळीं दासबाबू ह्मणाले:—“ मी या ठरावाचें मनःपूर्वक स्वागत करितों. कारण त्यामुळे एकमुखी बनलेल्या कॉंग्रेसच्या नवीन कारकीर्दीस सुरुवात होणार आहे. कॉंग्रेसनें या ठरावांत एकमुखानें असें जाहीर केलें आहे कीं, सविनय कायदेभंग हाच स्वराज्यप्राप्तीचा एकमात्र कायदेशीर मार्ग आहे ! कायदे-भंगानेंच स्वराज्य मिळेल अशी घोषणा करून आज आपण नवीन आखा-ड्यांत उतरण्याची तयारी करणें रास्त आहे [ हियर, हियर. ] कायदेभं-गानेंच नोकरशाही नमेल. कायदेभंग व कौन्सिलप्रवेश यांत परस्परविरोध बिलकुल नाहीं. उलट या दोन्ही गोष्टी एकमेकांस पोषकच आहेत. [ हियर, हियर ] ! कौन्सिलें काबीज करणें हा क्रांतिकारक चळवळीचाच एक भाग आहे ( हियर, हियर ) ! त्यामुळें सविनय कायदेभंगाच्या चळवळींस मद-तच होणार आहे ! तात्काळ कायदेभंग सुरू करावा असें ठरावांत ह्मटलें नसून, तो कधीं सुरू करावयाचा याची तारीखहि त्यांत नमूद करून ठेवि-लेली नाहीं. कायदेभंगाची कालमर्यादा कांहीं गणितशास्त्राच्या आधारानें ठरवितां येत नाहीं ! तो सुरू होणें न होणें हें परिस्थितीवर अवलंबून आहे. कदाचित परिस्थिति अशी उद्भवेल कीं, दोन महिन्यांत किंवा एका आठ-वड्यांतच कायदेभंग पुकारणें आपणांस भाग पडेल ! त्यास कौन्सिलची चळवळ आड येणार नाहीं.

## २१—मीहि गुन्हेगार आहे ! मला कां पकडीत नाहीं ?

कलकत्ता कार्पोरेशनचे चीफ एक्झिक्युटिव ऑफिसर श्री. सुभाषचंद्र बोस यांस बंगाल सरकारनें १८१८ च्या तिसऱ्या रेग्युलेशनअन्वयें अटक केली असतां, सदर अटकेचा निषेध करण्यासाठीं कलकत्ता कार्पोरेशनची बैठक ता. २९ आक्टोबर १९२४ रोजीं भरली होती. सदर बैठकींत कार्पोरेशनचे मेयर देशबंधु दास यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. ते म्हणाले—

" आजच्या सारखा ठराव या कार्पोरेशनपुढें आजपर्यंत कधींहि आलेला नसेल. कोठेंहि एखादा बॉंबगोळा पडला अगर पिस्तूल वाजलें ' तर किती नीचपणाचें कृत्य हें ! ' असें म्हणण्याची आम्हांला आजपर्यंतची संवय आहे. परंतु आज अत्याचारी लोकांच्या अत्याचारांबरोबरच सरकारी अत्याचारांचा निषेध करण्याचीहि वेळ येऊन ठेपली आहे [ ऐका, ऐका ]. सरकारनें अखिल कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांचा खून करणारा असा एक कायदा निर्माण करून, त्या खालीं श्री. सुभाषचंद्र बोस यांस तुरुंगांत टाकलें आहे. हा निव्वळ अत्याचार होय ! कॉर्पोरेशननें सुभाषबाबूंस ता. २४ एप्रिल १९२४ रोजीं आपलें चीफ एक्झिक्युटिव ऑफिसर निवडिलें. सरकारनें एक महिनाभर विचार करून कॉर्पोरेशननें केलेल्या निवडणुकीवर आपल्या पसंतीचें शिक्कामोर्तब केलें. ता. २६ आक्टोबर रोजीं सुभाषबाबूंस अटक झाली. एके दिवशीं आपलें काम आटोपून सुभाषबाबू घरीं परत येतात तों त्यांस घरांत पोलीस आपली वाट पहात असलेले दिसले. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा आरोप लादण्यांत आला नाहीं. त्यांस कोणत्याहि प्रकारचा जबाब विचारण्यांत आला नाहीं. " आमच्याजवळ पाशवी शक्ति आहे, तिचा सहाय्यानें आम्हीं तुम्हांला तुरुंगांत कोंबणार " एवढेंच फक्त त्यांस सांगण्यांत आलें ( ऐका, ऐका ). हा शुद्ध अत्याचार नव्हे काय ? याला कायदा कोण म्हणेल ? याला न्याय कोण म्हणेल ? सरकारला कायद्याची व न्यायाची चाड असती, तर लगेच त्यांनीं " तुमच्यावर असा असा आरोप आहे—या बाबतींत तुमचें काय म्हणणें

आहे ? ” असा प्रश्न सुभाषबाबूंस विचारिला असता. सुभाषबाबूंवर एकहि आरोप लादण्यांत आला नाहीं, किंवा त्यांस आपली कैफियत देण्याची संधीहि मिळाली नाहीं. त्यांस फक्त बळजबरीनें पकडून तुरुंगांत कोंबण्यांत आलें. सरकारच्या या अत्याचारापेक्षां, उत्साहाचे भरांत एकादें पिस्तूल झाडणाऱ्या अगर बॉंबगोळा फेंकणाऱ्या क्रांतिकारकाचा अत्याचार अधिक मोठा असेल असें मला वाटत नाहीं ( ऐका, ऐका ) ! अत्याचारानें अत्याचार वाढतो ! १९०७ सालापासून आजपर्यंत सरकार कायद्याच्या नांवाखालीं जें सतत अत्याचार करीत आलें आहे, त्यामुळें क्रांतिकारकांस उत्तेजन मिळून अत्याचारांची संख्या वाढली आहे ! सरकारनें माझ्या तोंडचे कांहीं उद्गार घेऊन आपल्या कृत्याचें समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या उद्गारांमुळें त्यांच्या कृत्याचें समर्थन बिलकुल होऊं शकत नाहीं. बंगाल्यांत क्रांतिकारक पक्ष आहे, ही गोष्ट मी आजहि कबूल करितों. परंतु अन्याय्य कायदे पास केल्यानें ही चळवळ कधींतरी दडपली जाणें शक्य आहे काय ? १९०५ सालापासून सरकारनें अनेक दडपशाही कायदे पास केले. परंतु क्रांतिकारकांचें मनोगत जाणून घेण्याचा त्यांनीं कधींतरी प्रयत्न केला आहे काय ? मला क्रांतिकारकांचें मनोगत पूर्णपणें अवगत झालें आहे. त्यांना स्वातंत्र्याशिवाय दुसरें कांहींहि नको आहे. त्यांना स्वातंत्र्याची भूक लागली आहे. ही भूक शमविण्यासाठीं आपण गेल्या १५० वर्षांत काय केलें आहे ? आमच्या सुशिक्षित तरुणांना जगांतील इतर राष्ट्रें स्वतंत्र झालेलीं दिसतात. त्यांच्याशी ते आपल्या मायदेशाची तुलना करून पाहतात. आणि साहजिकच “ आम्ही तरी गुलामगिरींत कां रहावें ? आमचाहि मायदेश स्वतंत्र झाला पाहिजे !” असें त्यांस वाटूं लागतें ( टाळ्या ). आपला देश स्वतंत्र व्हावा अशी इच्छा बाळगणें हा गुन्हा आहे काय ? स्वातंत्र्याची क्षुधा कशी असते याची आपणां सर्वांसच जाणीव नाहीं काय ? आमच्या तरुणांच्या अंतःकरणांत उत्साहाच्या ज्वाला प्रदीप्त झालेल्या असून सरकारी राज्ययंत्राचा एक भाग बनण्याची व अशा प्रकारें देशाची उन्नति करण्याची त्यांस संधि मिळत नाहीं. ही संधि त्यांस द्या, हा राज्ययंत्र हांकण्याचा हक्क त्यांस द्या, कीं इतःपर क्रांतिकारक चळवळीचें नांवहि तुम्हांला ऐकूं येणार नाहीं !

## कारण स्वीकारतां मग उपाय कां नाकारतां ?

क्रांतिकारक पक्षाचें अस्तित्व मी कबूल केलें या गोष्टीचा फायदा सरकार हरघडी घेत असतें. देशांत क्रांतिकारक पक्ष आहे ही गोष्ट मी हजार वेळां कबूल केली आहे. या घटकेलाहि मी ती कबूल करितों. माझी कबुली तेवढी सरकारला दिसते; परंतु क्रांतिकारक पक्ष नष्ट करण्याचा मी जो उपाय सुचविला त्याचा ते कां बरें विचार करीत नाहींत ? एक दिवस तरी मी सुचविलेल्या उपायाचा त्यांनीं विचार केला आहे काय ? सबंध जगांत दडपशाही अपेशी ठरली असतांना, तिच्याशिवाय दुसरा उपायच सरकारला सुचत नाहीं काय ? कितीहि दडपशाही केली तरी क्रांतिकारक चळवळीला आळा बसणें शक्य नाहीं, हें मी पुनः एकदां सांगून ठेवितों ! तुम्हांला कोणतेंहि राष्ट्र जगांतून कायमचें नष्ट करितां येणार नाहीं ! स्वातंत्र्योन्मुख प्रजेच्या चळवळीला पायबंद घालतां येणें तुम्हांला शक्य नाहीं.

## मी आत्मयज्ञ करण्यास तयार आहे !

मी स्वातंत्र्यासाठीं आत्मयज्ञ करण्यास तयार आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गांच्या दृष्टीनें मी क्रांतिकारक नाहीं. एरव्हीं मी क्रांतिकारक आहे, असें मला वाटतें. स्वातंत्र्यासाठीं आत्माहुति देण्याची जरुरी असली तर तसें करण्यासहि मी तयार आहे, असें मी आज जाहीर करितों. [ ऐका, ऐका व टाळ्या ] ! माझा क्रांतिकारक चळवळींत विश्वास असता, ती यशस्वी होईल असें मला आज वाटलें, तरी सुद्धां मी तींत तात्काळ सामील होईल. परंतु ती यशस्वी होईल असें मला वाटत नाहीं; आणि म्हणूनच मी तींत सामील होत नाहीं ! परंतु असें असलें तरी क्रांतिकारक तरुणांचा स्वातंत्र्योत्साह मात्र मला मान्य आहे. त्यांचें स्वातंत्र्यप्रेमहि मला मान्य आहे. माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं हालअपेष्टा भोगण्याची अगर रक्ताचा प्रत्येक थेंब देण्याची जरुरी असली तर तसें करण्यासहि मी तयार आहे ! मी हौरा-स्टेशनावर पाय टाकतांच माझ्या हातांत शृंखला पडणार, असें मला सिमला येथें सांगण्यांत आलें. मला शृंखलांची भीति वाटत नाहीं. मी कोणताहि गुन्हा केलेला नाहीं. हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रामाणिक माणसाचें जें कर्तव्य तेंच मी बजाविलें आहे. मला अटकेची भीति कशाला वाटेल ?

## देशाभिमान हा गुन्हा आहे काय ?

" माझा देश मला प्यारा आहे. माझें स्वातंत्र्य मला प्यारें आहे. माझ्या देशाचा राज्यकारभार चालविण्याची सत्ता माझ्या हातीं असणें हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मला मिळाला पाहिजे असें हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रामाणिक मनुष्य म्हटल्याशिवाय राहणार नाहीं. हा गुन्हा असेल तर तो मला मान्य आहे. तो गुन्हा असेल, तर त्यासाठीं फांसावर लटकण्याचीहि माझी तयारी आहे !

## " सुभाषबाबूंपेक्षांहि माझा गुन्हा मोठा आहे ! "

सुभाषबाबू क्रांतिकारक असतील, तर त्यांच्यांहिपेक्षां मी अधिक मोटा क्रांतिकारक आहे. मला सरकारनें कां पकडलें नाहीं ? देशप्रेम हा गुन्हा असेल तर तो गुन्हा मी केला आहे. सुभाषबाबू गुन्हेगार असतील, तर मीहि गुन्हेगार आहे. कलकत्ता कार्पोरेशनचा एकटा चीफ ऑफिसरच नव्हे, तर खुद मेयरहि तितकाच गुन्हेगार आहे (ऐका, ऐका व टाळ्या) ! क्रांतिकारकांची चळवळ दडपण्यासाटीं हें फर्मान काढलें आहे, असें मला वाटत नाहीं. देशांतील कायदेशीर संस्था चिरडून टाकण्यासाटींच त्याचा जन्म झालेला आहे. या बाबतींत मि. विल्सन यांनीं पं. मोतीलाल नेहरू यांच्या भाषणांतील एक उतारा वाचून दाखविला. मी त्यांतलाच आणखी थोडासा भाग वाचून दाखवितों. पं. नेहरू म्हणतात—

" अधिकाऱ्यांस टाऊक आहे त्यापेक्षांहि जास्त क्रांतिकारक चळवळ देशांत चालू आहे असें दासबाबू म्हणतात. दासबाबूंनीं कशाच्या आधारावर हें विधान केलें तें मला टाऊक नाहीं. परंतु त्यास माझा पूर्णपणें पाठिंबा आहे. मी सरकारला असेंहि बजावून टेवितों कीं, " संभाळा, वेळींच काळजी न घ्याल तर एकाद दिवशीं सकाळी झोंपेंतून जागे झाल्यानंतर तुम्हांला सबंध देशभर गुप्तमंडळ्यांचें अजस्र जाळें पसरलेलें दिसेल ! आणि मग या संस्था नाहींशा कशा कराव्या हें तुम्हाला समजणार नाहीं. माझा या क्रांतिकारकांशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसला, तरी त्यांस काय पाहिजे आहे याची मला पूर्णपणें जाणीव आहे.

शहाण्यासुरत्या कोणाहि माणसाला त्यांचें गाऱ्हाणें समजण्यासारखें आहे. तुह्मांलाहि त्यांस काय पाहिजे तें ठाऊक आहे. तुमच्या दडपशाही कायद्यांनीं क्रांतिकारक चळवळीची पाळेंमुळें खणलीं जातील, असा अभिमान पाहिजे तर तुम्ही खुशाल बाळगा. पण लक्षांत असूं द्या, तुमच्या दडपशाहीनें क्रांतिकारक चळवळ दडपली जाणें कदापि शक्य नाहीं. म.गांधी आपल्या अनत्याचारी असहकारतेच्या साहाय्यानें या क्रांतिकारक चळवळीस आळा घालण्याचा प्रयत्न यशस्वी रीतीनें करीत होते. परंतु तुम्हीं त्यांस तो प्रयत्न करूं दिला नाहीं. तुम्हीं त्यांचे पाय मागें ओढलेत! आतां आपल्या कर्मांची फळें भोगल्यावांचून तुम्हांला गत्यंतर नाहीं. आतां गुप्त कटांचें पुनरुज्जीवन होणें अपरिहार्य आहे. तुमच्या फर्मानांचा क्रांतिकारकांची चळवळ दडपून टाकण्याकडे काडीइतकाहि उपयोग होणार नाहीं. क्रांतिकारक लोक गुप्तपणें आपलें कार्य करीत असतात. त्यांस तुमच्या फर्मानांचा बाध कसा होऊं शकेल? त्यांचा सुगावा लागणें तुम्हांला शक्य नाहीं. तुमचीं फर्मानें त्यांस स्पर्शसुद्धां करूं शकणार नाहींत! त्यांच्या संस्थांचीं नांवेंसुद्धां तुम्हांला ठाऊक नाहींत. तुम्हांला फक्त ‘लाल बंगाल’ ( Red Bengal ) एवढेंच एक नामाभिधान ठाऊक आहे. या एकाच नांवानें तुम्हीं त्या सर्वांचा उल्लेख करतां. तुम्हीं या क्रांतिकारकांच्या संस्था बेकायदेशीर ठरविल्यात, तरीसुद्धां त्यापैकीं कितीशा तुम्हीं चिरडूं शकाल? मी अमुक अमुक गुप्तमंडळीचा सभासद आहें, असें तुमच्यापुढें येऊन कोण म्हणेल? कोणीहि म्हणणार नाहीं. क्रांतिकारक ‘लाल बंगाल’ ची चळवळ गुप्तपणें अव्याहत चालू राहणार ही गोष्ट लक्षांत ठेवा! तुमच्या फर्मानांचा उपयोग क्रांतिकारकांस चिरडून टाकण्याकडे झालेला नसून, श्री. दासांसारख्या व माझ्यासारख्या, क्रांतिकारकांपेक्षांहि अधिक भयंकर वाटणाऱ्या लोकांस चिरडून टाकण्याकडेच झालेला आहे!”

फर्मानांचा उपयोग हा असा होत आहे. यापेक्षां तीं जास्त कांहींहि करूं शकणार नाहींत. स्वातंत्र्यमोक्षासाठीं कायदेशीर रीतीनें चळवळ करणारे लोक या फर्मानाअन्वयें भरडले जात आहेत. देशांतील कायदेशीर संस्था नेस्तनाबूद करण्याकडे या संस्थांचा उपयोग होत आहे. आणि असें झाल्या-

मुळें क्रांतिकारक स्वरूपाच्या गुन्ह्यांची संख्या दामदुपटीनें वाढत आहे. स्वातंत्र्याची लढाई शांतिमय व न्याय्य मार्गांनीं लढणाऱ्या प्रामाणिक तरुणांस तुम्ही त्यांच्या मातापितरांच्या व बायकापोरांच्या मगरमिठींतून ओढून तुरुंगांत कोंडूं लागलांत, तर त्यांचे मनांत तुमच्या सरकारविषयीं प्रेमभावना शिल्लक राहील, अशी तुमची अपेक्षा आहे काय ? अशी अपेक्षा तुम्ही कशी करूं शकतां ? तुमच्या प्रत्येक अत्याचारागणिक क्रांतिकारक स्वरूपाचे शेंकडों गुन्हे वाढूं लागतील, अशीच अपेक्षा तुम्हीं करावयास नको काय ? बंगालमध्यें क्रांतिकारक संस्था आहेत, हें मी पुनः एकदां कबूल करतों. परंतु त्याबरोबरच तुमचे दडपशाही कायदे, कायद्याच्या मूल तत्वांचा खून करणारे तुमचे कायदे या संस्थांचा नायनाट कदापि करूं शकणार नाहींत असेंहि मी सरकारला सांगून ठेवितों. ईश्वरानें मला आणखी कांहीं वर्षें आयुष्य दिलें, तर मी स्वतः तुमच्या दडपशाहीं कायद्यानें क्रांतिकारक संस्था नष्ट होऊं शकत नाहींत हें सोदाहरण सिद्ध करून देईन ! दडपशाही कायद्यांनीं आजपर्यंत क्रांतिकारक संस्थांचा नाश झालेला नाहीं. आणि पुढेंहि होणार नाहीं !

## कॉर्पोरेशनवरील संकट.

श्री. सुभाषबाबूंस १८१८ च्या तिसऱ्या रेग्युलेशनअन्वयें अटक होणें, हें या कॉर्पोरेशनवरील संकट आहे. त्यांच्या अटकेमुळें राष्ट्रीयत्वास अगर स्वराज्याच्या चळवळीस केवढा धक्का बसला याचा विचार क्षणभर बाजूला ठेविला, तरीसुद्धां सुभाषबाबूंची अटक ही कॉर्पोरेशनवरील आपत्ति आहे, ही गोष्ट कोणालाहि कबूल करावी लागेल. सरकार एकदां कॉर्पोरेशनच्या चीफ एक्झिक्युटिव ऑफिसरास बिनहरकत पकडूं शकलें, तर कॉर्पोरेशनच्या इतर आधारस्तंभांसहि तें एकापाठीमागून एक नेस्तनाबूद करूं शकेल, व अशा प्रकारें स्वराज्यपक्षीयांमार्फत अगर बहुमतवाल्या पक्षामार्फत चाललेला कॉर्पोरेशनचा कारभार तें अशक्य करूं शकेल, ही गोष्ट लक्षांत ठेवा. समजा, कॉंग्रेसवाल्यांमार्फत कॉर्पोरेशनचा कारभार चालू नये असें सरकारास वाटत असलें—आणि तसा तो चालू नये असें पुष्कळशा

अधिकाऱ्यांस वाटत आहे यांत बिलकुल संदेह नाहीं—तर काय होईल ? चीफ एक्झिक्युटिव ऑफिसरापासून तहत खालपर्यंतचे सर्व अधिकारी त्यांनीं एकामागून एक तुरुंगांत टाकले, तर काँग्रेसवाल्यांमार्फत चालणारा कॉर्पो-रेशनचा कारभार अशक्य होणार नाहीं काय ? या दृष्टीनें आपण सुभाष-बाबूंच्या अटकेचा विचार करा, सुभाषबाबूंची अटक ही कॉर्पोरेशनवरील आपत्ति आहे ही गोष्ट लक्षांत घ्या, आणि मग आपल्या चीफ ऑफिसर-बद्दल विश्वास व्यक्त करून सरकारच्या कृत्याचा स्पष्ट शब्दांत धिक्कार करा, एवढेंच माझें आपल्याला सांगणें आहे.

---

## २२—घरांच्या झडत्या व धरपकड.

ता. ३१ आक्टोबर १९२४ रोजीं बंगाल सरकारच्या फर्मानाचा निषेध करण्यासाठीं कलकत्त्याच्या टाउनहॉलमध्यें व बाहेर लागोपाठ पांच सभा भरल्या होत्या. सर नीलरतन सरकार यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंत भाषण करितांना देशबंधु दास ह्मणालेः—

बंगालमध्यें क्रांतिकारक पक्षाचे लोक आहेत ही गोष्ट मला ठाऊक आहे. ती नाकबूल करण्यांत कांहींच हांशील नाहीं. परंतु सरकारनें कितीहि फर्मानें काढलीं तरी क्रांतिकारकांस जरासुद्धां धक्का पोंचूं शकणार नाहीं. हे लोक क्रांतिकारक संस्थांत सामील कां झाले, याचा सरकारनें विचार केला पाहिजे. क्रांति हा या लोकांचा आवडीचा धंदा आहे, असें सरकारला वाटतें काय ? रक्ताचा सडा शिंपडून नरमेध करण्यांत आनंद मानण्याइतके हे लोक दुष्ट व निर्दय आहेत, अशी सरकारची समजूत आहे काय ? सरकारनें क्रांतीच्या मुळांत हात घालून तेथें काय आहे याचा कधीं तरी विचार केला आहे काय ? हे लोक क्रांतिकारक कां बनतात ? त्यांना स्वातंत्र्याची भूक लागली आहे. हिंदुस्थानच्या अखिल तरुणांना स्वातंत्र्याची भूक लागणें हा गुन्हा आहे काय ? क्रांतिकारक चळवळीचा बींमोड करवयाचा असेल, तर या स्वातं-

च्छेची जोपासना व अभिवृद्धि करणें हेंच तुमचें कर्तव्य आहे. लोकांची स्वातंत्र्याची तहान भागवा कीं क्रांतिकारक चळवळ आपोआप नष्ट होईल.

## झडत्या घेऊन काय निष्पन्न झालें ?

स्वातंत्र्यासाठीं हपापलेल्या लोकांस तुम्हीं क्रांतिकारक म्हणतां व फर्मानांच्या सहाय्यानें आपण त्यांच्या साऱ्या संस्थांचीं पाळेंमुळें खणून काढूं, अशी तुमची समजूत आहे. या उद्देशानें परवां तुम्हीं आपल्या पोलिसांस मोहिमेवर पाठविलेंत व कलकत्त्यांतील ५४ घरांची झडती घेतलीत. या घरांत तुम्हांला काय सांपडलें ? कितीशीं पिस्तुलें सांपडलीं ? बॉंबगोळे कितीसे सांपडले ? ज्वालाग्रही अशीं कितीशीं द्रव्यें तुह्मांला मिळालीं ? तुह्मांला यांपैकीं कांहींसुद्धां मिळालें नाहीं. ( एक आवाजः--कांहीं वाङ्मय मिळालें ! ) होय, वाङ्मय मात्र मिळालें ! आणि हें वाङ्मय कशासंबंधीं मिळालें ? तर बोल्शेविझमच्या इतिहासासंबंधीं ! कलकत्त्यांतील कोणत्याहि सुसंस्कृत कुटुंबांत हें वाङ्मय तुम्हांला मिळेल. इतिहास वाचणें हा गुन्हा आहे काय ? दुसऱ्या देशांत प्रत्यक्ष काय घडून आलें याचा अभ्यास करणें हा गुन्हा आहे काय ? ज्या बोल्शेविकांजवळ तुम्ही लौकरच तह करणार आहां, त्यांचा इतिहास वाचणें हा गुन्हा आहे काय ? या ऐतिहासिक वाङ्मयासाठीं तुम्हीं आमच्या ५४ घरांचें पावित्र्य दूषित केलें ! हा सारा खटाटोप तुम्ही कोणाच्या बातमीवर विसंबून केलात ? तुम्हांला या ५४ घरांत हरकत घेण्यासारखें असें कांहींहि सांपडलें नाहींना ? मग अशा प्रकारच्या चुकीच्या बातम्या देणाऱ्या गुप्त हेरांचे तुम्ही कान उपटले आहेत काय ? तुम्ही कोणत्या प्रकारें त्यांचें पारिपत्य केलें आहे ? तुमचे बातमीदार म्हणजे खोट्या बातम्या तयार करणारे कारखाने आहेत, याची तुम्हाला कल्पना आहे काय ? अरविंदांच्या खटल्यांत ही गोष्ट उघडकीस आली होती, याची आपणांस विस्मृति पडली काय ? तुमच्या बातमीदारांनीं खोट्या बातम्या दिल्या, तरीसुद्धां त्यांस वेदवाक्याइतका मान देऊन तुम्ही दडपशाहीस प्रवृत्त होतां, हा न्याय झाला काय ? तुमचें हें कृत्य व्यवहाराला धरून आहे, असें कोणी तरी ह्मणूं शकेल काय ? अशा परिस्थितींत धादांत खोट्या बातम्या

कळविणाऱ्या तुमच्या दूतांस तुम्ही काय शिक्षा केलीत, हें जनतेला एकदां कळेल तर फार बरें होईल. बंगाली लोकांच्या घरांत हजारों पिस्तुलें लपवून ठेविलेलीं असतील, अशी तुमची समजूत आहे. पण तशा तऱ्हेची बातमी तुम्हांला अजून कोणी देत नाहीं. तुमच्या फर्मानांनीं अगर कायद्याच्या साऱ्या तत्त्वांस हरताळ फांसणाऱ्या अन्य कायद्यांनीं क्रांतिकारकांस जरा सुद्धां इजा होत नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवा. तुम्हांला त्यांच्यासंबंधीं काडीइतकीहि माहिती मिळूं शकत नाहीं. मग असल्या फर्मानांचा तुह्माला काय उपयोग ? हीं फर्मानें तुम्ही कशासाठीं काढतां ? निर्बंधपणें वाटेल त्या घराची झडती घेतां आली, तर चुकूनमाकून एकादा तरी खराखुरा क्रांतिकारक सांपडेल, याच आशेनें तुम्ही हें फर्मान काढिलेलें नाहीं काय ? तुम्ही जनलज्जा व मनलज्जा सारी सोडली आहे असें मला वाटतें. [ एक आवाज–निगरगट्टाला लाजलज्जा कसली आली आहे ? ] होय, कोणत्याहि ठिकाणच्या नोकरशाहीचें नेहेमी अशाच प्रकारचें वर्तन असतें. नोकरशाहीच्या स्वार्थास बाध येऊं लागला कीं ती स्वतःच्या संघटनेस धाब्यावर बसविण्यासहि कदापि कमी करीत नसते. क्रांतिकारक पक्ष तर बोलून चालून सध्यांची संघटना उलथून पाडण्यास उद्युक्त झालेला आहे. अशा प्रकारें एका बाजूला मनदशीर चळवळींत बिलकुल विश्वास नसलेले क्रांतिकारक, तर दुसऱ्या बाजूला स्वतःची संघटना वाटेल तेव्हां उधळून लावण्यास तयार असलेलें सरकार–अशा पेंचांत आपण सांपडलेले आहों. परंतु अद्यापि मी निराश झालेला नाहीं. उलट ही परिस्थिति पाहून मला आनंदच होत आहे. कारण, आपला अंत समीप आला असें नोकरशाहीला वाटूं लागलें कीं मगच ती अशा प्रकारच्या न्यायाची विडंबना करणाऱ्या कायद्यांचा आश्रय करीत असते, ही गोष्ट मला ठाऊक आहे. आमच्या नोकरशाहीनें १९०६ सालपासून असले कायदे प्रचारांत आणिले आहेत. अजूनहि क्रांतिकारकांचें कुळ नष्ट होत नाहीं. नोकरशाहीचा आणखी एक आशातंतु शिल्लक आहे. तिच्या शस्त्रागारांत अद्यापि लष्करी कायदा आहे. तो ती सुरू केल्याशिवाय राहणार नाहीं. मला त्याची पर्वा नाहीं. मी मातृभूमीच्या सेवेसाटीं आत्मबलिदान करण्यास तयार आहे.

मला अटकेची भीति वाटत नाहीं. असल्या धरपकडीनें अगर झडत्यांनीं हिंदी लोक चिरडले जाणें शक्य नाहीं. हिंदी लोकांस चिरडण्याचें सामर्थ्य तुमच्या हॉवित्झर तोफांतहि नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवा. तुम्ही आमच्या ७० लोकांस पकडिलें आहे. आम्हां सगळ्यांनाच पकडून बंगालचा उत्साह द्विगुणित कां करीत नाहीं ? मी वयानें वृद्ध झालों असलों, तरी तरुणांचा उत्साह माझ्या अंतःकरणांत वसत आहे. स्वातंत्र्योत्सुक बंगाली तरुण तुमच्या फर्मानांना अगर रेग्युलेशन्सनां कदापि भीक घालणार नाहींत. माझा नश्वर देह चितेवर पडण्यापूर्वी माझा मायदेश स्वतंत्र झालेला मला दिसो, एवढीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे ( टाळया ) !

## २३—क्रांतिकारकांबरोबर सरकारचाहि धिक्कार करा !

———:o:———

ता. २४ नोव्हेंबर १९२४ रोजीं मुंबईस भरलेल्या ऐक्य परिषदेंत बंगाल-ऑर्डिनन्स संबंधींच्या ठरावावर भाषण करितांना देशबंधु दास म्हणाले:—

" मला या ठरावांतील सर्व गोष्टी मान्य नसल्या तरी त्यास माझा पाठिंबा आहे. हा ठराव म्हणजे देशांतील अखिल पक्षांच्या देवाणघेवाणाचा परिणाम आहे. आणि म्हणूनच त्यास मी मनःपूर्वक पाठिंबा देतों. हा ठराव स्वराज्यपक्षाचा आहे, असा गैरसमज बाहेर होऊं नये म्हणून या ठरावाचे बाबतींत मी आपली बाजू स्पष्टपणें पुढें मांडणार आहे. या ठरावांत स्वराज्य-पक्षाचा नामनिर्देश कोठेंहि आढळत नाहीं, अशी कित्येक सभासदांची तक्रार आहे. ही तक्रार खरी असली तरीसुद्धां सदर ठराव तयार करणाऱ्या कमिटीचें मी अभिनंदन करितों. कारण बंगालसरकारच्या फर्मानाचा मूळ उद्देश कोणताहि असो, त्याचा परिणाम एक सनदशीर चळवळ दडपून टाकण्यांत झाला, ही गोष्ट देशांतील अखिल पक्षांस मान्य आहे. कांहीं अपवाद सोडून दिले, तर बंगालसरकारचें हें फर्मान स्वराज्यपक्षास चिरडून टाकण्यासाठीं अवतीर्ण झालें आहे, याबद्दल बंगालमधील प्रत्येक माणसाची खात्री होऊन चुकली आहे. असें असलें तरी

सुद्धां या ठरावांतून बंगालचें नांव गाळून टाकल्याबद्दल मी आपलें अभिनंदन करितों. कारण सरकारी दडपशाहीच्या सन्मानाचा वांटा देशांतील प्रत्येक पक्ष घेण्यास तयार आहे, हें या ठरावावरून कोणाच्याहि निदर्शनास येईल. आज बंगालसरकारनें आपल्या भात्यांतला बाण स्वराज्यपक्षाविरुद्ध फेंकला आहे. उद्यां तोच बाण नेमस्तपक्षाविरुद्ध फेंकला जाण्याचाहि संभव आहे. आणि तसें झालें तर त्यांत मला आनंदच वाटेल. कारण तसें झाल्याशिवाय नेमस्त पक्षाला या फर्मानाचें भयंकर स्वरूप कळून येणार नाहीं.

## सरकारचा डळमळीत पुरावा.

पुष्कळशा वक्त्यांनीं माझ्या कबुल्यांचा उल्लेख केला आहे. परंतु कोर्टास रामराम ठोकल्यापासून मी कधींहि कोणती कबुली दिली नाहीं ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी (हंशा). मला जें जें सत्य वाटलें तेंवढेंच मी बोललों आहे. देशांत क्रांतिकारक पक्ष आहे हें मी पुनः एकदां कबूल करतों. परंतु क्रांतिकारक पक्ष म्हणजे अराजक पक्ष मात्र नव्हे. कारण क्रांतिकारक पक्षाच्या मार्गास आपला विरोध असला, तरी त्यांचा उद्देश मात्र देशांत कोणत्याहि प्रकारचें सरकार नसावें असा नसून, सध्यांच्या सरकारांत फक्त क्रांति घडवून आणावयाची असा आहे. स्वराज्यपक्ष हा सुद्धां क्रांतिकारक पक्ष आहे. कारण त्याला शांतिमय क्रांति घडवून आणावयाची आहे. देशांत अत्याचारी क्रांतिकारकांचा पक्ष आहे असें गृहीत धरून चाललें, तरीसुद्धां तेवढ्यानें सरकारनें चालविलेली दडपशाही समर्थनीय ठरूं शकत नाहीं. उलट, देशांत अत्याचारी क्रांतिकारकांची चळवळ आहे असें सरकारला *वाटलें, तर सध्यांसारखें फर्मान काढण्यापूर्वी सरकारनें हजार वेळां विचार* केला पाहिजे. कारण असल्या फर्मानांनीं क्रांतिकारक पक्षाची पाळेंमुळें कधींहि खणलीं जात नसून, उलट ती चळवळ अधिकाधिक दृढमूल होत जाते, असा साऱ्या जगाचा अनुभव आहे. ज्या साक्षीपुराव्यावर सरकारची सबंध भिस्त, तो साक्षीपुरावाच मुळांत डळमळीत आहे. फर्मानांचें समर्थन करितांना कोना प्रकरण, गोपीनाथ साहाचा खटला, मिर्झापूर बाँब केस या चार दोन गोष्टींचा व्हाईसरॉयांनीं उल्लेख केल्याचें सांगण्यांत आलें. या चार दोन गोष्टी-

१२

वर विसंबूनच देशांत क्रांतिकारक पक्ष आहे, अशी सरकारनें आपली समजूत करून घेतली असेल तर मात्र ही त्यांची समजूत साफ चुकीची आहे, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कोना येथील दरवड्याचा खटला हा साफ बनावट असा खटला होता. त्यांतील माफीचा साक्षीदार हा बनवलेला साक्षीदार होता. असें असतांना या प्रकरणामुळें नेहमींचा कायदा न्यायदानास पुरेसा नाहीं, असें सरकारला कां वाटावें? दुसऱ्या एका खटल्यांत नॉर्टन व मी असे काम करीत होतों. त्यावेळीं पोलिसांनीं कोर्टापुढें एक पिस्तूल सादर केलें असतां, मि. नॉर्टन यांनीं त्यांस प्रश्न विचारला कीं, 'दुसऱ्या एका खटल्यांत कोर्टापुढें जें पिस्तूल सादर करण्यांत आलें, तेंच हें नव्हे काय?' या प्रश्नास पोलिस–साक्षिदाराकडून कांहींहि जबाब मिळाला नाहीं! आतां पोस्ट ऑफिसांत झालेल्या खुनाकडे वळूं. या खटल्यांत हिंदी साक्षिदारांनीं साक्षी दिल्या व हिंदी ज्यूररांनींच आरोपीस शिक्षा ठोठावली. गोपिनाथ साहाच्या खटल्यांत सगळे साक्षिदार हिंदी होते, ज्यूरर्सहि हिंदी होते व आरोपीस शिक्षा झाली. मिर्झापूर येथील बॉंब-प्रकरणांत शांती नांवाचा एक साक्षिदार असून त्यास दोन महिनेपर्यंत तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. पुढें ज्यूरीनें त्यास निर्दोष सोडून दिलें व जजाचेंहि ज्यूरीशीं एकमत झालें. पुढें या माणसाचा खून झाला. पण या गोष्टीवरून क्रांतिकारक पक्षाचें अस्तित्व कसें सिद्ध होतें? सदर खून केल्याचे आरोपावरून दोघां माणसांस पकडण्यांत येऊन त्यांना दोन महिने तुरुंगांत ठेवण्यांत आलें. परंतु त्यांचेविरुद्ध कांहींच साक्षीपुरावा नसल्यामुळें पुढें त्यांस सोडून द्यावें लागलें. ही सर्व हकीगत लक्षांत घेतां देशांतला साधा कायदा न्यायदानास अपुरा आहे असें कोणाला तरी म्हणतां येईल काय? या तुटपुंज्या साक्षीपुराव्याच्या पायावरच सरकारी दडपशाहीचा सर्व डोलारा उभा असेल, तर ऑर्डिनन्सला आपण बिलकुल संमति देऊं नका, असें माझें आपणांस सांगणें आहे. क्रांतिकारक चळवळीचें स्वरूप कितीहि लहान अगर मोठें असो, देशांत तिचें अस्तित्व आहे असें आरंभीं गृहीत धरूनच तुम्हीं चालत असाल, तर आधीं क्रांतिकारक चळवळीच्या मूळ कारणांची चौकशी केल्याशिवाय त्याचप्रमाणें क्रांतिकारक

चळवळींचें आद्यजनक जें सरकार त्याचा धिक्कार केल्याशिवाय तुम्हांला क्रांतिकारकांच्या चळवळीचा धिक्कार करितां येणार नाहीं ( टाळ्या )! केवळ बंगालमुळेंच आपणांपुढें हा ठराव आलेला आहे. अशा परिस्थितींत बंगालचें नांव आपण त्यांतून वगळलेंत तरी त्याची मला फिकीर नाहीं. बंगालचें नांव आपण वाटेल तितक्या वेळां गाळा; पण सार्वजनिक चळवळींतून आपल्याला बंगालची हकालपट्टी केव्हांहि करितां येणार नाहीं ( ऐका, ऐका व टाळ्या ).

## बंगालमधील दडपशाहीचा इतिहास.

१९०४ सालीं बंगालची फाळणी झाली. तत्पूर्वीं बंगालमध्यें क्रांतिकारक चळवळीचा गंधसुद्धां नव्हता. "लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं मी बंगालचे दोन तुकडे करीन" असें आव्हान लॉर्ड कर्झन यांनीं दिलें. बंगालनें मर्दपणें या आव्हानाचा स्वीकार केला व बहिष्काराच्या चळवळीस सुरुवात झाली. उलट सरकारनेंहि उत्तर म्हणून नानातऱ्हेचे दडपशाही कायदे अंमलांत आणण्यास सुरुवात केली. अनेक विद्यार्थ्यांनीं शाळांवर बहिष्कार पुकारून त्या सोडून दिल्या. या विद्यार्थ्यांस शाळांमधून पुनः केव्हांहि घेतलें जाऊं नये, असा हुकूम सरकारनें सोडला. हे सारे विद्यार्थी कुठें गेले व त्यांचेपुढें कोणता मार्ग शिल्लक राहिला, याची सरकारला दाद आहे काय ? नंतर सरकारी हुकमाअन्वयें पोलिसांनीं बारिसालची परिषद मोडली. या हल्ल्यांत पोलिसांस एकहि पिस्तूल सांपडलें नाहीं. आम्ही मिरवणुकींतून जात असतां पोलिसांनीं आमच्या पाठी कशा मोकळ्या केल्या हें मला अद्यापिहि चांगलें आठवतें. अशा प्रकारें दडपशाहीचा वरवंटा सारखा फिरत असतां क्रांतिकारक चळवळीचा जन्म होणार नाहीं तर होईल तरी काय ? या चळवळीचा धिक्कार करावयाचा असेल तर जरूर करा; पण तसें करतांना सदर चळवळीस जन्म देणाऱ्या सरकारचाहि धिक्कार करण्याचें धैर्य दाखवा. ( टाळ्या )! अत्याचारी चळवळीनें स्वराज्य मिळणार नाहीं, अशी माझी व्यक्तिशः समजूत आहे. या माझ्या विधानाबद्दल कांहीं व्यक्तींस शंका वाटत असली, तरी बंगालमधील ज्या

४।२ माणसांनीं अनत्याचाराचा तत्त्व ह्मणून स्वीकार केला आहे त्यांपैकीं मी एक आहे ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी. असो. बारिसाल प्रकरण आटोपल्यानंतर सरकारनें नानाप्रकारें लोकांची छळणूक करण्यास प्रारंभ केला. विद्यार्थ्यांवर खटले करण्यांत येऊन त्यांची तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. फाळणीसंबंधींची चळवळ जमीनदोस्त करण्यासाठीं सरकारनें हिंदू व मुसलमान यांमध्यें कलागती लावून देण्याचे प्रयत्न प्रत्यक्षपणें केले. नंतर 'लाल चोंपड्यां'चें प्रकरण उपस्थित झालें. हीं चोंपडीं कित्येक इंग्रजी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेलीं होतीं. या चोपड्यांचा मूळ जनक कोण, याची माहिती विचारली असतां सरकारनें कानावर हात ठेविले. पुढें हीं चोपडीं काढणाऱ्या माणसाचा आम्ही कसावसा सुगावा लाविला व त्यास कोर्टापुढें उभें केलें. तेव्हां सरकारनें मूळांतच फिर्याद काढून घेतली !

## क्रांतिकारक चळवळ अशीच चालू राहणार !

याच वेळीं हिंदूंचीं देवालयें पाडण्यांत आलीं व मुसलमानांनीं हिंदूंचीं घरें अपवित्र करून टाकलीं ! तेव्हां पोलीसची मदत मिळत नाहीं, असें पाहून आम्ही अखिल हिंदू समाजाचे बचावासाठीं 'अनुशीलन समितीची' स्थापना केली. नंतर सरकारतर्फे दडपशाहीच्या दुसऱ्या हप्त्यास सुरुवात झाली. १८१८चा तिसरा कायदा नोकरशाहीच्या शस्त्रागारांतून बाहेर पडला व त्यानें अश्विनीकुमार दत्तासारख्या लोकप्रिय माणसाचे व कृष्णकुमार मित्रांसारख्या मवाळांतल्या मवाळाचे बळी घेतले ! सदर कायद्याअन्वयें पकडलेल्या माणसांस हद्दपार करण्यांत आलें व 'अनुशीलन समिती' ही संस्था बेकायदेशीर ठरली ! यानंतर क्रांतिकारक चळवळीचा जन्म झाला. जोंपर्यंत देशांत नोकरशाही कायम आहे तोंपर्यंत ही चळवळ नष्ट होणें शक्य नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवा ! नोकरशाही कायम असेपर्यंत ही चळवळ तशीच पुढें चालू राहणार ( टाळ्या ) ! तुह्मांला ती दडपून टाकतां येणें शक्य नाहीं [टाळ्या] ! क्रांतिकारक तरुण देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या जिवावर उदार झाले असतांना, त्यांची स्वातंत्र्येच्छा तृप्त केल्याखेरीज तुह्मांला त्यांची चळवळ कशी नष्ट करतां येईल ? त्यांची स्वातंत्र्यक्षुधा शांत झाल्याखेरीज ही चळवळ

... ग्रंथ ... ना.

बंद होणें शक्य नाहीं. मायदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं स्वतःच्या देहाचें विसर्जन करण्यास आमचे तरुण तयार आहेत, तोंपर्यंत ही चळवळ- अशीच अव्याहत चालू राहणार ! ऐक्यपरिषदेच्या ठरावांनींही ती बंद होणें शक्य नाहीं. कारण, अत्याचारानें स्वराज्यप्राप्ति होणें शक्य नसलें, तरी मनुष्यस्वभाव पूर्वींसारखाच कायम आहेना ? तो कसा पालटणार ? [ टाळ्या ]. मला सत्य सांगावयाचें होतें. तें मी निर्भीडपणें आपणांसमोर सांगितलें आहे. आपण कदाचित मला अत्याचारी क्रांतिकारक ह्मणाल. परंतु त्याची मला पर्वा नाहीं. कारण मी अत्याचारी क्रांतिकारक नाहीं. आणि असें आहे तरी-सुद्धां एकट्या क्रांतिकारकांचा निषेध करण्यास मी तयार होणार नाहीं ! क्रांतिकारकांबरोबरच त्यांस जन्म व उत्तेजन देणाऱ्या सरकारचाहि निषेध केला पाहिजे ( ऐका, ऐका व टाळ्या ) ! या ठरावांत वैगुण्य असलें, तरी सुद्धां आपण त्यास पाठिंबा द्या, अशी माझी आपणांस विनंति आहे.

---

## २४--परकीयांचे खिसे भरूं नका !

ता. ५ डिसेंबर १९२४ रोजीं स्वराज्य—सप्ताहानिमित्त वेणियाकपूर येथें भरलेल्या सभेंत देशबंधु दास यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें ते म्हणाले—तीन वर्षांच्या असहकारितेच्या चळवळीमुळें लोकांच्या अंतः-करणांत स्वातंत्र्यलालसा उत्पन्न झाली. आतां स्वातंत्र्याचें वारें बहुजन-समाजांत पूर्णपणें शिरलें असल्याकारणानें भूमिका तयार झाली आहे. आतां विधायक कार्यक्रमाचे प्रयत्न जोरानें सुरू केले पाहिजेत. आमच्या चळवळींच्या सर्व क्षेत्रांवर नोकरशाहीचें वर्चस्व अद्यापि कायम आहे. हें वर्चस्व आधीं नष्ट केलें पाहिजे. नोकरशाहीचें वर्चस्व नष्ट झालें तरच राष्ट्राची कांहींतरी प्रगति झाली असें म्हणतां येईल. नोकरशाही आत्मसंरक्षणासाठीं जंगजंग पछाडल्याशिवाय राहणार नाहीं. ती आमच्या विधायक चळवळीसहि विरोध केल्याशिवाय राहणार नाहीं. आमच्या उद्योगधंद्यांची स्थिति सध्यां अत्यंत हलाखीची आहे. हिंदुस्थानांतील कोणतीहि बँक आमच्या उद्योग-

धंद्यांस मदत करूं शकत नाहीं. कारण साऱ्या बँकांचें अस्तित्व इंपीरियल बँकेवर अवलंबून आहे. आणि इंपीरियल बँकेची सत्तासूत्रें तर सरकारच्या हातीं आहेत. अशा प्रकारें आपल्या बँका परावलंबी बनल्याकारणानें, स्वतःच्या पायांवर उभें राहून आपल्या उद्योगधंद्यांची जोपासना व वाढ केल्याशिवाय आपणांस गत्यंतर नाहीं.

हरदिन उपासमार होत असलेली जनता स्वातंत्र्याची लढाई चालवूं शकत नाहीं. आपलें राष्ट्र दणकट होऊं शकेल, अशा प्रकारचीच चळवळ आपण चालविली पाहिजे. बंगालचे शेतकरी हालअपेष्टांत काळ कंठीत असतांना, त्यांच्या शेतांत उत्पन्न होणारें तागाचें पीक, इंडीच्या व्यापाऱ्यांचे खिसे गरम करण्यासाठीं खर्च होतां कामा नये. तागाच्या धंद्यांत मिळणाऱ्या पैशाचा विनियोग हिंदुस्थानास विघातक अशा प्रकारची चळवळ चालविण्याकडे होत असतो. हा पैसा तागाचें पीक काढणारे आमचे शेतकरी अजाणतां परकीयांच्या खिशांत जाऊं देतात. परकीयांकडे जाणारा हा संपत्तीचा प्रवाह बंद झाला पाहिजे. बंगालचें अस्तित्व नष्ट व्हावें असें बंगाली लोकांस वाटत नसेल, तर इतर स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणें आम्हीहि आमची मान वर करून चालण्याचा संकल्प केला पाहिजे. बीजारोपण केव्हांच होऊन गेलें आहे. आतां पीक काढण्यास पुढें आलें पाहिजे. मातृभूमीसाठीं थोडासा स्वार्थत्याग करण्यास आमचे देशबांधव कधींतरी मागेंपुढें पाहतील काय ? आमची पिढी मागें राहिली तरी त्याची मला पर्वा नाहीं. कारण माझा सारा विश्वास तरुणपिढीवर आहे. माझा सारा विश्वास भावि पिढीवर आहे. आमचे तरुण यथावकाश आपलें सारें सामर्थ्य प्रकट केल्याशिवाय राहणार नाहींत. मी स्वतः वृद्ध असलों तरी अखिल देशांत उत्साह व आत्मविश्वास उत्पन्न करण्यासाठीं अखंड झटण्याचा मी निश्चय केला आहे.

## २५—बेळगांव-कांग्रेसमधील भाषण.

ता. २६ डिसेंबर १९२४ रोजीं बेळगांव-कांग्रेसमध्यें गांधी-दास करारमदारासंबंधीचा ठराव पुढें मांडतांना देशबंधु दास म्हणाले—या ठरावानें कांग्रेसमधील अखिल पक्षांत एकी साधणार असून, त्यामुळें आम्हीं सरकारला एक आव्हान देत आहोंत. कांग्रेसमध्यें कितीहि मतभेद माजोत, सार्वत्रिक संकटाचे प्रसंगीं 'वयं पंचाधिकं शतम्' या न्यायानें आह्मी त्यास तोंड द्यावयास तयार आहोंत, असें या ठरावानें जाहीर केलें आहे. गयेला मतभेदांचें रणशिंग फुंकलें गेलें आणि आज मी पक्षैक्याचा ठराव पुढें मांडीत आहे. गयेला मतभेद झाले तरीसुद्धां मी कांग्रेस-सभासद होतों व आजहि कांग्रेस सभासद म्हणूनच मी हा ठराव पुढें मांडीत आहे. कांग्रेसमधील बहुमतवाल्या पक्षाशीं माझा मतभेद झाला, तरीसुद्धां मी कांग्रेस सोडून दिली नाहीं कांग्रेसच्या कक्षेंत राहूनच मी माझ्या मतप्रसाराचें काम चालविलें. मी कधींहि बंड केलें नाहीं. नाफेरपक्षाच्या माझ्या बांधवांशीं मी भांडलों असलों, तर तो केवळ कांग्रेसच्या चळवळीची दिशा बदलणें हें माझें कर्तव्य आहे असें मला वाटलें, म्हणूनच भांडलों. आतां तरी उभय पक्षांनीं परस्परांशीं उदारदृष्टीनें वागलें पाहिजे. मतभेद जसे दिल्लीस कायम होते, तसेच ते कोकोनाड्यासहि कायम होते. परंतु आज आम्ही आपले मतभेद बाजूस सारून ऐक्य संपादन केलें आहे. म. गांधींची मुक्तता झाल्याशिवाय देशांत खरें ऐक्य प्रस्थापित होऊं शकणार नाहीं, अशी माझी खात्री होती. आणि ह्मणूनच मी सारखी त्यांची वाट पाहत होतों. अखेरीस महात्माजींनीं प्रस्तुतच्या करारमदारास आपली संमति देऊन देशांत ऐक्य प्रस्थापित केलें. महात्माजींनीं प्रेमळपणानें स्वराज्यपक्षाशीं सहकार्य केलें. त्यांनीं कॉंग्रेसची कार्यमर्यादा वाढवून त्यांत स्वराज्यपक्षाचा अंतर्भाव केला. आजपासून फेरवादी पक्ष हा कॉंग्रेसचाच एक भाग बनला आहे.

### नोकरशाहीच्या आव्हानास उत्तर द्या !

मनुष्यमात्राला स्वतंत्र विचार करण्याचा हक्क आहे, तोंपर्यंत मतभेद हे कायम राहणारच. परंतु देशप्रेमासाठीं व नोकरशाहीच्या आव्हानाला—बंगा-

लच्या फर्मानाला-उत्तर देण्यासाठीं आपसांतील मतभेदांस तिलांजलि देणें आज आह्मांला प्राप्त आहे. बंगालच्या फर्मानामुळें आज साऱ्या हिंदुस्थानचा उपमर्द झाला असतांना फेरवाले हे अविचारी आहेत सबब त्यांस कॉंग्रेसच्या बाहेर हांकलून दिलें पाहिजे, किंवा नाफेरवाल्यांस दूरदृष्टि नाहीं, अशा प्रकारचीं भांडणें भांडत बसणें केव्हां तरी इष्ट होईल काय ? नोकरशाहीची अशी अपेक्षा होती कीं बेळगांवास फेरनाफेरांचीं भांडणें होऊन परस्परांचीं डोकीं फुटणार. परंतु म. गांधींनीं सदर अपेक्षा फोल ठरविली आहे [ ऐका, ऐका ] ! आम्हीं नोकरशाहीवर चहूंकडून हल्ले चढवून तिला बेजार करणार असें उत्तर आज कॉंग्रेसनें दिलें असून, सदर युद्ध चालविण्यास स्वराज्यपक्षाला कांग्रेसचा पाठिंबा मिळाला आहे. आपण नोकरशाहीला कोठेंहि थारा देतां कामा नये. तिच्या साऱ्या निवाऱ्याच्या जागा आपण काबीज करून त्यांची पाळेंमुळें खणून काढिलीं पाहिजेत. राष्ट्राला आत्मप्राप्ति करून घेण्याचे मार्गांत जे जे अडथळे येतात ते दूर होणें याचेंच नांव स्वराज्य. आपल्याला कौन्सिलांमधून स्वराज्य मिळणार नाहीं, ही गोष्ट खरी. परतु त्यांमुळें आमच्या देशाचा घात होऊं शकतो, इकडेहि डोळेझांक करून चालणार नाहीं. म्हणून स्वराज्यप्राप्तीचे आड येणाऱ्या या कौन्सिलांचा आपण आधीं नायनाट केला पाहिजे [ टाळ्या ]. स्वराज्य मिळविण्यासाठी आपण सतत चळवळ केली पाहिजे. चळवळ केली तरच स्वराज्य मिळेल. आपल्या राष्ट्राची उभारणी व्हावी असें आपल्याला वाटत असेल, तर कौन्सिलांबरोबरच म्युनिसिपालिट्या, जिल्हा बोर्ड व इतर स्थानिक संस्था काबीज करा व त्यांमधून राष्ट्रसंवर्धनाचा विधायक कार्यक्रम अंमलांत आणा.

## परदेशी कापडावरील बहिष्कार.

सर्व प्रकारच्या परदेशी कापडावर बहिष्कार घाला. सदर बहिष्कारानें ब्रिटिशांचा येथें राज्य करण्याचा हक्क तर नष्ट होईलच; परंतु त्याच्या अंमलबजावणीसाठीं प्रत्येकानें थोडथोडा स्वार्थत्याग करण्याचें ठरविलें तर आपल्या राष्ट्रसंवर्धनाचे बाबतींतहि बरीच आघाडी मारितां येईल. नीट प्रयत्न झाले तर आपण थोडक्याच काळांत अखिल परदेशी कापडावर बहिष्कार घालूं शकूं, अशी मला खात्री वाटते.

आम्ही हिंदुस्थानचा छळ व गांजणूक शेवटपर्यंत चालवूं शकूं, अशी नोकरशाहीची समजूत असेल, तर ती नोकरशाहीची भयंकर भूल आहे. आम्हांला नोकरशाहीच्या दडपशाहीची पर्वा नाहीं. देवाच्या घरीं केलेल्या पापांचें फळच आम्हांला भोगावें लागत आहे, असें समजून आम्ही नोकरशाहीनें चालविलेली दडपशाही सहन करूं; व अशा प्रकारें स्वातंत्र्य उपभोगण्याची लायकी आम्ही संपादन करूं. ज्या दिवशीं अखिल राष्ट्र स्वातंत्र्य भोगण्यास लायक ठरून केवळ ठरावांचे रूपानेंच नव्हे, तर कृतीनेंहि स्वातंत्र्याची लढाई लढण्यास एकदिलानें उभें राहील, त्या दिवशीं नोकरशाही नष्ट झाली, असें खुशाल समजा !

---

## २६—बंगाल कौन्सिलांतील भाषण.

बंगाल कौन्सिलांत स्वराज्य पक्षाचें बहुमत नसतांनाहि देशबंधूंनीं आपल्या असामान्य कर्तृत्वशक्तीच्या जोरावर बंगालसरकारचा अनेकवार पराभव केला. त्यांनीं दिवाणांचें पगार नाकारून त्यांस राजीनामे देण्यास तर भाग पाडलेंच; परंतु बंगालसरकारचें ऑर्डिनन्स बिल ७ जानेवारी १९२४ रोजीं कौन्सिलपुढें आलें असतां, तेंहि आपल्या स्वतंत्र पक्षांतील मित्रांच्या सहाय्यानें फेटाळून लाविलें. सदर बैठकीचे प्रसंगीं देशबंधू आजारी असतांहि आजाऱ्याच्या खुर्चीत बसून कौन्सिल–हॉलांत आले होते. ते हजर राहिल्यामुळें यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें सारा देखावा पालटला व आर्डिनन्स बिल ६६ विरुद्ध ५७ मतांनीं फेटाळलें गेलें. या बैठकीत त्यांनीं कोणत्याहि प्रकारचें भाषण केलें नाहीं. त्यांच्या कौन्सिलांतील भाषणाचा मासला वाचकांस पहावयास मिळावा म्हणून २३ मार्च १९२५ रोजीं भरलेल्या बंगाल कौन्सिलच्या बैठकींत दिवाणांच्या पगाराची मागणी सरकारतर्फे पुढें आली असतां त्यांनीं जें भाषण केलें, त्याचा गोषवारा पुढें दिला आहे. सदर बैठकींत दिवाणांचे पगाराची मागणी ६९ विरुद्ध ६३ मतांनीं फेटाळली जाऊन, फजलूल हक्कांसारख्या माजी दिवाणानेंहि स्वराज्यपक्षास अनुकूल मत दिलें ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

दिवाणांचे पगार फेंटाळून लावण्यासंबंधींच्या ठरावास पाठिंबा देतांना देशबंधु दास म्हणाले–माझी प्रकृति नादुरुस्त आहे तरी सुद्धां या ठरावावर बोलल्याशिवाय माझ्याच्यानें राहवत नाहीं. मि. फजलूल हक यांच्या भाषणावर माझ्या अनेक मित्रांनीं अत्यंत कडक टीका केली आहे. त्यांचा माझा मतभेद असला, तरी त्यांनीं पुढें मांडलेली बाजू बुद्धिग्राह्य कां ठरूं नये तेंच मला समजत नाहीं. मला त्यांची बाजू पूर्णपणें समजली आहे. द्विदळराज्यपद्धतीचें समर्थन करितांना राष्ट्रसंवर्धक खातीं लोकप्रतिनिधींनीं हातीं घेतलीं पाहिजेत व बहुजनसमाजाच्या कल्याणासाठीं कांहींना कांहीं तरी केलें पाहिजे–अशा प्रकारचे ठराविक मुद्दे अनेक सभासदांनीं पुढें मांडिले. पण याच्यापेक्षां जास्त कोणीहि कांहीं मांगू शकला नाहीं. उलट-पक्षीं दिवाणांना लोकपक्षाचा पाठिंबा मिळून त्यांचें बूड स्थिर होणार नसेल, द्विदळ पद्धतीमुळें जें काय थोडेंबहुत लोकहित साधावयाचें, तें साधाण्यास अनुकूल अशी परिस्थिति निर्माण होणार नसेल, तोंपर्यंत दिवाणगिऱ्या स्वीकारण्यांत कांहींहि हांशील नाहीं, असें मि. फजलूल हक यांचें म्हणणें आहे (ऐका, ऐका). मला मि. हक याची बाजू पूर्णपणें समजली असून तिजबद्दल मला आदर वाटतो. त्यांच्यावर एवढा टीकेचा भडिमार कां व्हावा तेंच मला समजत नाहीं. प्रस्तुत ठरावास मी कां पाठिंबा देतों याचीं कारणें वेगळीं असलीं तरी मि. हकांची बाजू मला पूर्णपणें समजली आहे. सर प्रवाशचंद्रांची बाजू मात्र मला बिलकूल समजू शकत नाहीं. (ऐका, ऐका). मि. फजलूल हक यांचा द्विदळ पद्धतींत विश्वास आहे. सर प्रवाशचंद्र मित्र यांचा नाहीं. सर प्रवाशचंद्र यांनीं द्विदल पद्धतीसंबंधींचें आपले मत अनेकवार बोलून दाखविलें असून, आजहि त्याचा पुनरुच्चार त्यांनीं आपल्या भाषणांत केला आहे. ते मुडिमन कमिटीसमोरील आपल्या साक्षींत म्हणतात—"दिदलपद्धति अपेशी ठरली असें माझें ठाम मत आहे; सदर पद्धति अंमलांत आणण्याचे बाबतींत यापुढें अधिकाधिक अडथळे येत जातील." ते आपल्या तोंडीं जबानींत म्हणाले कीं, मी द्विदल पद्धतीचा सदासर्वदा धिक्कार केला आहे. आज त्यांनीं 'तत्त्वा'चें एक तट्टू पुढें दामटलें आहे. मला त्यांच्या तत्त्वाचा अर्थच कळत

नाहीं. कोणत्या तत्त्वाच्या जोरावर " मी सदासर्वदा द्विदलपद्धतीचा धिक्कार केला आहे; माझा द्विदलपद्धतींत विश्वास नाहीं. द्विदलपद्धति अव्यवहार्य आहे; तरीसुद्धां मी ती अंमलांत आणण्यास तयार आहे " असें तुम्ही म्हणूं शकतां ? [ ऐका, ऐका ]. द्विदलराज्यपद्धतीमधून थोडेंसें तरी लोकहित साधण्यासारखें आहे असें तुम्हांस वाटत असेल, तरच तुम्ही ती अमलांत आणूं शकाल. आणि अशा प्रकारें जर ती अमलांत येईल असें तुम्हांला वाटतें तर मग द्विदलपद्धति अव्यवहार्य आहे असें कसें म्हणतां ? तुम्हांला द्विदलपद्धतीचा धिक्कार करावयाचा असेल, तर तो नुसत्या शब्दांनींच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीनें जाहीर करा. द्विदलपद्धतीचे बाबतींत आपलें काय मत आहे याचा आजच्या ठरावावरील मत हा पुरावा आहे. आज तुम्ही कशा प्रकारें मत देतां हें पाहूनच द्विदलपद्धतीस तुम्ही अनुकूल आहांत कीं प्रतिकूल, याचा निष्कर्ष सरकार काढील. सर प्रवाशचंद्र म्हणतात—' मी द्विदलपद्धतीचा सदासर्वदा धिक्कार केला आहे. परंतु तिनें जें काय थोडेंबहुत हित साधण्यासारखें आहे तें साध्य करून घेण्यासाठीं मला ती अमलांत आणणें भाग आहे. " द्विदलपद्धति थोड्या अंशानें कां होईना, पण फलदायी असेल तर तुम्हांला तिचा धिक्कार करतां येणार नाहीं. द्विदलपद्धतीनें काडीइतकासुद्धां फायदा होईल असें मला वाटत नाहीं. परंतु तुम्हांला असें वाटत नसेल तर तिचा धिक्कार करावयाचा तुम्हांला अधिकार नाहीं. धिक्कारच करावयाचा असेल तर मर्दपणानें पुढें या व सबंध जगाला सांगा कीं, " मी सदर पद्धतीचा धिक्कार करितों; मला सहकार्य करतां येत नाहीं. कारण सदर पद्धतीमुळें देशाचें थोडें तरी हित होईल, असें मला वाटत नाहीं. " सर प्रवाश यांनीं अशा प्रकारें आपली बाजू पुढें मांडली असती, तर ती मला पटली असती.

## विनाशाच्या धोरणाची मीमांसा.

आतां मी स्वराज्यपक्षावर करण्यांत आलेल्या टीकेकडे वळतों. या टीकेंत नवीन असें कांहींच नव्हतें. हजार वेळां एकाच प्रकारची टीका करण्याचा आमच्या टीकाकारांस कंटाळा कसा येत नाहीं, याचेंच मला मोठें आश्चर्य

वाटतें. आमच्या पक्षाचें तत्त्वज्ञानच या लोकांनीं वाचलेलें नाहीं, असें म्हणाव लागतें. ' सदासर्वदा विनाश ' हेंच स्वराज्यपक्षाचें धोरण आहे, असें आमचे टीकाकार म्हणतात. स्वराज्यपक्षाच्या तत्त्वज्ञानाबद्दल एवढें अगाध अज्ञान पाहिलें कीं काय उत्तर द्यावें तेंच समजत नाहीं. आम्ही विनाश कां करितों ? आम्हांला कशाचा विनाश करावयाचा आहे ? आम्हांला सध्यांच्या राज्यपद्धतीचा विनाश करावयाचा आहे. तिच्यापासून लोकांचें कोणत्याहि प्रकारचें हित होत नाहीं, किंवा होणारहि नाहीं. यशस्वी रीतीनें अंमलांत आणतां येईल अशा प्रकारची लोककल्याणकारी राज्यपद्धति आम्हांला अस्तित्वांत आणावयाची आहे, म्हणूनच आम्ही सध्यां विनाशाचें धोरण पत्करिलें आहे. सध्याची राज्यपद्धति तशीच पुढें चालवून लोकांचें खरेंखुरें कल्याण करितां येईल असें तुमच्यापैकीं कोणीतरी समंजस मनुष्य छातीवर हात ठेवून सांगूं शकेल काय ? खुद्द तुम्ही ही पद्धत अंमलांत आणून काय संपादन केलें आहे ? सर प्रवाश चंद्रासारख्या दिवाणांनीं तीन वर्षेंपर्यंत ही राज्यपद्धति अंमलांत आणली आहे. गेल्या तीन वर्षांत बहुजनसमाजाची स्थिति आपण कितीशी व कोणत्या प्रकारें सुधारली ? शिक्षणाचा प्रसार पूर्वीपेक्षां अधिक प्रमाणांत झाला आहे काय ? लोकांसाठीं अधिक पैसा खर्च करण्याची तुम्हांला परवानगी मिळाली काय ? बिलकुल नाहीं. अधिक लोककल्याण करण्याची सत्ताच तुमच्या हातीं नाहीं. ही सत्ता हातीं येत नाहीं तोंपर्यंत सध्यांच्या परिस्थितींत तुम्हांला चांगलें असें कांहींच करितां येणार नाहीं. अधिक पैसा खर्च करण्याची सत्ता मिळेपर्यंत सध्यांच्या राज्यपद्धतींत प्राण घालण्याचा प्रयत्न करणें म्हणजे निव्वळ थट्टा आहे. दिवाणाजवळ जबाबदारी व सत्ता मुबलक; परंतु तिचे अंमलबजावणीसाठीं त्यांचेजवळ पैसा मात्र नाहीं. राष्ट्रसंवर्धनाचीं खातीं दिवाणांचे हातांत पण पैशाची किल्ली मात्र राखीव खात्यांच्या हातांत. सोंपीव खात्यांची वाटेल तशी उपासमार करण्याची ताकद राखीव खात्यांमध्यें आहे. असें असतांना लोकांनीं "तुम्हीं राष्ट्रसंवर्धक अशा कितीशा योजना अंमलांत आणिल्या ?" अशी पृच्छा केलीच, तर सरकार दिवाणांकडे बोट दाखविण्यास पुनः तयारच ! अशी ही मजेदार राज्यपद्धति आहे. स्वराज्य पक्ष दिवाणांचे पगार फेंटाळील

तर सरकार सोंपीव खात्यांचा कारभारहि आपल्या हातीं घेईल, अशा प्रकारची धमकी आम्हांला देण्यांत आलेली आहे. ही धमकी खरी ठरली तरी आपलें नुकसान काय होणार आहे, तेंच मला समजत नाहीं. हीं खातीं सरकारच्या हातीं गेलीं तरी दिवाण लोकांच्या हातून जितकें क्षुल्लक लोककार्य होत होतें, तितकेंच सरकारच्या हातून होईल. उलट लोक असंतुष्ट झाले तर त्याची जबाबदारी सुद्धां सरकारचेच माथ्यावर जाऊन आदळेल. सोंपीव खात्यांबरोबरच ही जबाबदारीहि सरकारच्या स्वाधीन व्हावी, अशी आमची इच्छा आहे. अशा परिस्थितींत आम्हांला कांहींहि करतां येत नाहीं, कोणतीहि योजना अंमलांत आणण्यासाठीं लागणारा पैसा आमच्याजवळ नाहीं—असें स्पष्टपणें सांगणें हें दिवाणांचें काम आहे. दिवाणांना राष्ट्रसंवर्धक असें कांहींहि करितां येणें शक्य नाहीं. असें असतांना ' राष्ट्रसंवर्धक खातीं ' असें जाडें नामाभिधान असलेल्या खात्यांचा भार मात्र नाहक त्यांच्यावर टाकण्यांत आला आहे.

## आह्मांला नुसता विनाश करावयाचा नाहीं !

तुम्हीं विनाशाचें धोरण कां अमलांत आणितां, असा प्रश्न आह्मांला विचारण्यांत येतो. आह्मांला सध्यांच्या राज्यपद्धतीची कुजकी पडकी इमारत अजिबात जमीनदोस्त करून टाकावयाची असून तिचे जागीं एक नवीन व सुंदर असा राजवाडा उभा करावयाचा आहे. ज्या जागीं राजवाडा बांधावयाचा तीच जागा एकादी पडकी इमारत अडवून बसली असली तर ती जमीनदोस्त केल्याशिवाय तेथें नवीन राजवाडा कसा उभा करतां येणार ? तात्पर्य ' विनाश, विनाश ' अशी आरोळी ठोकणाऱ्या आमच्या टीकाकारांच्या टीकेंत कांहींच हांशील नाहीं. आह्मांला केवळ विनाश करावयाचा नाहीं. स्वराज्य पक्षाला केवळ विघातक कामगिरी करावयाची आहे, असें ह्मणणें ही स्वराज्य पक्षाची बेअब्रू आहे. आह्मांला नवीन इमारत बांधतां यावी ह्मणून जुन्या इमारतीचा नायनाट करण्याचें आम्ही ठरविलें आहे. आह्मांला विधायक कामगिरी करण्याची संधि मिळावी ह्मणूनच आम्ही अडवणुकीचें धोरण पुकारलें आहे. आमच्या अडवणुकीचें तत्त्व इतकें साधें

आहे कीं, तें कोणासहि कळेल. माझ्या इतर मित्रांना तें कां समजूं शकत नाहीं, तेंच मला कळत नाहीं. कोणत्याहि देशाचा इतिहास डोळ्यांसमोर उभा करा. खुद्द इंग्लंडच्याच इतिहासाकडे जराशी नजर फेंका ना. तेथेंहि लोक पूर्वी असेच सत्ताहीन होते. परंतु अडवणुकीच्या धोरणाचा पुरस्कार केल्यामुळेंच त्यांस सध्यांचे अधिकार मिळूं शकले. इंग्लंडांत जें धोरण स्वातंत्र्योत्पादक ह्मणून चांगलें ठरतें, तेंच धोरण हिंदुस्थानांत अमलांत आणल्यास वाईट ठरतें काय ? पण बरोबर आहे. येथें लवाड स्वराज्य पक्ष तें अंमलांत आणीत आहेना ? मग तें वाईट कसें बरें ठरणार नाहीं ?

## आमचा सहकार्याला विरोध नाहीं.

सर प्रवाशचंद्रप्रभृति सभासदांनीं सहकार्याच्या तत्त्वाची तारीफ केली आहे. या बाबतींत आमचें काय मत आहे, हें मी एकदां नव्हे तर हजार वेळां सांगितलें आहे. आमचा सहकार्यास कदापि विरोध नव्हता व नाहीं. कोणत्याहि स्वराजिस्टाचा सहकार्याच्या तत्त्वास विरोध नाहीं. परतु सध्यांची राज्यपद्धति कायम असेपर्यंत सहकार्य करितां येणें अशक्य आहे ( ऐका, ऐका ). को-ऑपरेशन शब्दांतला ' को ' गाळलात, तर मात्र कांहीं तरी करितां येण्यासारखें आहे. सहकार्य करावयाचें म्हणजे केवळ गुलामगिरी पत्करावयाची काय ? सरकार सहकार्यासाठीं थोडा तरी स्वार्थत्याग करण्यास तयार आहे काय ? बिलकुल नाहीं. सरकारची इच्छा अशी कीं, आपण म्हणूं ती पूर्वदिशा असावी व हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्यापुढें सदोदित नाक घासावें. ' सहकार्य ' शब्दाचा असा अर्थ होतो हें मला कधींच ठाऊक नव्हतें. मी त्याचा तसा अर्थ कधींच केलेला नाहीं. मी सहकार्य करण्यास तयार आहें. परंतु प्रामाणिकपणाचें सहकार्य करण्यास अनुकूल अशी परिस्थिति निर्माण करा. सध्यां प्रामाणिकपणाचें सहकार्य अशक्य आहे. सरकार आपल्या राज्यपद्धतींत सुधारणा करील, थोडेंसें देवाण घेवाण करण्याची तयारी दाखवील, लोकांचें दुःख निवारण करण्याची कळकळ त्यास वाटूं लागेल, हिंदी लोकांच्या हक्कांस मान्यता देण्याची तयारी तें दाखवील—तेव्हांच प्रामाणिकपणाचें सहकार्य शक्य आहे. सर-

कारची लोकांचें सहकार्य संपादन करण्याची इच्छा आज दिसून येत आहे काय ? बिलकुल नाहीं. कोणीहि स्वातंत्र्यासाठीं 'टाहो' फोडला तर लगेच सरकार त्याची मुस्कटदाबी करितें. आम्हीं आमच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं कांहींहि प्रयत्न केला, तर लगेच तें आमच्याविरुद्ध चहूंकडे हांकाटी सुरू करिते. स्वतःच्या उद्धारासाठीं आह्मी केलेला प्रत्येक प्रयत्न हा फौजदारी गुन्हा ठरतो. अशा परिस्थितींत लोकांना तुमच्याशीं सहकार्य करितां येणें कसें शक्य आहे ? तें कसलें सहकार्य तुमच्याशीं करणार ? आमची सहकार्य करण्याची तयारी आहे असें कांहीं लोक म्हणत असले, तरी ते मनापासून तसें म्हणत आहेत असें आपणांस वाटतें काय ? सध्यांच्या परिस्थितींत खरोखरीचें सहकार्य शक्य आहे, असें मला वाटत नाहीं. स्वराज्यपक्षीय लोकांचा सहकार्यास विरोध आहे असें मी तुह्मांला कदापि ह्मणूं देणार नाहीं. जें सरकार सन्मान्य स्वरूपाचें असेल, जें सरकार लोकांच्या कल्याणासाठीं अस्तित्वांत आलेलें असेल—अशा सरकारशींच स्वराज्यपक्षीय लोक सहकार्य करण्यास तयार होतील. दुसऱ्या कोणाशींहि नाहीं.

## द्विदल राज्यपद्धति नष्ट झाली, तर पुढें काय ?

द्विदल राज्यपद्धति ठार झाली, तर त्याचा पुढें परिणाम काय होईल ? असा एका मित्रानें सवाल केला आहे. द्विदल राज्यपद्धति नष्ट झाली तर मघां सांगितलेला सुंदर राजवाडा बांधण्याची ताकद आमचे अंगीं येईल. आम्हांला जिवंत व स्वतंत्र अशी राज्यघटना पाहिजे आहे. ज्या घटनेमध्यें सन्मान्य लोकांना तितक्याच सन्मान्य अशा लोकांशीं सहकार्य करितां येईल—अशा प्रकारची राज्य-घटना आम्हांला पाहिजे आहे. सध्यांची द्विदल पद्धति नष्ट होऊं शकली, तर तिचे जागीं सर्वांगसुंदर अशा दुसऱ्या एका घटनेची इमारत आम्हांला उभारतां येईल, हाच द्विदल पद्धति नष्ट होण्याचा साधा व सरळ परिणाम आहे. आपण आपला वर्णद्वेष घटकाभर सोडून द्याल, लोकांचें कल्याण कसें होईल याची काळजी वाहूं लागाल व 'सरकार हें नेहमीं लोकांचें व लोकांसाठींच असणें योग्य नाहीं काय ?' असा प्रश्न स्वतःस विचाराल तर द्विदल राज्यपद्धति नष्ट झाल्यास काय होईल, या प्रश्नाचा उलगडा आपणांस सहज होऊं शकेल.

आम्ही पुढें काय करणार, या प्रश्नाचें उत्तर परिस्थितीवर अवलंबून आहे. आम्हीं काय करणार अगर करणार नाहीं यामध्यें गुप्त असें कांहींच नाहीं. आमचे मार्ग सरळ आहेत. आज कौन्सिलनें सदर ठराव फेंटाळून लाविला तरी सुद्धां स्वराजिस्ट लोक यापुढें हेंच धोरण अंमलांत आणितील. त्यांची अडवणुकीची वृत्ति कायम राहील. कारण, सध्यांची राज्यपद्धति खराब असल्याकारणानें समान्य व प्रामाणिक गृहस्थ या नात्यानें त्यांस सरकारशीं सहकार्य करितां येणें शक्य नाहीं. कौन्सिलनें दिवाणांचे पगार नामंजूर केलेच, तर सरकारपुढें दोन मार्ग शिल्लक राहतील—( १ ) एक सोंपीव खात्यांचा राज्यकारभार त्यासंबंधीच्या जबाबदारीसह आपल्या हातीं घेणें; व [ २ ] दुसरा ह्मणजे सध्यांचीं कौन्सिलें मोडणें. पहिला मार्ग सरकारनें पत्करला तर त्यांत मला आनंदच वाटेल. कारण ' गुरूची विद्या गुरूला फळली ' या न्यायानें आजपर्यंत दिवाण लोकांस लोकांचे जे शिव्याशाप सहन करावे लागत, ते आतां सरकारला करावे लागतील. बरें सरकारनें दुसऱ्या मार्गाचा अवलंब करून सध्यांचीं कौन्सिलें मोडून टाकलीं, तरी त्यांत सुद्धां मला आनंदच आहे. कारण, तसें झालें तर नवीन निवडणुकींत बंगालसरकारच्या व माझ्या मताप्रमाणें कौन्सिलांत स्वराज्य पक्षाचें प्रचंड बहुमत निवडून येईल. या दोन मार्गांपैकीं कोणताहि मार्ग सरकार पत्करो. त्यांत आमचा फायदाच आहे. आणि असें झालें कीं मग ? मग पुढें काय ? पुढें सबंध देश आमच्या पाठीशीं आहे, ही गोष्ट विसरून कशी चालेल ? या देशांत जें काय आहे तें सारें कौन्सिलांतच भरलेलें आहे, अशी ' पुढें काय ? ' हा प्रश्न आम्हांला विचारणारांची समजूत झालेली दिसते. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी. कौन्सिलांत सर्व कांहीं भरलेलें नाहीं. विलायतेंतील सध्यांचें कट्टरपक्षीय सरकार कोणत्याहि पक्षाचा जुलूम सहन करण्यास तयार नाहीं, असें मला सांगण्यांत आलें आहे. कट्टर सरकार जुलूम सहन करील कीं नाहीं तें मला ठाऊक नाहीं. त्यांच्यावर जुलुम करावा अशी माझी इच्छाहि नाहीं. परंतु सदर सरकारनें सुद्धां ' लोकांची इच्छा ' या नांवाची कांहीं तरी चीज या जगांत

असते व ती अंतीं पार पाडावी लागते ही गोष्ट विसरतां कामा नये. ही ‘ लोकांची इच्छा ’ कट्टर सरकार पार पाडो, मजूर सरकार पार पाडो अगर उदार सरकार पाडो—त्याची मला फिकीर नाहीं पण अखेरीस या लोकेच्छेपुढें सर्वांस नमावें लागतें ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी. लोकांनीं फक्त आपली इच्छा व निश्चय प्रकट करणें जरूर आहे. आणि ही इच्छा एकदां प्रकट झाली कीं मग जगांतलें कोणतेंहि सरकार—मग तें कट्टर असो, मजूर पक्षाचें असो अगर उदार पक्षाचें असो, हिंदुस्थानसारख्या बलाढ्य देशाची इच्छा सदैव पायाखालीं तुडवूं शकणार नाहीं.

## २७—देशबंधूंची अखेरची घोषणा.

ता. २ मे १९२५ रोजीं फरीदपूर येथें देशबंधु दास यांचे अध्यक्षतेखालीं बंगाल प्रांतिक परिषदेचें अधिवेशन भरलें होतें. तत्प्रसंगीं त्यांनीं बंगालींत केलेलें भाषण हेंच त्यांचें अखेरचें भाषण होय. सदर भाषणांतील महत्त्वाचा भाग थोडक्यांत पुढें दिला आहे.

### ‘ मुक्तीचा मार्ग कोणता ? ’

देशबंधु दास म्हणाले—हिंदुस्थानांत ‘ मुक्तीचा मार्ग कोणता ? ’ असा प्रश्न वारंवार विचारण्यांत येतो. मायेला कंटाळलेल्या व सद्वस्तूला हपापलेल्या वैयक्तिक आत्म्याचा हा अतिप्राचीन काळापासूनचा आग्रहाचा प्रश्न आहे. पण आज ‘ मोक्षाचा मार्ग कोणता ? ’ ही हिंदुस्थानच्या आत्म्याची निकराची आरोळी बनून गेली आहे. व्यक्तीपुढें काय किंवा राष्ट्रापुढें काय बंधमुक्त व पापमुक्त कसें व्हावयाचें हा मुख्य प्रश्न असतो. बंधनें घडविणाराचें व तीं घडवूं देणाराचें असें दोघांचेंहि पाप असतें. या बाबतींत स्वातंत्र्य, स्वराज्य वगैरे अनेक कल्पना पुढें येतात. पण त्यांचें पूर्ण स्वरूप कळलें नाहीं तर नांवापलीकडे त्यांत कांहीं अर्थ नसतो. सदर कल्पनांचा साक्षात्कार करून घेतांना त्याच्या साधनांचा विचार ओघानेंच पुढें येतो. या साक्षात्कारासाठीं कोणी शांतिमय व न्याय्य मार्ग सुचवितात, तर जबरीशिवाय अगर अत्याचाराशिवाय स्वराज्यप्राप्ति होणें अशक्य असें कांहीं म्हणतात. याबाबत बंगाल प्रांतिक परिषदेला आपलें स्वातंत्र्यासंबंधीचें राष्ट्रीय ध्येय

कोणतें व त्यासाठीं कोणत्या साधनाचा अवलंब करावा हें निश्चितपणें जाहीर करितां यावें म्हणून कांहीं सूचना करण्याचा माझा विचार आहे.

## स्वातंत्र्य व स्वराज्य.

स्वातंत्र्यापेक्षां स्वराज्याचें ध्येय अधिक व्यापक आहे असें मला वाटतें. स्वातंत्र्य शब्द पारतंत्र्याचा अभाव दर्शवीत असला तरी तेवढयानें ध्येयाची निश्चित कल्पना डोळ्यासमोर उभी रहात नाहीं. स्वातंत्र्य हें स्वराज्याशीं सुसंगत नसतें, असा मात्र माझ्या म्हणण्याचा आशय नाहीं. परंतु आम्हांला नुसतें स्वातंत्र्य नको आहे. आम्हांला स्वराज्याची स्थापना करावयाची आहे. ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थान सोडून जावें हीच जर आमची स्वातंत्र्याची कल्पना असेल, तर तसलें स्वातंत्र्य कदाचित् आपणांस उद्यांहि मिळूं शकेल. परंतु त्यामुळें 'स्वराज्या' ची स्थापना होईलच असें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. मी गयेच्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें आमची परिस्थिति विलक्षण तर खरीच; पण गुंतागुंताचीहि आहे. कारण आम्हांला परस्पर-विरोधी अशा जातींचें व लोकांचें ऐक्य करावयाचें आहे. कदाचित एकी-करणाचें हें कार्य करण्यास आम्हांला पुष्कळ दिवस लागतील व कदाचित् तें कंटाळवाणेंहि वाटेल. परंतु तें केल्याशिवाय स्वराज्यप्राप्ति होणें शक्य नाहीं. यांतच विधायक कार्यक्रमाचें महत्त्व आहे. विधायक कार्यक्रमाचा संदेश प्रत्यक्ष महात्माजींच्याच मुखांतून आपणांस ऐकावयास मिळणार असल्याकारणानें त्यासंबंधीं मी येथें अधिक विवेचन करूं इच्छित नाहीं. हा कार्यक्रम मला पूर्णपणें मान्य असून, त्यास आपण केवळ शाब्दिकच नव्हे तर कृतिपूर्ण पाठिंबा द्या, अशी माझी आग्रहाची विनंति आहे.

## स्वराज्याची हिंदी कल्पना

स्वराज्याचें सारसर्वस्व अशी जी सुव्यवस्थेची कल्पना ती स्वातंत्र्यांत दिसून येत नाहीं. मी मघां सांगितलेलें संघटनात्मक कार्य याचाच अर्थ सुव्यवस्थेची संस्थापना. ज्या स्वराज्याची आम्ही संस्थापना करणार तें आमच्या बुद्धीस, वृत्तीस व परंपरेस सुसंगत मात्र असलें पाहिजे. माझ्या मतें स्वराज्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें असावें—( १ ) आह्मांला हिंदी

ग्रंथ संग्रहालय



समाजांतील भिन्नभिन्न जातींच्या व धर्मांच्या लोकांचें संघटन करण्याची मुभा असावी. ( २ ) हें संघटनाचें कार्य राष्ट्रीय दृष्टीनें चालवावें. दोन हजार वर्षांपूर्वीचें दृश्य डोळ्यांसमोर ठेवून आपण आपलें कार्य चालवितां कामा नये. स्वराज्य शब्दाचा अर्थ दोन हजार वर्षांपूर्वीची परिस्थिति पुनश्च जशीच्या तशी अंमलांत आणणें असा नव्हे. आपल्याला मागें जावयाचें नाहीं. आपली राष्ट्रीय प्रवृत्ति कायम ठेवून आपल्याला पुढें जावयाचें आहे. आह्मांला पाश्चात्यांचेंहि अंधानुकरण करावयाचें नाहीं. आमच्या भावि स्वराज्याचें वर्णन करितांना मी ज्या सुव्यवस्थेचा उल्लेख केला ती व युरोपमध्यें प्रचारांत असलेली शिस्तीची कल्पना या दोहोंमध्यें जमीनअस्मानाचा फरक आहे. युरोपियन समाज व सरकारें सर्वस्वी ' शिस्ती '-च्या पायावर उभीं असतात व ही शिस्त सर्वस्वी लष्करी स्वरूपाचीच असते. युरोपियन संस्कृतीची निंदा करण्याची माझी इच्छा नाहीं. पाश्चात्यांना स्वतःची संस्कृति प्रिय वाटते. त्यांनीं आपल्या मार्गानें जावें व पूर्णत्वाचा पल्ला गांठावा. परंतु त्यांचा मार्ग तो आमचा मार्ग नसल्याकारणानें आह्मांला आमच्या मार्गाप्रमाणें पूर्णत्वाची मजल गांठली पाहिजे. ( ३ ) आमच्या स्वराज्याचें तिसरें स्वरूप असें कीं, आह्मांला कोणत्याहि परदेशी राज्यसत्तेकडून अडथळा होतां कामा नये. हीं तीन स्वरूपें लक्षांत घेतां ' स्वराज्य ' हेंच आपण आपलें राष्ट्रीय ध्येय ठरविणें जरूर आहे. केवळ स्वातंत्र्य हें आपलें ध्येय असतां कामा नये. कारण स्वातंत्र्यांत खऱ्या स्वराज्याचा अभाव देखील असूं शकेल. अशा परिस्थितींत आपलें राष्ट्रीय ध्येय कोणतें असा कोणी प्रश्न विचारल्यास लगेच ' स्वराज्य ' हेंच उत्तर आपणांस देणें भाग आहे. 'स्वराज्या'शिवाय दुसरें कोणतेंहि उत्तर देतां येणें शक्य आहे, असें मला वाटत नाहीं. मला ' होमरूल ' किंवा 'सेल्फ् गव्हर्नमेंट' या दोहोंपैकीं एकहि कल्पना पसंत नाहीं. माझ्या मतें त्या दोन्ही अपुऱ्या आहेत. त्या दोहोंचा ' स्वराज्य ' या एका शब्दांत अंतर्भाव होतो असें मला वाटतें. स्वराज्य हें सर्वांत अधिक व्यापक असें ध्येय आहे. काय असेल तें असो, ' रूल ' शब्दच माझ्या संस्कृतीला विघातक असा वाटतो. मग तें ' होम-रूल ' असो, अगर ' फॉरिन-रूल '

असो. ' सेल्फ गव्हर्नमेंट ' या शब्दाला सुद्धां माझा असाच विरोध आहे. ' सेल्फ गव्हर्नमेंट ' या शब्दाचा अर्थ स्वतः व स्वतःसाठीं चालवावयाचें सरकार असा केला तर माझा विरोध कदाचित् दूर होऊं शकेल. परंतु तसें झालें तरी माझ्या 'स्वराज्यां'तहि वरील व्याख्येचा समावेश होतोच. तेव्हां ' स्वराज्य ' हें इतर सर्व ध्येयांपेक्षां व्यापक असें ध्येय आहे, ही गोष्ट स्पष्टपणें सिद्ध होते.

## साम्राज्यांतर्गत कीं साम्राज्यनिरपेक्ष ?

पुढें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, आमचें स्वराज्य साम्राज्यांतर्गत असणार कीं साम्राज्यनिरपेक्ष असणार ? साम्राज्य आमच्या हक्कांस मान्यता देण्यास तयार असेल तर आम्हांला साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळालें तरी चालेल; तसें नसेल, तर आम्हीं साम्राज्यनिरपेक्ष स्वराज्य घेण्यासहि तयार आहों—असें कांग्रेसचें वरील प्रश्नांस उत्तर आहे. आम्हांला आमचा विशिष्ट जीवनक्रम चालू ठेवण्याची, आत्मज्ञान, आत्मप्रगति व आत्मसर्वस्व साध्य करून घेण्याची संधि मिळाली पाहिजे, एवढेंच आमचें म्हणणें आहे. आमचें राष्ट्रीय जीवन कायम कसें ठेवावयाचें हा मुख्य प्रश्न आहे. आमच्या राष्ट्रीय जीवनाच्या संवर्धनाला साम्राज्यांत पुरेसा वाव मिळणार असेल तर साम्राज्याचीच कल्पना आम्ही पसंत करूं. उलट पक्षीं, जगन्नाथाच्या रथाखालीं माणसें चिरडतात त्याचप्रमाणें साम्राज्याच्या बादशाही दडपणाखालीं आम्ही चिरडले जाण्याचा संभव असेल, तर साम्राज्याच्या बाहेरचें स्वराज्य हेंच आपलें ध्येय ठेवणें इष्ट व न्याय्य होईल.

## वसाहतींचा दर्जा म्हणजे गुलामगिरी नव्हे !

खरोखरच साम्राज्याच्या कल्पनेंत पुष्कळसे फायदे दिसून येतात. वसाहतींचा दर्जा याचा अर्थ आज कोणत्याहि तऱ्हेनें गुलामगिरी असा होऊं शकत नाहीं. सहकार्यवृत्तीनें परस्परांच्या फायद्यासाठीं साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांनीं आत्मखुषीनें परस्परांशीं दोस्ती संपादन करणें याचेंच नांव वसाहतींचा दर्जा. स्वतंत्रपणें दोस्ती प्रस्थापित करण्याचा ज्या साम्राज्यघटकाला हक्क असतो, त्याला साम्राज्यांतून फुटून सवता सुभा स्थापन करण्याचा हक्कहि आपोआपच प्राप्त होतो. महायुद्धापूर्वी ब्रिटिश साम्राज्याच्या अनेक

भागांत सवत्या सुभ्याची ही कल्पना वृद्धिंगत होत होती; परंतु महायुद्ध आटोपल्यानंतर ती रद्द ठरून साम्राज्याचे सर्व घटक एकत्र संघ करून राहिले तरच जगूं शकतील, एरव्हीं नाहीं, अशा प्रकारची भावना आतां सामान्यतः सर्वांची झाली आहे. सध्यांच्या सुधारलेल्या युगांत कोणतेंहि राष्ट्र एकलकोंडेपणानें जिवंत राहूं शकणार नाहीं अशी सर्वांस जाणीव झालेली आहे. ब्रिटिश साम्राज्य या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या अनेक राष्ट्रांच्या संघांतील घटकांस वसाहतींचा दर्जा प्राप्त झाला तर संरक्षणविषयक हमी तर मिळतेच; पण त्याबरोबरच आत्मज्ञान, आत्मसंवर्धन व पूर्णत्व साध्य करण्याची मुभाहि मिळते. म्हणून स्वराज्याचें जें त्रिविध स्वरूप मी मघां वर्णन केलें त्यास साम्राज्याच्या कल्पनेंत भरपूर वाव मिळू शकतो ही गोष्ट कोणाच्याहि ध्यानांत येईल. आध्यात्मिक दृष्ट्या साम्राज्याची कल्पना अत्यंत महत्त्वाची असल्याकारणानें मला ती विशेष रमणीय वाटतें. अखिल जगांत शांतता नांदावी व जगांतील अखिल राष्ट्रांचा एक संघ व्हावा, अशी माझी इच्छा आहे. ब्रिटिश साम्राज्य या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या व भिन्नभिन्न जाति, भिन्नभिन्न जीवनपद्धति व भिन्नभिन्न संस्कृति यांचें संघटन करणाऱ्या राष्ट्रसंघाची, योग्य नेता मिळाल्यास सबंध जगांतील राष्ट्रांचा, अखिल मनुष्यजातीचा एक बडा संघ बनविण्याचें कामीं बरीच मदत होईल. परंतु 'योग्य' नेता मिळाला तरच हें उच्च ध्येय साधण्यासारखें आहे. एरव्हीं नाहीं. कारण अखिल जगाच्या संघाची कल्पना मूर्त स्वरूपांत आणावयाची म्हटली, तर त्याच्या घटकांस जबर स्वार्थत्याग करावा लागेल व दुसऱ्यावर राज्य करण्याची साम्राज्याची कल्पना तर अजिबात सोडून द्यावी लागेल. हिंदुस्थाननें एकट्या हिंदुस्थानच्या हितासाठींच नव्हे, तर सबंध राष्ट्रसंघाच्या व जगाच्या हितासाठीं ब्रिटिश राष्ट्रसंघाच्या कक्षेंत राहून स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याचा व अशा प्रकारें सबंधमनुष्यजातीची सेवा करण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे.

## स्वराज्याच्या मार्गाचें विवेचन.

आतां मी स्वराज्यप्राप्तीच्या मार्गाकडे वळतों. माझ्या मतें मार्ग हा ध्येयाचाच एक भाग आहे. तेव्हां मार्गाचा विचार करितांना ध्येयाच्या

व्यापक स्वरूपाकडे दुर्लक्ष्य करून आपणांस चालणार नाहीं. या दृष्टीनें अत्याचाराचा मार्ग आपल्या जीवनपद्धतीस व संस्कृतीस क्वचितच सुसंगत ठरूं शकेल. यावरून हिंदुस्थानच्या इतिहासास लढायांचा संपर्क नाहीं किंवा गतकाळांत कोणीहि अत्याचाराच्या मार्गाचा अवलंब केला नाहीं असें म्हणण्याचा मात्र माझा इरादा नाहीं. आमच्या इतिहासाचा वरवर अभ्यास करणाऱ्या माणसास सुद्धां हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्याचाराला वाव मिळाला असल्याचें दिसून येईल. परंतु कांहीं गोष्टी करणें आह्मांला दुसऱ्यांनीं भाग पाडलें ही गोष्ट लक्षांत ठेवून प्रत्येक इतिहासजिज्ञासूनें असले प्रसंग आमच्या खऱ्या मनःप्रवृत्तीचें संशोधन करितांना बाजूला काढून ठेविले पाहिजेत. अत्याचार हा जसा युरोपच्या अस्तित्वाचा एक भाग आहे, तसा तो आमचा नाहीं. युरोपमधील या अत्याचारास एका विशिष्ट कायदेपद्धतीनें आळा घातला जातो व ही कायदेपद्धति देखील लष्करशाहीच्या पायावर उभी असते. हिंदी लोकांना आपला गतेतिहास व चालीरीती यांस अनुसरून अत्याचाराच्या मार्गापासून अलिप्त राहण्याची पूर्वापार संवय आहे. आमच्या ग्रामसंस्था ह्मणजे शांतिमय चळवळींचें एक मनोरम दृश्यच होतें. कळी उमलून तिचें जसें फूल व्हावें, तसाच आमच्या संस्थांचा निसर्गतः विकास होत असतो. आमच्याकडे बौद्धिक वाद झाले; आत्म्याच्या तळमळी झाल्या; भांडणें व लढेहि नेहेमीं उपस्थित झाले. परंतु त्या सर्वांचें पर्यवसान शांतिमय मार्गांनीं तडजोडींत झालें. या प्रवृत्तीस विसंगत अगर विरोधात्मक असा कोणताहि मार्ग उच्च ध्येयाच्या दृष्टीनें अनैतिक तर आहेच; पण त्याच्या कपाळीं अपयशहि लिहिलेलें आहे. क्रांतिकारकांच्या अत्याचारानें आमचें स्वातंत्र्य कधींहि प्राप्त होणें शक्य नाहीं, ही माझी ठाम समजूत जाहीर करण्यास मला बिलकुल दिक्कत वाटत नाहीं. शिवाय, हिंदी लोकांच्या विशिष्ट मनःप्रवृत्तीचा विचार क्षणभर बाजूला ठेविला तरीसुद्धां गुलाम राष्ट्रास शक्य अशा प्रकारच्या अत्याचारानें सध्यांच्या अत्यंत संघटित अशा सरकारी अत्याचारास तोंड देतां येणें कसें शक्य आहे ? नुसतें फ्रेंच व इतर बंडांच्या इतिहासांतील प्रकरणांचा उल्लेख केल्यानें कांहींहि साध्य होणार नाहीं. या बंडांचे प्रसंगीं

लोक साध्या भाल्यांनीं लढत व बहुतांशीं यशस्वी होत. आतांचा काळ पालटला आहे. आतां तसल्याच मार्गांनीं सुधारलेलें व सुसंघटित असें कोणतेंहि सरकार उलथून टाकतां येणें शक्य आहे काय? अशा प्रकारचें सशस्त्र बंड आज खुद्द इंग्लंडांत देखील अशक्य आहे, असें मी बिनदिक्कत ह्मणूं शकतों.

## स्वातंत्र्य व अत्याचार.

शिवाय, अत्याचाराचा अवलंब केल्यानें ज्या राष्ट्रसंघटनाचा मी मघां उल्लेख केला व ज्याच्याशिवाय स्वराज्यप्राप्ति होणें अशक्य आहे, त्याचा पाया अजिबात ढांसळतो. आम्हीं अत्याचार केला तर त्याच्या पाठोपाठ सरकारचा अत्याचार सुरू होईल व सरकार इतकी अत्याचारी स्वरूपाची दडपशाही करील कीं, तीमुळें लोकांचा स्वराज्योत्साह थंडावेल. तुमच्या अत्याचाराच्या चळवळीस जनतेचा पाठिंबा मिळणें शक्य आहे काय? असा माझा क्रांतिकारक तरुणांस सवाल आहे. जीवित व मालमत्ता यांस धक्का पोंचण्याची भीति असली कीं, ज्या लोकांस सदर चळवळीपासून अपाय होतो अगर अपाय होण्याची भीति असते ते साहजिकच तीपासून परावृत्त होतात. एवंच अत्याचाराचा मार्ग अव्यवहार्य आहे. परंतु असें म्हटल्यानें क्रांतिकारक तरुणांचा प्रामाणिकपणा अगर देशाभिमान मला कबूल नाहीं असें मात्र कोणीहि समजूं नये. त्यांच्या प्रामाणिकपणाविरुद्ध अगर तेजस्वी देशाभिमानाविरुद्ध मी एक शब्दहि कधीं काढणार नाहीं. त्यांनीं पत्करिलेला मार्ग आपल्या मनःप्रवृत्तीस साजेल असा नसल्याकारणांनें, महात्माजींच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'त्याची अंमलबजावणी करणें हा काळाचा व शक्तीचा व्यर्थ व्यय आहे' एवढेंच फक्त मला सांगावयाचें होतें. अझूनहि अत्याचाराच्या चळवळीबद्दल अनुकूल मत बाळगणाऱ्या बंगाली तरुणांस माझी अशी आग्रहाची विनंति आहे कीं, मेहेरबानी करून असले विचार सोडून द्या. बंगाल प्रांतिक परिषदेनेंहि अत्यंत स्पष्ट शब्दांत 'आमच्या मतें अत्याचाराच्या मार्गानें स्वातंत्र्य प्राप्त होणें शक्य नाहीं' असें जाहीर करावें, अशी माझी विनंति आहे.

## क्रांतिकारक चळवळीचें जनक—सरकार !

अशा प्रकारें अत्याचारांच्या मार्गास माझा विरोध असला, तरी सरकारच्याच अत्याचारामुळें बंगालमधील क्रांतिकारक चळवळीस उत्तेजन मिळालें आहे, ही गोष्ट स्पष्टपणें नमूद करून ठेवणें मला भाग आहे. प्रोफेसर डायसी यांनीं एके ठिकाणीं " गेलीं तीस वर्षें आजकालच्या इंग्रज लोकांचे मनांतील कायदा व शिस्त याबद्दलचा आदर विलक्षण रीतीनें कमी कमी होत गेला आहे " असे उद्गार काढिले असून, याची जबाबदारी कायदे-कोर्टाच्या अधिकारांची खच्ची करणाऱ्या व कायद्याच्या अंमलबजावणीस बाधा करणाऱ्या अर्वाचीन कायद्यांवरच येऊन पडते असें सिद्ध केलें आहे. तात्पर्य, अत्याचारानें अत्याचार वाढतो व कायदेशीर चळवळी चिरडून टाकण्यासाठीं सरकार स्वतःच कायद्याचा खून करूं लागेल, तर लोकांमध्येंहि प्रोफेसर डायसी ह्मणतात त्याप्रमाणें " कायद्याचा खून करण्याची प्रवृत्ति व उत्साह " उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदुस्थानचा व विशेषतः बंगालचा इतिहास प्रोफेसर डायसी यांच्या सिद्धांतास चांगलीच पुष्टि देत आहे.

## क्रांतिकारक चळवळीचा इतिहास.

हिंदुस्थानांत क्रांतिकारक चळवळीचें वातावरण अचानक उत्पन्न झालें नाहीं. इतर राष्ट्रांप्रमाणें येथेंहि तें पायरीपायरीनें अस्तित्वांत आलें इंग्लंडच्या शंभर वर्षांच्या अप्पलपोटेपणाच्या व स्वार्थी धोरणाच्या राज्यकारभारानें क्रांतिकारक चळवळीचें बीज पेरलें. १८५८ सालीं हिंदुस्थान ब्रिटिश सरकारच्या हातीं आलें. तत्पूर्वीच्या क्रांतीमुळें सदर बीजास बळकटी येऊन अंकुर फुटला. १८५८ पासून १९०० सालपर्यंत व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींत एका परदेशी नोकरशाहीनें हिंदी लोकांच्या हिताची बिलकुल पर्वा न करितां हिंदुस्थानचा राज्यकारभार हांकला. या ५० वर्षांत हिंदुस्थानच्या खऱ्या हिताची जाणूनबुजून हेळसांड करण्यांत आली व सुशिक्षित लोकांचें मत धाब्यावर बसविण्यांत आलें. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या दुसऱ्या विभागांत जुलमी राज्यपद्धतीचीं निदर्शक परंतु उपकारक अशा स्वरूपाचीं कांहीं कांहीं कृत्यें करण्यांत आलीं ही गोष्ट मला कबूल आहे. सदर

कारकीर्दींत मुद्रणपारतंत्र्याचा कायदा रद्द झाला, स्थानिक स्वराज्य सुरू झालें, इल्बर्ट बिल पास झालें व १८९१ साली कौन्सिलांच्या अधिकारवाढीचा कायदा पास झाला. हीं कृत्यें सकृद्दर्शनीं उपकारक स्वरूपाची असलीं, तरी नोकरशाहीची सत्ता दृढमूल करणें हा त्यांचा गर्भित हेतु होता. आणि म्हणूनच मी त्यांस 'उपकारक स्वरूपाचीं परंतु जुलमी' असें म्हणतों. स्थानिक स्वराज्याचा कायदा हाच सर्वांत अत्यंत महत्त्वाचा. परंतु तो काळजीपूर्वक वाचून पाहिला तर त्यांत जें दिल्याची वढाई मारिलेली आहे तें मिळालेलें नाही, असें आढळून येईल. वरवर पहातां लोकहितकारी दिसणारे असे कायदे पास करण्यांत आलेले असले, तरी खरी सत्ता अशी लोकांस कधींच देण्यांत आली नाही. उलट लॉर्ड लिटन यांच्या कारकीर्दींत पास झालेला देशी वर्तमानपत्रांचा कायदा, देशांतील सुशिक्षितांच्या वाढत्या संख्येचें "दुर्बिणीनेंच दृष्टोत्पत्तीस येणारे अल्पमतवाले" असें लॉर्ड डफरीन यांनीं तिरस्कारपूर्वक केलेलं वर्णन, तसेंच दुष्काळनिवारणाचे बाबतींत दाखविलेला कवडीचुंबकपणा—या सर्व गोष्टीं-मुळें क्रांतिकारक चळवळीच्या बीजास मधूनमधून खतपाणीच मिळत गेलें.

## कर्झनशाहीनें आग पेटविली !

पुढें लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द सुरू झाली. त्यांनीं आपल्या लांछनास्पद कारकीर्दींत पुढचा मागचा विचार न करितां जे अनेक अन्याय केले त्यांमुळें क्रांतिकारक चळवळीच्या दुसऱ्या अवस्थेस सुरवात झाली. याच साहेबांनीं राज्यकारभारांतील शिस्तसंपन्नतेचें खूळ प्रथम अस्तित्वांत आणिलें व त्यासाठीं लोकांच्या गरजा गौण लेखिल्या. एकीकडे हें खूळ त्यांनीं उभें केलें व दुसरीकडे अत्यंत दुःखदायक अशा रीतीनें सतत लोकमत पायाखालीं तुडविण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय चळवळीस विरोध करून त्या दडपून टाकण्यासाठीं सर्क्युलरापाठीमागून सर्क्युलर निघूं लागलें व अशा प्रकारें एकीकडे दडपशाहीच्या व जुलमाच्या धोरणास सुरुवात झाली तर त्याचा प्रत्याघात ह्मणून दुसरीकडे कांहीं सुशिक्षित हिंदी लोकांचे अंतःकरणांत खऱ्याखुऱ्या क्रांतिकारक प्रवृत्तीचा प्रादुर्भाव झाला. लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द खलास झाल्यानंतर क्रांतिकारक चळवळीच्या तिसऱ्या अवस्थेस

सुरुवात झाली व कांहीं तरुणांनीं सरकारच्या अन्यायामुळें चिडून जाऊन आपला सूड व स्वातंत्र्याची कळकळ व्यक्त करण्यासाठीं प्रत्यक्ष क्रांतिकारक कृत्यें करण्यास सुरुवात केली. लॉर्ड मिंटो यांच्या कारकीर्दींत सरकारनें आपलें लष्करी स्वरूप व्यक्त केलें व दडपशाहीच्या भीषण साम्राज्यास सुरुवात झाली. सरकारच्या या नवीन धोरणास प्रत्युत्तर ह्मणून कांहीं बंगाली तरुणांनीं बॉंबगोळ्यांचें व पिस्तुलांचें साम्राज्य सुरू केलें !

## अन्य देशांतील स्वातंत्र्योपासनेचा परिणाम.

सरकारनें लोकमत सतत पायाखालीं तुडवून, जुलमाच्या व दडपशाहीच्या धोरणास सुरुवात केल्यामुळें क्रांतिकारकांची अत्याचारी चळवळ सुरू होऊन तिची जोपासना व वाढ झाली असली तरी आणखीहि एका गोष्टीमुळें तिला उत्तेजन मिळालें ही गोष्ट येथें विसरतां कामा नये. गेल्या शतकाचे अखेरीस जपानी लोकांनीं एका भीषण युद्धांत रशियाविरुद्ध मिळविलेला विजय व त्यामुळें आशिया खंडांत झालेली प्रचंड जागृति, ईजिप्शन देशभक्तांनीं चालविलेलें गनिमी काव्याचें युद्ध, आयरिश प्रजासत्तावाद्यांनीं चालविलेली स्वातंत्र्याची चळवळ, सोव्हियट रशियाची संस्थापना व त्याचा बोल्शेव्हिक तत्त्वांचा प्रसार व अखेरीस अंगोरासरकारनें इंग्रज व ग्रीक लोकांना नामोहरम करून त्यांजवर मिळविलेला विजय—या सर्व गोष्टींमुळें हिंदुस्थानचें स्वातंत्र्यहि वाटेल त्या युक्तायुक्त मार्गांनीं मिळविलें पाहिजे अशा प्रकारची हिंदी क्रांतिकारकांचे मनांतील भावना दृढमूल झाली.

येथें दासबाबूंनीं १९०५ सालच्या लॉर्ड कर्झन यांच्या युनिव्हर्सिटी बिलापासून सुरुवात करून, त्यांचा हिंदी लोकांवरील असत्य भाषणाचा सरसकट आरोप, बंगालची फाळणी, त्यामुळें कलकत्त्यांत झालेल्या फाळणी-प्रतिबंधक चळवळीचा उगम, स्वदेशी चळवळ, तिला सरकारचा विरोध व उपद्रव, “ वंदेमातरम् ” गीताविरुद्ध मनाई–हुकूम–इ. अनेक दडपशाही कृत्यांची तपशीलवार जंत्री परिषदेपुढें सादर केली. ही यादी १९१० पर्यंतची आहे. त्यानंतरचा इतिहास अगदीं ताजा असल्यामुळें त्यांनीं फक्त बंगालची फाळणी रद्द करणें, लॉर्ड हार्डिंजवरील बॉंबफेंक, भारतसंरक्षक कायद्या अन्वयें लोकांस झालेली अटक, रौलॅट कायदा, जालियनवाला बागें-

तील अत्याचार व कामागाटामारू प्रकरण या गोष्टींचा नुसता उल्लेख केला. सदर जंत्रीचा आधार देऊन दासबाबू पुढें म्हणाले—दडपशाहींतून क्रांतिकारक चळवळीचा कसा जन्म झाला व क्रांतिकारक चळवळ दडपून टाकण्यासाठीं पुनश्च दडपशाहीची लाट कशी उसळली हें या जंत्रीवरून कोणाच्याहि ध्यानीं येईल. त्याचप्रमाणें ब्रिटिश सरकारनें ज्या ज्या वेळीं उपकारक स्वरूपाचे कायदे पास केले त्या त्या वेळीं दडपशाही स्वरूपाचे कायदेहि पास करण्यांत आले हेंहि मी दिलेल्या जंत्रीवरून स्पष्ट होण्यासारखें आहे.

## नवयुगाचा उदय.

जालियनवाला बागेंतील हत्याकांडाबरोबरच एका नवीन युगाचा जन्म झाला व महात्माजींनीं स्वातंत्र्यप्राप्तीच्या एका नवीन मार्गानुसार चळवळ करण्यास सुरुवात केली. अनत्याचारी चळवळ हेंच या नवीन मार्गाचें नांव होय. सबंध हिंदुस्थान या नवीन मार्गाचा अवलंब करील अशी मला आशा आहे. कोणत्याहि प्रकारचा अत्याचार करणें व्यर्थ आहे, असें माझें सरकारला तसेंच माझ्या क्रांतिकारक मित्रांना आग्रहपूर्वक सांगणें आहे.

बंगालच्या फर्मानाचा कायदा हा लोकांवर अत्याचार करण्यासाठीं केलेला एक प्रयत्न आहे. मी आज आपल्या संतापावर पांघरूण घालून बोलावयाचें ठरविलें असल्याकारणानें या कायद्यासंबंधींचें माझें मत मला योग्य शब्दांत पुढें मांडतां येईल असें मला वाटत नाहीं. या कायद्याचा आज अखिल हिंदुस्थाननें एकरवानें निषेध केला आहे. मीहि या कायद्याचा निषेध करितों. सरकारच्या दडपशाही धोरणाचे बाबतींत सरकारशीं सहकार्य करण्याबद्दल लॉर्ड बर्कनहेड यांनीं नुकतेंच एका भाषणांत जें मला पाचारण केलें होतें त्यास प्रत्येक हिंदी मनुष्य जें एकमात्र उत्तर देऊं शकेल तेंच मी वरील निषेध प्रदर्शित करून दिलें आहे.

फर्मानामुळें प्रत्यक्ष गुन्हेगाराखेरीज दुसऱ्या कोणासहि धक्का पोंचलेला नाहीं, असें लॉर्ड बर्कनहेड यांनीं आपल्या भाषणांत म्हटलें होतें. बंगालच्या फर्मानाअन्वयें पकडलेले कैदी गुन्हेगार आहेत ही गोष्ट आम्हांला बिलकुल कबूल नाहीं. ते गुन्हेगार आहेत किंवा नाहींत हें ठरविण्याचा एकच मार्ग

आहे. आणि तो म्हणजे न्यायासनापुढें त्यांची उघड उघड चौकशी करणें हा होय ! सरकारनें त्यांच्यावर उघड उघड खटले करावे व गुप्त बातम्यांवर विसंबून न राहतां आपल्याजवळ जो काय साक्षीपुरावा असेल तो कोर्टापुढें सादर करावा. कोर्ट तो नीट तपासून पाहील व आरोपी गुन्हेगार आहेत कीं नाहींत तें ठरवील. अंमलबजावणी खात्यानें कायदेकोर्टाचे अधिकार बळकावून बसल्यानेंच लोकांच्या मनांत सुरक्षिततेबद्दल विश्वास उरत नाहीं व ज्या असुरक्षिततेचा इंग्लंडच्या सनदशीर इतिहासाच्या सुप्रसिद्ध लेखकांनीं उल्लेख केला आहे, तीहि हीच होय. सरकारनें स्वतःच्या दडपशाहीच्या समर्थनार्थ ज्या ज्या गोष्टी पुढें मांडल्या आहेत त्या प्रत्येकीचा तपशील देऊन मी आपणांस दमवूं इच्छीत नाहीं. पं. मोतिलाल नेहरू यांनीं असेंब्लींतील बंगाल ऑर्डिनन्सवरील आपल्या भाषणांत या सर्व मुद्यांचा तपशीलवार विचार केला आहे. सरकारला स्वतःच्या समर्थनपर अशी एकहि गोष्ट सांगतां आली नाहीं. याबद्दल आपणांस शंका वाटत असेल तर आपण तें भाषण जरूर वाचा. दडपशाही कायद्यांचे समर्थनार्थ सरकारनें जें 'स्टेटमेंट' पुढें केलें आहे त्यावर विश्वास ठेवणें कोणालाहि जड जाईल, असें मला सांगून ठेवणें भाग आहे. माझ्या म्हणण्याचे पुष्टयर्थ मी फक्त एकच उदाहरण देणार आहें. ता. ११ डिसेंबर १९०८ रोजीं श्री. कृष्णकुमार मित्र व कै. अश्विनीकुमार दत्त प्रभृति ९ बंगाली गृहस्थांस पकडून अटकेंत ठेवण्यांत आलें. त्यासंबंधीं तत्कालीन स्टेटसेक्रेटरी लॉर्ड मोर्ले लॉर्ड मिंटो यांस लिहिलेल्या पत्रांत म्हणतात—“गुन्हेगार लोकांच्या कटाशीं या नऊ गृहस्थांचा प्रत्यक्ष संबंध होता व त्यांस अटक केल्यानें सदर कटांस आळा बसेल असें आपणांस वाटलें म्हणून आपण त्यास एक वर्षापूर्वी अटकेंत ठेविलें आहे.” आतां सर ह्यू स्टीफन्सन या बाबतींत काय म्हणतात तिकडे आपण लक्ष देऊं. सर ह्यू परवांच बंगाल कौन्सिलांत म्हणाले—“आमच्या मार्गांच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय प्रसृत करण्यासाठीं नसलें, तरी आमच्या शिस्तीबद्दल व सुव्यवस्थेबद्दल शंका प्रसृत करण्यासाठीं ज्या तीन गोष्टींचा वर्तमानपत्रांमधून उपयोग केला जातो, त्यांचा उल्लेख मला येथें करावासा वाटतो. यांपैकीं पहिल्या दोन बाबू अश्विनीकुमार दत्त व बाबू कृष्णकुमार मित्र यांच्या-

संबंधी आहेत. अत्याचारी क्रांतिकारकांशीं या दोघांचा संबंध होता--या म्हणण्यावर कोणाचाहि विश्वास बसणें शक्य नाहीं आणि म्हणून गुप्त पोलिसांमार्फत सरकारला मिळालेली माहिती खोटी असली पाहिजे व या घटकेला देखील अशा प्रकारची खोटी माहिती मिळून सरकारची फसवणूक होण्याचा संभव आहे, असें म्हणण्यांत येतें. बाबू अश्विनीकुमार दत्त यांची मला मुळींच माहिती नाहीं. परंतु बाबू कृष्णकुमार मित्र हे माझे खास मित्र असून अत्याचारी चळवळीबद्दल त्यांची सहानुभूति होती--या आरोपांतून मी त्यांस पूर्णपणें मुक्त करितों. परंतु बाबू कृष्णकुमार काय, किंवा बाबू अश्विनीकुमार काय, त्यांनीं क्रांतिकारक चळवळींत भाग घेणें तर बाजूलाच राहिलें, पण क्रांतिकारक चळवळीस नुसतें उत्तेजन दिलें असाहि आरोप त्यांच्यावर कोणी केलेला नाहीं, असें मला वाटतें. बाबू अश्विनीकुमार यांनीं सरकारविरोधी भाषणें करण्याची जंगी मोहीम काढिली होती, म्हणून बंगालसरकारनें त्यांचे बाबतींत तिसऱ्या रेग्युलेशनचा उपयोग करण्याबद्दल परवानगी मागितली होती."

## सत्तेचा दुरुपयोग होणें अपरिहार्य आहे !

यावरून या देशांतील सरकारला मन मानेल तेव्हां बेकायदेशीर कायदे सुरू करण्याचा जो अधिकार आहे, त्याचा दुरुपयोग होण्याचा संभव आहे, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. सदर अधिकाराचा दुरुपयोग होणें हें अपरिहार्यच आहे 'शिस्त व सुव्यवस्था' या नांवाखालीं जगांतील अखिल नोकरशाही सरकारांनीं आपली सत्ता संघटित करण्याचा प्रयत्न केला असल्याची साक्ष इतिहास देत आहे. 'शिस्त व सुव्यवस्था' ही शब्दरचना दिसावयाला फार सुंदर दिसते. परंतु तिच्यापायीं ज्या देशांत कायद्याचें राज्य नाहीं अशा ठिकाणीं अधिकारसंपन्न लोकांचे हातीं अत्यंत व्यापक, एकतंत्री व कोणाचेहि अटकेंत ठेवतां येण्यासारखे अधिकार जाऊन पडतात ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. दडपशाही हा स्वतःची जुलमी सत्ता संघटित करण्याचा एक उपाय आहे. दडपशाही हा अत्याचाराचा अत्यंत भयंकर असा प्रकार आहे. आणि म्हणूनच मी राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीचे बाबतींत अत्याचाराच्या मार्गाचा जितक्या जोरानें निषेध करितों, तितक्याच जोरानें

या सरकारी अत्याचाराचा ऊर्फ दडपशाहीचा निषेध करितों. दडपशाहीचें धोरण अदूरदर्शीपणाचें आहे, असा मी सरकारला इषारा देऊन ठेवितों. त्यामुळें कदाचित तात्पुरती त्यांना बळकटी येईल; परंतु सरकारी हत्यार या दृष्टीनें अखेरीस तें अपेशी ठरणार याबद्दल लॉर्ड बर्कनहेड यांची खात्री होऊन चुकली असेल असें मला वाटतें.

आतांपर्यंत मी स्वराज्यमार्गांचें विवरण करून अत्याचार अनैतिक व अयोग्य कां तें सांगितलें. आमची जीवनपद्धति व संस्कृति यांस अत्याचाराचा मार्ग विसंगत आहे म्हणून तो अनैतिक ठरतो व सध्यांच्या परिस्थितींत बॉंबगोळ्यांच्या अगर पिस्तुलांच्या जोरावर कोणतेंहि सुसंघटित सरकार उलथून पाडण्याची कल्पना देखील अशक्य आहे म्हणून तो अयोग्य व अनुपयुक्त ठरतो. मग स्वराज्यप्राप्तीसाठीं कोणत्या मार्गाचा अवलंब करणार, असा प्रश्न साहजिकच पुढें उभा राहतो. सुधारणा कायदा अंमलांत आणण्याचे बाबतींत आपण सरकारशीं सहकार्य केलें तर स्वराज्य हां हां ह्मणतां मिळेल, असें आह्मांला अत्यंत गंभीरपणें सांगतां येतें. या उपदेशास माझें उत्तर सरळ आहे. सोंपीव खात्यामुळें लोकांच्या हातांत खरी सत्ता आली असून त्यांत आम्हांला आत्मज्ञान, आत्मप्रगति व पूर्णत्व प्राप्त करून घेण्यास पुरेसा वाव आहे, अशी माझी कोणी खात्री पटवून देईल तर या घटकेला सरकारशीं सहकार्य करून विधायक कार्यक्रम करण्यास मी तयार आहें. परंतु नुसत्या सावलीसाठीं खरें लोकहित सोडून देण्यास मात्र मी कदापि तयार होणार नाहीं. सुधारणा कायद्याअन्वयें लोकांस कोणत्याहि प्रकारची जबाबदारी प्राप्त झालेली नाहीं. याबद्दल पुरावा हवा असेल तर ज्यांच्या नेमस्तपणाबद्दल सरकारलासुद्धां शंका घेतां येणें शक्य नाहीं अशा लोकांनीं मुडिमन कमिटीसमोर दिलेल्या साक्षी वाचून पहा. दिवाणांसंबंधींच्या गैरविश्वासावर सुधारणा कायद्याची उभारणी झालेली आहे. असल्या गैरविश्वासाच्या परिस्थितींत सहकार्याची भाषा बोलतां येणें शक्य नाहीं. तथापि लोकांस खरोखरच थोडीशी जबाबदारी मिळणार असेल, तर मात्र सरकारशीं सहकार्य करण्यास आम्हीं तयार होऊं. परंतु हें सहकार्य टिकाऊ व परिणामकारक व्हावें असें सरकारला

वाटत असेल, तर त्यासाठीं पुढील दोन गोष्टी होणें अवश्य आहे—(१) सरकारच्या मनोवृत्तींत खराखुरा फेरफार झाला पाहिजे, व (२) संपूर्ण स्वराज्याची हमी आम्हांला तात्काळ मिळून तें लौकरच व आपोआप मिळेल अशी व्यवस्था झाली पाहिजे. तात्काळ विधायक कार्यक्रमास सुरुवात करतां यावी म्हणून योग्य अशी परिस्थिति निर्माण करण्यासाठीं आपण भरपूर स्वार्थत्याग करण्यास तयार असलें पाहिजे. स्वराज्याचा पाया तात्काळ घातला जाऊन राज्यकर्ते व प्रजा याच्या मनःप्रवृत्तींत खरोखरीचा फेरफार घडून येणार असेल, तर संपूर्ण स्वराज्य जरा उशिरां मिळालें तरी त्याची पर्वा नाहीं. कारण राष्ट्राच्या इतिहासांत ४।२ वर्षांची कांहींच किंमत नसते. कदाचित् 'मनोवृत्तीचा फेरफार' ही शब्दरचना फार कर्णमधुर आहे, पण तिच्यासंबंधीं कांहींतरी प्रत्यक्ष पुरावा पुढें आला पाहिजे असें तुम्हीं म्हणाल. मला तुमचें म्हणणें कबूल आहे. परंतु तडजोडीची एकादी योजना पुढें येऊन त्यामुळें जें वातावरण उत्पन्न होईल त्यावरच हा पुरावा मिळणें न मिळणें अवलंबून आहे. कोणत्याहि योजनेमुळें विश्वासाचें वातावरण उत्पन्न झालेलें आहे कां अद्यापहि गैरविश्वासच कायम आहे, हें तात्काळ समजण्यासारखें आहे. शिवाय कोणत्याहि बाबतींत शांतिमय तडजोड करावयाची असल्यास, ती होणें न होणें हें प्रत्यक्ष अटींपेक्षां त्या अटींचे मागें उभ्या असलेल्या संदेशावर ज्यास्त अवलंबून आहे. अशा प्रकारच्या तडजोडीच्या नक्की अटी या घटकेला घालतां येणें अशक्य आहे. परंतु मनःप्रवृत्तींत खरोखरीचा फेरफार होऊन उभय पक्षांमार्फत शांतिमय रीतीनें व परस्परांवर विश्वास ठेवून अशा प्रकारच्या वाटाघाटीस सुरुवात होणार असेल, तर मात्र नक्की अटी पुढें मांडता येणें अशक्य नाहीं.

## सरकारसाठीं कांहीं सूचना.

असें असलें तरी बंगालला काय पाहिजे हें लक्षांत घेतां सरकारला उद्देशून पुढील सूचना करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

प्रथमारंभीं, मन मानेल तेव्हां वाटेल त्यास अटक करण्याचे जादा अधिकार सरकारनें काढून घेतले पाहिजेत व त्याचे पाठोपाठ अखिल राजकीय कैद्यांस बंधमुक्त केलें पाहिजे. नंतर ब्रिटिश राष्ट्रसंघांत राहून शक्य तितक्या

लौकर स्वराज्यस्थापना करण्यासंबंधींच्या आमच्या हक्कास संपूर्ण मान्यता देण्यासंबंधींचें आश्वासन आम्हांला सरकारकडून मिळालें पाहिजे व तोंपर्यंत सदर स्वराज्याचा भरभक्कम पाया तात्काळ घातला गेला पाहिजे. हा पाया भरभक्कम आहे किंवा नाहीं हें अर्थातच वाटाघाटीशिवाय व करारमदारांशिवाय ठरणें शक्य नाहीं व नसावें. हे करारमदार केवळ सरकार व जनता यांमध्यें व्हावयाचे नसून युरोपियन व अँग्लो-इंडियन यांसह देशांतील निरनिराळ्या जातींमध्यें व्हावयाचे आहेत.

## लोकांचें कर्तव्य.

उलट पक्षीं आम्हींहि शब्दानें किंवा कृतीनें क्रांतिकारक चळवळीस उत्तेजन न देतां सदर चळवळ बंद पाडण्यासाठीं शक्य तितके प्रयत्न करूं— अशा प्रकारची हमी सरकारला दिली पाहिजे. वास्तविक पाहतां बंगाल प्रांतिक परिषदेतर्फें ही हमी देण्याची कांहीं जरुरी नाहीं. कारण तिनें क्रांतिकारक चळवळीविषयीं आपली अनुमति कधींच व्यक्त केली नव्हती. सरकारच्या मनोवृत्तींत फेरफार घडून आला कीं क्रांतिकारकांची बुद्धीहि आपोआप पालटेल व मी सांगतों तशा प्रकारची तडजोड झाली तर क्रांतिकारक चळवळ कायमची नष्ट होऊन, आज जी शक्ति सरकारला विरोध करण्यांत खर्च होत आहे, तिचा खऱ्या लोकसेवेसाठीं व्यय होईल, असा मला विश्वास वाटतो.

## सरकारनें नकारघंटा वाजविली तर ?

आम्ही प्रदर्शित केलेल्या तडजोडीच्या इच्छेस सरकारकडून योग्य उत्तर मिळालें नाहीं, तर आज दोन वर्षे आम्हीं जें धोरण अमलांत आणिलें तेंच धोरण आम्हीं पुढेंहि चालू ठेऊन, जादा अधिकारांशिवाय देशाचा राज्यकारभार चालविणें सरकारला अशक्य करून सोडूं. कित्येक लोकांना हें धोरण पसंत नाहीं. कारण लोकांना कर नाकारण्यास सांगण्याची तयारी असल्याशिवाय सरकारी अंदाजपत्रक व मागण्या फेटाळून लावण्याचा आपल्याला अधिकार नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. हें म्हणणें तर्कशास्त्रदृष्ट्या अत्यंत शुद्ध आहे. परंतु त्यास माझें असें उत्तर आहे कीं, मला सविनय

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता.

कायदेभंगाचें वातावरण उत्पन्न करावयाचें आहे. अखिल राष्ट्रीय कायदेभंग हा जनतेच्या भात्यांतला शेवटचा बाण आहे. इंग्लिश पार्लमेंटानें सरकारच्या मागण्या फेंटाळून लावण्याचा निश्चय केल्यानंतर किती तरी वर्षांनीं तेथें कर नाकारण्याची चळवळ सुरू झाली, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. सरकारला आपल्या जादा अधिकारांचा उपयोग करून पैसा उभा करण्यास भाग पाडल्यानेंच सविनय कायदेभंगाचें वातावरण उत्पन्न होत असतें. असा प्रसंग येईल तेव्हां जादा अधिकाराअन्वयें उभे केलेले कर भरूं नका—अशा प्रकारचा उपदेश लोकांना करण्यास आम्हीं कदापि मागेंपुढें पाहाणार नाहीं. हा प्रसंग येणारच नाहीं, अशी मला आशा वाटते. कारण आज मला चहूंकडे मनोवृत्तींत फेरफार झालेला दिसत आहे. असें असतांहि तडजोडीची सारी आशा फोल ठरली, तर मात्र सविनय कायदेभंग सुरू केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. सविनय कायदेभंगासाठीं उत्कृष्ट संघटन करावें लागतें, कमालीचा स्वार्थत्याग करण्याची तयारी असावी लागते व वैयक्तिक किंवा जातिविषयक हित गौण लेखण्याचा उदारपणा मनांत उत्पन्न व्हावा लागतो. विधायक कार्यक्रम पूर्णपणें अंमलांत आल्याशिवाय देश कधीं तरी कायदेभंगास तयार होईल, अशी आशा मला वाटत नाहीं. परंतु मी मघां म्हटल्याप्रमाणें मला सध्यां तडजोडीचीं चिन्हें चहूंकडे दिसत आहेत. जगाला तंट्याबखेड्यांचा कंटाळा आलेला असून सर्वत्र विधायक कामगिरीची तळमळ लागलेली दिसत आहे. हिंदुस्थानला जगाच्या इतिहासांत एक महत्कार्य करून दाखवावयाचें आहे. हिंदुस्थानला सबंध जगास उद्देशून एक संदेश सांगावयाचा आहे. सदर संदेश मी मघां सांगितलेल्या राष्ट्रसंघाच्या दरबारांत सांगण्यास तें उत्सुक झालें आहे. ब्रिटिश मुत्सद्दी या औत्सुक्याचें योग्य तें चीज करतील काय? तुम्हांला सन्मान्य अशा अटींवर या घटकेला तह करतां येणें शक्य आहे, असें माझें ब्रिटिश मुत्सद्यांस सांगणें आहे. हिंदुस्थानांत राहणाऱ्या ब्रिटिश लोकांस माझें असें सांगणें आहे कीं, बाबांनो आपली स्वातंत्र्याची परंपरा बरोबर घेऊन तुम्ही येथें आलां आहांत; तेव्हां अखेरच्या करारनाम्याचे प्रसंगीं तुमचें म्हणणें ऐकून घेण्याच्या हक्कास आमची मान्यता

असली, तर आमच्या राष्ट्रीय चळवळींत भाग घेण्याचें तुम्हांला नाकारतां येणार नाहीं. बंगालच्या लोकांस माझें असें सांगणें आहे कीं, बंधूहो, राजकीय स्वातंत्र्य जिंकण्याचें धैर्य दाखविल्यामुळें तुम्हांला अपरंपार स्वार्थत्याग करावा लागला आहे. सरकारी रोषाच्या ठिणग्या प्रामुख्यानें तुमच्या अंगावर पडल्या आहेत. आपलीं राजकीय शस्त्रें बाजूला ठेवण्याची अद्यापि वेळ आलेली नाहीं. निकराचें युद्ध करा, पण तें धर्मयुद्ध असूं द्या! आणि जेव्हां तहनामा करण्याचा प्रसंग येऊन ठेपेल–तो येणार यांत शंकाच नाहीं–तेव्हां ताठरपणानें नव्हे, तर आपल्या कीर्तीस साजेशा नम्रपणानें तहपरिषदेंत पाऊल टाका! विपत्तींतून विजयशिखर गांठल्यानंतर हे जगाकडून जास्त भलें म्हणवून घेण्याची इच्छा बाळगा. राष्ट्रीयत्व हें कांहीं अंतिम ध्येय नव्हे. आत्मज्ञान, आत्मोन्नति व पूर्णावस्था प्राप्त करून घेण्याचें तें एक साधन आहे. एवढेंच. सर्वंध मनुष्यजातीला आत्मज्ञान व आत्मोन्नति करून घेतां यावी म्हणून राष्ट्रीयत्वाची वाढ व प्रगति होणें जरूर आहे. अखेर या तहाची वाटाघाट करितांना, आपल्या राष्ट्रीयत्वाच्या अभिमानांतच गर्क होऊन न जातां, त्याहूनहि श्रेष्ठ असें अखिल मानवजातीबद्दलचें कर्तव्य विसरूं नका! आतां माझें ध्येय काय आहे? मला हिंदुस्थानांत स्वायत्त पण परस्परसहायक व लोकसेवातत्पर अशा संस्थानांचा एक संघ निर्माण करावयाचा आहे. अखिल जगांतील स्वतंत्र राष्ट्रांच्या मोठ्या संघाचा हा संघ एक घटक बनेल. या स्वतंत्र राष्ट्रांच्या संघांत स्वातंत्र्य हेंच लोकसेवेचें लक्षण राहील व त्यांचें ऐक्य हीच जगाच्या शांततेची आशा ठरेल.

---



दासबाबूंचें अखेरचें दर्शन.

# देशबंधूंचें अल्प चरित्र.

पूर्ववृत्तांतः—

दासबाबूंचा जन्म ता. ५ नव्हेंबर १८७० रोजीं तेलिरबाग ( जि. डाक्का ) येथें विद्वत्ता व औदार्य यांसाठीं पिढीजाद प्रसिद्धी पावलेल्या अशा एका उच्च कुळांत झाला. कोंकणांतील रत्नागिरी जिल्ह्याची जशी मोठमोठ्या विद्वानांस जन्म देण्याबद्दल ख्याति, तशीच डाक्क्याची बंगालमध्यें ख्याति आहे. भुवनमोहनदास हें दासबाबूंच्या वडिलांचें नांव. त्यांनीं ब्राह्मो धर्माचा स्वीकार केला होता. ते सॉलिसिटर होते व त्यांची प्रॅक्टिसही फार मोठी होती. परंतु औदार्याचा वडिलोपार्जित गुण त्यांच्या अंगीं बाणल्याकारणानें पुढें त्यांना कोर्टाकडून नादारी मिळवावी लागली. चित्तरंजन दास हे त्यांचे ज्येष्ठ चिरंजाव. दासबाबूंच्या कनिष्ठ बंधूंचें नांव प्रफुल्लरंजन दास असें असून ते सध्यां पाटणा–हायकोर्टांत न्यायाधीश आहेत. दासबाबूंचें शिक्षण भवानीपूर येथील कॉलेजांत होऊन, नंतर ते आय. सी. एस. साठीं विलायतेंत गेले.

विलायतेंतील चळवळ—

विलायतेंत दासबाबूंनीं केवळ आय. सी. एस. च्या अभ्यासांतच आपला वेळ घालविला नाहीं. तर कै. दादाभाई नौरोजी हे पार्लमेंटसाठीं उमेदवार उभे असतांना त्यांनीं कित्येक मतदारसंघांपुढें व्याख्यानें देऊन त्यांस यथाशक्ति मदत केली. पुढें मॅकलीननामक एका पार्लमेंट–सभासदानें ‘ हिंदूमुसलमान ’ या विषयावर व्याख्यान देतांना हिंदी लोकांस ‘ गुलाम ’ या नांवानें संबोधिलें. तेव्हां दासबाबूंच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन त्यांनीं लगेच मि. ग्लॅड्स्टन यांचे अध्यक्षतेखालीं हिंदी विद्यार्थ्यांची एक जाहीरसभा भरवून तींत सदर सभासदाच्या भाषणाचा कडकडीत निषेध केला. “ इंग्लंडनें हिंदुस्थानवर तरवारीनें विजय मिळविला आहे, त्याचा अभिमान इंग्लंडनें पाहिजे तर खुशाल बाळगावा. परंतु तरवारीच्या जोरावर राज्य संभाळण्याची क्षुद्र हांव मात्र त्यानें धरूं नये ” अशा अर्थाचे रोकडे उद्गार दासबाबूंनीं सदर सभेंत काढिले.

ग्लॅड्स्टनसाहेबांनीं दासबाबूंच्या वक्तृत्वशक्तीबद्दल प्रशंसोद्गार काढिले व त्यांच्या विचारसरणीबद्दल सहानुभूति व्यक्त केली. याचा परिणाम असा झाला कीं, मि. मॅकलीन यांस आपल्या पार्लमेंटमधील जागेस मुकावें लागलें. अशा प्रकारें विलायतेंत दासबाबूंचा देशाभिमान व असामान्य वक्तृत्वशक्ति कसोटीस उतरली असली, तरी त्यामुळें ते अधिकाऱ्यांच्या रोषास मात्र पात्र झाले. त्यांची आय. सी. एस. परीक्षा पास झाली; परंतु नंबर खालीं लागल्यामुळें वर्णी मात्र लागूं शकली नाहीं. तेव्हां त्यांनीं बॅरिस्टरीच्या अभ्यासास सुरुवात केला व पुढें ते बॅरिस्टर म्हणूनच हिंदुस्थानांत परत आले. आय. सी. एस. मध्यें वर नंबर आला असता तर कदाचित त्यांस एकाद्या जिल्ह्याची सुभेदारी मिळून ते सरकारचे एक घटक बनले असते; परंतु विधिघटना निराळी असल्याकारणानें त्यांचें सबंध आयुष्य देशसेवेंत खर्च होऊन ते पुढें 'देशबंधु' बनले.

## हिंदुस्थानचा आधुनिक हरिश्चंद्र--

हिंदुस्थानांत परत आल्यावर दासबाबूंनीं कलकत्त्यास 'प्रॅक्टिस' ला सुरुवात केली. आरंभी लक्ष्मीचा त्यांचेवर तितकासा लोभ नव्हता. तेव्हां त्यांनीं कलकत्ता शहर सोडून एकाद्या जिल्ह्याचे ठिकाणीं नशीब उघडतें कीं काय तें पाहिलें. परंतु तेथेंहि कांहीं नीटसें जमण्याचें चिन्ह दिसेना. वडिलांनीं केलेल्या कर्जाचा ससेमिरा अद्यापि त्यांचे मागून सुटला नव्हता. शिवाय वडिलांचा औदार्याचा गुण त्यांनींहि संपादन केला होता. त्यामुळें वडिलोपार्जित कर्जाच्या जाचणींतून सुटण्यासाठीं त्यांस नादारीचा अर्ज करावा लागला. हा प्रसंग अत्यंत अपमानकारक होता. दासबाबूंनीं नादारी मिळविली, पण त्याच दिवशीं सावकारांचें पैन पै कर्ज फेडून टाकण्याचा संकल्प त्यांनीं केला. आतां "भरपूर पैसा मिळवा, भरपूर खर्च करा व भरपूर दानधर्म करा" हें रॉकफेलरचें तत्त्वच त्यांचें मार्गदर्शक बनलें. सुदैवानें त्यांचे ग्रह हळूहळू उच्चीचे येऊं लागले. उत्कृष्ट कायदेपंडित अशी त्यांची चहूंकडे ख्याति होऊं लागली. हातीं पैसा येतांच, वडिलांच्या कर्जफेडीची मुदत खलास होऊन त्यांनीं नादारी मिळविली असतांहि आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें त्यांनीं सावकारांचें पैन पै कर्ज फेडून टाकिलें व न्यायमूर्ति फ्लेचर यांजकडून "जगांतील प्रामाणिकपणाचें हें अद्वितीय उदाहरण होय!" अशा प्रकारची

शाबासकी मिळविली. आतां दासबाबूंवरील नादारीचा कलंक धुवून निघाला व ते हिंदुस्थानचे आधुनिक हरिश्चंद्र बनले. दासबाबू जसे हरिश्चंद्रासारखे सत्यव्रत तसेच कर्णाप्रमाणें उदार होते. कारकीर्दीच्या सुरवातीपासून तों अखेरपर्यंत त्यांच्या औदार्याची गंगा सारखी वाहत होती. त्यांची प्राप्ति दरमहा ३०।४० हजारांची असे; पण यापैकीं अर्धीअधिक रक्कम तुरुंगवासी देशभक्तांच्या आतेष्टांना मदत करण्याचे कामीं, त्याचप्रमाणें प्रत्यक्ष चळवळींत पडलेल्या देशभक्तांस भाकरी देण्याचे कामीं खर्च होत असे. १९०५ सालापासून अरविंद, पालप्रभृतींनीं राष्ट्रीय पक्षाची चळवळ नेटानें चालविली व दास आणि चक्रवर्ती यांनीं सबंध राष्ट्रीय पक्षाचा योगक्षेम चालविला. अन्नास मोताद झालेल्या गरिबांचे अश्रू पुसावे, त्यांस सुखाचे चार घांस खावयास मिळतील अशी व्यवस्था करावी, ऐन उमेदींत मायदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं तुरुंगांत गेलेल्या अगर फांसावर लटकलेल्या बंगाली तरुणांच्या विधवांचे व आयाबहिणींचे करुण हंबरडे ऐकून दयाळू अंतःकरणानें त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करावी, असा दासबाबूंचा शिरस्ता होता. "दरिद्र नारायणा"ची सेवा हाच त्यांचा धर्म होता. 'दरिद्र नारायणा'ची सेवा हीच त्यांची देवसेवा होती. त्यांनीं पैसा कमविला; पण तो स्वतःच्या घरावर सोन्याचीं कौलें चढविण्यासाठीं नव्हे, तर गरिबांच्या व अनाथांच्या योगक्षेमासाठीं कमविला. गरिबांचें दुःख तेंच माझें दुःख; गरिबांचें सुखसमाधान तेंच माझें नबाबी ऐश्वर्य–अशी त्यांची वृत्ति बनली होती. १९२० सालीं वकिली सोडल्यानेंच गरिबांचें कल्याण होऊं शकेल, अशी विलक्षण कल्पना प्रचारांत आल्यामुळें आपल्या देशप्रेमाबद्दल जनतेची खात्री पटविण्यासाठीं त्यांनीं आपल्या ३०।४० हजारांच्या प्रॅक्टिसवर लाथ मारिली. स्वराज्यपक्षानें 'स्वार्थलंपटते'चा आरोप खोटा पाडण्यासाठीं ज्याप्रमाणें घरीं धांवत आलेल्या दिवाणगिऱ्यांवर लाथ मारिली, तशीच दासबाबूंनाहि आपल्या ३०।४० हजारांच्या प्रॅक्टिसवर लाथ मारावी लागली. आतां दरमहा ३०।४० हजारांच्या उत्पन्नाचा प्रवाह बंद झाला; परंतु औदार्याचा गंगौघ मात्र आटला नाहीं! आतांपर्यंत वकिलींत मिळणारा पैसा राष्ट्रकार्यार्थ खर्च होत असे; आतां शिलकींतली संपत्ति राष्ट्रकार्यार्थ खर्च होऊं लागली. घरादारावर तुळशीपत्र ठेवण्यांत आलें. स्वतःचा राहता वाडाहि दासबाबूंनीं राष्ट्राचे हवालीं केला.

कायद्यांतील विलक्षण नैपुण्य—

बॅरिस्टरीच्या धंद्यास सुरुवात केल्यानंतर आरंभीं लक्ष्मी त्यांजवर रुष्ट झालेली दिसली तरी पुढें ती प्रसन्न होत गेली, असें वर म्हटलें आहे. ( १ ) १९०८–९ सालच्या बाबू अरविंदांवरील खटल्यांत दासबाबूंचें कायद्यांतील विलक्षण नैपुण्य जगाच्या निदर्शनास आलें. या खटल्यांत अरविंदांची सुटका झाल्याकारणानें 'उत्कृष्ठ कायदेपंडित' अशी त्यांची चहूंकडे ख्याति झाली. खुद्द खटला चालविणाऱ्या न्यायमूर्तींनीं देखील दासबाबूंच्या नैपुण्याबद्दल त्यांची तारीफ केली. हा खटला जिंकल्यामुळें दासबाबू खोऱ्यानें पैसा ओढूं लागले व अखेरीस सर सत्येंद्रप्रसन्न सिंह [ आतां लॉर्ड सिंह ] हेच फक्त त्यांस प्रतिस्पर्धी राहिले. या दोघांचीहि मिळकत दरमहा ३०|४० हजारांपर्यंत होती. ( २ ) दासबाबूंच्या कीर्तींत भर टाकणारा दुसरा खटला ह्मणजे बाबू विपिनचंद्र पाल यांचा. त्यांनीं अरविंदांचे खटल्यांत साक्ष देण्याचें नाकारिल्यामुळें त्यांचेवर खटला करण्यांत आला होता. या खटल्यांत कोणत्याहि प्रकारचा 'डिफेन्स' देतां येणें शक्यच नव्हतें. कारण साक्ष नाकारण्याचे बाबतींत कायदा स्पष्ट होता. पालबाबूंस शिक्षा होणार हें निश्चित होतें. परंतु ज्या कायद्याअन्वयें पालबाबूंवर खटला करण्यांत आला तो हिंदी लोकमताचा निदर्शक नसल्याकारणानें मुळांत अन्याय्य आहे–या मुद्यावर दासबाबूंनीं आपली बाजू अत्यंत वक्तृत्वपूर्ण शब्दांत पुढें मांडली. या खटल्यांतील त्यांचें भाषण इतकें हृदयस्पर्शी झालें कीं त्यांच्या भाषणाचे अखेरीस प्रत्यक्ष न्यायाधीश व सरकारी वकील मि. ह्यूम–या दोघांचींहि अंतःकरणें भरून येऊन त्यांचे नेत्र अश्रूंना डबडबले! यावरून इतर प्रेक्षकांच्या चित्तवृत्ति किती थरारून गेल्या असतील याची कल्पना वाचकांनींच करावी. ( ३ ) यानंतरचे राजकीय खटले म्हणजे एक नागपूरच्या दे. नारायणराव वैद्यांचा व दुसरा रंगूनच्या डॉ. मेहतांचा. हे दोन्ही खटले दासबाबूंनीं यशस्वी रीतीनें चालविले. राजकीय खटले चालविण्याचें काम अंगावर घेतल्याकारणानें सांपत्तिक दृष्ट्या त्यांचें अपरिमित नुकसान झालें. परंतु त्याची त्यांनीं पर्वा केली नाहीं. ( ४ ) याखेरीज सुप्रसिद्ध म्युनिशन्स बोर्ड केस, डुमरांव राज केस–इ. मोठमोठ्या बिनराजकीय अगर निमराजकीय स्वरूपाच्या खटल्यांत त्यांचें असामान्य कायदेपांडित्य जगाच्या निदर्शनास

आलें. कॉंग्रेसच्या पंजाब-चौकशी-कमिशनलाहि दासबाबूंच्या कायद्याच्या ज्ञानाचा बराच फायदा मिळाला.

**अनत्याचारी असहकारिता—**

दासबाबूंनीं राजकारणांत प्रत्यक्षपणें असा १९१६ सालीं प्रवेश केला. कै. लोकमान्यांनीं सुरू केलेल्या होमरूलच्या चळवळीचा प्रतिध्वनि त्यांनीं बंगालप्रांतांत उमटविला. बंगालचे ' माजी ' पुढारी नेमस्तांच्या गोटांत शिरल्याकारणानें त्यांस बंगालच्या राजकारणाची धुरा आपल्या शिरावर घ्यावी लागली. कै. लोकमान्यांना ते आपले राजकीय गुरु मानू लागले. उलटपक्षीं लोकमान्यांनाहि ते आपले उजवे हात वाटत असत. लोकमान्यांचें प्रतिकाराचें तत्त्वज्ञान त्यांच्या रोमरंध्रीं भिनलें होतें व याच तत्त्वज्ञानास ते आमरणांत चिकटून राहिले. लोकमान्य दिवंगत होऊन कलकत्त्यास अनत्याचारी असहकारितेचा ठराव पास झाला त्यावेळीं सुद्धां दासबाबूंच्या डोळयांसमोरील लोकमान्य-तत्त्वज्ञानाचा ध्रुवतारा ढळला नाहीं. महात्माजींच्या असहकारितेच्या ठरावांत ' स्वराज्या '-चा उल्लेखहि नव्हता. तो दासबाबूंनीं नागपूरच्या ठरावांत करून घेतला व ' सध्यांची फक्त असहकारितेची तयारी आहे-खरी असहकारिता नव्हे ' अशा आशयाची शब्दयोजनाहि त्यांनीं कॉंग्रेसमधून पास करून घेतली.

**तुका म्हणे आतां, उरलों उपकारापुरता ।—**

नागपूर कॉंग्रेसमध्यें झालेल्या तडजोडीमुळें दासबाबूंनीं अनत्याचारी असहकारितेच्या प्रास्ताविक कार्यक्रमाचा जोरानें पुरस्कार केला. या वेळीं ' एक वर्षांत स्वराज्या ' ची खटपट चालू होती. दासबाबूंनीं वकिली सोडून देशासाठीं फकिरी पत्करल्याकारणानें लोकांची संशयनिवृत्ति झाली व बंगालमधील तरुणांचे तर ते अनभिषिक्त राजे बनले. मद्यप्राशन, धूम्रपान इ० व्यसनें दासबाबूंनीं तात्काळ सोडून दिलीं व आपल्या आत्मसंयमनाबद्दल लोकांची खात्री पटविली. महात्माजींनीं या त्यांच्या आत्मसंयमनाबद्दल 'यंग इंडियां'त गौरवपर उद्गार काढिले. राखाडी उडालेल्या निखाऱ्याप्रमाणें दासबाबू आतां राजकीय क्षेत्रांत तळपूं लागले. त्यांचें तेज जसें नोकरशाहीला तसेंच नाठाळ टीकाकारांनांहि दुर्धर्ष वाटूं लागलें. स्वार्थाची होळी झाल्याकारणानें तुकोबारायांच्या

उद्गारांप्रमाणें दासबाबू आतां फक्त उपकारांकरितां शिल्लक राहिले. नागपूर कांग्रेसहून परत जातांच दासबाबूंनीं असहकारितेच्या प्रचारास सुरुवात केली. कॉलेज-विद्यार्थ्यांस कॉलेजें ओस पाडण्याची विनंति करितांच हजारों तरुणांनीं आपल्या कॉलेजांस रामराम ठोकला. ठिकठिकाणच्या वकिलांनीं वकिल्या सोडल्या. पुढें युवराजांच्या आगमनावरील बहिष्कार अयशस्वी व्हावा म्हणून नोकरशाहीनें समित्यांचा कायदा सुरू केला. धरपकड सुरू झाली. दासबाबूंनीं पहिला बळी आपल्या मुलाचा दिला, दुसरा बायकोचा दिला व नंतर ते स्वतः तुरुंगांत गेले. त्यांच्या पाठोपाठ २० हजार तरुण तुरुंगांत गेले. त्यामुळें सर्वंध जगांत बलिष्ठ असें सरकार असहकारितावाद्यांपुढें नमलें! त्यांनीं दासबाबू व अझद यांजकडे तहाच्या अटी पाठविल्या. दासबाबूंनीं त्या महात्माजींकडे पाठविल्या. महात्माजींनीं तहाची संधि घालविली. बरें, लढाई तरी तशीच पुढें चालवावयाची. तर तसेंहि न करतां त्यांनीं बार्डोलीस शस्त्रसंन्यास पुकारला. आतां दासबाबूंचा त्यांच्या धोरणावरील विश्वास उडाला व तुरुंगांतून बाहेर येतांच त्यांनीं प्रतिकाराच्या ध्रुवताऱ्याच्या अनुरोधानें मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली. त्यांनीं कौन्सिलबहिष्काराची दिशा बदलावी असा पुकारा अमरावतीहून केला. गया कांग्रेस त्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. त्यांनीं कलकत्ता कांग्रेसचे अध्यक्ष दे. लाला लजपतराय यांचेप्रमाणें मुग्धता न स्वीकारतां कौन्सिलांतील अडवणुकीची घोषणा अध्यक्षपदावरून केली. गया कांग्रेसनें त्यांचें म्हणणें ऐकिलें नाहीं. दासबाबूंनीं कांग्रेसमध्यें राहून स्वराज्य पक्षाची स्थापना केली व याच गोष्टीमुळें त्यांची धडाडी, स्पष्टवक्तेपणा, स्वमतनिष्ठा व विलक्षण आत्मविश्वास हीं लोकांचे प्रत्ययास आलीं. त्यांनीं कांग्रेसमधील बहुमत आपणांस अनुकूल करून घेण्यासाठीं महाराष्ट्र, मद्रास, आसाम, बिहार, बंगाल, पंजाब इ. प्रांतांत मोहिमा काढल्या व हलके हलके एक एक पुढारी त्यांच्या गोटांत सामील होऊं लागला. प्रांतोप्रांतीं स्वराज्य पक्षाच्या शाखा स्थापन झाल्या व "हे शांतिमय गोंथ व सनदशीर हूण कौन्सिलांत येऊन अडवणूक करणार" अशा प्रकारची भीति हेलेप्रभृति अधिकाऱ्यांनीं असेंब्लींत प्रदर्शित केली. दिल्ली-कांग्रेसनें कौन्सिलप्रवेशाचे बाबतींत स्वराज्यपक्षीयांशीं तडजोड केली. निवडणुकी होऊन मध्यप्रांत व बंगाल या दोन ठिकाणीं स्वराजिस्टांचें बहुमत

निवडून आलें. अडवणुकीस सुरुवात झाली; अंदाजपत्रकें व दिवाणांचे पगार फेटाळण्यांत आले; दिवाणगिऱ्या उघड्या पडल्या; द्विदळ राज्यपद्धतीस मध्यप्रांतांत मूठमाती मिळाली व बंगाल्यांतहि तो मात पुरुष खोल गाडल्याचें सरकारी फर्मान दासबाबूंच्या निधनापूर्वी अवघे ४८ तासच बाहेर पडलें. दासबाबूंच्या प्रतिकाराच्या तत्त्वज्ञानाचा अपूर्व विजय झाला. विधायक कार्यक्रमाचा पाया घालण्यासाठीच आधी विनाश केला पाहिजे व या दृष्टीनें विनाश हा विधायक कार्यक्रमाचाच एक भाग आहे, हें मर्दानी तत्त्वज्ञान अखिल जनतेस पटलें. स्वराज्य पक्षाला चिरडण्यासाठीं बंगाल सरकारनें फर्मान काढिलें व त्याअन्वयें ७० देशभक्तांस अटक केली. दासबाबूंनीं त्याविरुद्ध जोराची चळवळ केली. त्यांचीं सडेतोड भाषणें ऐकतांना ते एकाद्या पेट घेतलेल्या ज्वालाग्राहीप्रमाणें दिसत असत. "सुभाषबाबू क्रांतिकारक असतील, तर मी सवाई क्रांतिकारक आहें; एकटा एक्झिक्यूटिव ऑफिसरच नव्हे तर कलकत्ता कॉर्पोरेशनचा मेयरहि क्रांतिकारक आहे. मला पकडा !" अशा प्रकारचें त्यांनीं नोकरशाहीस दिलेलें आव्हान अद्यापिहि त्यांच्या श्रोत्यांच्या कानांत दुमदुमत असेल. "नोकरशाही कायम आहे तोंपर्यंत क्रांतिकारक चळवळ नष्ट होणें शक्य नाहीं; ती तशीच कायम राहणार" हे त्यांचे उद्गार तर चिरस्मरणीय आहेत. दासबाबूंनीं फरीदपूरच्या परिषदेंत महत्त्वपूर्ण भाषण करून नोकरशाहीस लोकपक्षाशीं तह करण्याची सुवर्णसंधि उत्पन्न करून दिली. परंतु नोकरशाहीनें ती कशी लाथाडली हें लॉर्ड बर्केनहेड यांच्या भाषणावरून व परवां असेंब्ली उघडतांना व्हाईसरायांनीं केलेल्या भाषणावरून सर्वांचे निदर्शनास आलेंच आहे.

## दासबाबूंचीं मतें व तत्त्वज्ञान—

असहकारितेच्या चळवळीचा इतिहास देतांना त्यांत दासबाबूंच्या राजकीय मतांचा उल्लेख आपोआपच होत गेला असला तरी त्यांच्या सामाजिक व राजकीय मतांचा व तत्त्वज्ञानाचा स्वतंत्र रीतीनें विचार करणें इष्ट आहे (१) आधीं दासबाबूंच्या सामाजिक मतांचा विचार करूं. दासबाबू हे कट्टे व कर्ते समाजसुधारक होते. त्यांनीं स्वतःच्या घरांत समाजसुधारणेचीं तत्त्वें अंमलांत आणिलीं होतीं. परंतु सामाजिक सुधारणेवर कमालीचा भर देऊन, राजकीय सुधारणेकडे दुर्लक्ष्य करणें हें त्यांस बिलकुल संमत नव्हतें. कलकत्त्यास भर-

लेल्या समाजसेवा-परिषदेंत भाषण करितांना " जिची सर्वांगीण सुधारणेच्या बाबतींत उदासीनता अशा एकलकोंड्या समाजसुधारणेंत माझा विश्वास नाहीं ! जीवन जसें एक, जीवनाचे जसे निरनिराळे तुकडे पाडतां येणार नाहींत, तसेच सुधारणेचेहि निरनिराळे तुकडे पाडतां येणार नाहींत ! राष्ट्राच्या सर्वांगीण सुधारणेंतच माझा विश्वास आहे !" अशा प्रकारचे उद्गार त्यांनीं काढिले होते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीबरोबरच खरी समाजसेवा करितां यावी म्हणून त्यांनीं लोकलबोर्डें, म्युनिसिपालट्या व इतर स्थानिक संस्था काबीज करा, असा राष्ट्रास उपदेश केला होता. कलकत्ता कार्पोरेशनचे पहिले मेयर झाल्यानंतर त्यांनीं सुरुवातीच्या भाषणांत जो 'दरिद्र नारायणा'च्या सेवेचा व्यापक कार्यक्रम आंखला होता त्याचें या दृष्टीनें मनन व चिंतन करण्यासारखें आहे. बार्डोलीचा बार फसल्यानंतर कांग्रेस ही एक बडी समाजसुधारक संस्था बनूं लागली, तेव्हां देखील दासबाबूंनीं " कांग्रेसला राजकीय स्वरूप द्या, तिच्यापुढें राजकीय कार्यक्रम ठेवा " अशा प्रकारचा आग्रह धरिला व त्यासाठींच स्वतंत्र स्वराज्य-पक्षाची स्थापना केली. पुढें महात्माजींस दासबाबूंचें ह्मणणें मान्य होऊन त्यांनीं कांग्रेसमध्यें स्वराज्य पक्षाचा अंतर्भाव केला व त्याचेकडे कांग्रेसची राजकीय कामगिरी सोंपवून, स्वतःच्या पक्षाकडे समाजसुधारणेचें खातें घेतलें.

( २ ) दासबाबूंचीं राजकीय मतें व तत्त्वज्ञान यांचा एकत्र विचार करणें जरूर आहे. कारण त्यांनीं आपलें अखिल तत्त्वज्ञान राजकीय मतांच्या रूपानेंच प्रतिपादिलें व अंमलांत आणिलें. अखिल मानवजातीचा एक बडा संघ समाजसेवेच्या पायावर उभा रहावा व अखिल मानवजातीस आत्मज्ञान, आत्मप्रगति व पूर्णत्व प्राप्त करून घेण्याची संधि मिळावी हें दासबाबूंचें अंतिम ध्येय होतें. या दृष्टीनें आशियाखंडांतील अखिल राष्ट्रांचा संघ निर्माण करण्याची सूचना त्यांनीं आपल्या गया येथील भाषणांत केली होती. अखिल मानवजातीचा बडा संघ निर्माण करण्याचें ध्येय सिद्धीस नेतां यावें म्हणून ब्रिटिश कॉमनवेल्थच्या पंखाखालीं—पंजाखालीं नव्हे—एक स्वतंत्र घटक म्हणून राहण्याचीहि त्यांची तयारी होती. त्यांना 'होमरूल अगर सेल्फ गव्हर्नमेंट'ची कल्पना अपुरी वाटत असे. किंबहुना ज्या ज्या शब्दांत 'रूल' हा शब्द असे, त्याची त्यांना घृणा वाटे. 'स्वराज्य' हें त्यांचें राजकीय ध्येय होतें. 'स्वराज्य' शब्दांत स्वातंत्र्याच्या अखिल कल्पनांचा समावेश होतो, असें त्यांचें म्हणणें

मराठी ग्रंथ संग्रहालय

असे. स्वायत्त पण परस्परावलंबी ग्रामसंघांची स्थापना करून मध्यवर्ती सरकारला फक्त सल्लागाराचें स्वरूप प्राप्त व्हावें–अशी त्यांची भावी स्वराज्याची योजना होती. या योजनेसंबंधींचा तपशील वाचकांस प्रस्तुत पुस्तकाच्या ७३, ७४ व ७५ पानांवर वाचावयास मिळेल. 'स्वराज्य' कोणीहि द्यावयाचें नसतें; तें घ्यावयाचें असतें; त्याची प्रजेस जाणीव व्हावयाची असते व मग सत्ताधाऱ्यांनीं त्यास फक्त मान्यता द्यावयाची असते–असें दासबाबू प्रत्येक भाषणांत सांगत असत. आम्हांला आमच्या प्रवृत्तीस व परंपरेस साजेसें स्वराज्य स्थापन करण्याच्या हक्कास मान्यता पाहिजे अशी त्यांची ब्रिटिश सरकारजवळ मागणी होती व हीच मागणी त्यांनीं असेंब्लीमार्फत ब्रिटिश सरकारकडे पाठविली होती. लोकांस स्वराज्यसंस्थापनेच्या नैसर्गिक हक्काची एकदां जाणीव झाली कीं, मग स्वराज्य त्यांच्या मुठींत आहे, जगांतील कोणतेंहि सरकार अगर नोकरशाही सदर हक्क त्यांजपासून हिरावून घेऊं शकणार नाहीं–असें त्यांचें वारंवार सांगणें असे. ( ३ ) आतां राहिला स्वराज्यप्राप्तीच्या मार्गाचा प्रश्न. सध्यांच्या परिस्थितींत अनत्याचारी असहकारिता हा स्वराज्यप्राप्तीचा एकमात्र मार्ग होय अशी दासबाबूंची वालंबाल खात्री होऊन चुकली होती. सविनय कायदेभंग व कर देण्याचें नाकारणें हें त्यांच्या असहकारितेचें तीव्र व अंतिम स्वरूप होतें. कॉंग्रेसनें खऱ्या असहकारितेस सुरुवात केली नसून, फक्त तिच्या तयारीस सुरुवात केली होती हें दासबाबूंच्या मुत्सद्देगिरीच्या चाळणींतून बाहेर पडलेल्या नागपूर–कॉंग्रेसच्या ठरावावरून कोणाच्याहि ध्यानीं येईल. असहकारिता उर्फ सविनय कायदेभंग सुरू करितां यावा म्हणूनच त्यांनीं तयारीचा एक मार्ग म्हणून कौन्सिलप्रवेश पुकारला व अंमलांत आणिला. कौन्सिलप्रवेशाचे पाठीशीं सविनय कायदेभंगाची दंडशक्तीच (सँक्शन ) उभी होती. कौन्सिलमतदार हे लुंगेसुंगे लोक नसून कर भरणारे लोक असतात. तेव्हां कौन्सिलांची लढाई लढतांना त्यांचें संघटन करितां आलें तर अंतिम स्वरूपाची असहकारिता करणें अत्यंत सोपें जाईल–अशी त्यांची खात्री होती. हे सर्व लोक नोकरशाहीविरुद्ध उलटले व कायदेभंग करण्यास नुसते सज्ज झाले तर तात्काळ नोकरशाही नमेल व कायदेभंग करण्याची जरूरीहि पडणार नाहीं–असें दासबाबूंची मनोदेवता त्यांस सांगत होती. कसेंहि करून नोकरशाहीला

चहूंकडून घेरा, तिच्यावर चहूंकडून मारा करा, भ्याडाप्रमाणें अलिप्त न राहतां मर्दपणानें तिच्या बालेकिल्ल्यांत प्रवेश करून आंतून मारा सुरू करा, तिला सुखाची झोंप मिळूं देऊं नका व कसेंहि करून राष्ट्राचा जिवंतपणा कायम ठेवा—असा दासबाबूंचा राष्ट्राला संदेश होता. नोकरशाहीला सतावून सोडण्याच्या या धोरणाला सहकारिता म्हणा, प्रतियोगी सहकारिता म्हणा अगर प्रतियोगी असहकारिता म्हणा, दासबाबूस त्याची खंत वाटत नव्हती. स्वराज्यप्राप्ति होत असल व लोकांचें हित साधून तितक्याच प्रमाणांत नोकरशाहांची सत्ता ढिली होत असेल तर वाटेल तें धोरण कौन्सिलांत अमलांत आणण्यास दासबाबूंची तयारी होती. " माझ्या हक्काचा ध्रुवतारा माझ्या डोळ्यांसमोर असला व माझा हक्क अमुक मार्गानें गेलें असतां मी कबीज करूं शकेन असें मला वाटत असलें कीं मग माझें तारूं प्रतियोगी सहकारितेच्याच काय, पण कोणत्याहि दर्यांत भटकत राहिलें तरी त्याची पर्वा नाहीं " [ पृष्ठ १५३ ] असें दासबाबू ह्मणत असत. " स्वराज्य प्राप्त होत असेल, तर नोकरशाहीपुढें साष्टांग नमस्कार घालण्यापासून, तिच्या विरुद्ध बंडाचें निशाण उभारीपर्यंत सर्व मार्ग मला पसंत आहेत " या लोकमान्योक्तींत जो संदेश होता, तोच दासबाबूंच्या वरील उक्तींत व धोरणांत होता. त्यांची अडवणुकीची असहकारिता प्रतियोगी सहकारितेपासून बिलकुल भिन्न नव्हती. तें सहकारितेचें दुसरें अंग होतें. अमृतसर कांग्रेसमध्यें प्रतियोगी सहकारितेच्या ठरावास पुष्टि देतांना त्यांनीं जें भाषण केलें त्यावरून आमच्या विधानाची सत्यता वाचकांस तात्काळ पटेल. सदर प्रसंगीं दासबाबू ह्मणाले—

" आम्ही आपसांत तडजोड केली आहे. पं. मदनमोहन मालवीय यांनीं या ठरावांत सहकार्य व आभारप्रदर्शन असे दोन मुद्दे आहेत, असें सांगितलें. सहकार्याचे बाबतींत कार्यसिद्धीसाठीं जरूर तर व तेव्हां अडवणूक करावी अशा प्रकारच्या तडजोडीसच मी तयार झालों आहे [ ऐका, ऐका ] ! संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना तात्काळ करतां यावी ह्मणून शक्य होईल तितक्या प्रमाणांत आम्ही सुधारणा अंमलांत आणू—असे स्पष्ट शब्द या ठरावांत घातलेले आहेत [ ऐका, ऐका ] ! सहकार्यानें स्वराज्यस्थापनेस मदत होत असेल तर त्यास

आमचा विरोध नाहीं. परंतु अडवणुकीनें, निर्मळ व सतत अडवणुकीनें आमचें राजकीय ध्येय साध्य होण्यास मदत होत असेल, तर त्यासहि आमचा विरोध नाहीं ( ऐका, ऐका )!"

अमृतसर कांग्रेसमध्यें दासबाबूंनीं केलेलीं सडेतोड भाषणें ऐकून माझी छाती दडपली, अशा प्रकारचे उद्गार महात्माजींनीं 'फॉरवर्ड' पत्रांतील एका लेखांत नुकतेच काढिले आहेत, ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**दासबाबू व अनत्याचार—**

(४) अत्याचाराचा मार्ग दासबाबूंस पसंत नव्हता. अनत्याचार हा त्यांचा धर्म होता. असहकारितेच्या सुरुवातीपासून अनत्याचाराचें नवयुग उत्पन्न झालें, अशा प्रकारचे उद्गार त्यांनीं एके ठिकाणीं काढिले आहेत. गया-काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून अत्याचारानें कधींहि 'स्वराज्य' प्राप्त झालें नाहीं, असें दाखविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला होता. असें होतें तरीसुद्धां अत्याचारी लोकांच्या उच्च ध्येयाबद्दल अगर स्वार्थत्यागाबद्दल मात्र त्यांनीं कधींच हेटाळणी केली नाहीं. किंबहुना त्यांचा उज्वल देशाभिमान पाहून दासबाबूंस प्रेमाचें भरतें येई. "अत्याचारी क्रांतिकारक तरी कशासाठीं अत्याचार करितात? ते इतके निर्दय नराधम आहेत काय कीं त्यांस सदैव नरमेध करण्यांत आनंद वाटावा? त्यांना काय पाहिजे याची तुम्ही कधींतरी चौकशी केली आहे काय?" असा त्यांचा सरकारला नेहमीं सवाल असे. "क्रांतिकारकांना स्वातंत्र्याची भूक लागली आहे; ही भूक शमवा कीं त्यांची चळवळ आपोआप बंद होईल!" असें ते खात्रीपूर्वक सांगत असत. प्रथम देशांत क्रांतिकारक चळवळ मुळीं अस्तित्वांतच नव्हती. परंतु सरकारनें आपल्या अपकृत्यांनीं या चळवळीस जन्म दिला व पुढें दडपशाही सुरू केल्याकारणानें या चळवळीस खतपाणी मिळून तिची बेसुमार वाढ झाली, असें दासबाबू प्रत्येक सभेंत प्रतिपादीत असत. क्रांतिकारकांच्या उज्ज्वल देशाभिमानाबद्दल आदर बाळगल्यामुळें त्यास परकीयांचाच काय, पण स्वकीयांचाहि रोष सहन करावा लागला. सिराजगंज येथील परिषदेंत गोपीनाथ साहाच्या अपरिमित स्वार्थत्यागाबद्दल प्रशंसोद्गार काढल्यामुळें दासबाबूवर कित्येकांनीं टीकेचा भडिमार केला. खुद्द महात्माजींनीं दासबाबूंच्या या

वर्तनाबद्दल नापसंती दर्शविली. हेतु व कृत्य हीं निरनिराळीं लेखून गोपीनाथाच्या स्वार्थत्यागाबद्दल अगर देशाभिमानाबद्दल तारीफ करावयास नको होती, असे महात्माजींचें ह्मणणें होतें. दासबाबू डगमगले नाहींत. त्यांनीं पुढील आशयाचीं दोन जाहीरपत्रकें प्रसिद्ध केलें—

( १ ) सिराजगंजचा ठराव खुनाला पाठिंबा देणारा कसा आहे, तेंच मला समजत नाहीं. म. गांधींनींहि गोपीनाथ साहाला दिशाभूल झालेला देशभक्त असें म्हटलें असून, त्याच्या अंगच्या स्वार्थत्याग, निर्भयता, देशाभिमान इ. गुणांबद्दल कबुली दिली आहे. यापेक्षां सिराजगंज येथील ठरावांत ज्यास्त काय होतें तेंच मला समजत नाहीं. एखाद्या तरुणाचें कृत्य नापसंत असलें तरी त्याला जें आपलें कर्तव्य वाटलें त्यासाठीं त्यानें आपल्या प्राणाची आहुति दिली असल्यास त्याबद्दल प्रशंसोद्गार काढणें कां बरें शक्य होऊं नये ? सिराजगंज येथील ठरावानें गोपीनाथाच्या कृत्यांतील हिंसेचा निषेध केला असून, त्याच्या स्वार्थत्यागाची तारीफ केली आहे. स्वराष्ट्रसेवेसाठीं अवश्य वाटणाऱ्या गोष्टी करीत असतां स्वतःच्या प्राणांची आहुति देणाऱ्या तरुणाबद्दल कौतुक वाटत नाहीं, असें मी किंवा इतर कोणीहि म्हणणें हा शुद्ध ढोंगीपणा होय ! हा ठराव अखिल बंगालच्या मताचा निदर्शक असून, त्याबद्दल मला बिलकुल विषाद वाटत नाहीं. अहिंसेच्या तत्त्वावर माझा विश्वास असल्याचें मी अनेकवार जाहीर केलें आहे. परंतु राष्ट्रसेवेसाठीं स्वतःच्या प्राणांची आहुति देणाऱ्या तरुणांची वाहवा केल्याखेरीज माझ्याच्यानें कधींहि राहवणार नाहीं. हिंसा करणें चुकीचें असून, कोणताहि खून हा वाईटच. परंतु अशाहि मनुष्याचा स्वार्थत्याग वाखाणण्याजोगा आहे, असें जाहीर करणें हें माझें कर्तव्य आहे. ( ता. ८ जून १९२४ ).

( २ ) मी गोपीनाथ साहासंबंधीं म. गांधींचें मत फार काळजीपूर्वक वाचलें. मला त्यांचें म्हणणें बिलकुल पटत नाहीं. अहिंसेच्या तत्त्वानुसार गोपीनाथाचें कृत्य निंद्य असल्याकारणानें त्याच्याबद्दल आदर प्रदर्शित करणें चुकीचें आहे असें महात्माजींचें म्हणणें असेल तर तें मला कदापि कबूल होणें शक्य नाहीं. गोपीनाथाची पहिली जबानी-

वाचून त्याच्या सत्यनिष्ठेबद्दल व राष्ट्रहितार्थ वाटेल त्या हालअपेष्टा भोगण्याच्या त्याच्या तयारीबद्दल देशांतील बऱ्याचशा लोकांस आदर वाटला नाहीं काय? मग बंगाली लोकांच्या परिषदेनें या सत्यास वाचा फोडली यांत बिघडलें कोठें? सत्य बोलणें हें अहिंसेला संमत नाहीं काय? एकादें कृत्य व त्याच्या मुळाशीं असलेला हेतु यांचा वेगवेगळा विचार करणें यांत काय कठीण आहे? इतिहासांतील अनेक कृत्यांचा निषेध करून आपण तीं करणारांच्या हेतूंबद्दल वाखाणणी करीत नाहीं काय? जगांत उघडउघड दिसणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करणारा कोणताहि नियम पाळण्यास मी तयार नाहीं. गोपीनाथ साहाचें कृत्य निंद्य असलें तरी त्याची सत्यनिष्ठा, देशाकरितां वाटेल त्या हालअपेष्टा सोसण्याची त्याची तयारी व आपल्या प्राणाहुतीनें सर्व देशभर राष्ट्रभक्ति पसरावी ही त्याची इच्छा–या सर्व गोष्टी बंगालला आदरणीय वाटतात, असें मी बिनदिक्कत जाहीर करितों. ( ता. १७ जून १९२४ ).

पुढें हें प्रकरण हातघाईस येऊन अहमदाबादेस भरलेल्या ऑल इंडिया कांग्रेस कमिटीचा संस्मरणीय बैठकींत दासबाबूंची उपसूचना ७० वि. ७८ मतांनीं नापास होऊन त्यांस नैतिक विजय प्राप्त झाला. दासबाबूंस अत्याचार मान्य नव्हता, परंतु अत्याचारी तरुणांच्या अलोट स्वार्थत्यागाबद्दल त्यांचे मनांत पूज्यभाव वसत होता. अत्याचारी तरुणांच्या कृत्यांबरोबरच अत्याचारी पक्षास जन्म देऊन त्याची जोपासना व वाढ करणाऱ्या सरकाराचाहि ते स्पष्ट शब्दांत निषेध करीत असत. याबाबतींत मुंबईस भरलेल्या ऐक्य परिषदेंत त्यांनीं केलेलें सडेतोड भाषण अद्यापिहि सर्वांचे कानांत दुमदुमत असेल. अनत्याचार हा दासबाबूंचा धर्म होता, तरी त्याचें खूळ माजविण्यास ते तयार नव्हते.

**दासबाबूंचें वक्तृत्व व काव्यशक्ति—**

दासबाबूंच्या असामान्य वक्तृत्वशक्तीची छटा विद्यार्थीदशेंत असतांना विलायतेंत दिसून आली असली, तरी अरविंद, पालबाबू, नारायणराव वैद्य वगैरेंच्या खटल्यांत त्यांच्या वक्तृत्वाची तेजस्विता विशेष प्रामुख्यानें प्रकट झाली. स्वराज्यसंघाची चळवळ हातीं घेतल्यानंतर १९१८ सालीं त्यांनीं

सरकारच्या गोटांत गेलेले बंगालचे ‘ माजी पुढारी ’ सर सुरेंद्रनाथ यांचे कसे वाभाडे काढिले याची साक्ष वाचकांस २४ ते ३७ या पृष्ठांवर वाचावयास मिळेल. असहकारितेच्या होमकुंडांत उडी घेऊन केवळ स्वार्थत्यागमूर्ति बनल्यानंतर तर त्यांच्या वाणात विशेष ओज भरलें आहे असें वाटे. राजकीय वक्तृत्वाची शक्ति केवळ शब्दांत नसून, प्रत्यक्ष कृति, आचरण, निश्चय इ. गोष्टींत असते ही मोर्ले यांची उक्ति दासबाबूंचे बाबतींत पूर्णपणें प्रत्ययास आली होती. सगळा स्वार्थ जळाल्यामुळे व ‘ आतां उरलों उपकारापुरता ’ ही दिव्य स्थिति प्राप्त झाल्यामुळें त्यांचे मनांत विलक्षण आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. आणि म्हणूनच त्यांच्या परकीय व स्वकीय शत्रूंस त्यांचें तेज अत्यंत दुर्धर्ष वाटे. मद्रासेंतील दौऱ्यांत त्यांनीं श्री. राजगोपाळाचार्य यांचा कसा धुव्वा उडवून दिला याचीहि साक्ष प्रस्तुत पुस्तकांत वाचकांस वाचावयास मिळणार आहे. मद्रासच्या दौऱ्यांत त्यांनी ब्राह्मणेतरांपुढें व्याख्यानें देऊन त्यांचेपैकीं पुष्कळशीं माणसें काबीज केलीं याचेंहि श्रेय त्यांच्या असामान्य वक्तृत्वशक्तीसच आहे. दासबाबू आणखी ४।२ वर्षें जगते तर त्यांची मद्रास–महाराष्ट्रांतील ब्राह्मणब्राह्मणेतर वाद सोडविण्यास बरीच मदत झाली असती यांत शंका नाहीं.

दासबाबू हे जसे उत्कृष्ठ वक्ते तसेच उत्कृष्ठ कवीहि होते. त्यांचें पहिलें ‘ मालंच ’ नामक काव्य १८९५ सालीं प्रसिद्ध झालें. हें काव्य ह्मणजे नानाप्रकारच्या सुगंधी पुष्पांचा एक मनोमय हारच होय ! ‘ सागर–संगीत ’ हें त्यांचें दुसरें काव्य असून, त्याचें अरविंदासारख्या महर्षीनें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. याशिवाय त्यांचीं इतर खंडकाव्येंहि अनेक प्रसिद्ध झालीं आहेत. दासबाबूंची वाङ्मयसेवा हें त्यांचें चिरकाल टिकणारें स्मारक होय, यांत बिलकुल शंका नाहीं.

## दासबाबू व उद्योगधंदे—

दासबाबूंची औद्योगिक कामगिरीहि अत्यंत संस्मरणीय अशी आहे. ( १ ) त्यांनीं ‘ झेनिदा रेल्वे सिंडिकेट ’ या स्वदेशी रेल्वे कंपनीसाठीं जबर मेहनत घेतली व भरपूर भांडवल मिळवून दिलें. याशिवाय हिंदुस्थान इन्शुअरन्स कंपनीचे अध्यक्ष व डायरेक्टर या नात्यानेंहि त्यांनीं कंपनीस भरपूर द्रव्यसहाय्य केलें. सध्यां कंपनी केवळ जिवंतच नव्हे तर भरभराटींत

आहे, याचें श्रेय सर्वस्वी दासबाबूंसच देणें जरूर आहे. ( २ ) एका हिंदी रसायनशास्त्रज्ञानें देशी 'वॉटरप्रूफ' कापड कसें तयार करावें याचा शोध लावला होता. त्याचें चीज कोणीहि करीत नाहीं, असें पाहून दास बाबूंनीं स्वतः 'नॅशनल डाय ॲंड वॉटरप्रूफ वर्क्स' नांवाचा एक कारखाना कलकत्त्यांत स्थापन केला. सदर कारखान्यांतील 'वॉटरप्रूफ' कापड बंगालमध्यें लोकप्रिय झालें असून, तें अखिल हिंदुस्थानांत असेंच लोकप्रिय होत जाईल, अशी आशा वाटत आहे. ( ३ ) दासबाबूंची तिसरी व सर्वांत महत्त्वाची औद्योगिक कामगिरी ह्मणजे 'फॉरवर्ड प्रेस' ची स्थापना ही होय! लोकमान्यांचें जसें 'केसरी' हें जिवंत स्मारक, तसेंच दास-बाबूंचें 'फॉरवर्ड' हें जिवंत स्मारक आहे. 'फॉरवर्ड'चें धोरण दासबाबू-सारखेंच धडाडीचें असून, सध्यां त्याचा खप दररोज ३० हजारांचे वर आहे.

**बंगालचा वाघ गेला !—**

अशा प्रकारें ४।५ वर्षें प्रचंड लोकजागृति केल्यानंतर दासबाबूंनीं ता० १६ जून १९२५ रोजीं आपला देह अकस्मात दार्जीलिंग येथें ठेविला. स्वराज्य-पक्षाचे अध्वर्यु व कलकत्त्याचे मेयर या नात्यानें केलेल्या प्रचंड कामगिरीचा त्यांच्या शरीरावर अनिष्ट परिणाम होऊन अखेरीस त्यांतच त्यांचा अंत झाला. एकादा तेजस्वी तारा नभोपटलावर चमकूं लागावा व आतां हा सूर्यासहि लाजवतो कीं काय, असे विचार सुरू होतात न होतात तोंच तो अचानक आकाशांतून गळून पडावा—अशांतलीच स्थिति दासबाबूंचे बाब-तींत झाली. ते गेलीं ४।५ वर्षें विद्युल्लतेप्रमाणें देशांत चमकले व विद्युल्लते-प्रमाणेंच अचानक अदृश्य झाले. त्यांच्या निधनानें अखिल स्वराज्यपक्षच काय, पण अखिल हिंदुस्थान देश पोरका झाला आहे. त्यांच्यासारखा करारी, निःस्वार्थी व धडाडीचा पुरुष निपजून त्यांचीं जागा भरून निघ-ण्यास कांहीं तरी वर्षेंच लोटावीं लागतील. त्यांचें शव दार्जीलिंगहून अंत्य-विधीकरितां कलकत्त्यांत आणल्यावर त्याजबरोबर चार लाख स्त्रीपुरुषांचा लोकसमुदाय आपल्या अनभिषिक्त राजाचें अखेरचें दर्शन घेण्यासाठीं हुगळी नदाकडे लोटला होता, यावरून देशबंधूंच्या असामान्य लोकप्रियतेची तात्काळ साक्ष पटते. "लोकमान्यांनंतर राष्ट्राला स्वराज्याप्रत नेऊं शकणारा असा हा एकच पुढारी होता" असे अर्थपूर्ण उद्गार बाबू अरविंद घोष यांनीं दासबाबूं-बद्दल काढिले आहेत. अरविंदांचे तोंडून निघालेल्या या एकाच वाक्यांत

देशबंधू दासांच्या अखिल चरित्राचें रहस्य भरलेलें आहे. लोकमान्यांस आपले गुरु मानणारा, महाराष्ट्रास बंधुवत् लेखणार, महाराष्ट्राचें तत्त्वज्ञान स्वराज्य-पार्टीची स्थापना करून अंमलांत आणणारा हा पुरुषव्याघ्र अचानक काळाच्या जबड्यांत सांपडल्यामुळें टिळकसांप्रदायाचें अपरिमित नुकसान झालें आहे. तथापि कै. लोकमान्यांच्या अनुयायांनीं या प्रसंगानें डगमगून न जातां, आपली सर्व शक्ति एकवटून आपल्या तत्त्वज्ञानाचें निशाण तसेंच फडकावीत ठेवणें जरूर आहे. दासबाबूंच्या मृत्यूमुळें " आतां आपला मार्ग निष्कंटक झाला" असें नोकरशाहीनेंहि समजण्याचें कारण नाहीं. या बाबतींत 'केसरी'नें दिलेला पुढील इषारा नोकरशाहीनें लक्षांत ठेवावा.

" दासबाबूंच्या मरणानें हिंदी राजकारणाची अपरिमित हानि झाली आहे व प्रत्यक्ष त्यांची जागा तावडतोब भरून निघणें आज शक्य दिसत नसलें तरी स्वराज्याच्या चळवळीला मोठासा खंड पडेल असें मात्र सरकारनें समजूं नये व तसें न समजण्याइतकें तें व्यवहारज्ञ आहेहि. युद्धामध्यें सेनापति लढतां लढतां पडला, व स्वर्गद्वारांतून वर नेण्याला आलेल्या विमानांत त्याला सत्कारपूर्वक बसविण्याकरितां त्याच्या सहकारी सैनिकांचा एक हात क्षणभर गुंतला गेला, तरी त्यांचा दुसरा हात शस्त्रांशीं संलग्न असाच असतो. त्यांची तरवार उपसलेलीच असते पण उजव्या हातांत उभी असावयाची ती निमित्तापुरती क्षणभर डाव्या कांखेंत आडवी राहते इतकाच फरक. पण तो उजवा हात मोकळा होताच फिरून ती तलवार स्वस्थानीं येतेच. देशबंधूच्या मरणामुळें काळानें दुरून एका बलाढ्य ढाणाईत बंगाली वाघाची शिकार साधली हें खरें. तथापि त्याच्या आसपास वावरणारीं बछडीं अनेक असून त्यांच्या अंगावर हात टाकूं पहाणाराला आपला जीव धोक्यांतच घालावा लागेल. बंगाली राजकारणाच्या गहन अरण्यांतील वाघांची खानेसुमारी घेणारा धाडसी ' एन्यूमरेटर ' अजून जन्मलेला नाहीं. आणि या ' सुंदर बनांत ' शिकार करण्याची हौस जरी नोकरशाहीच्या अनेक पारध्यांनीं आजवर फेडून घेतली असली, तरी बंगाल वाघांच्या कुळाचा क्षय झालेला नाहीं. काळ आला म्हणजे पुढारी त्याबरोबर ठेवलेलाच असतो. या न्यायानें हिंदी राजकारण, किंबहुना बंगाल्यांतील स्वराज्यपक्षहि क्षणभर झालेल्या अश्रुविमोचनानें आपलें खंडित झालेलें युद्धकर्म फिरून पूर्वीच्याच जोरानें सुरू करण्याला उभा राहील याविषयीं जनतेनें व सरकारनेंहि खात्री बाळगावी." २७७१

---

सुप्रसिद्ध पुढारी डॉ. मुंजे यांच्या अभिप्रायासह.

अगदीं नवीन ] संन्यास गीता. [ अगदीं नवीन

सार्थ व सविवरण

वैदिक धर्मांतल्या सर्व वर्णांतल्या व आश्रमांतल्या मनुष्यांस अनुष्ठेय असलेल्या प्रवृत्ति व निवृत्ति धर्माचें चर्चात्मक विवेचन पृष्ठसंख्या २०० प्रिन्सिपॉल वि. कृ. जोशी यांची प्रस्तावना. याज्ञवल्क्यांचा सुंदर फोटो. किंमत २ रुपये.

बळिराम जनार्दन आचार्य–पुणतांबेकर.
पुराणिकवाडी, दादर–मुंबई.

---

# इन्कमटॅक्स सुपरटॅक्स

नव्या कायद्याप्रमाणें सर्व प्रकारचे टॅक्सचे कामासंबंधाच्या अगर दुसऱ्या कांहीं माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा.

ह. ठोसर.
अकौंटंट.

४१ काळबादेवीरोड, मुंबई.

REFBK-0002711

# रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीक रु. ४; टुशी रु. ७; मगी रु. ४; नथ मोत्यांची रु ५; आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घड्याळाचा छेडा रु. ३.


केंस काळे करण्याचा साबण—यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्यांच्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं—हीं मोतीं हुबेहुब खऱ्याप्रमाणें असून, टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यांसाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

**मगनलाल के. आणि कं.**

अमृतवाडी, गिरगांव, मुंबई.

---



# आजचें नवें घड्याळ !

## रोल्ड गोल्ड रेल्वे (REGD)

घरपोंच व्ही. पी. सह

**चार रुपये चौदा आणे.**

गॅरंटी तीन वर्षे.

**लिचो वॉच कंपनी,**

(*India*) मुंबई नं. ४